श्री.

सुभाषित.

के. विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांनीं

आपल्या निबंधमाला मासिक पुस्तकाच्या

नवव्या सालचे अंकांत दिलेले सर्व एक-

त्र करून त्यांचें हें पुस्तक

चित्रशाळा छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

आक्टोबर १८८२

किंमत चौदा आणे.

सुभाषित.

सुभाषितेन गीतेन युवतीनांच लीलया ॥
यस्य न द्रवते चित्तं सवै मुक्तोऽथवा पशुः १

सुभाषित गायन, आणि तरुण स्त्रियांच्या लीला, या निर्दोन ज्याचें मन न-
न होऊन जात नाहीं, तो एक जीवन्मुक्त योगी समजावा किंवा पशु समजावा!"

गीर्वाणा वाणीषु विदिताबुद्धिस्त्वयापि भाषांतर लोलुपेहे ॥
यथा सुराणां सुधया च सत्वं स्वर्गांगनानामधरासवे रुचिः २

" संस्कृत भाषेकडेच तुझी सारखा ओढा आहे, तरी इतर भाषांविषयींही-
ण मला उत्कंठा आहे; जसे स्वर्गांच्या देवांस सादर करण्यास चंद्राचें अमृत असतां
ा अप्सरांच्या अधरांचें मद्यही त्यांस आवडतें! "

सायं नायभुवेनि वासरमणिश्चंद्रो न चंद्रद्युतिः ।
दावाग्निः कथमेवं किमशनिः स्वच्छांबरीक्षे स्थितः ॥
हंतेदं निरणायि पांथरमणीप्राणानिलाद्राद्रया ।
भावद्धोरविभावरीविषधरीभोगस्य भीमो मणिः ३

कालिदास—शृंगारमाष्टक.

जिचा नवरा प्रवासास गेला आहे अशा कोणी विरहिणी चुकत्याच उगवले-
ल्या पूर्णिमेच्या चंद्रास बघून उन्मादावस्थेत त्याबद्दल उन्मेषा करते——

" आतां संध्याकाळ झाला आहे, तेव्हां हा खचीत सूर्य उगवलेला नव्हे;—बरें,
जर चंद्र समजावा, तर याचापासून संताप होतो हें कसें? — रात्रीतील वणवा समजावा,
तर तो आकाशांत कां? — अशनि* समजावा, तर हा स्वच्छ निरभ्र आकाशांत आ-
हे! तेव्हां वरील कल्पना कोणतीच बसत नाहीं;— पण हां समजलें! पांथांच्या स्त्रि-
यांच्या प्राणरूप वायनें [illegible] या आशेनें रात्रिरूप घोर सर्पिणी धांवत

* 'अशनि' म्हणजे 'वज्र'

ण शब्द स्त्रीलिंग असल्यामुळें तो वर घातला आ-
ला नाहीं.

येत आहे, तिच्या शिरावरचा हा भयंकर मणि हिसकावून आणला आहे !! "*

जटा नेयं वेणीकृतकचकलापो न गरलं
गले कस्तूरीयं शिरसि शशिलेखा न कुसुमं ॥
दृषं भूतिर्नेत्रे मिषदहिरहज्वाभ्रवलिमा
पुरारातिस्त्रीणां कुसुमशर किं मां व्यथयसि ४

कोणी विरहिणी पदनाम उद्देशून म्हणते—

"हे मदना! शिवाच्या स्त्रीनीने मजवर का व्यर्थ प्रहार करतोस? अरे, ही जटा नव्हे, तर केसांची बांधलेली वेणी होय; हे गळ्याभोवती विष नव्हे, तर कस्तूरीचा लेप आहे; शिरी चंद्राची कोर नव्हे, तर पांढरे फूल आहे. नेत्रास भस्म फासलेले नव्हे, तर पतीच्या विरहामुळे आलेला पांढरेपणा होय."

आघ्राणं मणिचुंबितं मणिमुहुर्लीढंच यच्चर्वितं
क्षिप्तं वा यदि नीरसेन कृपिते नात्र व्यथां मा कृथाः ॥
हे माणिक्य तवैव तच्च कुशलं यद्वानरेणामुना ;-
प्यंतस्त्वन्निरूपणव्यसनिना चूर्णीकृतं नाश्मना ५.

एका वानराच्या हातीं सदन माणिक लागले असता त्याणीं नाना तऱ्हेच्या चेष्टा करून त्याची त्याने दुर्दशा केली. ते पाहून कोणी त्या माणिकास उद्देशून बोलतो-

"हे माणिका! या वानराने तुला हुंगून, तुझे पुनःपुनः चुंबन करून, तुला वारंवार चाटून, तुला चावून, तुझी योग्यता न जाणता गळ्यातून दूर फेकून दिले, याचा तूं खेद मानू नको! का नर, हे तुझे भाग्यच मोठे की, ज्ञान काय आहे ते पाहण्याकरिता रागेत येऊन त्याने तुझा चुराडा करून सोडिला नाही !"

ही अन्योक्ति आहे. कुपरीसकाची गांठ पडली असता धडपणी सुटून आले असतांच जोडी मिळविली म्हणून समजावें!

अद्यापि दुर्निवारं स्खलितिकन्या वहति कौमारम् ॥
सद्भ्यो न रोचते सा ऽसंतोऽप्यस्यै न रोचंते ॥ ६ ॥

गोवर्धनाचार्य— सप्तशती.

* "सुनि हीव कोणी कन्या ही मयाः
का चवती कोण्या पुलकोनात पद पावरून मयीत

गडे: तिचें मयावेंच को-
मनेरी पावरून समजेल.

ठें नमन नाहीं!— जे निला आवडतात ते निला पन्करीत नाहींत: व ज्यांस ती आवड ते ते निला नकोत!"

याजे जे थोर पुरुष स्वतांस वास्तविक पाहूं असतात त्यांस आपली महांसा कोणीं केलेली आवडत नाहीं: पण अंगीं कांहींच योग्यता नसूनही जे आपली खोटी बोहोकरे मिरवूं पाहतात त्यांची कोणींच स्तुती करीत नाहींत. उलटा त्यांचा उपहास मात्र होत असतो:— थोरल्यांत खरोखर अर्थ लिहिण्याची आवाघांची शक्ति आहे!

नहात्मपोभिः शमयंति देहं बुधा मनः सर्वविकारहेतुं ॥
श्वा पुरुषमभ्रं दशनैर्दशति मोक्षारमुद्दिश्य क्षिपति लिष्टः७

" जे अज्ञान असतात ते तपश्चरण करून देहाचें शमन करतात; पण ज्ञाते पुरुष सर्व विकारांचें मूळ जें मन त्याचेंच दमन करतात. यास दृष्टांत. कुत्र्यावर जर बाण टाकला तर ते त्या बाणास च मारावें चावूं लागेल: पण सिंह बाण सोडणाराचर झेंप घालून त्यास ठार करून टाकील " यावरून, कर्ममार्ग गौण; ज्ञानमार्ग श्रेष्ठ होय!

वाक्माधुर्यान्नान्यदस्तिप्रियत्वं वाक्यारूढ्याद्योपकारोऽपिनष्टः॥
किंनद्रव्यं कोकिलेनोपनीतं को वा लोके गर्दभस्यापराधः॥८॥

" मधुर भाषणा मधाणें लोकांस वश करणारे कांहीं नाहीं; व कर्कश भाषणानें केलेल्या उपकारासही कोणी विचारीत नाहीं. यावरून, कोकिल कोणास काय द्रव्य आणून देतो? व गाढव कोणास काय उपद्रव करतें?" पण पहिला केवळ गोड वाणीनें सर्वांस प्रिय होऊन राहिला आहे: व दुसरा साऱ्या जन्मभर लोकहितार्थ खपत असतांही एका हाड भोरड्यानें सर्वांच्या तिरस्कारास पात्र झाला आहे!

खलसख्यं साधुमधुरं वयोऽतराले निदाघदिवसंते॥
एकाऽदिमध्यपरिणतिरमणीया साधुजनमैत्री॥९॥

" दुष्टांची मैत्री पहिल्यानें गोड वाटते; मनुष्याचें सायुष्य मध्यकाळीं, म्हणजे तारुण्यांत; आणि उन्हाळ्याचा दिवस शेवटीं, म्हणजे संध्याकाळीं. पण आरंभीं, मध्यें, व शेवटीं अशा त्रिवेणीकाळीं रमणीय अशी एक सज्जनांची मैत्री मात्र! "

ऊर्णा नैव विभर्तिनैव विषयो रौद्रस्य गाढस्य वा ।

नृपिर्नास्य महोदरस्य बहुभिर्धामैः पलालैरपि ॥
हा कष्टं कथमस्य पृष्ठजिन्वं गोणी समारोप्यते ।
को गृण्हाति कपर्दकैरलमहो याभ्यैर्गजो ह्रास्यते १०

गांवढळ लोकांस इतकी कोडद पाहात असावी? त्यांनी तो नव्यानेच पाहिला असता तो त्याचा उपहास करतात:—

"अहो! काय हो विलक्षण पशु हा! याच्यापासून कोणत्याच कामाचा नाही; दुधही मिळावयाचें नाही; कीं बसायाच्याही हा उपयोगी नाही! याचें केवढें हो हें पोट! गवत कोंडा यांचे दोनचे दोनही याला पुरेसे होणार नाहीत! — असो हें ही राहूं द्या; ओझ्याला अक्षम असून पेलता यावे तरी या धुडाच्या पाठीवर गोणी हो कोणी चढवावी! — तें! याला पेंढून काय करावा कोणी दोन कवडयांचाही याला पुसणार नाहीं!!"

कम्बुं मोहिनलोचनाम्यचरणौ हंसः कुतो मानसात्।
किं नन्वस्ति सुवर्णपंकजवनान्यंभः सुधासन्निभम् ॥
रत्नानां निचयाः प्रवालशकलिका वैदूर्यगोटाः क्वचित्
शंखूका नहि संति नेति च बकैरेकैकमुर्व्यां हाहाकृतम् ॥११॥

एका रवक्यानीं बगळ्याची मंडळी बसली असतां तेथें एक हंस आला; त्यास ते हालहवाल विचारतात.—

"अरे! तुझे डोळे, नांदण पाय निरखीत आहेत असा तूं कोण पक्षी? हंस उत्तर देतो—'मी हंस.' 'कोठून आलास?'—'मानस सरोवरापासून.' 'तेथें काय काय असतें?'— 'कोठें सोन्याची कमळे, कोठें अमृतासारखें गोड पाणी, कोठें रत्नांचे समुदाय, कोठें पोवळ्याच्या वेली, व कोठें पाचूचे अंकुर, असे जागोजाग आहेत.' 'बरें, पण किड्यांच्या शिंपा आहेत काय?'— 'नाहींत' 'नाहींत ना! मग आहे काय तर नेथें?' असें ऐकून सर्वांनीं हा-हा-हा-करून त्याचा उपहास केला."

यानस्नान समस्त पावकविधौ नैरायसे सर्वथा ।
यद्वा विक्रमशालिवाहनमही भृत्भुंज भोजादयः ॥
अस्मिन्निरजीविनो न विहिता ये विश्वजीवानवो ।

मार्कंडिधुवलोमशामभृतयः सृष्टाः मम्भूतायुषः ॥१२॥

कोणी याचक ब्रह्मदेवास म्हणतो—

" बापा ब्रह्मदेवा! आमच्या याचक मंडळांनीं तुझें मोठें वैर आहेसें दिसतें! कां नल, विक्रम, शालिवाहन, भुंज, भोज इत्यादि जे जगाचा भार वागविणारे उदार राजे त्यांस चिरंजीव करण्याचें टाकून मार्कंडेय, ध्रुव, लोमश, इत्यादिकांस— कीं ज्यांपासून कोणास कांहीं लभ्य नाहीं, अशांस मात्र आयुष्याची रगाडी करून देविली आहेस! "

भद्रं कृतं कृतं मौनं कोकिलैर्जलदागमे ॥
दर्दुरा यत्र वक्तारस्तत्र मौनं हि शोभनम् ॥१३॥

कवी म्हणतो— " पावसाळ्याच्या दिवसांत कोकिल मौन धरतात हें फार चांगलें करतात; कारण, तेथें बेडूक बके आले तेथें कोकिलांची काय शोभा राहिली! " सारांश, मूर्ख लोकांच्या समाजांत पंडितास मौनच उचित होय.

नयं काका वयं काका इति जल्पंति वायसाः ॥
निर्विशेषे ध्वनौ मोहं तुः शंकाऽनंकितमानसाः ॥१४॥

चोरट्या गर्भी कावळे ओरडतांना पाहून कवी त्या ओरडण्यावर उत्प्रेक्षा करतो— " कावळे का— का— का— असें ओरडतांना ते चंद्राला असें सांगतात कीं, ' काकाः! काकाः! ' (आम्ही कावळे! आम्ही कावळे!) आम्ही अंधकार नाहीं! नाहींतर अंधकारावरोबर आमचेही कांहीं काढतील! "

सूकर सिंह संवाद.

सूकरः— दंता व्याघ्रा जिताः पूर्वं सप्त सिंहास्त्वयो गजाः ।
पश्यंतु देवताः सर्वा अद्य युद्धं त्वया मम ॥
सिंहः— गच्छ सूकर! भद्रं ते ब्रूहि सिंहो मया जितः ।
पंडिता एव जानंति सिंहसूकरयोर्बलम् ॥१५॥

एका डुकराची आणि सिंहाची गांठ पडली. तेव्हां डुकर सिंहास म्हणतो—
" अरे! मीं पूर्वी दहा वाघ, सात सिंह, आणि तीन हत्ती जिंकले. आज तुझी बरी गांठ पडली! होऊंदे युद्ध! सर्व देवता तें आज पाहोत! "

शिवानें उत्तर केलें — " अरे दुष्टा! तूं खुशाल ऐस, मी जातों. तूं हवें तर वर्षास मागून घे. मी शिव्याप शिवीनें. परिणाम शिव्याचे व दुष्टपणाचे वळ किती असतें तें दाखव मात्रेच!"

विद्या विवादाय धनं मदाय शक्तिः परेषां परिपीडनाय ।।
खलस्य साधोर्विपरीतमेतन् ज्ञानाय दानाय च रक्षणाय १६

पूर्व ब्राह्मण या वर्णाचे अंतर :— " पूर्वीं विद्या मान झाली. कीं तो ज्याची त्याची वादाला उभा राहतो; धन मिळालें कीं गर्वानें नाचूं लागतो; अंगीं सामर्थ्य असलें. कीं दुसऱ्यास पीडा करूं लागतो. हा पूर्वीचा प्रकार झाला. आतां ब्राह्मण्याचा ऐका; तो बऱ्याच्या अगदीं उलट:— म्हणजे विद्येचा उपयोग तो ज्ञान सांगतो; धनाचा दान, व शक्तीचा दुर्बळांचें रक्षण. "

अपूर्वः कोऽपि कोषोऽयं विद्यते तव भारति ।।
व्ययतो वृद्धिमायाति क्षयमायाति संचयात् १७

" हे सरस्वति! तुझें भांडार मोठें विचित्र आहे. त्याचा जो जो खर्च करावा, तो तो नें वाढत जातें; व जों जों साठवून ठेवूं लागावें, तों तों तें कमी होत जातें!"

यस्यादासीत्कुमारः कुवलयदलवल्लोलयोर्बाहू गंगा ।
वामा यस्यांगसंगा पिहितजनचयो यो गवाद्रिध्वजोऽपि ।।
लंकेशाद्येकनाथो हिमकरशुचिभृद्विशेषाश्रयोऽसौ ।
वर्णस्यायस्य लोपादपहरतु हरिः पातकं वः स्मरारिः १८ *

या श्लोकांत विष्णूचे व शिवाचें वर्णन आहे. तुमचा श्लोक घेतला तर शिवाचें व पहिलें अक्षर काढून टाकलें असतां नेमकें विष्णूचें वर्णन होतें:—

" ज्याचा सुत कुमार (कार्तिकस्वामी, मार (मदन)) झाला; ज्यानें कमलपत्रा समाणें भूषणार्थ (पत्नी— सहज) गंगा धारण केली आहे (गां— पृथ्वीनें (वराहावतारीं) धारण केली): ज्यानें वामा म्ह० पार्वती अर्द्धांगीं धरिली आहे (मा - लक्ष्मी ज्याच्या जवळ आहे); ज्याचा ध्वज गवीद्र म्ह० नंदी (वीर— गरुड) आहे: जो लंकेशादिकांचा म्ह० रावण, बाणासुर इत्यादिकांचा (पत्नी - नमदेवादिकांचा) ए-

---

* या श्लोकांतील अर्धा पूर्व बरोबर समजत नाहीत. पण कांहीं चाचरोष पण्डित की काय न कळे.

क. नाथ होय: त्यानें चंद्राची कोनि (मस्तकावर) धारण केली आहे, व जो पर्वतावर - (हिमाचलावर) असतो (पर्वी - समुद्रांत असतो): तो शिव (आणि विष्णु) तुमच्या पातकांचें हरण करो. "

स्वर्धुनि तव महिमानं वक्तुमनीशाः फणीशोऽपि ॥
विनरसि यत्पदमच्युतमच्युतपदविच्युताऽपि त्वं १९

कवी गंगेस म्हणतो —— " हे स्वर्गनदि! तुझा महिमा महस्मपुरुष जो शेष त्याच्यानेंही वर्णवणार नाहीं! कां कीं, तूं स्वतः अच्युतपदापासून (विष्णूच्या पायापासून), पडली आहेस तरी अच्युत पद (अढळ स्थान) देतेस! "

गुरुरेकः कविरेकः सदसि मघोनः कलाधरोऽप्येकः ॥
मदुनसत्र सभायां गुरवः कवयः कलाधराः सर्वे २०

कवी कोणा राजाची सभा वर्णितो —— " इंद्राच्या सभेंत गुरु (बृहस्पति) एक, कवि (शुक्राचार्य) एक, आणि कलाधर (चंद्र) हीं एकच; पण या सभेंत पहा! सर्व पंडित गुरु, कवि आणि कलाधर (कलांत निपुण) आहेत! "

भारतं चेक्षुदंडं च कलानाथं च वर्णय ॥
कालिदासः कविर्ब्रूते मतिपर्व रसावहं २१

भोजराजानें कालिदासास म्हटलें, " कविराज! भारत, इक्षुदंड (ऊंस), आणि चंद्र, या तिहींचें एकदम वर्णन करा. " कवीनें उत्तर केलें —— " तिहींचा रस मतिपर्वी चढतो. "— ' पर्व ' शब्द श्लिष्ट आहे; त्याचा पहिला अर्थ मतिसंबंधी आहे, दुसरा ' पेर, ' आणि तिसरा ' पर्वणी. '

विद्यायां दुर्मदो यस्य कार्पण्यं विभवे सति ॥
तेषां दैवाभिज्ञानानां सलिलादग्निरुत्थितः २२

" ज्यास विद्येपासून दुर्मद म्हणजे दुष्ट गर्व आणि संपत्तीपासून कृपणपणा जडतो, त्यास दैवानें शापच दिला असें समजावें! पाण्यापासून अग्नि निघून जसा मनुष्य भाजावा, त्याप्रमाणेंच वरील दोषां हतभाग्यांची स्थिति होय! "

असाधुः साधुर्वा भवति खलु जात्यैव पुरुषो।
न संगाद्दौर्जन्यं नच सुजनता कस्यचिदपि ॥
परूढे संसर्गे मणिभुजगयोर्जन्मजनिते ।
मणिर्नाद्दे दोषान् स्पृशति नच सर्पो मणिगुणान् २३

"पुरुष जो सज्जन किंवा दुष्ट होतो तो जातीनेंच असतो; दुसऱ्याचें दौर्जन्य किंवा सौजन्य कोणास संगतीनें लागत नाहीं. पहा कीं, सर्प व त्याच्या शिरांचा मणि यांचा सहवास साऱ्या जन्मभर असतो; पण त्या रत्नास सर्पाचे दोष लागत नाहींत. व सर्पासहि रत्नाचे गुण लागत नाहींत."

हे दारिद्र्य नमस्तुभ्यं सिद्धोऽहं त्वत्प्रसादतः॥
पश्याम्यहं जगत्सर्वं न मां पश्यति कश्चन २४

कोणी दरिद्र कवि दारिद्र्यास उद्देशून मोजणें असतो:—"हे दारिद्र्या! तुझ्या कृपेनें मी सिद्ध झालो आहें! कसा असशील तर मी सर्व जगास पाहत असतों मला कोणी पाहत नाहीं!" तात्पर्य हें कीं, गरीब मनुष्यास कोणी पुसत नाहीं.

इतरपापफलानि पथेच्छया विनय नानि सहे चतुरानन ॥
अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख २५.

"हे ब्रह्मदेवा! मीं जीं पातकें केलीं असतील त्यांचीं इतर फलें तूं मला खुशाल दे, मीं ती सोशीन पण एकमात्र माझ्या कपाळीं नको — नकोच लिहूं. तें येवढें दुःसह कां? — अरसिकांपाशीं कवित्वनिवेदन, म्हणजे कवितेचा रस समजून देणें!" आमच्या वाचकांपैकीं कोणासही वरील श्लोक न लागो म्हणजे झालें!

परिचरितव्याः संतो यद्यपि कथयंति नो मदुपदेशं ॥
यासेषां सैरकथास्ता एव भवंति शास्त्राणि ॥२६॥

"सत्पुरुषांनीं साक्षात् उपदेश जरी केला नाहीं, तरी त्यांच्या सहवासानें नेहमीं असावें; कां कीं, त्यांचें जें सहज बोलणें तें सुद्धां गोडें अर्थयुक्त असतें!"

तावन्मौनेन नीयंते कोकिलैश्चैव वासराः ॥
यावत्सर्वजनानंददायिनी वाक्समवर्तते ॥ २७ ॥

" कोकिल नों वर्षेन मौनच धरून दिवस घालविनात, कां नोवर्षेन सर्व जनां-स आनंद देणारी वाणी त्यास प्राप्त झालेली वसते! " हा अन्योक्ति आहे. तोवर्षे-न तो कांतमौनेषणा मिरविण्याचा हाकि आपलेठायीं आली वसते. तोवर्षेन च-तुरपुरुष असमिरूच गहनात

परिपीय यदच्छं नदीय वचनानि स्वबलयन्नुपागतोऽसि ॥
यचिनं तदिदं मुकुंदसख्ये रमना बिंबफलेन जाड्यमेनि ॥ २८ ॥

गर्वेच्या घरून आपण करे आलेल्या कृष्णास सत्यभामा म्हणते—" हे मुकुंदा! निच्या अधरचे पान करून तू मजकरे यावा आदरस हे मा समजत! कशावरून त्यानशीब. तर तुम्ही सदरचणावरून व फलतेच बोलण्यावरून! तोउल्यानें तास जड होते हे सर्वांस माहीत आहे! "

एकं वस्तु द्विधा कर्तुं बहवः संति धन्विनः ॥
नयधनुरस्मगे धन्वी देवमेकांकुशेन यः २९

कोणी कवि महणतात्र अयाचे वर्णिता [illegible] कृष्णा तेन करणारे दु-रुस्त धनुर्धर आहेत. पण दुर्जेपण मोडून टोकांस एक करणारा असा धनुर्धर एक कामच! "

संगमविरहविकल्पे वरमिह विरहो न संगमस्तस्याः ॥
संगे सैव यदेका त्रिभुवनमपि तन्मयं विरहे ॥३०॥

" निश्चयाची (आवडत्या स्त्रीची) संगम किंवा विरह यांतून तुला कोणतें हा-वें म्हणून जर मला कोणी विचारलें, तर मी विरह बरा, संगम नको असें सांगेन! का कीं. समागम झाला असतां ती एकटीच मला मिळणार; पण जर विरह घडला, तर अवघ्या त्रिभुवनांत ती मला जिकडे तिकडे दिसेल! "

बंधनानि खलु संति बहूनि प्रेमरज्जुकृदबंधन-माहुः ॥
दारुभेदनिपुणोऽपि षडंघ्रिर्निष्क्रियो भवति पंकजकोशे ३१

" बंधनें अनेक आहेत स्त्रीं; पण सर्वांत प्रेमबन्धनें बंधन अत्यंत दृढ होय. पहा बरें! अपर हा वाक्यांची ओळखें फोडून काढतां. पण त्यामध्यांच्या गाभ्यांत त्यांचें कांहीं चालत नाहीं!"

जानःस्त्यं न जघाद कंठीरवकिशोरकः ॥
चक्रव्यौपारयामास कुंजे कुंजरवालिनि ३२

" सिंहाचा बच्चा गजमांच मारूंचे दुध प्याला नाहीं असल्यारे कुंजी करे त्यांचें हृदि फंकली! "

गृह्णात्येष स्त्रियाः शिरःपरिचितं कर्षत्यसौ वाजिनं।
नीत्वा वर्म धनुः प्रयाति पुरतः संग्रामभूमावपि ॥
यूनं वीर्यकथां तथाच शपथं कुर्यान्च वामः करो ।
दानानुद्यमनो विरोध्य विधिना शौचाधिकारी कृतः ३३

एके समयीं कोणा एका राजाचे दोन्ही हात धरून दोघे कवी फिरत होते. तेव्हां एकेकानें आपआपल्या दानाचें वर्णन आरंभले. डावा हात धरून जो चालला होता तो ह्मणाला:— " हा हात शत्रूचे शिर धरतो. तसेच घोड्याचा लगाम धरून त्याम मदकालांत नेतो. आणि रणभूमीवर ढाल किंवा धनुष्य घेऊन हाच चालतो.-इतकेंच नव्हे तर उजव्या हाताचे अवगुणही यांत नाहीत— हा डावा हात न द्यूत खेळत नाहीं. चोरी करीत नाहीं अथवा शपथही घालत नाहीं." दुसऱ्या कवीनें हें सर्व ऐकून घेतलें. आणि शेवटचें उत्तर केलें कीं " हें सर्व खरें. पण दानकर्मास हा अयोग्य जाणून विधात्याने त्याची योजना— करून केला आहे." हा श्लोक एरवी फार उत्कृष्ट आहे; पण शेवटल्या पदाच्या अस्मीलत्वानें याची थोडीशी खराबी झाली.

तिर्यक्कां भजतु मनारयतु वा धर्मक्रियाकोविदं ।
हंतु स्त्रां जननीं पिबत्वपि सुरां सुद्धां वधूमुद्वहतु ॥
वेदाम्निंदतु वा हिनस्तु जननीं किंवाऽनया चिंतया ।
लक्ष्मीर्यस्य गृहे स एव भजति प्रायो जगत्पूज्यतां ३४

हा श्लोकांत विष्णुच्या दहा अवतारांस उद्देशून कवीनें असें मोजेनें रात्रवि-

ने माहे की. मनुष्यापाशीं संपत्ति असली म्हणजे विद्या आहे सारे अवगुण लपून जाता
ने ---- " मनुष्य मनुष्यापासून कधीं फसे. धार्मिक मनुष्यास बाहेर त्यास तोंडघशीं पाडो,
अपल्या आईला वधकरणे अगदान करे विश्वास राकून देवो, वेदांची निंदा
करणे सोकाय मागे.-- कोही करो, त्यापाशीं असली (पक्की, संपत्ति) असली म्हण-
जे लगाम नो पूल्य (पक्की, आदरणीय पात्र) आवश्यक !"

गुरवो बहवः संति शिष्यवित्तापहारकाः ॥
दुर्लभः स गुरुर्लोके शिष्यचित्तापहारकः २५

" शिष्याच्या चित्ताचे अपहरण करणारे गुरु पृथ्वीच्या पाठीवर पुष्कळ आहे-
त; पण असा गुरु थोडा सांपडतो की जो शिष्याच्या चित्ताचे अपहरण करतो! "

सुखार्थी चेत्त्यजेद्विद्यां विद्यार्थी चेत्त्यजेत्सुखं ॥
सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखं २६

" ज्याला सुख पाहिजे तेंने हवी असेल त्याने विद्या सोडून द्यावी; व ज्याला
विद्या हवी असेल त्याने सुख सोडून द्यावे. कारण ज्याला सुख हवे त्याला विद्या को-
ठची? व ज्याला विद्या पाहिजे त्याला सुख कोठचे? "

अर्थानुरागो न पिता न बंधुः कामानुरागो न भयं न लज्जा ॥
क्षुधानुरागो न बलं न तेजः-स्त्रिनानुरागो न सुखं न निद्रा २७

" पैशाकरता जे लोकांच्या मुलगा मुलगाकरणाचा त्यांस बाप नाही व भाऊही
नाही. जे कामांध झाले त्यांस भय नाही व लज्जाही नाही; जे तेहेमी बुभुक्षित भ-
सणार त्यांस बल नाही व तेजही नाही; आणि जे चिंतेने व्यापले त्यांस सुख नाही
व निद्राही नाही. "

कृमिर्नो वा कीटः समजनि न भेदः मयमनः ।
ततो द्विभ्यैर्मासैर्मनुज इति जग्राह हृदयम् ॥
ततोऽसौ मन्मेयानहमपि तदीया मियतमा ।
क्रमाद्वर्षे मासे मियतमभयं ज्ञानमखिलम् ॥२८॥

कोणी तरुण स्त्री माझ्या मनाच्या निरनिराळ्या वृत्ति आपल्या सहवासे मि-

देवत करितें — " जेव्हां माझा पतिव्रतानें योग्य पहिली तेव्हां कोन (नवरा) की कोन (पण) यांत मला भेद वाटत नसे; पुढें दोन तीन महिन्यांनीं तो आपल्या सारखाच मनुष्य आहे असें मला वाटूं लागलें; त्यानंतर तो माझा प्रियकर आणि मी त्याची आवडती स्त्री असें माझ्या बुद्धीस वाटूं लागलें; आणि हळूं हळूं वर्ष होत आलें तेव्हां तर सर्व त्रिभुवनांत तो मला दिसूं लागला !"

राम मत्स्य संवाद.

रामः— पश्य लक्ष्मण पंपायां बकः परमधार्मिकः ॥
शनैर्पुंचानि पादाग्रं मीनां वधशंकया ॥
मत्स्यः— सहवासी विजानाति सहवासिविचेष्टितं ॥
बकं किं वर्ण्यसे राम येनाहं निष्कुलीकृतः ३९

राम व लक्ष्मण सीतेचा शोध करीत करीत पंपासरोवराशीं आले तेव्हां तेथील अपूर्व शोभा पाहून अगदीं राम लक्ष्मणास म्हणतो :— " हे लक्ष्मणा! पहा, या पंपासरोवरांत बगळेरूपी केवढे धार्मिक आहेत तें! तो बगळा पहा; पायांचा- हीं एखादा जीवजंतु चिरडेल या शंकेनें कसे हळूं हळूं पाय टाकतो आहे तें!"

हें भाषण ऐकून एक मासा रामास म्हणतो:— " हे राम! कोणाची वागणूक कशी आहे हें त्याच्या शेजाऱ्यास पुसावें! भर. तूं या बगळ्यास मोठा धार्मिक. मोठा हिंसाभीरु म्हणून मानतोस! यानेंच माझें कुळ चट खाऊन टाकून मला एकटें ठेवलें ना!"

हा संवाद रामायणांतलाच आहे किंवा दुसऱ्या कोणी कवीनें केला आहे कोण जाणें? पण कोणताही असला तरी हा फार बहारीचा आहे यांत संशय नाहीं. यांत एकंदर त्या काव्यप्रसिद्ध रम्य सरोवराचें थोडक्यांत मजेदार वर्णन आहे; आणि शिवाय मनुष्य आपल्याच हृदयवृत्तींवरून दुसऱ्यांच्या वृत्तींचे मान नेहमीं कसें करीत असतो यावेंही हें खुबीदार उदाहरण होय. तसेंच या पद्यांची रचनाही अगदीं साधी असून सुंदर असल्यामुळें मागें सांगितलेल्या अनुप्रास काव्याचाच हाही आणखी एक मासला होय.

अनंतरत्नप्रभवस्य यस्य हिमं न सौभाग्यविलोपि जातं ॥
एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोः किरणेष्विवांकः ४०

कुमारसंभव. १

कालिदास हिमालयाच्या वर्णनांत म्हणतो:— "या पर्वतांत अगणित रत्नें निपजतात. यास्तव यावर जरी चोहोंकडे बर्फ पडलें आहे तरी येवढ्यानेंच याच्या रम्यतेची हानि होत नाहीं; कां तर ज्यामध्यें चंद्राच्या मध्यें त्याचा डाग लपून जातो. त्यामध्यें गुणांच्या समुदायांत एक दोष लोपून जाऊन दिसेनासा होतो."

याच्यावर दुसऱ्या एका कवीनें कोटी केली आहे:—

एको हि दोषो गुणसन्निपाते निमज्जतींदोरिव यो बभासे ॥
नूनं न दृष्टं कविनाऽपि तेन दारिद्र्यदोषो गुणराशिनाशी ४१

हा कवि दरिद्री असावा असें दिसतें. तो म्हणतो:—

"'गुणसमुदायांत एक दोष लपून जातो' इत्यादि ज्यानें लिहिलें त्याच्या नजरेंतून स्वतः कवि असतांही[+] येवढें चुकलें असावें कीं, एक दारिद्र्यदोष असला म्हणजे तो सर्व गुण लोपवून टाकतो!" तस्मात् वरील नियम सर्वथैव व खरा म्हणता येत नाहीं.

पृथ्वी नावदियं महत्सु महती तद्वेष्टनं वारिधिः ।
पीतोऽसौ कलशोद्भवेन मुनिना स व्योम्नि खद्योतवत् ॥
तद्विष्णोः परमं पदं कलयतः पूर्णं पदं नाभवत् ।
सोऽपि त्वद्धृदि वर्तते खलु भवंस्त्वत्तः परः को महान् ४२

कोणी कवि कोण्या भगवत्परायण साधूस म्हणतो:— "हे महापुरुषा! तुझ्याहून थोर कोण आहे?— कसें म्हणशील तर पहा. ही पृथ्वी अगोदर मोठ्यांत मोठी म्हणजे फार विस्तीर्ण आहे; तिचें वेष्टन समुद्र; त्या समुद्रास ज्यानें पिऊन टाकिलें तो अगस्त्य मुनि[†] आकाशांत केवळ काजव्यासमाणें आहे; तें येवढें अवाढव्य आकाश विष्णूच्या एका पावलास पुरलें नाहीं; पण येवढा व्यापक परमेश्वर असतां तो तुझ्या हृदयांत वास करतो! तेव्हां तूं केवढा मोठा!!" या अलंकारास संस्कृतांत सार व इंग्रेजींत Climax म्हणतात.

अर्थो गिरामपिहितः पिहितश्च कान्त्या ।

+ "ने न देखे रवी। वे देखे कवी॥" अशी मराठींत म्हण आहे.

† (अगस्ति) नाम दक्षिण गोलार्धींच आहे. तो या दिवसांत संध्याकाळीं दक्षिणेकडे दिसत असतो.

सौभाग्यमेति मरहट्टवधूस्तनाभः ॥
नो गुर्जरीस्तन इवातिनरां निगूढो ।
नांधीपयोधर इवातिविघट्टिताभः ४३

जगन्नाथराय.

कविनेचा अर्थ कसा असावा याविषयीं पंडितराय लिहितात:——

"मरहट्ट (मारवाडी) स्त्रियांच्या स्तनाप्रमाणें जेव्हां काव्याचा अर्थ घट्ट व दा नाहीं घट्ट आंकलेलाही नाहीं असा असतो, त्यावेळेस फार शोभतो; पण जेव्हां गुर्जरीस्तनाप्रमाणें तो अत्यंत गूढ असतो, किंवा* आंध्रीस्तनाप्रमाणें अगदीं उघड असतो, तेव्हां तो तसा शोभत नाहीं."

कल्यानःक्रूरकेलिः कनुकदनकरः कुंदकर्पूरकांतिः ।
क्रीडन् कैलासकूटे कलित कुमुदिनीकामुकः कोनकायः॥
कंकालक्रीडनोत्कः कलितकलकलः कालकाल्पाकलत्रः ।
कालिंदीकालकंठः कलयतु कुशलं कोपि कापालिकोनः ४४

"तो योगिश्रेष्ठ आमचें कल्याण करो — जो कल्याणीं भयंकर क्रीडा करतो. ज्यानें पत्नीचा (दक्षाच्या) विध्वंस केला, ज्याची कांति कुंदपुष्पाप्रमाणें व कापुराप्रमाणें आहे, जो कैलासाच्या शिखरावर क्रीडा करतो, ज्यानें चंद्र धारण केला आहे, ज्याचें शरीर सुंदर आहे, जो (स्मशानीं) पत्नीसमवेत रमतो, जो अट्टहास करतो. ज्याचें कलत्र काळी नी काली नी होय, आणि ज्याचा गळा यमुनेप्रमाणें काळा आहे." या श्लोकाचा भाग स्पष्ट नाहीं.

स्वचिद्वीणावाद्यं क्वचिदपिच हाहेति रुदितं ।
स्वचिद्विद्वद्गोष्ठी क्वचिदपि सुरामत्त कलहः ॥
स्वचिद्गम्या रामाः क्वचिदपि गलत्कुष्ठवपुषो ।
न जाने संसारः किममृतमयः किं विषमयः ४५

कवि संसाराची सुखदुःख विचित्रता वर्णितो:- "अहो! हा संसार विषमय आहे कीं अमृतमय आहे याचा मला निश्चय होत नाहीं! कोठें पहावें तों संसार सदने;कोठें

* आंध्रदेश दक्षिण हिंदुस्थानांत आहे. त्यावें आजांचें नांव माहित नाहीं.

विलापाचा स्वर कानीं येतो; कोठें विद्वज्जनांचा समुदाय विनोदांत रमलेला दिसतो; कोठें दारुं पिवून मस्त झालेल्यांचा कल्ला ऐकूं येतो; कोठें रम्य स्त्रियां असतात; आणि कोठें त्याच रोगग्रस्त दृष्टीस पडतात. तस्मात् संसार मोठा विचित्र आहे!"

यः पूतनामारणलब्धकीर्तिः काकोदरो येन विनीतदर्पः ॥
यशोदयालंकृतमूर्तिरव्यात् स नित्यदुनामथवा रघूणां ४६

या श्लोकांत श्रीकृष्णाचें व रामाचें वर्णन केलें आहे:—

"(रामपक्षीं) ज्याचें नाव पुण्यप्रद आहे, ज्यानें रणांत कीर्ति मिळविली, ज्यानें काकोदराचा (विशेषनाम आहे कीं काय कोण जाणें!) गर्व शमविला, ज्याची मूर्ति यशोदया सीतेनें अलंकृत आहे, तो रघुपति तुमचें रक्षण करो.

"(कृष्णपक्षीं) जो पूतनेच्या वधानें प्रसिद्ध झाला आहे, ज्यानें सर्पाची (कालियमर्दनाची) खोड मोडली, ज्यास यशोदेनें नटवला आहे, असा यदुपति—" अशा श्लेषानें सभंगश्लेष सुचवितात.

करवालकरालवारिधारा यमुना दिव्यतरंगिणी च कीर्तिः ॥
नव कामद तीर्थराज दूरात् अनुबध्नासि सरस्वती कवीनां ४७

कोणी कवि राजास उद्देशून म्हणतो:—— " हे उदार राजा! तुझ्या तरवारीचा नावधार हाच (काळेपणामुळें) यमुना होय; तुझी कीर्ति ही (शुभ्रत्वामुळें) भागीरथी होय; व यामुळेंच कवींची सरस्वती (वाणी-पक्षीं, या नांवाची नदी) ही दूरून तुजकडे येऊं पाहते; कांहीं, तूं तीर्थराज म्हणजे संगम आहेस! "

स्वयोनौ द्योतते नावद्यावन्नोदयते शशी ॥
उदिते तु सहस्रांशौ न स्वयोनौ न चंद्रमाः ४८

" जोंपर्यंत चंद्र उगवला नाहीं तोंपर्यंत कानव्याची चमक; आणि सहस्रकिरण जो सूर्य तो उगवला म्हणजे तर कानवाही एकीकडे राहतो व चंद्रही एकीकडे राहतो. " ही अन्योक्ति आहे. एकाहून एक वरचढ गुणी आहे असतां मागलें निस्तेज होऊन जातात!

वदनं प्रसादसदनं सदयं हृदयं सुधामुचो वाचः ॥

करणं परोपकरणं येषां केषां न ते वंद्याः ॥ ४९ ॥

सज्जन पुरुषांचें यांत पूर्ण वर्णन आहे:— " ज्यांचें मुख नेहमीं प्रफुल्लित, हृदय कोमळ, वाणी अमृत स्रवणारी, शरीर परोपकारार्थ सतत झिजणारें, असे ते पुरुष असतील ते कोणास वंद्य नव्हेत? " या आर्येत सर्वत्र अनुप्रास आहे.

(५०) कोणी कवि विक्रम राजाच्या सभेस जाऊन त्यानें ही रूपापिनें त्या राजापुढें म्हटलीं:—

सर्वदा सर्वदोऽसीति त्वं मिथ्या कथ्यसे बुधैः ॥
नार्थो लेखिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः ॥ १ ॥

'हे राजा! तूं सर्वकाळ सर्वांचें दान करीत असतोस ही तुझी मिथ्या स्तुति कवि गायन! कां तर, आजपर्यंत याचकांस तूं कधीं पाठ दिली नाहींस, व परस्त्रियांस तुझें वक्षस्थळही कधीं लाभलें नाहीं.' हा व्याजनिंदा अलंकार होय.

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः ॥
मार्गणोघः समभ्येति गुणो याति दिगंतरं ॥ २ ॥

"हे राजा! तूं ही अपूर्व धनुर्विद्या कोणापासीं शिकलास? चमत्कार काय कीं, मार्गणांचा (बाणांचा, पक्षीं याचकांचा समुदाय तुजकडे येतो; आणि गुण (धनुष्याचा दोरा, पक्षीं कीर्ति) दिगंतरास जातो!" नेहमीं हा व्यापार धनुष्याच्या नेहमींच्या व्यापारापेक्षां अगदीं उलट झाला!— श्लेष कारणा असतां अर्थांतर सर्वांकष आहे.

सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मीः करसरोरुहे ॥
राजेंद्र कुपिता कीर्तिस्तेन देशांतरं गता ॥ ३ ॥

" हे राजा! सरस्वती तुझ्या कंठाशीं वास करते आहे (पक्षीं कंठालिंगन करते आहे), आणि लक्ष्मी तुझ्या हस्तकमलाच्याठायीं आहे— म्हणजे तूं मोठा दानशूर आहेस (पक्षीं, लक्ष्मीचें करांनीं लालन करितो आहेस), यास्तव कीर्तीस (सवतीमत्सरास्तव) राग येऊन ती (झिटकाऱ्यानें तुला टाकून) देशांतरास निघून गेली!" काय चमत्कारिक अर्थ वर्णिला आहे!

हे तिन्ही श्लोक विक्रम वत्सिद्धीत आहेत. तीत असें सांगितलें आहे कीं. या श्लोकांनीं गाता प्रसन्न होऊन गेला कीं. प्रत्येक श्लोकाबरोबर एकेक दिव्यांचें राज्य त्यानें स्वाकरावें असें त्यानें केलें.— वस्तुतः पाहतां त्यांची योग्यता खरोखरच तशी आहे !!

न नीतमुपनासिकं परिमलज्ञयाशंकया ।
न दत्तं विनिवेशितं विरहवन्हिकुंडे हृदि ॥
दृशोर्वीक्षितिनि श्रुतौ न निहितं प्रियप्रेषितं ।
करे कमलमर्पितं मृगदृशा दृशा पीयते ॥ ५१ ॥

एका स्त्रीनें तिच्या प्रियकराला एक कमल पाठवून दिलें. तेव्हां तिनें त्याची या-प्रमाणें व्यवस्था केली.—" ते तिनें नाकाशी नेऊन त्याचा वास घेतला नाहीं. कों नर तशानें त्याचा सुगंध कमी होईल. या भयानें; ते तिनें आपल्या हृदयांत ठेवले नाहीं, कों नर विरहाग्नीच्या धगीनें ते न जाणों कोमेजून जाईल म्हणून; तसेच ते तिनें आपल्या कानावरही घेतले नाहीं,—डोल्या आड होतें म्हणून. नर केले काय?— ते त्या मृगनयनेनें आपल्या हातांत घेऊन त्याचें दृष्टीनें प्राशन करी-त राहिली." यावरुन मृगाक्षीचा हा एक उत्कृष्ट मानसा होय!

गुणा नामज्ञाना मधुरधनदानेऽपि न मुदे ।
मुदे विद्याज्ञाना भवति मितदानेऽपि गुणिनां ॥
दृशौ साम्या दत्ते न पुनरवबन्धे च चतुरो ।
दृशः प्रीतिं दत्वा वशयति नितांतं पुरवधूः ५२

" पुष्कळ धन देणें सर्वांस गुण कळत नाहीं तें धनी गुणिजनांस आनंदप्रद होत नाहीं; आणि बक्षीस थोडेंच का देईना, पण ज्यास मनुष्याच्या अंगातलीं करामत समजते त्याच्या धन्यास ते राजी होतात. कसें?— नर जशी ग्राम्य स्त्री ही जाणाऱ्या पुरुषाकडे डोळे भरून पाहते, पण चतुर पुरुष तिज-कडे लक्ष फक्त देत नाहीं; पण नगरांतील स्त्री डोळ्याचा किंचित् कोपरा त्याकडे करते, पण मन वेधूनच राहते!" सारांश, खरा परीक्षक भेटला म्हण-जे गुणाचें बीज होतें.

मम प्रेम नवोदास्यं स्पर्धया वर्द्धते दृशं ॥
नेतव्य मन यो: केन न जाते पंकजानने ५३

कोणी कामी आपल्या मनांत भरलेल्या स्त्रीस उद्देशून म्हणतो :——

" हे कमलानने! माझें तुजवरचें प्रेम आणि तुझें मजविषयीं औदासीन्य हीं जणों काय चढाओढीनें वाढताहेत. असो या दोहोंतून कोणाची सरशी होईल तें मला समजत नाहीं!"

श्रीवर्धनकरो राजा मंत्री नु पटवर्धनः ॥
नथापि श्रीः पटो नास्ति वाग्वर्धनकरस्य मे ५४

कोणी कवि पेशव्यांच्या दरबारी आला असता गाद्दीस उद्देशून म्हणतो:-

" राजा श्रीवर्धनकर (लक्ष्मीचें वर्धन करणारा, पक्षीं श्रीवर्धनचा मुलगा राहणारा.) आणि मंत्री पटवर्धन (वस्त्रांची वृद्धि करणारा, पक्षीं आडनांव). तरी वाग्वर्धनकरास (वक्तृत्वाभूषण करणारास, पक्षीं वाग्वर्धनकरास) मला श्री (संपत्ति) नाहीं व पट (वस्त्र) ही नाहीं!"

कन्या वरयते रूपं माता वित्तं पिता श्रुतं ॥
बांधवाः कुलमिच्छंति मिष्टान्नमितरे जनाः ५५.

विवाहसमयीं निरनिराळ्या पक्षांचे कमकमे मनोरथ असतात ते यांत दाखविले आहेत:— " कन्येस नवरा रूपवान असावा येवढीच इच्छा असते; तिच्या आईस तो घरचा संपन्न असला म्हणजे आले; बापाचे पाहणे त्याच्या केवळ विद्येवर असतें; आमच्या मनांत तो कुलीन असावा इतकेच असतें; आणि बाकीच्या लोकांस चार दिवस चमचमीत भोजन असलें म्हणजे आलें!"

मंडले मंडलाकारो रेखा वाजिमयी जवे ॥
सव्यापसव्ये द्विमुखो नकुलाधिष्ठितो द्वयः ५६

पांडवांतला चौथा नकुल अश्वविद्येंत मोठा निपुण होता. तो विराटराजाच्या पदरीं घोडेस्वार नाम धारण करून राहिला होता हें सर्वत्र प्रसिद्ध आहेच. त्याच्या कौशल्याविषयीं कोणी कवि म्हणतो:—

" नकुलानें घोड्याकडून जेव्हां रंगण घेववावें तेव्हां तो घोडा वर्तुलच मार्ग काय असा भास होई; जेव्हां समोर सारखा काढावा, तेव्हां घोड्यांची एक जोडच जांव रेव दिसे; डावी उजवीकडे फिरवी, तेव्हां घोड्यास दोन तोंडें आहे-

न काय असा भास व्हावा ! ''

असंमुखालोकनमाभिमुख्यं निषेधणंवानुमतिप्रकारः ॥
मत्युत्तरं मुद्रणमेव वाचो नवांगनानां नवमेव पंथाः ॥ ५७ ॥

कवि नूतन वधूंचा प्रकार वर्णितो :—— '' नूतनाच ज्यांचा विवाह झाला अ-
शा नूतन स्त्रियांचा [illegible] नवीच स्नणजे मोठी विचित्र असते ! ती अशी की, त्यां-
ने दुसऱ्याकडे बघणे स्नणजेच नवऱ्याकडे बघणें. नको स्नणणें स्नणजेच नकार दे-
णें. आणि मुकस्नम राहणें स्नणजेच मत्युत्तर देणें ! '' अशाच अर्थाचे एक दोन
श्लोक 'आकुतर' नाटकाच्या पहिल्या दुसऱ्या अंकांत आहेत ते आमच्या सं-
स्कृतज्ञ वाचकांस माहीत असतीलच.

कमलभूतनया वदनांबुजे । वसतु ते कमला कर-पल्लवे ॥
वपुषि ते रमता कमलांगजः । मनिदिनं हृदये कमलापतिः ५८

कोणी कवि राजास आशीर्वाद करतो :—— '' हे राजा ! तुझ्या मुखाचे
ठायीं कमलभूतनया (सरस्वती) वास करो; हस्ताचे ठायीं कमला (लक्ष्मी) वा-
स करो; तुझ्या शरीराचे ठायीं कमलांगज (मदन) विहार करो, आणि हृदया-
चे ठायीं नेहमी कमलापति (विष्णु) वास करो. '' सरस्वती, लक्ष्मीत्व, दानशूर-
त्व आणि शक्ति ही तुझे ठायीं नांदोत.

त्यजंति मूर्खवद्दोषान् गुणान् गृह्णंति साधवः ॥
दोषग्राही गुणत्यागी चालनीव दुर्जनाः ॥ ५९ ॥

'' सज्जन रसिक जे असतात ते सुपाप्रमाणें असतांना दोष टाकून गुण ते-
वढे ग्रहण करतात; आणि दुर्जन असतात ते चाळणीप्रमाणें गुण गाळून टाकू-
न दोष तेवढे घेतात. ''

मीनः स्नानरतः फणी पवनभुक् मेषस्तु शूर्णाशनः ।
नीरज्ञः खलु चातकः मनिदिनं शेते बिले मूषकः ॥
अस्मोन्मूलनतत्परः खलु खरो ध्यानाधिरूढो बकः ।
सर्वे किं ननु यांति मोक्षपदवीं ज्ञानमधानं तपः ६०

" मासा नेहेमीं पाण्यांत बुडतो, साप वारा पितो, मेंढा पानें खाऊन राहतो, चातक बुसतें पाणी पितो, हंदीर नेहेमीं बिळांत एकांतवासी असतो, गाढवरा- खेनें सरलेला असतो, म्हणि बगळा ध्यान लावून बसतो,— मग हे सर्व मोक्षा- स जाणार काय? नेहमीं तपश्चरण ज्ञानाशिवाय व्यर्थ होतें."

यद्यपि बहु नाधीषे तथापि पठ पुत्र व्याकरणं ॥
स्वजनः श्वजनो माभूत्सकलं शकलं सकृच्छकृत ६१

बाप आपल्या मुलास व्याकरणाचा उपयोग सांगतो:— " हे पुत्रा! तूं दुसरें काहीं पढला नाहींस तरी निदान व्याकरण तरी घ्ण: म्हणजे 'स्वजना'- च्या निकाणीं 'श्वजन' (कुत्र्यांचा समुदाय) 'सकला' बद्दल 'शकल' (तुकडा) 'सकृत' (एकदां) याच्या जागीं 'शकृत' (विष्ठा) असे हास्यास्पद दोष तु- झ्या भाषणांत येणार नाहींत."

सकृज्जल्पंति राजानः सकृज्जल्पंति पंडिताः ॥
सकृत्कन्याः प्रदीयंते त्रीण्येतानि सकृत्सकृत ६२

" राजे (म्हणजे जे स्वैर थोर असतात ते) एक वार भाषण करतात, तसे च पंडित. त्याप्रमाणेच कन्यादान एकदांच होतें:— या तीन गोष्टी एकदां झाल्या म्हणजे आल्या, मग माघारीं येत नाहींत."

सज्जनस्य हृदयं नवनीतं । यद्वदंति कवयस्तदलीकम ॥
अन्यदेहविलसत्परितापात् । सज्जनो द्रवति नो नवनीतं ६३

" सज्जनांचें हृदय लोण्यापासून असतें असें जें कवि म्हणतात ते खोटें आ- हे: कां तर. सज्जन दुसऱ्याम आलेल्या तापानें द्रवतात, आणि लोणी केवळ आ- पल्याच तापानें विरघळतें." या स्थळीं व्यतिरेकालंकार आहे

अपूर्वेयं धनुर्विद्या मदनस्य महात्मनः ॥
शरीरमक्षतं कृत्वा भिनत्त्यंतर्गतं मनः ॥ ६४ ॥

" पराक्रमी जो मदन त्याचें हस्तकौशल्य कांहीं विलक्षण आहे! कसेंन शरीरास क्षत न पाडतां तो आंतल्या हृदयास विंधतो." येथेंही वरचाच अलं-

परीक्ष्य सत्कुलं विद्यां शीलं शौर्यं सुरूपताम् ॥ *
विधिर्दद्यान्नि निपुणः कन्यामिव दरिद्रताम्॥ ६५॥

सर्वगुणसंपन्न पुरुषाला कधी कधी दरिद्री असतात. या गोष्टीवर कोणी चतुर कवि उत्प्रेक्षा करतो.—— " उत्तम कुळ, शील. विद्या, शौर्य. रूप इत्यादि सर्व गुण पाहून नवऱ्या मुलास ज्याप जशी आपली मुलगी देतो, त्याप्रमाणे ब्रह्मदेव सर्व उत्कृष्ट गुणांची परीक्षा करून त्यास दरिद्रतेची योजना करतो. "

यद्यपि बहुगुणगम्यं नवनमेतस्य कूपपुरुषस्य ॥
जनयति तथापि विवेकं दानं याचानुमानेन॥ ६६॥

" या मोठ्या कूपाचें (विहिरीचे) पाणी काढण्यास जरी मोठी दोरी लागते, तरी याचा विवेक घेणाऱ्या मनुष्याच्या विचारावर मोठा भरंसनीय होय; कीं याच्या मानानेच दान. ही अन्योक्ति आहे. एकादा मोठा धनिक. कीं ज्याची सर्वत्र प्रसिद्धि झाल्यास मोठाच गुण असतो लागतो, आणि जो पात्रत्वाचा विचार करून त्या मानानेच दान करतो. त्याकडे हिचे अनुसंधान आहे. कूपपक्षीं, तो खोल असल्यामुळें बहुगुण (श्लिष्टशब्द आहे) लागतो, आणि जेवढें खोल असेल तेवढेंच अर्थात पाणी विपुल

दृढतरनिबद्धपुष्टेः कोशनिषण्णस्य सहजमलिनस्य॥
कृपणस्य कृपाणस्य च केवलमाकारतो भेदः॥ ६७॥

---

* या श्लोकास सुभाषितरत्नाकर नांवाच्या ग्रंथांतील मल्लिनाथाच्या पुस्तकांतून कांहीं श्लोक न घेतले आहेत. व तसे घेतले म्हणून मल्लिनाथास नांवें. हा ग्रंथच येथें दोन कारणांकरून देता आहे. एक तर तसें करणे गरज आहे म्हणून; आणि दुसरें कारण हा उत्कृष्ट ग्रंथ आमच्या वाचकांपैकीं कोणास पाहून तसेच तर तो मोठाच लाभ. हा ग्रंथ सर्व संस्कृतज्ञांच्या आश्रयास पात्र असतो त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याचा सत्कार झाला असेलसें वाटत नाहीं. पाचें कारण उपरच आहे. जर एकाद्या ग्रामण्यदर्शीय पांचसातसें पानें पंडितानें तो रचला असता, तर तो पंडितांचें शिरावर होऊन बसतें जग त्याच्या सत्कारास थोडें होतें! एकीकडे यूरोप व दुसरीकडे अमेरिका-खंड यांनें पाहिलें असतें. पण कर्ता परता एतद्देशीय संस्कृतज्ञ नेटका मराठी असलेला असावा म्हणून तो सर्व सर्व जगाच्या दृष्टीआड परक्याच्या!

कवि कृपण व कृपाण (खड्ग) यांचें सादृश्य वर्णितो:— " दोहोंची मूठ बळकट घातलेली असते (म० कृपणाच्या हातून कवडी सुटायाची नाहीं, आणि तरवारीची मूठ बळकट अर्थातच केलेली असते), दोघे कोशांत (पैसा ठेवण्याच्या खोलींत ; म्यानांत) पडून राहिलेले असतात; आणि दोघे स्वभावतःच मलिन- (मळकट वस्त्रें वापरल्यामुळें, निळ्या रंगामुळें) असतात: भेद त्यातून काय तो एका आकारांत (दिसण्यांत. कारण एक मनुष्य आणि दुसरें शस्त्र; पक्षी, ' आ ' या अक्षरांत) मात्र आहे! "

निद्रालियो यः खलु कुंभकर्णो । हतः समीके स रघूत्तमेन ॥
वैधव्यमापद्यत नव्यकांता । श्रोतुं समायाति कथां पुराणं ६८

कथेच्या पुराणाच्या वेळीं हरकून झोप येते, यावर कोणी विनोदी कवि कन्या- ना बोधतो :—— कुंभकर्ण जो निद्रालिय होता त्याला रामचंद्रांनीं रणांत स्व- र्गास्पदा. नेल्ला ना निद्रा विधवा होत्साती कथा पुराणें वगैरे ऐकण्यास येते ! "

अश्विष्टोऽपि खलीनं दत्वाऽग्रेऽपुच्छ वाजिराजस्य ॥
आरूढस्तृप्ते भूमौ बध्नाम मंडलाकारम् ॥ ६९ ॥

दोघऱ्या पंगवा इंग्रजी समोर पढत होता त्यावर कोणी* लिहिलें आहे:—

" स्वतः अश्विष्टः (अत्यंत लहान) असतांही वाजिराजाच्या (वाजीरा- वाच्या: मोठ्या घोड्याच्या) पाठीवर चढून त्याच्या तोंडांत खलिन (वायु: ल- गाम) देऊन त्यानें त्यासु भूमीवर मंडलाकार फिरविलें. " या आर्येत वाजिरा- वाचा घोड्या कोजेनें पराभव व पडतां पडतां जे त्याचे हाल आले (त्याचयास खलीन म० वायु) ते हीं दोन्हीं सुचविलीं आहेत.

उपकर्तुं प्रियं वक्तुं कर्तुं स्नेहमकृत्रिमम् ॥
सज्जनानां स्वभावोयं केनेंदुः शिशिरीकृतः ७०

" दुसऱ्यावर उपकार करावा, गोड बोलावें, निष्कपट स्नेहानें वागावें, हा स-

* येथील्या लेखांत विविक्षमशास्त्री असून कोणी होते, त्यांनीं केलेल्या पैकीं हा आर्या श्लोक असें ऐकण्यांत आहे. † एतत्फिनस्तन पुस्तक रेसिडेंट मलनां त्याम पेशवा सोक अस्विहन किंवा अ- स्विह असें असावें असत. या दुसऱ्या नांवाचा वरील आर्येत श्लेष केला आहे. ‡ वक्रोक्तिभेद. यावरून 'वाजिराज' म्हणजे 'दशम बाजीराव' — 'अपुच्छ' याचा अर्थ नीट कळत नाहीं.

ज्ञानांचा स्वभावच होय! चंद्रास कोणी थंड केला? "

भक्ते द्वेषो जडे मीतिररुचिर्गुरुलंघनम् ॥
मुखे कटुकता नित्यं धनिनां ज्वरिणामिव ७१

" धनवान आणि ज्वरी ह्यणजे नापकरी यांची स्थिति एक असते. कवी कों, भक्त ह्यणजे निंद्यनें चाकरी करणारे लोक, (पक्षीं) भात, यांविषयीं दोघांस ही द्वेष असतो; जड ह्यणजे मूर्ख लोक, (पक्षीं) पाणी यांचा दोघांची मीति: दोघांसही अरुचि असते; दोघांसही गुरुलंघन ह्यणजे वडील माणसांची अमर्यादा करणें (पक्षीं) अन्नाडिवाय राहणें, हें आवडतें; दोघांचींही तोंडें कडू (दोघांही अर्थ उघडच आहेत, हो ना. "

ज्ञानेषु जायते शूरः सदस्येषु च पंडितः ॥
वक्ता दशसहस्रेषु दाता भवति वा न वा ७२

" ज्ञानगर्वानें एक शूर मात्र होईल, हजारांत पंडित मात्र होईल, दहा हजारांत वक्ता मात्र होईल; पण दाता असा होईल किंवा न होईल. " यावरून दातृत्व किती कठीण आहे व याचें कारण जो पैशाचा लोभ तो मनुष्यांत किती प्रबळ आहे याची कवीची खात्री होती असें दिसून येतें.

इंदीवरेण नयनं मुखमब्जकेन । कुंदेन दंतमधरं नवपल्लवेन ॥
अंगानि चंपककलैः स विधाय धाता । कांते कथं घटितवानुपलेन चेतः ७३

कालिदास– शृंगारतिलक

" हे कांते! तुझे डोळे इंदीवराचे, तोंड कमळाचें, दांत कुंदाच्या कळ्यांचे, अधर नव्या पल्लवाचा, यामाणें कोमल कोमल पदार्थांनीं तुझें बाईचें सर्व शरीर घडून तुझें हृदय मात्र विधात्यानें कसें दगडाचें घडले? "

शब्दज्ञानेषेव कुर्वाणा सर्वदानवनिर्दृतिम् ॥
काव्यविद्या श्रुतिगता स्यान्मृतस्यापि जीवनी ७४

कवि कवितेचें आणि संजीवनी विद्येचें साम्य वर्णितो :— " (कविता पक्षीं) कविता ही केवळ शब्दांच्याच सामर्थ्यानें नेहमीं नवा नवा आनंद मनास देते. आणि

कानीं पडतांच मेलेल्यासही उठवून बसवील! (येथें शेवटीं अंमळ अत्युक्तीचा दोष येतो.)

" (संजीवनी पक्षीं) शुक्राचार्याची श्रुति-(वेद)-प्रसिद्ध विद्या केवळ उच्चारमात्रें करून मेलेल्यांस उठवून सर्व दानवांस आनंददायक झाली. "

दयिता बाहुपाशस्य कुतोऽयमपरो विधिः ॥
जीवयत्यर्पितः कंठे मारयत्यपवर्जितः ७५

" स्त्रियांच्या बाहुपाशाचा काय विपरीत प्रकार आहे हा! तो कंठीं पडला असतां जीव येतो (आनंद होतो), आणि निघाला म्हणजे मरण येतें (त्या सारखें दुख होतें)!

मुग्धे मुंच विषादमत्र बलभित् कंपोगुरुस्त्यज्यतां।
सद्भावं भज पुंडरीकनयने मान्यानिमान्मानय ॥
इत्थं शिक्षयतः स्वयंवरविधौ धन्वंतरेर्वाकुछला-।
दन्यत्र प्रतिषिद्धुमात्मविहितं जानन् हरिःपातु वः ७६

(प्राचीन काळची स्वयंवराची चाल सर्वांस माहीतच आहे कीं, कन्येनें आपणास मागणी घालण्यास आलेल्या वरांतून आपला नवरा आपल्या खुषीनें निवडावा. अशा प्रसंगीं आलेल्या वरांचें कुलशीलादि वर्णन करण्यास कन्येबरोबर दासी किंवा निचा भाऊ असें कोणी तरी असे. पुढील श्लोकांत स्वयंवरकाळीं निचा भाऊ धन्वंतरि हा स्वयंवरास आलेल्या देवांचें वर्णन करतो आहे. या श्लोकांत कवीनें खूबी काय केली आहे, कीं बाहेरून त्याचे बोलणें आलेल्या देवांस व लक्ष्मीस उद्देशून आहे असें दाखवून खरा अर्थ सगळा विष्णूकडेच लागेसा केला आहे.)

" हे वेडे! गोंधळ नको, धैर्य नाहींसें करणारें हें कांपणें सोडून दे, चांगली स्वस्थ हो; आणि हे कमलनयने! या मान्य देवांचा चांगला सत्कार कर "—हा वरवरचा सहृदयांनीं दिसणारा अर्थ झाला; पण विवक्षित अर्थ श्लेषानें असा होतो—

" हे वेडे! या विषादास (शंकरास) सोड, हा येथें इंद्र बसला आहे यास राहून दे, तसेच वरुण व बृहस्पति हेही राहूं दे; विष्णूच्या ठायीं प्रेम धरून या

नाकाच्या कोणासही मुनूंनको: ;; यामध्यें स्वयंवराचे वेळीं धन्वंतरीनें लक्ष्मी-
स नाकीनीनें आपल्या पक्षाचा अभिमान सांगितला असतां तो जाणारा वि-
ष्णु तुमचें रक्षण करो. ''

माकृ पादयो: पतति स्वादति पृष्ठमांसं ।
कर्णे कलं किमपि रौति शनैर्विचित्रम् ॥
छिद्रं निरूप्य सहसा प्रविशत्यशंकः ।
सर्वं खलस्य चरितं मशकः करोति ॥ ७७ ॥

कार्णी चतुरपणाविषयीं कवि स्वतःचें आणि डासाचें साम्य वर्णितो :——

'' मशक हा स्वतःची सर्व कृति कपटानें दाखवितो. कधीं नरपहिल्यानें पा-
यां पडतो (पायाची मुटमळतो, आर्जव करतो); मग पाठीचें मांस खातो (पाठी-
ला चावतो); व कपटानें कांहीं उपद्रव करतो); नंतर कांहीं वेळ कानाशीं विचित्र गा-
यन करतो (कानाशीं गुणगुणतो; लाडीगोडीचीं गोड गोड बोलणीं बोलतो);
आणि पुढची छिद्रं पाहून दचून वेधडक आंत शिरतो (नाकाकानांत वेगें घुसक-
न जातो, व्यग पाहून दचून निःशंकपणें पंक्ति देऊं लागतो).'' हा वहारीचा श्लो-
क '' द्विजोपदेशा'त आलेली आहे; पण कवीला काय तें कांहीं माहीत नाहीं !

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे भार्या गृहद्वारि जनः श्मशाने ।
देहश्चितायां परलोकमार्गे कर्मानुगो गच्छति जीव एकः ७८

'' मरणसमयीं पैसा भूमीत, गायां म्हशी गोठ्यांतल्या गोठ्यांत, स्त्री घरा-
च्या दारापर्यंत, इष्टमित्र स्मशानापर्यंत, आणि शरीर चितेवर राहतें; परलोका-
स जातां एकट्याच जीवाला असून त्याचेबरोबर त्याचें एक कर्म मात्र येतें!'' सर्व
जगण्याचें तत्त्व या एका पद्यांत आहे!

अकृत्वा परसंतापमकृत्वा खलनम्रताम् ॥
अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्बहु ७९

'' दुसऱ्यास ताप न करतां दुष्टांशीं नमून न वागतां, आणि सज्जनांच्या-
मार्गास अनुसरून, जें मिळेल तें थोडें असलें तरी लाखाच्या जागीं होय!''

सकृत्कंदुकपातेन पतत्यार्द्रः पतन्नपि ॥

तथा पतति मूर्खस्य मृत्पिंडपतनं यथा ८०

थोरांत व हलक्यांत अंतर :—— "थोर आहे तो पडला तरी चेंडूसारखा पडतो; आणि मूर्ख आहे तो पाण्याच्या गोळ्यासारखा पडतो." म्हणजे पहिल्याच्या अंगीं स्थितिस्थापकत्वाचा गुण असल्यामुळें तो जसा पुनः वर उसळतो तसा बुद्धिमान् पुरुष पुनः आपल्या पदावर चढतो; आणि दुसऱ्याच्या अंगीं तो गुण मुळींच नसल्यामुळें तो जसा फतकन खालीं पडला की पडला, तसा मंदबुद्धि मनुष्य एकदां घसरला कीं घसरला!

नवेषु विद्रुमच्छायो मत्समार्गेऽवाधरः ॥
करोति कस्य नो बाले पिपासाकुलितं मनः ८१

"हे कुमारिके! तुझा अधरोष्ठ मारवाड देशांतील मार्गाप्रमाणें विद्रुमच्छाय (प्रवाळ झाडांची सावली नाहीं असा) आहे. यास्तव त्याच्या योगानें कोणास पान करण्याची इच्छा होत नाहीं? पक्षीं, विद्रुमच्छाय म्हणजे पोवळ्याची लाली ज्याच्यावर मारली आहे असा तुझा अधरोष्ठ आहे. नेहमीं तो कोणास पानाविषयीं उत्कंठित करीत नाहीं? अर्थात् सर्व सहृदय जनांस उत्सुक करतो!"

निर्वाणदीपे किमु तैलदानं। चौरे गते वा किमु सावधानं॥
वयो गते किं वनिताविलासः। पयो गते किं खलु सेतुबंधः ८२
वेतालभट्ट.

"दिवा विझाल्यावर आंत तेल घालून काय उपयोग? चोर गेल्यावर 'सावध रे सावध!' म्हणून हाकाटी करून काय फळ? वय गेल्यावर विषयोपभोगांत काय मौज? पाणी ओसरून गेल्यावर मग पूल तो कशाला?"

कंधरां समपहाय कंधरां। प्राप्य संयति जहास कस्यचित्॥
मां विलानमपनः स्वपूर्नये। दुर्भगात्किमुदराद्वियोगतः॥८३॥

पुढांत एकाचें शिर वर उडालें असतां हंसलें; त्यावर कोणी कवि उपेक्षा करतो —— "एका पुरुषाचें शिर मानेपासून उडून मुंडीवर पडलें असतां हंस-

लें. कां? तर त्यास असें वाटलें कीं, आपली मर करण्या करतां जें मला नेहेमीं सां-कवीन होनें त्या या दुर्भर उदरापासून माझा आज वियोग झाला, यांत काय वाईट झालें? ''

गवीशपत्नो नगजापहारी। कुमारतातः शशिखंडमौलिः॥
लंकेशसंपूजितपादपद्मः। पायादनादिः परमेश्वरो नः॥८४॥

''या श्लोकांत शिवाचें व विष्णूचेही वर्णन आहे —— '' (शिवपक्षीं) वे ल ज्याचें वाहन आहे. ज्याने पार्वतीचें हरण केलें, जो कार्तिकेयाचा बाप, ज्या-ने चंद्राची कोर मस्तकावर धारण केली आहे, रावणानें ज्याच्या पदकमलांची पूजा केली. असा अनादि शिव आमचें रक्षण करो. ''

(दुसरा अर्थ करतांना वरील प्रत्येक पदाचे पहिले पहिले अक्षर काढावयाचें. हें जोडल्या चरणांतील 'अनादि' पदानें सूचविलें आहे.)

'' (विष्णुपक्षीं) गरुड ज्याचें वाहन आहे. ज्याने गजेंद्राला (नक्राच्या तोंडातून) सोडविला अथवा कंसाच्या कुवलयापीड हत्तीला मारला. जो मद-नाचा पिता. ज्याच्या मुकुटावर मोराचे पीस खोवले आहे. ब्रह्मदेव आणि शि-व ज्याच्या पदकमलांची पूजा करतात, असा रमेचा पति ——— ''

चत्वारो धनदायादा धर्माग्नि नृप तस्कराः॥
तत्र ज्येष्ठावमानेन त्रयः कुप्यंति बांधवाः ८५

'' धर्म (दान करणें), अग्नि, राजा, आणि चोर हे धनाचे चार वांटेकरी - आहेत. यास्तव यांच्या वडील भावाचा (धर्माचा) जेव्हां अवमान करावा, ते-व्हां बाकीचे तिन्ही बंधु कोपतात! ''

दूरेऽपि श्रुत्वा भवदीयकीर्तिः कर्णौ हि तृप्तौ न च चक्षुषी मे॥
तयोर्विवादं परिहर्तुकामः। समागतोऽहं नव दर्शनाय ८६

'' आपली कीर्ति दूर पासून ऐकली असतां माझे कान तृप्त झाले, पण डो-ळे झाले नाहींत. यास्तव त्यांचा तंटा मिटविण्याकरतां आपल्या दर्शनार्थ आलों आ-हें. ''

मणिः शाणोल्लीढः समरविजयी हेतिनिहतो ।
मदक्षीणो नागः शरदि सरितः श्यामपुलिनाः॥

कलाशेषश्चंद्रः सुरतमृदिता बालवनिता ।
तनिम्ना शोभंते गलितविभवाश्चार्थिषु नृपाः ८७
भर्तृहरि.

" माहाणेवर पांमलेले रत्न, रणांत जय पावून आलेला शूर घायाळ झाले-ला, ज्याच्या गंडस्थळापासून मदस्राव व्हायाचा बंद झाला अशा हत्ती, शरद-ऋतूंत ज्याची बाळवंटें उघडी पडलीं आहेत अशा नद्या, ज्याची सुभगता कोरून राहिली आहे अशा चंद्र, संभोगानें श्रांत झालेली तरुण स्त्री, आणि अर्थिजनांस दान करून निःस्व झालेले राजे, हीं सर्व भाषल्या क्षीणत्वानें अत्यंत रमणीय दिसतात! " *

परान्नं प्राप्य दुर्बुद्धे मा प्राणेषु दयां कुरु ॥
परान्नं दुर्लभं लोके प्राणा जन्मनि जन्मनि ८८

कोणी भटजी आपल्या पुत्राप्रत उपदेश करतात:— " मुला! परान्न मा-त्र आलें असतां प्राणावर अगदीं लोभ ठेवीत जाऊं नको; सडकून जेवीत जा! कां, तर हे प्राण वेळ्या पुण्याचे आहेत. जन्मोजन्मीं ठेवलेच आहेत; पण परान्न बरोबर परम दुर्लभ आहे!! "

बालत्वं च मृता माता वृद्धत्वं च मृताः सुताः ॥
यौवनं च हता भार्या पातकं किमतः परं ८९

" जन्म झाला तों आई मेली; तरुणपण आलें तों बायको मेली; आणि म्हातारपण आलें तों मुलगे आटपले:— यापरतें पातक कोणतें? "

काकः कृष्णः पिकः कृष्णस्त्वभेदः पिककाकयोः ॥
वसंते समुपायाते काकः काकः पिकः पिकः ९०

" कावळा काळा म्हणि कोकिळही काळा, तेव्हां दोघे सारखेच; पण व-

---

* वरील श्लोकाचें रामनाचें भाषांतर केलें आहे तें येणेप्रमाणें:—
प्राणांतेंवर जया असा मणि रणीं जो वीर घायाळला ।
संभोगें शिणली अशा तरुवधू हस्ती न मस्तावला ॥
ज्यांची स्वच्छ तारतूंन पुलिनें ती विपगा चंद्रही- ।
वीजेचा प्रभु पावनत्वधन जो हे शोभती सर्वही ॥

सेन ऋतु आला की, कावळा तो कावळा, आणि कोकिळ तो कोकिळ!" ही म्हण्योक्ति आहे. समयास मनुष्या मनुष्याची पारख होते!

गंगुल्याः कःकपाटं मद्दयति कुटिले माधवः किं वसंतो ।
नो चक्री किं कुमारो न हि धरणिधरः किं द्विजिह्वः फणींद्रः॥
नाहं घोराद्रिमर्दी त्वमसि खगपतिर्नो हरिः किं कपींद्र ।
इत्येवं गोपकन्यामनिवचनजिनः पातु वश्चक्रपाणिः॥ ९१॥

इतर नायिकांच्या पक्षात मध्यरात्री कृष्ण आला असतां गोपिका व त्याचा संवादः—

"दार कोण वाजवते?—हे कुटिले (कपटकरे!), मी माधव आहे—कोण वसंत?—नाही, मी चक्री आहे—कोण, कुमार?—नाही, मी धरणीधर आहे—कोण, द्विजिह्व (दुसऱ्या अर्थी चहाडा) सर्प?—नव्हे, मी घोर पर्वतांचे मर्दन करणारा आहे—कोण, तू गरुड आहेस काय?—नाही नाही, मी हरि आहे—कोण, वानर?—यामध्ये त्या गोपकन्येच्या उत्तरांनी ज्याचे हार्दिक आशय, तो चक्रपाणि तुमचे रक्षण करो!"

व्याघ्रे च मद्दयालस्ये सर्पे चैव महद्भयम ॥
शिशुने चैव दारिद्र्य तेन निष्ठंति जंतवः ९२

"वाघाचे ठायी मोठा आलस, सापाचे ठायी भय, आणि चहाडास दारिद्र्य, ह्या तीन गोष्टी सुदैवेंकरून एकेकाचे ठिकाणी आहेत म्हणून सगळ्या जगाचा बचाव आहे!"

दृष्ट्वैकासनसंस्थिते प्रियतमे पश्चादुपेत्यादरा-।
देकस्या नयने पिधाय विहितक्रीडानुबंधच्छलः॥
ईषद्वक्रितकंधरः सपुलकः प्रेमोल्लसन्मानसा- ।
मंतर्हासलसत्कपोलफलकां धूर्तोऽपरां चुंबति ९३

समस्यानक.

कोणा पुरुषास दोन नायका होत्या. त्या दोघीही त्याच्या मावड्या होत्या. एके समयीं असें झालें, त्या दोघी महालांत एकेच जागीं बसल्या असतां हा न कळत आंत गेला. तेव्हां आपणावरच विशेष प्रीति आहे असें दो-

घींस वाटण्याकरतां त्या चतुर पुरुषानें ही युक्ति केली :———

" दोघीही अत्यंत प्रिय अशा आपल्या स्त्रिया एकेच ठिकाणी बसल्या आहेत असें पाहून तो मागें चुपचुप गेला, आणि विनोदाच्या मिषानें त्यानें एकीचे डोळे आपल्या हातांनीं गपकन झांकले; आणि अंमळ वांकडी मान करून हर्षरोमांचित होत्साता त्या धूर्तानें, प्रेमानें जिचें हृदय उचंबळलें आहे, आणि आंतल्या आंत हसल्यानें जिचे गाल प्रफुल्लित झाले आहेत अशा दुसऱ्या स्त्रीचें वदन चुंबन केलें! "—— यामुळें दोघींसही आपापल्या मनांत वाटलें कीं, मीच वर पडण्याची ज्याला आवडती आहें !

नौ—र्दुर्जनजिह्वाच प्रतिकूलं विसर्पिणी ॥
परमनारणार्थेव दारुणा केन निर्मिता ॥ ९४ ॥

कवि नावेचे आणि वल्हाड्याच्या जिभेचें श्लेषानें वर्णन करतो :———

" (नौकापक्षीं) पत्यक्ष नीराला लागणारी आणि दुसऱ्यास तारून नेण्याकरतां लांकडाची केलेली. "

" (जिह्वापक्षीं) ज्याच्या त्याच्या मर्माचा उच्चार केल्यानें नेहेमी विरुद्ध वागणारी, आणि दुसऱ्यास फसवण्याकरतां दारुण म० भयंकर होत्साती विधात्यानें निर्माण केलेली. "

रे रे कोकिल मा भज मौनं। किंचिदुदंचय पंचमरागम् ॥
नो चेत्वामिह को जानीते। काककदंबकपिहिते चूते ९५

" रे कोकिळा ! असें मौन धरून बसूं नको, पंचमस्वर किंचित तरी काढ; नाहीं तर कावळ्यांच्या मंडळींत या आंब्याच्या झाडावर तुला कोण ओळखतो! "

करावित्र शरीरस्य नेत्रयोरिव पक्ष्मणी ॥
अमोक्षमपि कुर्वंति तन्मित्रं मित्रलक्षणं ९६

" नोच खरा मित्र कीं जो, हात जसे शरीरास, किंवा पापण्या डोळ्यास. त्यामुळें केवळ स्वतःच्या प्रेरणेनेंच जो सर्व कामीं उपयोगी पडतो! "

रात्रिर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं ।
भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजालं ॥

इत्थं विचिंतयति कोशगते द्विरेफे ।
हा हंत हंत नलिनी गज उज्जहार ९७

" गज जाईल, चांगली पहाट होईल, सूर्य उगवेल, आणि सर्व कमळेवि-
कसतील.— यामप्रमाणें कमळांत गुंतलेला भ्रमर जो मनाचे संकल्प करतो -
तोहे नींच हत्तीनें देठासकट तें पार उपटून टाकलें ! "

गर्जसि मेघ न यच्छसि तोयं । चातकपक्षी व्याकुलितोऽहं ॥
दैवादिह यदि दक्षिणवातः । कस्त्वं स्याहं क्व च जलपातः ९८

चातकपक्षी मेघास उद्देशून बोलतो :—" हे मेघा ! तूं नुसता गर्जतोस
मात्र, पण वृष्टि करीत नाहींस: हा मी चातकपक्षी पहा कसा तान्हेनें व्याकुळ
होऊन गेला आहे ! अरे, विचार कर कीं जर दैवेंकरून इतस्ततः दक्षिणेचा
वारा सुटला, तर तूं कोठें, मी कोठें, आणि जलवृष्टि कोठें अशी गत होऊन
जाईल ! " ही अन्योक्ति आहे. जोवर दानांत आहे तोवर सत्पात्रीं दान
केल्याचें श्रेय पदरांत घेऊन टेवावें; कां कीं, वेसव केव्हां जाईल याचा काय
नेम सांगावा !

वार्त्ता च कौतुकवती विमला च विद्या ॥।
लोकोत्तरः परिमलश्च कुरंगनाभेः ॥
तैलस्य बिंदुरिव वारिणि दुर्निवार- ।
मेतत्त्रयं प्रसरति स्वयमेव लोके ॥ ९९ ॥

" अद्भुत वार्ता, उत्कृष्ट विद्वत्ता, आणि मृगनाभीचा (कस्तूरीचा) लोकोत्त-
र परिमळ, हीं तीन तेलाचा बिंदु जसा पाण्यांत त्यामप्रमाणें आपोआप चौ-
हींकडे पसरतात ! "

सारस्य मित्रमसि किंच सुधामयस्त्वं ।
शंभावपि प्रणयिनां सकृती करोषि ॥
विश्वासपात्रमसि यद्दिवनौकसोर- ।
प्येतत्तव प्रकृतिशुद्धतनोश्चरित्रं ॥ १०० ॥

"हे चंद्रा! तूं मदनाचा मित्र आहेस, व तसाच शिवाचाही आवडता आहेस. हे परस्पर वायु असतांही तूं दोघांचें स्नेहपात्र झाला आहेस हा तुझ्या स्वभावसिद्ध गुरुपणाचा (मुख्यपणाचा; पक्षीं, मनाच्यासारखेपणाचा) महिमा होय!"

को न याति वशं लोके मुखे पिंडेन पूरितः ॥
मृदंगो मुखलेपेन करोति मधुरध्वनिं ॥१०१॥

"तोंड भरलें असतां कोण या जगांत वश्य होत नाहीं: पहा. मृदंग मुद्दाम तसें केल्यानें मधुर ध्वनि करायाला लागतो!"

काचं मणिं कांचनमेकसूत्रे। गुम्फा निबध्नंति किमत्र चित्रं ॥
विचारवान् पाणिनिरेकसूत्रे। श्वानं युवानं मघवानमाह १०२

"स्वभावतःच मुग्ध असणाऱ्या स्त्रिया ज्या काच व सोन्याचे मणी एका-च सूत्रांत (गळेसरींत) ओवतांत यांत काय आश्चर्य आहे? पहा कीं, येवढा बुद्धिमान् पाणिनि, पण त्यानें सुद्धां एकाच सूत्रांत श्वा (कुत्रा), युवा (तरुण), आणि मघवा (इंद्र) या तिघांस ओंवून दिलें!"

जनस्थाने भ्रांतं कनकमृगतृष्णाकुलधिया।
वचो वैदेहीति प्रतिपदमुदश्रु प्रलपितम् ॥
स्तनालंकाभर्तुर्वदनपरिपाटीषु रचना ।
मयासं रामत्वं कुशलवसुता न त्वधिगता १०३

धनतृष्णेमुळें आपली झालेली विटंबना कोणी याचक वर्णितो :—

"अहो! माझ्यांत व रामचंद्रांत काय उणें आहे? मी त्याची सर्व कृति केली! कशी?— (रामपक्षीं) तो सुवर्णमृगानें लोभावला जाऊन जनस्थानांत* त्याच्या मागें फिरला; पुढें सीता नाहींशी झालीसें पाहून खिन्नांतःकरण होत्साता पावलोपावलीं 'हे जानकि' असा डोळ्यांत अश्रु आणून तिचा ध्यासच त्यानें घेतला; शेवटीं रावणाची बातमी लागल्यावर त्या लंकापतीशीं घोर संग्राम करून त्याची मस्तकपंक्ति बाणांनीं उडविली;—

---

* जनस्थान नासिक प्रांतांत तेथल्या प्रदेशास पूर्वीचें नांव 'जनस्थान' येथेंच सुवर्णमृगाचा वध झाला हें ऐकिवांत आहे.— या शब्दाचा श्लेषार्थ 'जन-स्थान' (लोकांची वस्ती) हा उघडच आ-

(कविपत्नी) मोठी धनाढ्य रूप जें मृगजळ त्याच्या पाठीस लागून धनिकां-च्या दारोदार हिंडलों; पावलोपावलीं ' मला या ' असें दैन्यपूर्वक सगद्गद स्वरानें ज्या त्यापाशीं म्हटलें; आणि दुष्ट व भरत्न मला धनिकांच्या कपाळावर आपल्या नामरूप दर्शनानें आठ्या पाडविल्या;——— पण रामास स्मरते होवरीं सी-ता मात्र होऊन कुश व लव हे दोन पुत्रही झाले; त्यामुळें कुशल-वरू-ना-धनसंपन्नता) मात्र मला माप झाली नाहीं ! ''

राजा कदाचिन् संध्यामालोक्य माह—

परिपतति पयोनिधौ पतंगः ।
ननु बाणः माह —— सरसिरुहामुदरेषु मत्तभृंगः ॥
ननु महेश्वरः कविः — उपवननरुकोटरे विहंगः ।
ततः कालिदासः माह — युवतिजनेषु शनैःशनैरनंगः १०४

—— भोजप्रबंध.

'' एके समयीं भोजराजा संध्याकालची शोभा पाहात होत्साता म्हणाला—

—पहा! पतंग (सूर्य) समुद्रांत बुडतो आहे ——

तेव्हां बाण म्हणाला:—— कमलांच्या गाभ्यांत मधास लोभावलेला भृंग (भुंगा) गुंतून पडतो आहे ——

नंतर महेश्वर म्हणतो —— वाणांनीं झाडांच्या कोठ्यांत विहंग (पक्षी) जाऊन दडतो आहे ——

तेवढीं कालिदास:—— तरुण स्त्रियांच्या ठायीं अनंग (मदन) हळू-हळू संचार करतो आहे —— ''

धनुः पौष्पं मौर्वी मधुकरमयी चंचलदृशां ।
दृशां कोणो बाणः सुहृदपि जडात्मा हिमकरः॥
स्वयं चैकोऽनंगः सकलभुवनं व्याकुलयति ।
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे १०५

'' पहा! मदनाचें धनुष्य काय तर पुष्प;—धनुष्याची दोरी तरी कसली? तर भ्रमरांची;—बाण कोणता? तर चंचल नेत्री ज्या तरुण स्त्रिया त्यांच्या डोळ्यांचा कोपरा (कटाक्ष);—साह्यकारी तरी कोणी मोठा समर्थ?—तो तर जडात्मा (चं-

दबुद्धि; पक्षी, जनमय) असा चंद्र;-आणि स्वतः काय नी एकटा:— पण इतकें असतां ही हा अनंग (ज्याला शरीरही नाहीं!) सगळ्या विश्वास व्याकुळ करून सोडतो. तेव्हां घोर जे आहेत त्यांची क्रियासिद्धि त्यांच्या अंगच्या सामर्थ्यावरच केवळ घडते, उपकरणांत म्हणजे त्यांच्या जवळ असणाऱ्या साहित्यांत-(सैन्यांत, शस्त्रांत वगैरे) काय जीव आहे!"

रथस्येकं चक्रं भुजगयमिताः सप्ततुरगा ।
निरालंबो मार्गश्चरणविकलः सारथिरपि ॥
रविर्यात्येवांतं प्रतिदिनमपारस्य नभसः ।
क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे १०६

हाही श्लोक वरच्याच तात्पर्यावर आहे:——"सूर्याची सामग्री पहा! रथाला चाक एक; घोडे अठरांडुसात; त्यांचे दोर सळसळीत असे साप; मार्ग निराधार; आणि सारथि पाहिला तर व्यंग (ज्याला मांड्या नाहींत असा-पोरा); पण येवढ्या अडचणी असतांही अपरंपार जें आकाश तें प्रतिदिवशीं लंघून सूर्य जातो! तेव्हां क्रियासिद्धि साधनांवर नाहीं, तर मनुष्याच्या अंगच्या हिमतीवर होत असते!"

नपुंसकमिति ज्ञात्वा प्रियायै प्रेषितं मनः ॥
तनु तत्रैव रमते हताः पाणिनिना वयं १०७

"मन हें नपुंसक जाणून प्रियेकडे पाठविलें; पण तें कसलें लबाड! तें तिचे ठायीं रममाण झालें! —तेव्हां पाणिनीनें आम्हांस फसविलें!"

दोषाकरोऽपि कुटिलोऽपि कलंकितोऽपि।
प्रियावसानसमये विहितोद्योऽपि ॥
चंद्रस्तथापि हरवल्लभतामुपैति ।
नैवाश्रितेषु गुणदोषविचारणा स्यात् १०८

"चंद्र हा दोषाकर (दोषांची खाण; म्हणजे संध्याकाळीं मरावा करणारा), कुटिल (वांकडा), कलंकित (दोन्ही अर्थ स्पष्टच आहेत), आणि प्रियाच्या (पत्नी, सूर्याच्या) अंतकाळीं उदय पावणारा, असा आहे: तरी

शिवास तो अत्यंत प्रिय आहे. तस्मात् प्रभु जे आहेत ते आपल्या आश्रितांचे गुण-दोष पाहात नसतात!''

आश्चाम्य पर्वतकुलं तपनोष्णतप्त-
मुद्दाम दावविधुराणि च काननानि ॥
नानानदीनदवतानि च पूरयित्वा
रिक्तोऽसि यज्जनद मेघ नवोन्नमधीः १०९

'' हे मेघा! सूर्याच्या उन्हानें तापलेले पर्वत व वणव्यानें पेटलेलीं रानें पांचो पाडा हरण करून आणि डोंकडो नद्या व नदहो भरून टाकून तूं रिक्त झालास, हेंच तुझ्या वैभवास अत्यंत भूषण झालें!'' ही अन्योक्ति आहे; व हिचा गर्भित अर्थही उघड आहे.

स्तनयुगमश्रुस्नातं समीपनरवर्त्तिहृदयकोशायैः॥
चरति विमुक्ताहारं वनमिव भवतो रिपुस्त्रीणां ११०
कादंबरी.

पोपट राजाची स्तुति करतो:— '' हे राजा! तुझ्या शत्रूंच्या स्त्रियांचें स्तनयुग अश्रूंनीं स्नात होत्साते व विमुक्ताहार (त्यक्त भोजन; पक्षीं मुक्ताहाररहित) होऊन जयलक्ष्मीची उपासनाच करते आहे काय असें वाटतें!''

साधारणतरुवृत्त्या न मया रचितस्तवावतारोऽपि॥
लज्जयसि मामिदानीं चंपक भवनाधिवासिनैः कुसुमैः १११

'' हे चांफ्या! तूं कोणी यःकश्चित् वृक्ष असशील असा समजूतीनें मी तुला तुसतें आलेंही रचलें नाहीं. पण तोच तूं आतां परभर वास मरणाऱ्या फुलांनीं भला लाजवतो आहेस!'' ही अन्योक्ति आहे. मंदिरसंस्थावरून वरोरे ज्याची आपण अवगणना केली असतां जो पुढें मोठा लौकिकास आला असता चाकरास, शिष्यास-वगैरेही लागले.

कस्येयं तरुणि मया पथिक नः किं तेऽस्त्यनेन पथः।
धेनोर्वा उत माहिषं वधिर रे वारः कथं मंगलः ॥
सोमो वाऽथ शनैश्चरोऽमृतमिदं तन्नेऽधरे क्षयतो।

श्रीमत्पांथ विलासस्कंदर सखे यद्वोचते तन्निबद्ध १९२

कोणी पांथ एका पाणपोईवर पाणी प्यावयास आला असता तेथें एका तरुणीस पाहून म्हणतो:—— " हे तरुणि! ही पोई कोणाची आहे?— हे पांथा, आम्ची.—हीत पिण्यास काय आहे?—पय.—गायीचें कीं म्हशीचें?—रे बहिऱ्या, वार: (उदक).— सोमवार कीं गुरुवार?— नाहीं नाहीं. हें अमृत आहे.—कोणतें? तुझ्या मधराचे ठायीं दिसत आहे तें काय?— हे चतुर व सुंदर पांथा, तुला तें द्यावें तें पी!"

अमंत्रमक्षरं नास्ति नास्ति मूलमनौषधं ॥
अयोग्य: पुरुषो नास्ति योजकस्तत्र दुर्लभ: १९३

" कोणतेंही अक्षर मंत्राचेंगुण नाहीं. मुळी औषधा चेंगुण नाहीं, किंवा पुरुष योग्यतेचेंगुण नाहीं! योजक मात्र पाहिजे!"

कमलासनकमलेक्षणकमलाधिकिरीटकमलभूद्वाहै: ॥
नुतपदकमला कमला करधृतकमला करोतु मे कमलं १९४

" ब्रह्मदेव, विष्णु, शिव, आणि वरुण (?), हे जिच्या पदकमलाची स्तुति करतात, आणि जिच्या हातांत कमल आहे, अशी लक्ष्मी माझें पुष्कळ कल्याण करो." या आर्येंत सर्वत्र अनुप्रास आहे.

उपशमितमेघनादं मज्वलितदशाननं रमितरामं ॥
रामायणमिव सुभगं दीपदिनं हरतु वो दुरितं १९५.

कवि रामायणाचें आणि दीपदिनाचें (दिवाळीचें) साम्य वर्णन करतो:——

" (रामायणपक्षीं) ज्या काव्यांत मेघनादाचा (इंद्रजिताचा) उपशम (अंत) आहे, रावण कोपायमान झाला आहे, आणि राम आनंदित झाला आहे:—

(दीपदिनपक्षीं) पावसाळा बुडताच गेल्यामुळें मेघांचा गडगडाट ज्यांत नाहींसा झाला आहे, वातींच्या दशा (टोकें) ज्यांत मज्वलित झाल्या आहेत, स्त्रियांस ज्यांत मोठा उत्सव प्राप्त होतो,— असा हा सण तुमच्या पातकांचें हरण करो!"

आहारे विरति: समस्तविषयग्रासे निवृत्ति: परा ।

नासाग्रे नयनं तदेतदपरं यच्चैकतानं मनः ।।
मौनं चेदमिदं च शून्यमधुना यद्विश्वमाभासते ।
तद्ब्रूयाः सखि योगिनी किमसि भोः किंवा वियोगिन्यसि ११६

यानंतर विरहामुळें उदास झालेल्या एका स्त्रीस तिची सखी विचारते:—

" हे सखि! तूं नेत्र टाकलेस, सर्व विषयांपासून अत्यंत पराङ्मुख झालीस, नाकावर दृष्टि लावून बसली आहेस, तसेंच तुझें मन केवळ एकाग्र झालेसें दिसत आहे, मौन धारण केलें आहेस, सर्व विश्व तुला शून्य भासतें आहे,—तेव्हां सांग तूं योगिनी (योगधारण केलेली) आहेस कीं वियोगिनी (विरहिणी) आहेस!"

किमिंदुः किं पद्मं किमु मुकुरबिंबं किमु मुखं ।
किमब्जे किं मीनौ किमु मदनबाणौ किमु दृशौ ।।
खगौ वा गुच्छौ वा कनककलशौ वा किमु कुचौ ।
तडिद्वा नागो वा कनकलतिका वा किमबला ११७

कवि कोण्या रूपवतीचे वर्णन करतो :—— " हा चंद्र आहे कीं कमल आहे, कीं आरसा आहे, कीं तोंड आहे!— हीं कमलें आहेत, कीं मासे आहेत, कीं मदनाचे बाण आहेत, कीं डोळे आहेत!— तसेंच हे कोण? चक्रवाक, फुलांचे झेंडे, सुवर्णाचें कलश, कीं कुच!— तसेंच ही वीज आहे काय! कीं चांदणी, कीं सोन्याचा वेल, का स्त्री!"

अनिलेपलुतमयासयोर्मलिनाभ्यंतरयोरधीरयोः ।।
स्मृतिलोकपरत्वमेतयोरुचितं लोचनयोर्मृगीदृशः ११८

" ते डोळे अनिलेपलुतमयासयोर्(कर्णपर्यंतापर्यंत चोचण्याविषयीं; वेदोल्लंघनाविषयीं) उद्युक्त आहेत. त्यांचे अभ्यंतर मलिन आहे (एके अर्थीं, काजळानें; दुसऱ्या अर्थीं ते मलिनांतःकरण आहेत), ते अधीर आहेत (चंचल; विवेकशून्य), ते स्मृतीचा (स्मरणाचा; शास्त्रादिकांचा) लोप करण्यात हें ठीकच आहे!"

विद्वज्जनसभामध्ये नारीमथमसंगमे ।।
रणे रिपुसमाकीर्णे कोन कातरतां व्रजेत् ११९

" पंडितांच्या समाजांत, स्त्रीच्या माथमिक समागमाचे वेळीं, आणि रणांगणांत शत्रूंवीं पडिल्याने गांठ पडली असतां कोणाचा उर धडाडत नाहीं!"

अकस्मादागारे रहसि मिलितापि प्रियतमा ।
समाश्लिष्टा नागंतुकपिशुनभीतेन मनसा ॥
अथैषा मामज्ञं निपुणमथ सावज्ञमथवा ।
न जाने किं मेने प्रतिपलमतस्लाम्यति मनः ११९

कोणी कवि स्वानुभूत एक चमत्कारिक दृष्टांत वर्णितो:— " माझ्या प्रियेची आणि माझी अकस्मात् एकीकडे गांठ पडली असतांही मी तीस आलिंगिली नाहीं: कां कीं न जाणों इतक्यांत कोणी आलें तर तें सर्वांस कळेल असा मला धाक वाटला! पण आतां माझ्या मनाला सारखी चुरचुर लागून गेली आहे कीं, त्या माझ्या रूतीवरून ती मला अज्ञान समजली, पक्का समजली, कीं तिची मीं अवज्ञा केली असें तीस वाटलें, कायजणें! "

पातु वो निकषग्रावा मतिहेम्नः सरस्वती ॥
माज्ञेतरपरिच्छेदं वचसैव करोति या १२०

" मति हें च कोणी सोनें हें जिच्यावर तेव्हांच कसलें जाऊन एक्या वचनांतच जी शाहाणा व मूर्ख यांचा भेद कळवते, त्या सरस्वतीस नमन असो. "

वेणी श्यामा भुजंगीयं नितंबान्मस्तकं गता ॥
वक्त्रचंद्रसुधां लेढुं साद्रसिंदूरजिह्वया १२१

कोणी कवि वेणीवर उत्प्रेक्षा करतो:— " मला वाटतें, ही वेणी काळी सर्पीण आहे। आणि ही मुखचंद्राच्या ठायीं असणारें जें अमृत तें आपल्या सिंदूररूप लालजिभेनें चाटण्याकरतांच नितंबस्थलापासून वर गेली आहे काय!" वेणीचा शेवटाकडीं निमुळता होत गेलेला आकार, पेडांची वीण, आणि दुसऱ्या शेवटाकडीं होत जाणारा पसरटपणा, तसाच काळा रंग, हे सर्व वरील उत्प्रेक्षेचे अवयव होत; आणि बायका मांगांत शेंदूर घालतांतान यावरही वरील श्लोकांत लक्ष्य आहे.

भूमौ स्खलितपादानां भूमिरेवावलंबनं ॥

त्वयि जातापराधानां त्वमेव शरणं मम १२२

कोणी भक्त परमेश्वरास म्हणतो :—— " हे देवा! भूमीवर पदस्खलन झा-ले असतां म्हणजे पाय मुरगळला असतां त्या मनुष्यास सांवरणारी पुनः भूमीच; त्याचप्रमाणे आम्हा मनुष्यांच्या हातून अपराध झाले तरी तुझ्याकडेच पुनः आ-म्हांस येणें आहे; कारण तुजशिवाय दुसरें कोण आणें आहे?"

दंतावलिर्विगलिता गलितं शरीरं ।
केशाश्च फेनधवला नहि मे विषादः ॥
एणीदृशो युवतयः पथि मां विलोक्य ।
नानेति भाषणपरा शतकुंभघानः १२३

कोणी विषयलंपट पुरुष वृद्धत्वावस्था आली असतां खेद प्रदर्शित करतो:—

" माझे दांत पडले, शरीर थकलें, केस फेसाप्रमाणें पांढरे पक्क झाले; इत्या-दि गोष्टींचा मला खेद वाटत नाही;— परंतु हरिणनयना ज्या तरुण स्त्रिया त्या मला वाटेंत जाता आल्या असतां 'बाबा' शब्दानें मला दूर होण्यास सांगतात, तो शब्द मला डोंगर आल्याप्रमाणें दोंचतो!"

ज्वलति चलितेंधनोऽग्निर्विमुक्तः पन्नगः फणं कुरुते॥
प्रायः स्वं महिमानं क्षोभात्मनिपद्यते हि जनाः १२४
शाकुंतल.

" सर्पण चाळवले असतां अग्नि पेट घेतो, साप डिवचल्या बरोबर फडा का-ढतो; सारांश, तेजस्वी ते असतात त्यांस राग आणला असतां ते आपला म-हाव तत्क्षणीं प्रगट करतात."

असहनो नायं न च वरगुणैरेष रहितः । ।
प्रियो मुक्ताहारस्तव चरणमूले निपतितः॥
गृहाणेनं भद्रे व्रजतु नव कंठप्रणयिता— ।
मुपायो नास्त्यन्यस्तव हृदयनापोपशमने १२५

कोणी नायिका नायकावर रुसून तिनें गळ्यांतील हारवीर पाय तोडून फेंकू-

न दिले. नेंदा तिची एक सखी तिच्या पायांशीं पडलेल्या हारास बाह्यात्कारा-
उद्देशून बोलून श्लेषोक्तीनें तिच्या वल्लभाविषयीं तीस सांगते :———

"अगे सखि! हा सहृन (वाटोळा; पक्षीं, रुजील) नाहींसा नाहीं;
नसाच वरगुणांनीं (चांगल्या दोऱ्यांनीं; पक्षीं, वरास जे गुण असावे त्यांनीं)
ही हा कमी नाहीं; हा तुझा मुक्ताहार तुझ्या पायांशीं पडला आहे (पक्षीं, तु-
झा प्रिय त्यक्तजीवन होत्साता तुझ्या पायां पडतो आहे); तर हे गडे, याला
जवळ घे; आणि हा तुझ्या गळां पडो: कारण तुझ्या हृदयाचा ताप शमण्यास
दुसरा उपाय नाहीं!"

यास्यति जलधरसमयस्तव च समृद्धिर्लघीयसी भविता ॥
तटिनि तरद्रुमपाननपानकमेकं चिरस्थायि ॥१२६॥

कोणी कवि वर्षाकाळीं फुगलेल्या नदीस उद्देशून म्हणतो :— "हे नदि!
हा वर्षाकाळ निघून जाईल, व तसेंच तुझें हें वैभवही फार टिकलसें नाहीं: पण -
तीरावरील झाडांस तूं उपटून टाकिलेंस हें पानक मात्र तुला चिरकाळ जडलें!"
ही अर्थानच मन्योक्ति आहे.

केशाः संयमिनः श्रुतेरपि परं पारं गते लोचने ।
अंतर्वक्त्रमपि स्वभावशुचिभिः कीर्णं द्विजानां गणैः ॥
मुक्तानां सततावियासरुचिरं वक्षोज कुंभद्वय- ।
मित्थं तन्वि वपुः प्रशांतमपि ते क्षोभं करोत्येव नः १२७

भर्तृहरि.

"हे तन्वि! तुझे केस संयमी (बांधलेले; पक्षीं. जितेंद्रिय) आहेत; तु
झे डोळे श्रुतीच्या (कर्णाच्या; वेदाच्या) ही पार गेले आहेत; तुझ्या मुख-
चेष्टाही स्वभावतःच स्वच्छ (शुभ्र; निष्पाप) अशी द्विजपंक्ति (दोनी अर्थ
मिश्रित आहेत) आहे; आणि तुझे स्तनरूप मुक्तांच्या (मोत्यांच्या; पक्षीं,
जीवन्मुक्त योग्यांच्या) निरंतर सहवासानें पवित्र झालेलें आहे; —— मग ये-
वढा शांतीची सामग्री जवळ असतांही तुझें शरीर आमच्या मनास क्षुब्ध-
कां हों करतें?" *

---

* यावर श्लोकार्धें मागून आपांनतर पंडितांनी असें केलें आहे:——— (पुढील पृष्ठ पहा.)

श्रीरामे मृगयां गतेऽपि धनुषा बाणे समारोपिते।
ज्याकर्णीनगतेऽपि मुष्टिगलिते ऽप्येनांगलग्नेऽपि च॥
नत्रस्तं न पलायितं न चकितं नोत्कंपितं नोद्धतं ।
मृग्या महदागं करोनि दयितं कामोऽयमित्याशया १२८

"राम मृगयेस गेला असतां त्याने धनुष्यावर बाण ठेवला, कर्णमदेशापर्यंत ओढला, आणि एका मृगावर लक्ष्य धरून तो त्याच्या अंगावर सोडून दिला;—पण इतकें केलें तरी ही त्याची स्त्री हरिणी भ्याली नाहीं, पळाली नाहीं, चकित झाली नाहीं, आणि कंपही पावली नाहीं: कां, तर नाथ मजशी भ्रांति झाली कीं, हा मदन च आहे: व माझ्या स्वार्थास यास करण्याकरितां हा यावर बाण टाकतो आहे!"

चांचल्यमृक्षेः श्रवमस्मुरंगात ।
कौटिल्यमिंदोर्विषतो विमोहः ॥
इति श्रिया शिक्षित महोदरेभ्यो ।
नवेधि कस्माद्गुणवद्विरोधः॥१२८॥

कोणी कवि लक्ष्मी आणि सरस्वती यांच्या विरोधाचा अनुलक्षून म्हणतो:—

"लक्ष्मीनें आपल्या भावंडापासून एक एक गुण घेतला — उच्चैःश्रवा नामक अश्वापासून चापल्य, चंद्रापासून कुटिलपणा, आणि विषापासून उन्मादकपणा: पण गुणिजनांचा विरोध करण्याचा गुण ही कोणापासून शिकली हें कळत नाहीं!"

विलासिनी कांचनपट्टिकायां। शरीरपंकेरिंदीवरी विलिख्य॥
तस्याः कपोले व्यलिखत्पयोधौ। ओष्ठे नवर्गं चरणे टवर्गं १२९

"कोणा विरही पुरुषाने सोन्याच्या चित्रफलकावर चंदनाच्या रसाने आपल्या प्रियेचा मनोहर काढून तिच्या गालावर पवर्ग, अधरोष्ठावर नवर्ग, आणि पायांवर

ओष्ठे मयमवर्णित केला वपन कर्यनही पावले ।
मंतर्वेच्च गुणिमंत द्विजगणीं नें सर्वसा मंथिलें ॥
मुकांचा मनचा विलास दुरवी महनताही मनीं ।
नेमें ज्ञान शरीर याप करिने को मांग वा कामिनी ॥

चित्रचा कपाळाच्या शेवटीं आणलेल्या कारानें नवीन स्नेह आपण जोडून घातलेनें पालून दिला आहे हें मार्मिक वाचणाऱ्यांच्या लक्षांत येईलच!

दवर्ण पामपाणें वर्ण लिहिले. ''

अभिमाष म्हणजे आदर की तिरस्कार स्थानें अनुक्रमें करून ओष्ठ्य, दंत्य, भाणि मूर्धन्य द्रोन!''

हारो नागेषिनः कंठे मया विश्लेषभीरुणा ॥
इदानीमंतरे जानाः सरित्सागरदुर्गमाः १३०
हनूमन्नाटक.

राम विरहातुर होत्साता पूर्वस्थिति आठवून म्हणतो:— '' ज्या मला पूर्वी विरह इतका सहन होत नसे की गळ्यांतला हार देखील मला शत्रुसारखा वाटे, त्या-च माझ्यामधें आणि सीतेमधें आतां नद्या, सागर, पर्वत इत्यादि आले आहेत!''

मनस्वी म्रियते कामं कार्पण्यं न तु गच्छति ॥
अपि निर्वाणमायाति नानलो याति शीतलं १३१

'' मनस्वी म्हणजे थोर मनाचे जे भगवान ते मरून जातात, पण दैन्य कधींही पत्करीत नाहींत. पहा! अग्नि विझून जातो; पण कधीं थंड झाला आहे काय? ''

न संध्यां संधत्ते नियमितनिमाजां न कुरुते ।
न वा मौंजीबंधं कलयति न वा सौवतविधिम् ॥
न गोजां जानीते व्रतमपि हरेर्नैव कुरुते ।
न काशीं मक्कां वा शिवशिव न हिंदुर्न यवनः १३२

''संध्या करीत नाहीं, व निमाजही पढत नाहीं; ज्याला मुंजहा नको, व सुंनेची ही गरज नाहीं; गोजा माहीत नाहीं, व एकादशीही करीत नाहीं; जो काशीमक्काही मानीत नाहीं, आणि मक्केलाही विचारीत नाहीं;— एकून हर हर! जो धड हिंदुही नाहीं आणि मुसलमानही नाहीं!'' *

---

* वरील पद्यावरून ब्रह्मोपासनेंत गेल्या शतकांत पर्यंत्या संबंधानें वरीच चलविचल झाली असावी असें दिसतें. म्हणजे आजीकडे तीस चाळीस वर्षे ब्रह्मोपासनेचा प्रसार जसा झाला आहे, तसाच या पूर्वी पंढरपुरच्या वैष्णवपंथाची बोळवंडे सारखा मतांचा असें अनुमान होतें. वरील श्लोकांतील वर्णन सध्यां ज्या काळीं बोंकडी पशुयज्ञांस बोलावा करून केला असतां पुरतेपणीं आगेत. त्रिमूर्तीची व त्यांच्या शास्त्रांविषयीं अशी अवास्तव आतुरता दर्शविल्यास पडते कीं, सर्वांशीं विरुद्ध होऊन पुढारलेल्या वर्गावर

कन्याप्रसूतस्य धनुःप्रसंगात्। मन्मानिनोऽगाहितवैभवस्य॥
धनंजयाधीनपराभवस्य। दीनस्य कर्णस्य च को विशेषः १३३

दुर्योधनमित्र कर्ण म्हणि दीन यांचेर श्लेष:— "कर्णांत म्हणि दीनांत का-य भेद आहे? दोघांचाही जन्म कन्येपासून (कुंतीपासून--कन्यारूढीपासून); दो-घांसही धनुःप्रसंगानें (धनुष्याच्या योगानें--धनुर्विद्येनें), वड येऊन त्यांचा अभि-मानिन प्रभाव मग हो नो: म्हणि दोघांचाही पराजय धनंजयाच्या [अर्जुनाच्या --अर्थाच्या] आधीन ! "

परवादे दृढावदनः परस्त्रीधनिरीक्षणे सहस्राक्षः ॥
सहचरनिद्रणे बाहुसहस्रार्जुनः पिशुनः १३४

" स्वत: हा दुसऱ्याची निंदा करताना दृढामुखाचा गरुण बनतो. दुसऱ्याचें उणें पाहण्यांत सहस्रनेत्र इंद्र होतो. म्हणि सज्जनांचे द्वेष्यद्रण करताना कार्तवीर्यासमा-गे हजार बाहु धारण करतो ! "

सदा वक्रः सदा रुष्टः सदा पूजामपेक्षते ॥
कन्यागर्भोद्भवितो नित्यं जामाता दशमो ग्रहः १३५

कोणी विनोदी कवि जांवयाचें म्हणि ग्रहाचें साम्य वर्णितो:— " जामात हा दहावा ग्रहच होय. कसा? नेहमी वक्र म्हणजे मापल्याच कुर्यांत असणारा, नेहे-मी रुसलेला, नेहमी सन्मानाविना पाहिजे! म्हणों दोहोंत एक साच मोठा भेद आ-हे:— ग्रह नेहमी गरीबरून चढतो, पण हे बोवा कन्यारत्नाम धरून जे एकदां चढतात ते मग हालत नाहींत ! "

जले तैलं खले गुह्यं पात्रे दानं मनागपि ॥
प्राज्ञे शास्त्रं स्वयं याति विस्तारं वस्तुशक्तितः १३६

" पाण्याचे ठायीं तेल, खलाचे ठायीं एकादी गुप्तगोष्ट, सत्पात्राचे ठायीं केले-

---

त्रिपाठींचें पद्य, दुर्योधन पंढरीच्या पताकेसमोर तुकाराम महाराजांचा गाथा, जिसें पहाटें योगा-भ्यास, सायंकाळीं पाळण्यांतील सुरम पदें, म्हणि सदा वैकुंठनाथ ईश्वरपुत्र शरीरधारिन! के-ला एकंदर पसारच काय कीं, सरते शेवटीं ईश्वर त्या द्वारानें द्वारकापुरीस निघून जाण्या-ला लागले !

मैं अन्यहा दान, विचक्षण शिष्यास शिकवलेलें शास्त्र. हीं सर्व केवळ स्वभावतः-
च वस्तुमाहात्म्यासच विस्तार पावतात ! ''

वरं दरिद्रः श्रुतिशास्त्रपारगो ।
न चापि मूर्खो बहुरत्नसंयुतः ॥
सुलोचना जीर्णपटाऽपि शोभते ।
ननेत्रहीना कनकैरलंकृता १३७

''वेदशास्त्रांत पारंगत झालेला असा दरिद्री असला तरी बरा, पण जडा-वाचे रागिने पाहलेलाही मूर्ख नको; पहा कीं, जिचे डोळे सुरेख आहेत अशी सुंदर स्त्री जीर्णवस्त्र नेसली असतांही शोभते, पण जिला डोळे नाहींत ती सो-न्यानें मढवून टाकली असतांही शोभत नाहीं. ''

आज्ञा नाम मनुष्याणां काचिदाश्चर्यशृंखला ॥
यया बद्धाः प्रधावंति मुक्तास्तिष्ठंति पंगुवत् १३८

''आज्ञा ही कोणी आश्चर्यकारक शृंखला होय! कशी? तर तिनें जे बद्ध-होतात ते धांवूं लागतात; आणि तिजपासून मुक्त जे झाले ते पांगळ्यासारखे जागच्या जागीं बसतात! '' म्हणजे जे द्रव्याच्या आशेला गुंतलेले असतात त्यां-स नेहमीं यातायात करावी लागते; आणि जे निरिच्छ असतात ते खुशाल स्वातंत्र्या-नें वागतात.

आलस्यं स्थिरतामुपैति भजते चापल्यमुद्योगिनां ।
मूकत्वं मितभाषितां विनयते मौढ्यं भवेदार्जवम् ॥
पात्रापात्रविचारणाविरहिता यच्छत्युदारात्मनां ।
मानर्लक्ष्मि नव प्रसादवशतो दोषा अपि स्युर्गुणाः १३९

कवि लक्ष्मीचा प्रभाव वर्णन करतो :— '' श्रीमंताचे ठायीं आळस असला तरी तो स्थैर्य व गंभीरपणा हे नांव पावतो; चापल्य म्हणजे शिकाम्या उलाढाली कर-ण्याचा असला, तरी त्यास उद्योग हें नांव प्राप्त होतें; मुखदुर्बळपणा मितभाषी-पणा होतो; मूर्खत्व सरळपणा म्हणून गणलें जातें; आणि पात्रापात्रविचारशून्यता या दोषास मनाचें औदार्य असें रूप लोक देतात: सारांश, हे माते लक्ष्मि! तुझ्या म-

सादृश्यमूल दोषं नहीं गुण होनादेत!"

युक्तोऽसि भुवनभारे मावक्तां विततु कंधरां शेष ॥
अन्यैकस्मिन् कष्टे सुखितानि भवंति भुवनानि १४०

"हे शेषा! तुझ्यावर अवघ्या भुवनांचा भार आहे; तर तू आपली मानभावल्याचें दुःख मानून ती वाकडी करूनको. कां तर, तुला एकट्याला कष्ट होऊन त्यावर सगळ्या जगतास सुख होत आहे!" ही अन्योक्ति होय.

गिरिरपि न गृहति नाटक्क पाटक्क संनपति वालुकानिकरः ॥
अन्यस्मात्लुब्धपदः प्रायो नीचोऽपि दुःसहो भवति ॥ १४१ ॥

"पहा काय चमत्कार आहे! मत्सर मूर्तीपासूनही इतको नाश होत नाहीं; पण या वाळूत पायाला काय चटके बसतात! तस्मात् नीच (द्वयर्थी) जो आहे त्यास दुसऱ्यापासून अधिकार मिळाला असतां मूळच्या धन्याहूनही तो दुःसह होतो!"

वाग्वादश्चार्थसंबंधः परोक्षे दारभाषणम् ॥
यदिच्छेद्विपुलां मैत्रीं त्रीणि तत्र न कारयेत् १४२

"त्याने कोणाशीं निरंतर स्नेह देवाघेवा असेल त्याने त्याशीं पुढील तीन गोष्टी कधीं नयेत— एक वाग्वाद म्हणजे वाद घेऊन भांडत बसणें; दुसरा,-अर्थसंबंध म्हणजे पैशाचे देणें घेणें करणें; आणि तिसरी त्याच्या पश्चात त्याच्या बायकोशीं बोलणें!"

नवकीर्तिर्नवलक्ष्मीः कुलमकलंकं गुणास्त्वदायत्ताः ।
मंदस्मितं विबुधवामदृशां मदनाः ॥
नन्वेवं गुणेषु नव कीर्तिषु रंधनेषो ।
हासं न जातु इति नाम मिथो हसंति १४३

कोणी भाट राजाचा स्तव करतो:— "हे राजा! तुझ्या कीर्ति हीच कोणी पुष्पाफळें तीं तुझ्या गुणांहीं (दोन्ही अर्थ मिसळ आहेत) भांवतपास देवी म्हणा लागल्या. पण गुण हातीं घेऊन पहाल्यास तीं त्यास भंवत नाहीं, म्हणोन

नीसि लहानही रंध्र नाहीं, हें पाहून हार करावा नरी कसा असें म्हणून आपल्या आपल्यांतच त्या हसूं लागल्या !"

मंदरेण मथितोऽसि न पापिन् ग्रासितोऽसि तमसा न दुरात्मन् ॥
त्वां शरेण शतधा परिनिन्ये जानकीमुखसमो यदि न स्याः १४४

हनूमन्नाटक.

विरही राम चंद्राची निर्भर्त्सना करतो :— " हे दुष्टा! तुला मंदरपर्वतानें पुसळून कसा टाकला नाहीं; व राहूनें गिळला कसा नाहीं! अरे, जर तूं जानकीच्या मुखासारखा नसतास तर तुला या क्षणीं शरानें शतधा विदीर्ण करून टाकला असता! "

कांतं वक्ति कपोतिकाऽकुशलधा नाथांतकालोऽधुना ।
व्याधोऽधो धृतचापसज्जिनशरः श्येनः परिभ्राम्यति ॥
इत्थं सत्यहिना स दृष्ट इषुणा श्येनोऽपि तेनाहतः ।
तूर्णं नौ नु यमालयं मति गतौ देवी विचित्रा गतिः १४५

" कपोतिका आपल्या नवऱ्यास म्हणते, ' हे प्रिया! आतां या संकटांतून आपण बांचत नाहीं. पहा, तो पारधी धनुष्यास बाण लावून खालीं उभा आहे; आणि उडून जावें तर ससाणा श्येनाली मराव्या मारतो आहे! ' असें ती बोलते आहे तों व्याधास सर्पदंश झाला, आणि त्यामुळें त्याचा नेम चुकून ससाण्यासच बाण लागला. याप्रमाणें ते दोघे तत्क्षणीं यमसदनास जाऊन तो पक्ष्यांचा विचारा जोडा अयुक्त होत्साता आनंदानें उडून गेला! तस्मात् दैवगति विचित्र! "

हृदयानि सतामेव कठिनानीति मे मतिः ॥
खलवाग्विद्धि रेवस्ती क्ष्णेभिद्यंते न मनाग्यतः १४६

" सज्जनांचीच अंतःकरणें अत्यंत कठोर असें मला वाटतें; कां तर दुष्टांच्या तीक्ष्ण वाग्बाणांनीं हा जीं यत्किंचित् ही भंग पावत नाहींत! "

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरुस्तथा ॥
पापं तापं च दैन्यं च सद्यः साधुसमागमात् १४७

सज्जनांच्या समागमाचें माहात्म्यः— " गंगा पातकाचे हरण करते, चंद्र ता-
पाला विनो, आणि कल्पवृक्ष दारिद्र्य नाहींसें करतो. पण साधूचा समागम होतांच
पाप, ताप, आणि दैन्य हीं सर्वीं दूर होतात! "

कांनोऽसि नित्य मधुरोऽसि रसाकुलोऽसि ।
किंचासि पंचशरकार्मुकमद्वितीयम् ॥
इक्षो नवास्ति सकलं परमेकमूनं ।
यत्सेविनो भजसि नीरसतां क्रमेण ॥ १४८ ॥

कोणी कवि बाह्यात्कारीं उंसास बोलून भव्योक्तीनें रा नाम ग्रहणतो:—

" हे उंसा! तूं दिसण्या आद्देस. नद्देसीं मधुर व रसानें परिपूर्ण असा असतोस;
फार काय सांगावें. तूंच कामदेवाचें एक धनुष्य होस. पण तुझेठायीं एकमात्र उणें
आहे कीं, तुझगेचर नीरस (रसहीन— आदरशून्य) होतात! "

अनधिगतमनोरथस्य पूर्वं । ज्ञानगुणितेव गता मम त्रियामा ॥
यदि नु तव समागमे नथैव । प्रसरति मुग्धे तनः कुतो भवेयं १४९
विक्रमोर्वशी.

नायक नायिकेस ग्रणतो:— " हे मुग्धे! ममाप मनोरथ असतां माझी
रात्र जशी ज्ञानगुणित झाल्याप्रमाणें जात असे, त्याचप्रमाणें तुझ्या समागमांत-
ही तीं जाईल, तर मग माझ्यासारखा धन्य कोण? "

रे रे घरट्ट मा रोदीः कं कं न भ्रामयंत्यमुः ॥
कटाक्षवीक्षणादेव कराकृष्टस्य का कथा १५०

" हे घरटा! या स्त्रिया केवल कटाक्षवीक्षणानेंही कोणास भ्रमण करवि-
त नाहींत? मग तुला तर हातांनीं ओढले आहे; तेव्हां तुझी दुर्दशा तर
काय पुसावी! तूं उगीच कशाला दीनवाणा आक्रोश करतोस? "

मूर्खस्य पंच चिन्हानि गर्वी दुर्वचनी तथा ॥
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते १५१

" मूर्खांचीं हीं पांच चिन्हें होत:— गर्वानें फुगून जाणें, दुसऱ्यास हसून बो-

नणें, मापलाच हेका धरून बसणें, अप्रिय भाषण करणें, भाणि दुसऱ्याचें बोलणें न ऐकणें!"

इंदीवराक्ष्याः स्फुटविद्रुमोष्ठ्याः। संकेतमुद्दिश्य वने चरंत्याः॥
चौरैः समस्ताभरणानि हृत्वा। नामामणिं नापहरंति चित्रं १५२

"कोणी स्त्री वनांत भेटण्याविषयीं आपल्या वल्लभाशीं संकेत करून निघते ना न होती. या स्त्रीचे डोळे नीलकमलासारखे काळे आणि होते. व तिच्या ओठांवर पोवळ्याची लाली होती. फिरतां फिरतां एकदम तिला चोरांनी गांठले. आणि तिचे सर्व दागिने चुचाडून नेले; पण एकनाम मात्र नेली नाहीं! काय चमत्कार आहे!" - वरील दागिनाच नेतात चोरांनी कोणत्या हेतु करांनें पहिल्या चरणांत गर्भित केला आहे. तो हा कीं, नथेच्या मोत्यावर बसून डाळ्यांचा नीलवर्ण पडून ते त्यांच्यांत प्रतिबिंबित झाल्यामुळें गुंजाफलांचा भ्रम होऊन चोरांनीं त्यांस हात घातला नाहीं! कल्पना मोठ्या मोजकी आहे खरी; पण वरील श्लोकावर अंमळ अतिशयोक्तीचा दोष यतो.

वाणी मनोज्ञ सरसा यदि रंजयित्री। नमार्थ्यते रसविदामवधान दानं ॥
सायंतनीषु मकरंदवतीषु यूंगाः। किं मल्लिकासु परयंत्रणमारभंते १५३

"माझी वाणीच जर सरस व रंजन करणारी आहे, तर रसिकांस अवधान देण्याविषयीं मला मागणें करणें नलगे; पहा कीं, सायंकाळीं प्रफुल्लित झालेल्या व मकरंदयुक्त अशा मल्लिका त्यांस भ्रमरांस आपल्या ठायीं मध करण्यास दुसरी तजवीज कांहीं करावी लागते काय?"

मदारितोऽपि मार्जारस्तमांसुं नैव मुंचति ॥
बहुधा बोधितो मूर्खस्तमांसुं नैव मुंचति १५४

"मांजर उंदराचर टपून बसलें असतां त्याम मारलें तरी तें त्यास सोडीत नाहीं; तसाच मूर्खास किंतीही पढविला तरी तो तमासु सोडीत नाहीं!"

पुरुषमेकं पुरस्कृत्य मूल्यात्मानोऽपि साधकाः ॥
यांति तं विनानैव यथा संख्यांकबिंदवः॥ १५५॥

कोणी चांगला मनुष्य पुढारी झाला असतां बाकीचे लोक मुसने खोगीर भरतीला असले तरी ते कार्य-साधक होतात; तो नसेल तर त्यांच्या हातून कांहींच व्हावयाचें नाहीं. तसें अंकगणितातील आंकडे आणि शून्यें; शून्यास जी किंमत येते ती मागील आंकड्यांनीं; ते नसतील तर तीं शून्यें च !"

आघ्रातं कमलं प्रियेण सुतरां स्मित्वाऽपनीतं मुखं।
दत्तं विघ्नमकंदुके नखपदं सीत्कृत्य गूढो मनौ ॥
दत्ता चंपकमालिकोरसि तया मोद्भिन्नरोमांचया ।
मालस्लोचनया स्थितं प्रणयिनो दूरेऽपि पूर्णं रहः १५६

" प्रियानें कमलाचा वास घेतला असतां, स्त्रीनें त्याचा भाव समजून हसून मुकीकडे तोंड केलें; त्यानें तीला कंदुकावर नखपदाचें चिन्ह केलें असतां तिनें रुसल्कार करून पदर वीट सरसावून घेतला; आणि तोवर तिच्या चंपकपुष्पाची माला त्यानें आपल्या गुलाटी घातली, तेव्हां रोमांचित होऊन व डोळे मिटून ती प्रियापासून दूर असतां तत्क्षणीच जागच्या जागीं स्तब्ध होऊन राहिली ! "

गुणदोषौ बुधोगृह्णात्यविदुष्वेवाविवेश्वरः॥
शिरसा श्लाघते पूर्वं परं कंठे निधत्ते न १५७

" जो सुज्ञ असेल तो दुसऱ्याच्या कवींतील गुण व दोष दोन्हीही घेतो, कीं न्यायमार्गें शंकरानें चंद्र व विष हीं दोन्हींही ग्रहण केलीं: पण न्यायमार्गें शिवानें एकाला मस्तकीं धारण केला व दुसऱ्यास आपल्या कंठाचे ठायीं ठाव दिला, त्याचप्रमाणें वरील सुज्ञजन गुणाची श्लाघा करून दोष मनांत ठेवतो. "

अयं मे वाग्गुम्फो विदग्धपदवैदग्ध्यमधुरः ।
स्फुरद्बंधो बंध्यः पशुहृदि कृतार्थः कविहृदि ॥
कटाक्षो वामाक्ष्या दरदलितनेत्रांतकलितः।
कुमारे निःसारः सतु किमपि पुनः सुरवयति १५८

" मजसारखे अर्थ परांच्या रचनाचातुर्यकरून युक्त व मनास चमत्कार देणारा असा माझा काव्यप्रबंध पशु ह्मणजे जो अरसिक माणूस त्याच्या हृदयांत निष्फळ होईल; पण तोच कवीच्या ह्मणजे रसिकाच्या हृदयांत सफळता पावेल. कसा? कीं जसा -

करीचा नेत्रान्त किंचित आकुंचित करून फेकलेला कटाक्ष अर्जुनाचे ठायीं निःसार होऊन तरुणास अनिद्रायेंकरून क्लेशप्रद होतो! ''

स्त्रीनांमुर्मुखमुत्पले तव दृशौ पद्मानुकारौ करौ ।
रंभागर्भनिभं नवोरुयुगुलं बाहू मृणालोपमौ ॥
इत्याल्हादकरांखिलांगि रभसान्निःशंकमालिंगमां।
मंगानि त्वमनंगतापविधुराण्येह्येहि निर्वापय १५९

रत्नावली.

नायकाची नायिकेशीं गांठ पडली असतां तो तीस उद्देशून म्हणतो :—

'' हे वल्लभे! तुझें मुख चंद्र होय, डोळे कमळें होत, तुझे हात रक्तकमलांसारखे आहेत, तुझे ऊरुयुगुल केळीच्या गाभ्यासारखें आहे, आणि बाहु कमळाच्या देंठाप्रमाणें आहेत. तर याप्रमाणें सर्वांगांनीं आल्हाद करणारी अशी जी तूं तीला निःशंकपणें सत्वर आलिंगन दे; आणि मदनतापानें पीडिलेल्या माझ्या गात्रांस शीतल कर. चल ये लौकर! ''

घृष्टं घृष्टं पुनरपि पुनश्चंदनं चारुगंधं ।
छिन्नं छिन्नं पुनरपि पुनः स्वादु चैवेक्षुदंडं ॥
दग्धं दग्धं पुनरपि पुनः कांचनं कांतवर्णं ।
न प्राणांते प्रकृतिविकृतिर्जायते चोत्तमानां १६०

'' चंदन पुनः पुनः घांसलें तरी त्याचा मनोहर गंध येतो; ऊंस पुनःपुनः तोडला तरी त्याचीं कांडीं गोडच लागतात; तसेंच सोनेंही वारंवार तापविलें तरी त्याचा सुंदर वर्ण जात नाहीं: तेव्हां तात्पर्य काय कीं, जे उत्तम पुरुष असतात त्यांच्या प्रकृतीस प्राणांतींही विकार होत नसतो! ''

वदनं दशनविहीनं वाचो नपरिस्फुटा गता शक्तिः॥
अक्ष्णोर्द्वियशक्तिः पुनरपि बाल्यं कृतं जरया १६१

'' जरेनें पुनः बाल्यावस्था माझी केली. कशी? तर मुख दंतविरहित झालें; वाणी अस्पष्ट झाली; शक्ति गेली; आणि सगळ्या इंद्रियांचें सामर्थ्य अव्यक्त झालें! ''

पक्वा चिन्नं तथा वाचो यथा वाप्यस्तथा क्रियाः॥

चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता १६२

"[illegible] वाणी. आणि जशी वाणी तशीच कृति; यामध्यें जे सज्जन [illegible] त्यांचें चित्त, वाणी. आणि क्रिया हीं तिन्ही एकरूप असतात!"

दंपत्योर्निशि जल्पतोर्गृहशुकेनाकर्णितं यद्वचः ।
तन्मातर्मुखसन्निधौ निगदतस्तस्योपहारं वधूः ॥
कर्णालंबिनपद्मरागशकलं बिम्बम्व संचुंबुटे ।
व्रीडार्ता प्रकरोति दाडिमफलव्याजेन वाग्बंधनं १६३

अमरुशतक.

"स्त्रीपुरुषांचें रात्रीचें बोलणें चाललें असतां तें घरांतील शपूनें ऐकून तें दुसऱ्या दिवशीं सकाळीं वडील माणसां देखत तो बोलूं लागला. तेव्हा स्त्रीस लज्जा प्राप्त होऊन तिनें आपल्या कानांतील माणकाचा दागिना काढून डाळिंबाच्या मिषानें पोपटाच्या तोंडांत दिला. आणि त्याचें तोंड बंद करून टाकलें!"

एको देवः केशवोवा शिवोवा । एकं मित्रं भूपतिर्वा यतिर्वा ॥
एको वासः पत्तने वा वने वा । एका भार्या सुंदरी वा दरी वा १६४

"कोणता तरी एक देव असावा, केशव कीं शिव; एक मित्र असावा राजा किंवा यति; राहावें, तर एक शहरांत किंवा वनांत; आणि स्त्री असली तर एक सुंदरी तरी असावी, किंवा आपली दरी तरी करावी (म्हणजे अरण्यवास करावा)!"

पवनचपलवेगः स्थूलधाराशरौघः । स्तनितपटहनादः स्पष्टविद्युत्पताकः ॥
हरति करसमूहं यो ग्रहाणां विभोर्वो । नृप इव पुरमध्ये मंदवीर्यस्य शत्रोः १६५

मृच्छकटिक.

मेघावर पण्डकाचें रूपक:— "याचा वेग तीव्र झाला आहे, मोठ्या धारा हीच ज्याची शरपंक्ति आहे, गर्जना हाच ज्याचा पटहनाद होय, विजेचें स्फुरण हीच ज्याची पताका फडकत आहे, असा मेघ आकाशाचे ग्रहांच्या करसमूहाचें (किरण समुदायाचें, पक्षीं करभाराचें) हरण करीत आहे; कीं ज्याप्रमाणें दुर्बळ झालेल्या शत्रूस त्याच्या नगरांत गांठून एकादा राजा त्याची दुर्दशा

माघश्चोरो मयूरो मुररिपुरपरो भारविः सारविद्यः ।
श्रीहर्षः कालिदासःकविरथ भवभूत्यादयो भोजराजः।।
श्रीदंडी डिंडिमाख्यः श्रुतिमुकुटगुरुर्भल्लटो भट्टबाणः ।
ख्याताश्चान्ये सुबंध्वादय इह कृतिभिर्विश्वमाल्हादयंति १६६

विश्वगुणादर्श.

संस्कृत कवींची माला :— " माघ, चोरकवि, मयूर, मुरारी. उत्तम विद्या पदरेना असा भारवी, श्रीहर्ष, कालिदास, भवभूति, भोजराजा. दंडी. डिंडिम, वेदविचार-दक्ष असा भल्लट, बाणभट्ट, आणि सुबंधु आदिकरून इतर दुसरे कविही आपल्या कवींचें विश्वास आल्हाद देतात. "

यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो ।
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः।।
हर्षो हर्षो हृदयवसतिः पंचबाणस्तु बाणः ।
केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय १६७

जयदेव.

" ज्या कविता वधूचा चोर हा चिकुर निकर (केशपाश), मयूर हा कर्णपूर (कर्णभूषण), भास हा हास (हास्य), कविकुलाचा केवल गुरुच म्हणजे कविश्रेष्ठ जो कालिदास तो जिचा विलास, हर्ष हा हर्ष (चित्ताचा उल्हास) आणि बाण हा जिच्या हृदयांत संचार करणारा साक्षात् पंचबाण (मदन) होय. ती कोणाच्या चित्तास मोहन टाकीत नाहीं ! "

साक्षी पाणिनिपीडनस्य कुचयोराजन्मबंधुश्च मे ।
मुद्रांकोऽमनंगलेखविधिषु द्यूतगृहे बंधकः ।।
अंतःसूत्रमिव प्रियेण हृदयं मूर्त्तेऽपि मेक्षितं ।
चक्षुर्मंगलमंगुलीयकमणिः सोऽयं विराद्दीस्यते १६८

कोणा विरही पुरुषानें आपल्या स्त्रीचें कांहीं सांत्वन करण्याकरतां तिजकडे आपली आंगठी पाठविली. तिनकडे पाहत असतां तिच्या सखीनें विचार-

त्याचप्रमाणे ती सांगते :—

" हा अंगुलीयकमणि उरोजनिपीडनाचा साक्षी होय, याची आणि माझी विवाहापासून आजपर्यंत सारखी प्रीति जडली आहे, परंतु लेखांचे प्रसंगी मुद्रण करण्यास हाच उपयोगी पडे, म्हणजे यूनाचे प्रसंगी हा पणाचे नाणें होई; तर माझ्या प्रियानें विरहोत्कीर्ण आपलें हृदयच जणों काय असा जो हा मणि पाठविला आहे त्याकडे केव्हांपासून मी मोठ्या प्रेमानें बघत आहें ! "

विकृतिं नैव गच्छंति दुष्टसंगेन साधवः ॥
आवेष्टितो महासर्पैश्चंदनः किं विषायते १६९

" दुष्टांचा निरंतर संगति असतांही साधु विकृतीनें पावन असतात, पहा मोठ्या मोठ्या सर्पांनी सदा वेष्टिलेला असतांही चंदन विषारी होतो काय? "

वचस्येव वक्तव्यं यत्रोक्तं सफलं भवेत् ॥
स्थाप्यामवति वात्यंतं रंगः शुक्लपटे यथा १७०

" त्याच ठिकाणी भाषण करावें कीं जेथें त्याची सफलता होईल, म्हणजे पूर्णपणें उमून राहील: कीं जसा पांढऱ्या कापडावर रंग चांगला उमटतो! "

क्षणं सरलवीक्षणं क्षणमपांगसंवीक्षणं ।
क्षणं रत्नसि खेलनं क्षणमतीव भूषादरः ॥
क्षणं द्रुतनटा गतिः क्षणमतीव मंदा गतिः ।
क्षणक्षण विलक्षणं जयति चेष्टितं सुभ्रुवः १७१

कवि सुप्रावस्थेचे विलास वर्णितो :— " क्षणभर सरळ पाहणें, क्षणभर कोन पाहणें, क्षणभर भुवांना वेढणें, क्षणभर दृगदृगिन्यांची होस करणें; क्षणभर सत्वर चालणें, क्षणभर मंदगति दाखविणें; यामप्रमाणें यौवनांत पेंऊ लागणाऱ्या स्त्रीचे विलास क्षणोक्षणीं विलक्षण दिसून येतात ! "

मार्तंडमंडलनिभं भवतः प्रतापं । ये वर्णयंति नहि ते कवयः प्रवीणाः ॥
अंभोनिधौ विलयमेति परं पतंगः । पारं प्रयाति जलधेश्च भवत्प्रतापः १७२

" हे राजा! तुझा प्रताप सूर्यमंडलासारखा आहे असें जे कवि वर्णन करतात

ने मूढ होत; कां कीं, सूर्याचें तेज नों समुद्रांत बुडाला क्षणजे विलयास पावतें: आणि तुझा मनाप नए समुद्राच्याही पलीकडे जातो !"

गुणवानपि नोपयाति पूजां । पुरुषः सत्पुरुषैरकथ्यमानः ।
न हि सौरमणिः स्वभाव कांतिं । रविपादैरनिधिष्ठितः करोति १७३

"पुरुष स्वतः जरी मोठा गुणवान् असला, तरी थोरांनीं जोंवर त्याची प्रशंसा केली नाहीं तोपर्यंत तो लोकमान्यतेस पात्र होत नाहीं. पहा कीं, सूर्यकांत स्वभावतः तेजस्वी असतांही सूर्यकिरणांच्या अधिष्ठानाशिवाय त्याचें तेज बाहेर पडत नाहीं!"

पात्रापात्रविवेकोऽस्ति धेनुपन्नगयोरिव ॥
तृणात्संजायते क्षीरं क्षीरात्संजायते विषं १७४

"दान करते समयीं पात्रापात्र विचार जो करावा लागतो त्याचा प्रकार असा आहे;— पहा, गायीला गवत घातलें तर त्यापासून दूध उत्पन्न होतें; आणि सर्पाला दूध पातलें तर त्याचें विष होतें!"

आशा ये दासास्ते दासाः सर्वलोकस्य ॥
आशा येषां दासी तेषां दासायते लोकः १७५

"जे धनतृष्णेचे दास नेसाऱ्या लोकांचे दास होतात; आणि आशा ज्यांची दासी क्षणजे धनप्राप्तीविषयीं जे केवळ उदासीन असतात त्यांचें दास्य सर्वलोक करतात."

दोषाकरः शिरसि तेऽस्ति गले द्विजिह्वो । पाषाणजा सहचरी पशुरांतरंगः ॥
दुःखं निवेदयसि को मम दीनबंधो । त्वं चेन्निलोचन निर्मलिनलोचनोऽसि १७६

कोणी भक्त शिवास क्षणतो —— "हे त्रिलोचना! दोषाकर (चंद्र—पक्षीं, दोषमय) तर तुझ्या शिरीं आहे, कंठभागीं द्विजिह्व (सर्प; चहाड) आहे, तुझी सखी पाषाणजा (पर्वतकन्या; व पाखंड अर्थीतच कठोरहृदयाची) होय, आणि तुझा मोठा विश्वासक सेवक तो पशु (नंदी) आहे; मग इतकें असून तूंही जर डोळे मिटून राहशील (ध्यानस्थ असशील), तर हे दीनबंधो! माझें दुःख तुला कोण येऊन सांगेल?"

असद्भिः शपथेनोक्तं जलेलिखितमक्षरं ॥
सद्भिस्तु लीलया प्रोक्तं शिलालिखितमक्षरं १७७

"दुष्ट मनुष्यांनी शपथपूर्वक सांगितलेलें अक्षर हें पाण्यावरच्या रेखेसारखें हो-
य; पण सज्जनांनीं सहज बोललेलें वचन शिळेवर लिहिल्याप्रमाणें!"

उद्योगः कलहः कडुर्द्यूतं मद्यं परस्त्रियः ॥
आहारो मैथुनं निद्रा सेव्यमानं तु वर्धते १७८

"उद्योग, कलह, स्वरूज, जुवा, मद्य, परस्त्री, भोजन, सुरत, निद्रा,—हीं
सर्व जिनकीं सेवावीं तिनकीं वाढतात."

नक्षत्राणि बहूनि संति परितः पूर्णोदयान्यंबरे ।
तैः किं शांतिमुपैति दीर्घतिमिरं किं वार्धिरुल्लंघते ॥
किं न्यादार्नचकोरचारणविधिर्म्लानः सुधादीधिते ।
तन्मूर्ख भुवनैकतापशमनः श्लाघ्यस्त्वयैवोदयः ॥१७९॥

"आकाशांत नक्षत्रांचे पुष्कळ नक्षत्रें पूर्ण उदयास पावून सकाकनाहेत प-
ण त्यांच्या योगानें गर्वाचा निबिड अंधकार नाहींसा जाईल काय? समुद्र वर उचंब-
ळेल काय? व तृषित जे चकोर त्यांचें समाधान होईल काय?— यास्तव हे मिश्रा
चंद्रा! केवळ तुझाच उदय भुवनाच्या तापशमनार्थ अपेक्षित आहे, व तोच श्लाघ्य
होय!"

निद्रामीलितलोचनो मृगपतिर्यावद्बहून् सेवते ।
तावत्स्वैरमदा चरंतु हरिणाः स्वच्छंदसंचारिणः ॥
उन्निद्रस्य विधूतकेसरभरा भारस्य निर्गच्छतो ।
नादे श्रोत्रपथं गते गजधियः संत्येव दीर्घायुषः ॥१८०॥

"जोंपर्यंत सिंह हा निद्रिस्त होत्साता पुढेंचा आश्रय करून आहे, तोंपर्यंत हे
स्वच्छंद संचार करणारे हरिण चोहोंकडे फिरोत; पण तो जागा होऊन व आपलें का-
याळ झाडून बाहेर निघाला असतां व त्याची गर्जना कानीं पडली असतां हे पूर्ण दी-
र्घायु असोत म्हणजे झाले!"

हस्तांभोजे वदनमलकानायतान् बाहुमूले ।
हारे स्वैरं नयनमधरे तर्जनीं सन्निधाय ॥
दीर्घोच्छ्वासं विरतविषयास्वादमुत्कंठितोष्णं ।
मुग्धाक्षी त्वां हृदि विदधती बाष्पमाविष्करोति १८१

विरहिणीचें वर्णन:——" हातावर तोंड टेकून, केश खांद्यावरून पोकळे सोडून, अधरोष्ठावर तर्जनी देवून, उत्कंठितत्वामुळें दीर्घ व उष्ण निःश्वास टाकणारी, व विरक्त झालेली, अशी ही सुंदरी केवळ तुझा निदिध्यास घेऊन अश्रुयुक्त होत्साती वारंवार दाराकडे पहात आहे! "

ब्रह्मन्नध्ययनस्य नैष समयस्तूष्णीं बहिस्थीयतां ।
स्वल्पं जल्प रहस्पते जडमते नैषा सभा वज्रिण: ॥
वीणां संहर नारद स्तुतिकथा व्यापेरलं नुंबुरो ।
सीतारब्धकलङ्कभग्नहृदय: स्वस्थो न लंकेश्वर:॥१८२॥

सीतेनें तिरस्कार केला असतां अस्वस्थहृदय झालेला असा रावण विरहज्वरेकर मदनपीडित होत्साता तडमडत होता. तेव्हां त्याचे द्वारपाळ बाहेर जाऊन देवांस धमकाविताना:—— " ब्रह्मदेवा! हीं अध्ययनाचीं वेळ नव्हे, बाहेर मुकाट्यानें बसावें; बृहस्पते! मूर्खासारखी बडबड किती करतोस, ही कांहीं इंद्राची सभा नव्हे, आपलें पांडित्य अंमळ पुरें कर; नारदा! तूं आपली वीणा आटोप:- हे तुंबुरो! स्तुतिपाठ सध्यां बस कर. कां तर, महाराजांची स्वारी सीतेच्या पल्यरूप भान्यानें विदृहृदय झाली असून त्यांस आज चैन नाहीं! "

आलुणोति यदि सा मृगीदृशी।स्वांचलेन कुचकांचनाचलं॥
भूयएव बहिरेति गौरवा-दुन्नतोन सहते निरस्क्रियां १८३

" ही मृगनयना आपल्या कुचरूप कांचनपर्वतास जरी पदरानें झांकित भाहे तरी तो गौरवाल्लव पुनःप्रकट होऊं पहातोच; सारांश, स्वभावेंकरूनच जो उन्नत असतो त्यास अपमान कधीं सहन होत नसतो! "

यस्यारा: शिरसा नकेन विधृता: पृथ्वीभृतां मध्यत: ।
तस्मिन् भास्वति राहुणा कवलिते लोकत्रयीचक्षुषि ॥

स्वयोनेः स्फुरितं नभोरुभिदितं नाराभिरुज्जृंभितं ।
घूकैरुत्थितमाः किमत्र करवै किं केन नो चेष्टितं १८४

"जगत्पाचा चक्षु जो तेजस्वी सूर्य, कीं त्याचे पाद (पाय-किरण) पर्वत-श्रेष्ठांतींही शिरसावंद्य केले, त्याचा गाहूनें क्षणमात्र यास केला असतां काय काय चमत्कार आले पहा!— कानचे चमकूं लागले, गिरिकंदरांत दडलेला अंधकार पुनः पुढें सरसावला, तारे उदय पावले; फार काय सांगावें, क्षुद्रघेरी जे घूक ते सुद्धां उठले!" ही अर्थोनच अन्योक्ति होय.

दातुरुन्नतविस्तम्भ गुणपक्षस्य चार्थिनः॥
दुर्लभः खलु संयोगः सद्बीजक्षेत्रयोरिव १८५

"मोठा श्रीमंत दाता आणि सत्पात्र अर्थी यांचा संयोग उत्तम बीज आणि उत्तम क्षेत्र यांच्यासमान मोठा दुर्लभ होय."

दिगंते खेलंती सरसहृदयानंदजननी ।
मया नीता मौजक्षितिपनगरीमेव कविते॥
अकस्मादुर्भीलत्खलवदनवल्मीकरसना-।
भुजंगीदृष्टोगी शिवशिव समाधिंगतवती १८६

"हे माझे कविते! तूं जी दिगंतीं क्षपण करणारी व रसिकांच्या हृदयास आनंद देणारी त्या तुला मी मौजनगराच्या नगरास नेलीं; पण तेथें अकस्मात् खलवदनरूप वाल्मीकांतून निघालेल्या नागीण विषारी तिनें तुला दंश केला, आणि तुझा अंत झाला! हरहर!"

पिंडे पिंडे मतिर्भिन्ना कुंडे कुंडे नवं पयः ॥
जातौ जातौ नवाचारा नवा वाणी मुखे मुखे १८७

"मनुष्या मनुष्यांची बुद्धि निराळी भासते; कुंडा कुंडांत निरनिराळ्या प्रकारचें पाणी भासतें; दरएक जातीचे निराळे आचार असतात; आणि निरनिराळ्या लोकांची निरनिराळी भाषा भासते."

नहि ज्येष्ठस्य ज्येष्ठत्वं गुणे ज्येष्ठत्वमुच्यते॥

केतकीवरपत्रेषु नपुंसत्वस्य गौरवं ॥ १८७ ॥

" श्रेष्ठत्व नें गणिलें जातें तें वयावरून नव्हे, तर गुणावरून गणतात. पहा! केवड्याच्या पानांत जें अत्यंत लहान असतें त्याची योग्यता विशेष! "

यदि स्मरामि तन्वंगीं जीविताशा कुतो मम ॥
अथ विस्मृत्य जीवामि जीवितव्यसनेनकिं १८८

कोणी विरही पुरुष म्हणतो —— " प्रियतमेचें स्मरण जर माझ्या ठायीं नाहीं, तर मग बांचण्याची आशा नकोच; आणि तिचें विस्मरण पडून जर मी जीवन राहीन, तर मग में जिणें केवळ धिक्कार होय! "

ऋषीणांच नदीनांच कुलानांच महात्मनां ॥
प्रभवो नाधिगंतव्यः स्त्रीणां दुश्चरितस्यच १८९

" ऋषि, नद्या, आणि थोर पुरुषांचें कुळ यांचें मूळ शोधीत बसूं नये; त्याप्रमाणें स्त्रियांच्या दुराचरणाचेंही. " *

नैव व्याकरणज्ञमेव पितरं न भ्रातरं तार्किकं ।
मीमांसानिपुणं नपुंसकमिति ज्ञात्वा निरस्तादरा ॥
दूरात्संकुचितेव गच्छति पुनर्म्यांडालवच्छांदसं ।
काव्यालंकरणज्ञमेवकविनाकांना वृणीते स्वयं ॥१९०॥

" कविनाकांना ही वैयाकरणास पित्यासमान व तर्कज्ञास भ्रात्यासमान मानून त्यांचा अंगीकार करीत नाहीं, मीमांसकास तर षंढ समजून त्याचा निरस्कार करते, आणि वैदिकाचा तर चांडालासमाणें विटाळ मानून त्यापासून संकोच पावून दूर निघून जाते; परंतु काव्यालंकार जाणणारास मात्र आपण होऊन वरते! "

उद्दंडे भुजदंडे तव कोदंडे परिस्फुरति ।
अरिमंडलरविमंडलरंभाकुचमंडलानि वेपंते १९१

" हे राजा! तुझ्या प्रचंड भुजदंडावर धनुष्य चढलें असतां शत्रूचें मंडळ, स-

---

* श्लोकांत म्हण आहे," नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ हीं पाहूं नयेत. "

र्यमंडळ. आणि रंभेचें कुचमंडळ. हीं निरीं कषायमान होतात." म्हणजे शत्रूचा रक्तकोप होतो, सूर्यास रजःपटलाचा थाक पडतो, आणि रंभादि अप्सरा मात्र वीरालिंगनाची उत्प्रेक्षा करून हर्षकंपित होतात.

किं जन्मना महति किं पितृपौरुषेण ।
ज्ञानेन्धनं यदि निजया पुरुषः प्रतिष्ठा ॥
कुंभो हि कूपनपि शोषयितुं न शक्तः ।
कुंभोद्भवेन मुनिनांबुधिरेव पीतः॥१९२॥

"मोठ्या कुलांत जन्म घेऊन काय उपयोग आहे? व बापाचा पराक्रम मुलाच्या काय कामाचा? पुरुष जो प्रतिष्ठा पावतो तो स्वतःच्या ज्ञानसामर्थ्यावर पावतो. घडा कीं, मातीच्या पदार्थास विहीर सुद्धां शोषून टाकण्याची शक्ति नसते, पण त्याच घटापासून जन्म पावलेला जो मुनि अगस्त्य, त्याने समुद्रासुद्धां पान करून टाकले!"

वेश्येव साधिव विद्येयं मुखचुंबनकोविदा ।
हृदयाकर्षिणी स्पष्टा दिव्या संनिहिता सदा १९३

"वेश्येसमाणें विद्येचें मुखचुंबन कुणते कोण करीत नाहीं? परंतु त्यांचें हृदय त्यांच्या ठायीं लागले आहे असे दोन तीनच असतात किंवा नसतात!"

स्वल्पस्य विद्रुमवनाय नमो मणिभ्यः ।
कल्याणिनी भवतु मौक्तिकशुक्तिमाला ॥
प्राप्तं मया सकलमेव फलं पयोधे ।
यद्वा कणेन नलचरैर्न विदारितोऽसि॥१९४॥

"हे समुद्रा! तुझ्या पोवळ्याचीं वनें फलवतीं असोत; तुझ्या रत्नांस माझा नमस्कार असो; व मोती शिंपांचेंहि निरंतर कल्याण असो; मला सगळें फलद्रूपानें च पावले कीं, तुझ्या पोटांतल्या क्रूर जलचरांच्या तडाख्यांतून मी थडपणीं बरविघून आलों!" ही अर्थांतर सन्योक्ति होय.

नाना रत्नानां स्फुरतेऽगनानां । स्तुतौ कवीनां समरे भटानां ॥
त्वंकारयुक्ता हि गिरः सयुक्ता । रसाधिकाश्चाऽतितरां भवंति १९५

" बाणाची मुलगा लहिवाळपणानें बोलत असतां, स्त्रियांच्या रतिप्रसंगीं. कवि राजाचें स्तोत्र गात असतां नसेंच योद्ध्यांच्या समरप्रसंगीं, 'तूं' या शब्दानें बोललेलीं भाषणें रसाधिक होऊन अधिक रम्य होतात!"

ते वंद्यास्ते महात्मानस्तेषां लोके स्थिरं यशः ॥
यैर्निबद्धानि काव्यानि ये वा काव्ये प्रतिष्ठिताः १९६

" तेच वंद्य, तेच महात्मे, आणि त्यांचेंच यश लोकांचे ठायीं चिरकाल राहणारें आहे, कीं ज्यांनीं काव्यें रचलीं, किंवा जे त्यांत प्रतिष्ठित झाले आहेत. ह्मणजे ज्यांचें त्यांत यशोवर्णन केलेलें आहे. "

रूपं सुदर्शनं ते वदने पद्मं च नंदको हासः ॥
वससि न हरेः करे किं त्वं किल कौमोदकी गोपि १९७

" हे गोपि! तुझें रूप सुदर्शन (दिसण्यास सुरेख: पक्षी, कृष्णाचें चक्र) आहे; तोंड पद्म आहे. हास्य नंदक (आनंदविणारें; पक्षी, विष्णूचा खड्ग) आहे, आणि तूं स्वतः कौमोदकी (पद्मिनी; पक्षी. विष्णूची गदा) आहेस; मग हरीच्या करीं का रहात नाहींस?"

अविवेकान्पीडयतां स्थितमन्योन्यमंडलम् ॥
कुनृपाणां कुचानांच तपनाय समुच्छ्रयः॥ १९८ ॥

"विवेकशून्यत्वास्तव एकमेकाच्या मंडलास पीडा करणारे (पक्षांतरीं, निरंतरत्वास्तव परस्परसंश्रय असणारे) असे दुष्टराजे व कुच यांची उन्नति झाली असतां त्यास पतन पडणारच!"

अकर्णमकरोच्छेषं विधिर्ब्रह्मांडभंगधीः ॥
श्रुत्वा रामकथां रम्यां शिरः कस्य न कंपते १९९

" ब्रह्मदेवानें शेषास कर्णहीन उत्पन्न केलें, कीं ब्रह्मांडाचा भंग होऊंनये; कारण रम्य जी रामकथा ती कानीं पडली असतां कोणाचें शिर आनंदानें कंपायमान होत नाहीं? "

आरोग्यं विद्वत्ता सज्जनमैत्री महाकुले जन्म ॥

स्वाधीनता च पुंसां महदैश्वर्यं विनाऽप्यर्थैः॥२००॥

" सागरा. विद्वत्त्व. सज्जनपुरुषांचा समागम, मोठ्या कुलांत जन्म आणि स्वतंत्रता. हीं पांच संपत्तीविनाच पुरुषास मोठीं ऐश्वर्यें होत. "

मूर्खो जानः कदशनवसाद्वैद्ययोगात्कपाली ।
वस्त्राभावाद्गगनवसनः स्नेहशून्याज्जरावान् ॥
इत्थं गजन्न तव परिचयाद्दीश्वरत्वं मयाप्तं ।
तस्मात्त्वद्वै किमपि कृपया नार्द्धचंद्रं ददासि॥२०१॥

कोणी एका कवीने नशापूर्ण झालेल्या देवा भाकडे असतांही यानें हारपाला-कडून त्याम घालवून दिले. तेव्हां तो उलटून गजास्य म्हणतो :——

" हे गजा ! मी कदन्नाच्या अक्षणें करून मूर्खा (मूलधातु- मूलव्याधिन) झालों; भिक्षा मागण्याने कपाली (कपालधारी शिव) झालों; वस्त्रें नेसण्याम व पांघरण्याम नसल्याने दिगंबर (दिग्रूप अर्थ मनिरूप आहेत) झालों: स्नेहाच्या (तेलाच्या) शून्यत्वाम्ब जरापर झालों; — मग या प्रमाणें तुझ्या परिचयाम्ब मला ईश्वरत्व (गजत्व-शिवत्व) माप झालें असतां तू कृपायुक्त होऊन मला अर्द्धचंद्र (पक्षी. गचांडी) देतोस यात नवल कसचें! "

न जाने समुद्रायाने प्रियाणि वदनि प्रिये ।
सर्वाण्यंगानि मे यानि नेत्रतां किमु कर्णतां २०२

कोणी स्त्री आपल्या पतीस सांगते — " प्रिय जवळ येऊन गोड गोड गोष्टी सांगू लागला असतां माझे सर्व शरीरावयव नेत्र होतात की कर्ण होतात, हें मला कळत नाहीं. " अशा तऱ्हेची इंद्रियांच्या शक्तिसारख्याच वैपुल्याची जाणीव.

मागस्त्यः शूरतरो न कश्चित । परप्रभवःस्त्रीहरणान्न चान्यः॥
तथापि नाब्धिं प्रविवेश रामो । बबंध सेतुं विनयी सहिष्णुः २०३

" मदनाहून दुसरा कोणी अधिक वीर नाहीं, व स्त्रीहरणाहून दुसरी अपमानकारक गोष्ट नाहीं; तरी रामानें समुद्रांत उडी घातली नाहीं, तर धीर धरून सेतूचें बंधन केलें. "

अदृष्टमुखभंगस्य युक्तमंधस्य याचितुम् ॥
अहो बत महत्कष्टं चक्षुष्मानपि याचते २०४

"आंधळेपणामुळें ज्यास मनुष्यांचा क्रोधवर्षी दिसत नाहीं अशानें याचना केली असतां एक वेळ चालेल; पण ज्याला डोळे आहेत अशानें दैन्य भाकणें हें केवढें दुःखास्पद आहे!"

पयोधेः सर्वस्वं शिरसि धृतवान् यं नृपगणः ।
पणो यस्याक्षोणीं चतुरुदधिसीमावधिरभूत् ॥
स एवायं दैवाच्छबरवनिता पाणिपतितो ।
मणिर्मेषग्रीवाद्विगुणगुणबद्धो विहरति २०५

"जें रत्न समुद्रांचें सर्वस्वभूत असून ज्याला मोठेमोठे राजे मस्तकाचे ठायीं धारण करते झाले; आणि ज्याचें मोल समुद्रवलयांकित सकल पृथ्वी होती; तो दुर्दैवानें भिल्लिणीच्या हातीं लागला असतां मेंढ्याच्या गळ्यांत दोहेरी दोऱ्यानें बांधला जाऊन आतां विहार करीत आहे!"

आपातालगभीरे मज्जन्निर्नीरे निदाघसंतप्तः ॥
न स्मृशति पल्वलांभः पंजरशेषोऽपि कुंजरः क्वापि २०६

"हत्ती रोड होऊन अस्थिपंजररूप जरी झाला, तरी पातालापर्यंत खोल असा डोहांतच पौष्मकाळच्या रागीरदाहास शमविण्याकरितां बुडी मारतो; डबक्याच्या पाण्यास शिवतही नाहीं!"

स्वपाः क्षामीकृत्य प्रसभमपहृत्यांबु सरितां ।
मनाप्योर्वीं सर्वां नरुगहनमुच्छोष्य सकलं ॥
स्व संभस्युष्णांशुर्गत इति नदालोकनपरा- ।
स्तडिद्दीपालोकं दिशि दिशि चरंतीव जलदाः २०७

वर्षाकालांतील रात्रीचें वर्णन:— "रात्रीस कष्ट करून टाकून, नद्यांचें पाणी बळेंच हरण करून, साऱ्या पृथ्वीस अत्यंत तप्त करून, झाडांचे कुंज सारे वाळवून टाकून, सूर्य कोणीकडे नाहींसा झाला असून विद्युल्लतारूप दीपिका घेऊन

माझ्या दिशा मेघ जणों काय शोधीत आहेत!"

स्वेदस्ते कथमीदृशः प्रियतमे त्वन्नेत्रबन्धेर्विभो ।
कस्माद्देपितमेतदिंदुवदने भोगींद्रभीतेर्भवम् ॥
गेमांचः कथमेष देवि भगवन् गंगांभसः शीकरै-
स्तिष्ठंभर्तरि भावगोपनपरा गौरी चिरं पातु वः २०८

गौरीहरसंवादः— "हे प्रियतमे! तुझ्या अंगावर हे स्वेदबिंदु कशामुळें दिसतात? हे विभो! तुझ्या नेत्राग्रीच्या योगानें: हे इंदुवदने! हा कंप कशामुळें उत्पन्न झाला आहे? महासर्पाच्या भीतीनें: हे देवि! या रोमांचांचें कारण काय? हे भगवन् गंगेचे तुषार;— या प्रमाणें म्हणण्यानें उत्पन्न झालेल्या हृदि जिणें शिवापासून लपविल्या त्या पार्वती तुमचें रक्षण करो!" हा श्लोकापर्यंत अलंकार होय.

नमस्तोम भृंगा सोममंडलोपरि राजसे ॥
धूमपानेन किं नाम धाम गम्यमतः परं २०९

"हे अंधकारसमूहा! तूं चंद्रमंडलाच्या वर फार शोभा पावत आहेस. धूमपानरूप नवस्मरणानें याहून उत्तम स्थान तुला कोणतें प्राप्त व्हावें?" या श्लोकांत अंधकारसमूह हा केशकलाप होय. चंद्रमंडल मुख होय व धूमपान सुगंधी द्रव्यांचा धुरी होय."

करे वेणीमेणीसदृशनयना स्नानविरतौ ।
दधाना हर्म्याग्रे हरनयनतेजोहनमपि ॥
इयं मुग्धा दुग्धांबुधिबहलकल्लोलसदृशा ।
दृशा वारंवारं मनसिज नरुपल्लवयति २१०

"नाहणें होऊन गच्चीवर हातांत केस धरून उभी राहिलेली ही मृगनयना क्षीरसागराच्या कल्लोलाप्रमाणें धवल भरा दृष्टीनें शिवाच्या नेत्राग्नीनें दग्ध झालेल्या मदनवृक्षास वारंवार पालवीत आहे!"

किं क्षत्रं किंनु रत्नं तिलकमथ तथा कुंडलं कौस्तुभं वा ।
चक्रं वा वारिजं वेत्यमरयुवतिभिर्यद्विलिप्तोपि देहे ॥
ऊर्ध्वं मौलौ ललाटे श्रवसि हृदि करे नाभिदेशे च दृष्टं ।

पायान्नहोऽर्कबिंबं सच दनुजरिपुर्वर्द्धमानः क्रमेण ॥ २११ ॥

" वामनावतारीं विष्णूनें आपलें मंडळ रूप एकदम प्रगट केलें असतां देवांनां सूर्य हा प्रथम त्याच्या डोक्यावरील छत्र, नंतर शिरोभागींचें रत्न, नंतर कपाळावरचा टिळा, नंतर कानांतील कुंडल, नंतर हृदयावरील कौस्तुभ, नंतर हातांतील चक्र, आणि शेवटीं नाभिस्थानचें कमल, असें क्रमाक्रमानें वाटलें; — असा तो दैत्यरिपु वामनें सूर्यबिंब तुमचें रक्षण करो ! "

दामोदरस्य मुरली कथं न भवति प्रिया ॥
विप्रयोगे गतप्राणा सप्राणाऽधरयोगतः २१२

" मुरली हा कृष्णास अत्यंत प्रियकर कां वाटणार नाहीं ? — जी त्याच्या वियोगी गतप्राण होते; व अधराचा संयोग झाला असतां प्राणवती होते ! "

यो न संचरते देशान् यो न सेवेत पंडितान् ॥
तस्य संकुचिता बुद्धिर्घृतबिंदुरिवांभसि २१३

" जो देशाटन करीत नाहीं, व पंडितांचा समागम करीत नाहीं, त्याची बुद्धि पाण्यांत जसा तुपाचा थेंब त्याप्रमाणें संकुचितच राहते. "

यस्तु संचरते देशान् यस्तु सेवेत पंडितान् ॥
तस्य विस्तारिता बुद्धिस्तैलबिंदुरिवाभसि २१४

" जो निरनिराळ्या देशांत फिरतो व पंडितांच्या समागमें राहतो, त्याची बुद्धि पाण्यांत जसा तेलाचा बिंदु त्याप्रमाणें विस्तार पावत जाते ! "

परीपंन्नायते हारो नाभिकूपे मृगीदृशः ॥
संसेकुमिव लावण्यपयसा यौवनद्रुमं २१५

" मृगनयनेच्या यौवनरूप वृक्षास लावण्यरूप उदकानें सिंचन करण्यास्तव जणों काय हा मौक्तिकहार नाभिकूपावर परीपंन्नाप्रमाणें (राहाटगाडग्या प्रमाणें) लोंबत आहे ! " हें सावयव रूपक होय.

कठोरदरिविवरा कठोरा नरपि ते न मानः कठोराः ।

पुरो दिगनुरागिणी तदपि नानुरागोदयः ॥
प्रसन्नमिदमंबरं तदपि न प्रसन्नं मनो ।
नदंति चरणायुधास्तदपि मौनमालंबसे २१६

कोणी पुरुषानें आपल्या प्रियतमेचा कोप दूर करण्याकरितां तीस उद्देशून परोपरीचीं अनुनयपूर्वक भाषणें केलीं, तरी तिची समजावणी होईना. शेवटीं रात्र सरत आली तेव्हां तो तीस ह्मणतो :——

" हे मानिनि! रात्र झाली तरी तुझा मान झाला होत नाहीं; पाची दिशा अनुरागयुक्त (किंचित् आरक्त) झाली तरी तुझ्या अनुरागाचा (प्रेमाचा) अद्याप उदय होत नाहीं; हें आकाश प्रसन्न (स्वच्छ) झालें तरी तुझें मन प्रसन्न (प्रसादयुक्त) होत नाहीं; पहा! चरणायुध (कुक्कुट) शब्द करूं लागले तरी तूं अद्याप दृढ मौन धारण करून बसली आहेस! "

द्वारं खड्गिभिरावृतं बहिरपि प्रस्निग्धगंडैर्गजै- ।
रंतः कंचुकिभिः स्फुरन्मणिधरैरासादिता भूमयः ॥
आक्रांतं महिषाभिरेव जायनं त्वद्दिदृक्षा मंदिरे ।
राजन् सैव चिरंतनमणयिनी शून्येऽपि राज्यस्थितिः २१७

कोणी कवि राजाच्या मनापाचें वर्णन करतो :— " हे राजा ! तुझ्या शत्रूच्या मंदिराच्या द्वारभागीं अद्याप खड्गी (गेंडे; पक्षी, द्वाररक्षक) माहेत; बाहेर मदोदकानें स्निग्ध गाल झालेले हत्ती आहेत (ह्मणजे आतां चोहोंकडे अरण्य झाल्यामुळें वनचर हत्ती तेथें दृष्टीस पडतात;) आत तेजस्वी रत्नें धारण करणारे कंचुकी (सर्प; पक्षी. अंतःपुररक्षक) इकडून तिकडे वावरत आहेत; त्यामुळेंच त्यांचें द्वाऱ्यानद्दी महिषींनी; (म्हशींनी; पक्षी, गजस्त्रियांनी) अधिष्ठित आहे. सारांश, फार दिवस राहिल्यानें तेथें गमलेली राज्यस्थिति अद्याप त्या शून्यस्थलीं नांदत आहे! "

कविना वनिना चैव स्वयमेवागता वरा ॥
बलादाकृष्यमाणा सा सरसा विरसा भवेत् २१८

" कविना व तरुण स्त्री ही स्वतः होऊन आली असतां सांत मना आहे;

पण तर दोहोंचें बलानें आकर्षण केलें, तर दोघी मूर्छेच्या सरस श्रमल्या तरी वरी-
ल वर्णनाच्या योगानें अत्यंत विरस होतात !"

पुक्तं मौक्तिकदाम हेमवलयश्रेणी समुत्सारिता ।
वासो नीलपुरीकृतं नियमितो मंजीरकोलाहलः ॥
गच्छंत्यास्तव साहसं न सहते तन्वंगि संगोपनं ।
पश्चीलच्युतमल्लिकापरिमलमोहो निद्रीयानिलः २१९

अभिसारिकेचें वर्णन :— "हे तन्वंगि ! तूं कोणाच्या दृष्टीस पडूंनये म्हणून मोत्यांचा हार टाकून दिलास. सुवर्णकंकणें काढून टाकिलींस, नीलवस्त्र पांघरली आहेस, पैंजणाचा नाद बंद केला आहेस; यामध्यें तूं आपणाकडून सारा बंदोबस्त केला आहेस, पण तुझ्या शिरींच्या नवमल्लिकेच्या मृगंधानें भरलेल्या मध्यरात्रसमयींच्या वायूस तुझें साहस सहन न होऊन तो तुला मगदकडे पाडून आहे!" *

नोष्णश्वासं कलयति न वा गंडयोः पांडिमानं ।
दृष्टे वस्तुन्यपि च भजसि मत्यभिज्ञामभिज्ञा ॥
कोऽयं धर्मं वहसि बहलं नन्वयं नंदसूनो-
र्वैणीनादस्तव न सरले श्रोत्रदेशं विवेश ॥२२०॥

"तूं उष्ण श्वास टाकीत नाहींस, तुझ्या गालांवर पांढुरकी आली नाहीं, पुढें असलेल्या पदार्थाविषयीं तुला भ्रांति न पडून तूं तो ओळखतेस, आणि कुलांगनांची रीत तूं जाणून अस्खलित चालविली आहेस; या सर्व चिन्हांवरून मला वाटतें कीं, हे सरले ! नंदपुत्राचा वेणुनाद तुझ्या कर्णपथावर अद्याप आला नाहीं!"

मुहुः स्खलति नीविका पुलकिता च गंडस्थली ।
दृशोरपि कषोदरि स्फुरति रीतिरन्या हठी ॥

---

* 'कुवलयाश्व' नाटकांत मथम मरेशांत विटाचें वसंतसेनेस अद्याप मकारचें भाषण आहे :—

कामं मदोत्कनिभिरेव न दृश्यसे त्वं ।
मौक्तानिवाव जलदोदरसंविलीना ॥
तां सूचयिष्यति तु गात्रसमुद्भवोऽयं ।
गंधश्च शीतु कुसुमानि च नूपुराणि ॥

वचोऽपि नव गद्गदं स्फुरदमंदचंद्रानने ।
मुरारिपुरलीरवः कथय किं समाकर्णितः ९९१

" तुझी मिरगांड वारंवार सरकते. तुझ्या गालांवर रोमांच उठले आहेत, नेत्रांची स्थितिही कांहीं चमत्कारिक आली आहे आणि तुझा कंठ दाटून येऊन शब्द उमटेनासा झाला आहे, तर हे मंदोदरि! हे पूर्णचंद्रानने! मुरारीच्या पुरलीचा नाद तूं ऐकिलास कीं काय? "

भ्रांत्वा दिग्वलयं दशास्यदमन त्वत्कीर्तिहंसी दिवं ।
यातां ब्रह्ममरालसंगमवशान्नत्रैव गर्भिण्यभूत् ॥
पश्य स्वर्गतरंगिणीपरिसरे कुंदावदातं नया ।
मुक्तं भाति विशालमंडलमिदं क्षीनत्विषो मंडलं ॥२२२॥

चंद्रमंडलावर उत्प्रेक्षा :— " हे दशाननांतका! तुझी कीर्तिहंसी सगळ्या दिशा फिरतां फिरतां स्वर्गांस गेली. तेथे ब्रह्मदेवाच्या हंसाशीं तिचा संगम होऊन तेथें च तिनें कुंदपुष्पासमाणें धवल असें मोठें अंडु टाकून दिलें, तें हें चंद्रमंडल दिसत आहे! "

सार्धीकृत्य महेश्वरं सगिरिजं स्वर्गापगायास्तटे ।
प्राणानां शरणं कलेवरधनं न्यासीकृतं सज्जनैः ॥
भूयो भूरिनरेरुपायनिचयैः संप्रार्थ्यमाना तु या ।
दातुं नेच्छति सा तु किं मुनिवरैर्धन्येति काशीर्यते २२३

" शिव व पार्वती यांस साक्षी ठेवून गंगेच्या कांठीं प्राणांचें वसतिस्थान तें शरीर तेंच धन सज्जनांनीं ठेव ठेवून काशीपाशीं ठेवलें असतां व नंतर अनेक उपायांनीं तें पुनः मागितलें असतां तेंही पुनः परत देऊं इच्छीत नाहीं; तर अशीस मोठमोठे मुनी धन्य ठेवून वर्णितात ते काय? " या श्लोकांत व्याजनिंदा अलंकार आहे.

कस्तूरी यंति भाले तरुनु नयनयोः कज्जलीयंति कर्ण - ।
मांते नीलोत्पलीयंत्युरसि मरकतालंकृतीयंति देव्याः ॥
रोमाळीयंति नाभेरुपरि हरिमणी मेखलीयंति मध्ये ।
कल्याणं कुर्युरेते त्रिजगति पुरनिर्लंठभासां विलासाः२२४

"त्रिपुरारि जो शिव त्याच्या कंठाच्या कांतीचे विलास त्रिजगताचें कल्याण करोत; ते विलास कसे? तर पार्वतीच्या कपाळावर वरील मध्ये कस्तुरीसारखी शोभते, व डोळ्यास कज्जलाप्रमाणें होते, कर्णाचे ठायीं नीलोत्पलापरी भासते, वक्षस्थलावर पार्वेच्या अलंकाराप्रमाणें दिसते, नाभिप्रदेशीं रोमावलीसारखी शोभते आणि कटीचे ठायीं पार्वेची मेखलाच कीं काय असा भास होतो!"

स्फटिकमरकतश्रीहारिणोः प्रीतियोगात्।
तदवतु वपुरेकं कामकंसद्विषोर्वः ॥
भवति गिरिसुताया: सार्द्धमंभोधिपुत्र्या ।
सदसि महसि कंठे यत्र सीमाविवादः २२५

"काम आणि कंस यांच्या शत्रूंचें स्फटिक व पाच यांची प्रभा हरणारें असें एकमद्वितीय शरीर तुमचें रक्षण करो; कां, ज्याच्या कंठाचे ठायीं पार्वती चा व लक्ष्मीचा प्रीतिपूर्वक सीमाविवाद होतो. म्हणजे दोघांच्याही कंठप्रदेशाचा नीलवर्ण असल्यामुळें वरील दोघींस आपल्यापेक्षां हृद्‌कोठचा हा वरचेवर समजत नाहीं!"

गतास्ते राजानः परतरणिभोजप्रभृतयो ।
गुणो दानं त्यागस्त्वयमपि च येषां स्थिरमभूत्॥
गुणः कोदंडेऽयं द्विरदवदने दानमधुना ।
सतां देहत्यागे निवसति वचस्त्याग इति च २२६

"ते भोजप्रभृति राजे गेले. कीं त्यांच्या ठायीं गुण, दान आणि त्याग (उदारता) हीं निदान स्थिर असत: आता पाहिलें तर गुण (दोरा) हा धनुष्याचे ठायीं, दान (मदोदक) हें गजाच्या गंडस्थलीं. आणि विद्वज्जनांनीं देहत्याग केला असतां त्यास काय तो त्याग हा संत्ता यायचाच!"

सस्यानि स्वपसन्ति चेद्रसुमतां माता सुतं हंति चेत्।
वेलामंबुनिधिर्विलंघयति चेद्भूमिं दहेत्पावकः ॥
आकाशं जनमस्तके पतति चेदन्यं विषं चेद्भवेत्।
अन्यायं कुरुते परा सिनिपतिः कस्तं निरोद्धुं क्षमः २२७

" पृथ्वीचा गोलें जर खाईल, माई पुलासा मारील, समुद्र वेलेचें मर्यादाक्रमण क-रील, अग्नि सूर्याचें दहन करील: आकाशा कोसळून लोकांच्या डोक्यावर पडेल, अन्न विष होईल. मणि मना स्वतःच अन्याधानें आचरण करील, तर त्याला मनिबंध को-णी करावा ? "

स्थिरत्वमचिरद्युतौ तमसि कोऽपि बंधग्रहो ।
विधौ किमपि सौरभं मधुनि कापि वर्णान्वना ॥
शिरीषनवदामनि स्फुरति कोऽपि हौलोदयो ।
वयोऽभिनववेधसस्तदिह मन्महे कौशलं ॥२२८॥

" विद्युल्लतेचे ठायीं स्थिरत्व, अंधकारास बंधन, चंद्रावेगाचीं सुगंध, मधाचे ठायीं मनोहर रंग, शिरीषपुष्पांच्या नव्या मालेचे ठायीं विचित्र असा पर्वनोदय,— हें सर्व यौवनरूप अपूर्व ब्रह्मदेवाचें कुशलत्व होय असें आम्ही मानतों! " वरील विद्युल्लतादि कळ्या कळ्यांचें सूचक होय हें रसिकास सहज समजणार आहे.

दिक्चक्रं मृगतृष्णया कवलितं व्योमापि भास्वत्क-।
च्छायाभिः स्फुरितं नृपानलरुणमापाश्च भूरेणवः ॥
पांथाः पल्लवसंकुलद्रुमलता कुंजे मुहुः शेरते ।
मज्जत्कुंजरतालतोलिनजलाः क्षुभ्यंति तोयाशयाः॥२२९॥

ग्रीष्मकालाचें वर्णन:— " सारी दिशा मृगजळानीं व्याप्त झाल्या आहेत; आकाशही सूर्याच्या प्रखर किरणांनीं तप्त काय कापलें आहे; पृथ्वीचा धूळ सारी-ख्या ठिणग्यांप्रमाणें तप्त झाला आहे, पांथस्थ लोक दाट पालवींच्या लतांकुंजांत वि-सावा घेत आहेत, आणि पाण्याचे डोह आंत पोहणाऱ्या हत्तींच्या कांडणें क्षुब्ध हो-त आहेत. "

विश्रामांतं गता मेधाः प्रसवांतं हि यौवनं ॥
प्रणामांतः सतां कोपो याचनांतं हि गौरवं २३०

" विश्रामा लागल्या कीं मेधांची समाप्ति झाली, स्त्री प्रसूत झाली कीं तिचें तारुण्य संपलें, नमस्कार करण्यापर्यंतच सज्जनांचा कोप राहतो आणि याचनेपर्यंत गौर-वाची [illegible]

किमिति सखे परदेशो गमयसि दिवसान् धनाशया लब्धुं
वर्षति मौक्तिकनिकरं तव भवनद्वारि कांचनी वल्ली २३१

" हे मित्रा! धनराशीच्या लोभास्तव परदेशांत कालक्रमण कां करतोस? अरे, तुझ्या घरीं सोन्याची वेल मोत्यांचा सडा शोभत आहे!" व्यंग्यार्थ उघडच आहे कीं, तुझी सुंदर स्त्री तुझ्या वियोगाच्या दुःखानें घरीं विलाप करते आहे, तर येवढें कठीण मन करून दूरदेशीं कशाला हिंडतोस?

यदि वा याति गोविंदो मथुरातः पुनः सखि ॥
राधाया नयनद्वंद्वे राधानामविपर्ययः ॥२३२॥

" हे सखि! मथुरेहून पुनः जर कृष्ण जाईल; तर राधेच्या नेत्रद्वयाचे ठायीं 'राधा' या नांवाचा विपर्यय दृष्टीस पडेल." म्हणजे तिच्या नेत्रांपुढें सदैव 'धारा' वाहेल!

बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते। पिपासितैः काव्यरसो न पीयते॥
न च्छंदसा केनचिदुद्धृतं कुलं। हिरण्यमेवार्जय निष्फला गुणाः २३३

" जे सुधिन झाले त्यांस खावयाला व्याकरण उपयोगीं पडत नाहीं; तृषा लागली असतां काव्यांचा रस पाशन करतां येत नाहीं; व छंदःशास्त्राच्या योगानें कोणीं कुटुंबभरण केलें आहे असेंही नाहीं; तस्मात सर्व गुण निष्फल समजून सुवर्णाच्या मासीचा नेवढा उद्योग करीत जा!"

पीतः क्रुद्धेन तातश्चरणतलहतो वल्लभोऽन्येन रोषात्।
आबाल्यादूर्जितैर्यैः स्वबंधुविवरे धार्यते वैरिणी मे॥
गेहं मे छेदयंति प्रतिदिवसमुमाकांतपूजानिमित्तं ।
तस्मात्तिष्ठामि सदाहं द्विजकुलनिलयं नाथ नित्यं त्वदग्रे २३४

" एकानें माझ्या बापास पिडून टाकला, दुसऱ्यानें नवऱ्यास नाश मारिली, माझी वैरिणी जी सरस्वती तिला विपरीत नेहेमीं आपल्या मुखांत बाल्यावस्थेपासून बाळगतात, तसेंच उमेच्या नवऱ्याची पूजा करण्याकरितां माझ्या घराचा (कमलाचा) हरएक छेद करतात. यास्तव सदां विप्र होत्साती मी ब्राह्मणाचें घर नेहेमीं वर्ज न क

मनसः परमाणुमां वदंतः। कथमद्यापि न नार्किकास्त्यपंते॥
कनकाचलजित्वरस्तनीनां। युवतीनामपि यत्र संनिवेशः२३५

" मन हें परमाणुमात्र आहे असें म्हणणारे ते नार्किक (तर्कशास्त्रवेत्ते) त्यांस अद्यापि लाज कशी वाटत नाहीं ? पहा कीं, त्याच परमसूक्ष्म मनाचे ठायीं कनकपर्वतास तुच्छ करणारे स्तन ज्यांचे अशा युवतींचाही निवास होतो! " यांतील तात्पर्य स्थूलरूपानें असें आहे कीं, कनकाचलास म्हणजे मेरूसही जिंकणारे (अर्थात त्याहूनही विशाल) असे ज्यांचे शरीरावयव त्याही न्यायिकाणीं मानलेल्या त्याचें परिमाण इतकें अत्यल्प कसें असेल?

आपदो महतामेव महतामेव संपदः ॥
स्तनयोर्वर्धनं चंद्रः कदाचिन्नैव तारकाः २३६

" महत्तांचि च विपत्ति व्यर्थ दोन्ही दृष्टीं मोक्षाप्तच नापू आहेत; पहा, चंद्राला च स्तनवृद्धि आहेत. तारकांस नाहींत! "

उष्णाणां च गृहे लग्नं गर्भाः स्युर्निष्ठुराः ॥
परस्परं मर्मभेदि महोल्बणमहो ध्वनिः॥ २३७॥

" उष्णाच्या घरीं लग्न झालें साहिजे असतां मंगलाष्टक म्हणण्यास गर्भाचार्यांची योजना झाली; पण नांवईवीचा व उपाध्येबोवा एकमेकांची मर्मभेदक करतात— ' काय हो मनोहर रूप! " कंठ तरी केवढा गोड हो! ' "

मूर्खस्य पंच चिह्नानि गर्वी दुर्वचनी तथा ॥
हठी चाप्रियवादी च परोक्तं नैव मन्यते॥ २३८॥

" मूर्खाचीं हीं पांच चिन्हें आहेत,— गर्व, दुर्भाषण, हठवाद, कटुभाषण, आणि कोणाचें ऐकायाचें म्हणून नाहीं। "

खलः सत्क्रियमाणोऽपि ददाति कलहं सताम् ॥
दुग्धधौतोऽपि किं याति वायसः कलहंसताम् २३९

" खलाचा सत्कार केला तरी तो सज्जनांशीं कलह केल्याशिवाय राहात नाहीं;

कसें? तर कावळ्यास दुधानें जरी पोसला तरी तो कधींही कलहंस होईल काय?"

धम्मिल्लं न करिष्करोति कुसुमैर्नालंकरोत्याननं ।
नीलाकारकिशोरमादरतया नालापयत्याकुला ॥
नोल्लासं मनिपद्मने ननयुते संलापमालीजनैः ।
मूर्ता चंपकमालिकेव विपिने मेनात्मजा वर्तते २४०

पार्वतीच्या विरहावस्थेचें वर्णनः— "ही आपला भांग फुलांनीं भरीत नाहीं, मुखास सुशोभित करीत नाहीं, दुःखित होत्साती साक्षेपानें क्रीडाशुकाशीं बोलत नाहीं, उल्हासवृत्ति धारण करीत नाहीं, सखीजनांशींही भाषण करीत नाहीं, नरगनांत जशी चंपकमाला सुकून जाते त्याप्रमाणें ही मेनेची कन्या खेदयुक्त झालेली आहे!"

मणिहारलता विभाति नव्याः। कुचसिंहासनसंस्थितेव तस्याः॥
अभिषेक्तुमनंगदेवराजं। गलगंगेव दृषद्विनेव दुग्धधारा ॥२४१॥

"नवीनें मणिहाररूप लता जी कंठाचे ठायीं धारण केली आहे ती कुचसिंहासनावर अधिरूढ झालेल्या कामदेवास अभिषेक करण्याकरितां शंखाकृति जो कंठ त्यापासून गळणारी दुग्धधाराच काय यापरि भासते!"

दानुः परोपकृतिनिर्भरचित्तवृत्ते-रासन्नदृग्गणना नहि संभ्रमेषु ॥
भानुर्विकासयति हंत सरोजषंडं। पाणिस्थपंकजमसं भुवनांतरेषु २४२

"परोपकाराविषयीं त्याची चित्तवृत्ति सदा उल्हासयुक्त असल्यामुळें त्याच्या आश्रितजनाविषयीं दूरसमीपभाव कधींहा असत नाहीं; पहा कीं, सूर्य हा आपल्या हातांतील कमलासमानेंच भुवनांतरीं असणाऱ्या कमलसमुदायासही विकासवितो!"

अक्षराणि समश्रेणी वर्तुलानि घनानि च ॥
परस्परविलग्नानि तरुणीकुचकुंभवत् २४३

"अक्षरें हीं तरुणीकुचांप्रमाणें सारख्या उंचीचीं, वर्तुळ, घन आणि परस्पर विलग्न अशीं असावीं!"

वाच्यं नास्ति सहचरि मदृद्धिविस्रंभवत्तो ।

स्नेहैरिद्धे मम वपुरिदं कामहोत्रे जुहोमि ॥
प्राणानस्मै नदिदमुचितां दक्षिणां दातुमीहे ।
तत्रादेशो भवतु भवतां यत्त्वमेषामधीशः २४६

कोणी विरहिणी आपल्या सखीजवळ मियकरास निरोप पाठवते:—

"हे सखि! त्याला असें जाऊन सांग की, स्नेह पोगानें (' स्नेह ' शब्द श्लिष्ट आहे) पेटविलेला जो विरहाग्नि त्यांत कामरूप यज्ञा माझ्या शरीराची आहुती देत आहे व अशा प्रसंगास उचित अशी प्राणरूप दक्षिणा समर्पण करण्याचें माझें मनोगत आहे; पण त्याचें स्वामित्व आपल्याकडे असल्यामुळें आपणास विचारणा-रा पाठविलें आहे. तर याविषयीं आज्ञा द्यावी."

कीलालैः कुंकुमानां सकलमपि जगज्जालमेतन्निषिक्तं ।
मुक्ताश्चोन्मत्तभृंगा विघटितकमलकोरकागृहेभ्यः ॥
उत्सृष्टं गोमहस्रं बहलजलकलः श्रूयते च द्विजानां ।
आग्नेयैर्बृंहितानां हरिदुदयदृषिना सूयतेऽध्वरत्नं ॥२४७॥

सूर्याविरुद्ध उत्प्रेक्षा — "इंद्राचा पर्वी (मार्गी) देवाच्या आग्नेयरूप पुरोहितास मम्मवर्ती, म्हणून त्याच्या सन्मानार्थ केशरचे सडे घातले आहेत, उन्मत्त जे भृंग त्यांस कमलबंधनरूप कागगृहांतून मुक्त केले आहेत, द्विजांनी गायी सोडून दिल्या आहेत आणि द्विज समुदायाचा मोठ्या घोष होत आहे." — 'द्विज' शब्दावरील श्लेष व एकंदर वर्णनाचा दुसरा अभिप्राय मार्मिकांस सहज कळण्यासारखा आहे.

उत्प्रेक्षा शैलूषी सेयमपि चित्रभूमिकासंदृब्ध ॥
रंजयति काव्यरंगे नृत्यति च सहृदयं चेतः २४८

"उत्प्रेक्षा ही नटी विचित्रित वेष घेऊन काव्यरूप रंगभूमीवर येते व तत्त्वज्ञाने ती सहृदय रसिक त्यांच्या चित्तास रंजन करून त्यास आनंदाने नाचवीत असते." ह्या श्लोकांतर रूपक, उत्प्रेक्षा, अपह्नुति, विशेषाभास, श्लेष इत्यादि होत.

शशिनिर्मितनिकषा शोणनिकषोपरिष्कृता सरसी ॥
अपि भजते नवरम्भा नवरसभावज्ञवर्तिनं शोभां २४९

" चंद्रहीन रात्र, कमळसमुदायानें नशोभणारें सरोवर आणि नवरस वभ-
लेला नाणणारे पंडित जींत नाहींत अशी मोठी सभा हीं तिन्हीं शोभा पावत ना-
हींत. "

स्वजानां धनुषां चापि सहंशजनुषामपि ॥
गुणलाभोभवेद्यासु परद्वेदकारकः २५०

" सहंशापासून (सत्कुलापासून— चांगल्या वेळूपासून) झाले असले तरी
सरळ व धनुष्य यांस गुणलाभ (उत्कर्षलाभ—रज्जुलाभ) झाला न झाला कीं त्या-
चा परिणाम दुसऱ्याच्या हृदयाचा भेद (दोन्ही अर्थ स्पष्टच आहेत) हा व्हावयाचाच!"

यानस्यास्तमनंतरं दिनकृतो वेषेण रागान्वितः ।
स्वैरं क्षीणकरः करः कमलिनीमालिंगितुं योजितः ॥
क्षीतस्पर्शमुपेत्य संभ्रमनिभृतया मुद्रांकमुद्रे ।
हासेनैव कुमुद्वतीवदनया वैलक्ष्यपांडुकृतः २५१

" सूर्य अस्तास गेलासा पाहून चंद्र हा रागेंकरून (अनुरागानें— संध्यारागानें)
युक्त होत्साता सूर्याच्या वेषानें कमलिनीस बळेंच करानें (हातानें— किरणानें)
आलिंगावयास जों मदून झाला, तों त्याच्या शीतल स्पर्शावरून त्यास अन्य सम
जून तिनें आपलें मुख झांकलें; हें सर्व पाहून चंद्राची स्त्री जी कुमुद्वती तिनें मत्स-
रभावानें हास्य वदन केलें; त्याच्या योगानें चंद्र खजील होऊन तो फिका झाला!"

जपश्रियः कृपाणी यं वेणी नानाख्यभूपतेः ॥
अस्यां करगृहीतायामसावभिमुखो नव २५२

" 'नाना' नामक भूपाची तरवार ही जपश्रीचा वेणीच होय. ती हातांत आ-
ली असतां जपश्री अर्थात् अनुकूल झालीच ! " *

---

* वरील श्लोक शिवराज्याभिषेकाचा जो नानाशास्त्रीकृत ग्रंथ त्याविषयी लिहिला असावा. असाच दुसरा ए-
क श्लोक 'बखर' या नांवाचें लिहिलेला सापडल्यावरून आला आहे :——

" बखरं शोभिवान त्वद्विजनगरे सत्वरंती किराती ।
कीर्णाख्याद्राव रत्ना नुरुवरखदिरांगारवांकाकुलांगी ॥
सिंहा श्रीखंडखंडं वहति मुखजयूनेत्रा भवंती ।
श्यामा शोणत्वकेर्णपुटरचटमैर्भूषितांका करोमि ॥ "

वरील श्लोकाच्या श्लेषाच्या विवरणाची एक पद्य आहे :——

" शोभिवान विजयनगरे सत्वरंती किराती (इत्यादि)

सूचीमात्रविशेद्दसंभ्रमगुणः स्तोणीद्वयाभस्तुवा-।
मुत्तुंगस्तनमंडलेषु लभते नीव्याश्रितिं कंचुकः ॥
नागश्चेन्निविडैर्विमिश्रवपुषां पुंसां महाषोधने ।
स्वर्गश्रीकुचकुंभसंभ्रमपरीरंभः कथं दुर्लभः २५३

"केवळ सुईनें शरीर टोचून घेतल्याच्या गुणानें कंचुकास (चोळीस) राजस्त्रियांच्या उन्नत कुचमंडलावर निरंतर नीवी करायास सांपडतें; मग निबिड शरबंधांनें ज्यांचीं शरीरें नुपुर युद्धांत छिन्नभिन्न होऊन गेलीं आहेत अशा योद्धांस भयंकर कुचकुंभालिंगनाचा लाभ घडतो यांत नवल तें कोणतें?"

अमी विलासैकरसैकतन्मयाः स्नेहादवश्यं भवतोपनीताः ॥
देवोऽभविष्यद्दयितासु नित्यं तदाश्रवस्यं किमवाकरिष्यः २५४

"हे नेत्या! या स्त्रियांचें केवळ स्नेहाधीन (पत्नी, नेता करिता) तूं अवश्य करून टाकलेंस; मग यांचा तुच्छ्यांशीं नित्य द्वेष असता, तर यांची अवश्य यापेक्षा भयंकर काय स्थिती असती कोण जाणें!"

इतीव मदनोद्यमंगुरे रणभुवो मत्कारमानन्दतो ।
यामोऽदात्प्रथमस्य पीनकुचयोर्वीरं सुतेऽकैतवे ॥
द्वितीयस्य च वीरिकां स्मितमुखी पाण्योरणत्कंकणे।
पश्चाद्वैरिनि केशपाशविषये पुंको हि बंधक्रमः २५५

"रतिसंगर साहसी असतां रणांगणीं ज्यांनीं योगची चाकरी बजावली त्यांचा सत्कार करण्याकरितां स्त्रीनें आपलाच वस्त्रदान केलें, पीनकुचांस हार व कंकण कुंडलें अर्पिलीं, विलासावर नर पर्जन्य रूपसन्न होऊन त्यास विडा दिला वहस्तांस रणत्कार करणारीं कंकणें बहाल केलीं; पण युद्धांत मागच्या मागेंच गाडिलेला जो केशपाश त्याचें मात्र गजदोर करण्याइतपत बंधन केलें!" हें असंबंधाविरोधोक्तीचें उदाहरण होय.

(मागील पृष्ठावरून)

नार्तीनः करवालकालभुजगी किं नाम गर्जिष्यति ॥
मत्तेभेंद्रविभिन्नकुंभविगलन्मुक्ताद्रसप्लावना-।
दत्यापद्गरलप्रवाहविरसं सूते स्फुरंती मुहुः ॥"

वैयाकरणकिरातादपशब्दमृगाः क्व यांतु संत्रस्ताः ॥
यदि नटगणकचिकित्सकवैतालिकवदनकंदरा न स्युः २५६

"वैयाकरणरूप किरातापासून भय पावलेले जे अपशब्दरूप मृग त्यांनी एरवीं कोठें जावें? — जर नट, ज्योतिषी, वैद्य, स्तुतिपाठक यांचीं मुखें याच कोणी गुहा ह्या नर नसत्या तर."

अव्याकरणमधीतं भिन्नद्रोण्या तरंगिणीतरणं ॥
भेषजमपथ्यसहितं त्रयमिदमकृतं वरं न कृतं २५७

"व्याकरणा वांचून केलेलें अध्ययन, फुटक्या नावेनें नदी तरून गेलेली व पथ्याविरहित औषधाचें सेवन,— या तीन गोष्टी न केलेल्या बऱ्या."

घटं भिंद्यात्पटं छिंद्यात्कुर्याद्वा गर्दभस्वरं ॥
येन केन प्रकारेण प्रसिद्धः पुरुषो भवेत् २५८

"घडा फोडून जाऊन पागर फोडून टाकावा, वस्त्रें फाडीन वसावें, किंवहुना गर्दभासारखा स्वरही काढावा; पण कोणत्या तरी रीतीनें पुरुषानें लोकप्रसिद्ध व्हावें।"

चित्रं तपति रानेंद्र मनोपवनपल्लव ॥
अनानपत्रमुत्सृज्य सानपत्रं द्विषद्गणं २५९

"हे राजा! तुझ्या मनोपवनपल्लवाचा हा काय चमत्कार आहे पहा, कीं ज्याच्या डोक्यावर छत्र नाहीं त्यास सोडून छत्र धारण करणाऱ्या शत्रुसच तो ताप देतो." हा विशेषनामालंकार होय.

भूभुजः शरीरगोत्रं वसुभाजं वसुंधरा ॥
दुश्चारिणीव हसति स्वपतिं पुंश्चलालनात् २६०

"ज्यामध्यें जारिणी स्त्री आपल्या पतीस पुंश्चलालन करतांना पाहून हंसते, त्याप्रमाणें भूमि ही शरीराची भोगवण करणाऱ्या मनुष्यास व भूमि धनरत्न करणाऱ्यास हंसते।"

मान्द्रादं वचनं मयच्छसि न मे नो वांछितं यच्छसि।
मा घः मोक्ष्यसिषि द्रुतं हुतवह ज्वालासमं रामिषु॥
कंठाश्लेषपरिग्रहे शिथिलता यस्मादुराधुंचसे।
तत्ते धूर्त हृदि स्थिता प्रियतमा कांचिन्नमेवापरा २५१

कोणी मानिनी गणावे त्याप्रमाणे वसुदास म्हणतो :—" तूं माझ्याशीं मान्दपूर्वक भाषण करीत नाहींस, मला दृष्टि विचारीत नाहींस, यामुळे तुझे निरंतर उष्ण निश्वास चालले असतात. आलिंगनाचे ठायीं शिथिलता दृष्टीस पडते व अधरपानाविषयीं हा तुझा आमचकता दिसत नाहीं; येवढें हे धूर्ता! या सर्व चिन्हांवरून मी असें समजतों कीं कोणी माझ्याहून निराळी प्रियतमा तुझ्या हृदयाचे ठायीं वास करीत असावी!"

स्मर्तव्यो ऽहं त्वया कांते न स्मरिष्याम्यहं तव ॥
स्मरणं चेतसो धर्मस्त्वेतो भवता हृतं ॥ २५२ ॥

" हे कांते! तूंच मला स्मरण करावें, मला तुझें स्मरण होणार नाहीं; कां तर, स्मरण हें चित्ताचा धर्म होय आणि चित्तच मुळीं तूं हरण करून नेलें आहेस!"

सर्वस्वापहरो न तस्करगणो रक्षो न रक्षाशनः ।
सर्पो नैव विलेशयोऽखिलनिशाचारी न भूतोऽपि च॥
अनर्थानपटुर्न सिद्धपुरुषो नाप्याशुगो मारुत- ।
स्त्रीक्ष्णाग्र्यो वनु मापकल्मषमिदं ये जानंति ते पंडिताः२५३

" सर्वस्वाचें हरण करणारा (पहा), सर्व निद्रा घालवणारा (असून तस्कर नव्हे, रक्षाचें भक्षण करून असून राक्षस नव्हे, बिळांत राहून असणारा असून सर्प नव्हे, निशाचर खरा पण भूत नव्हे, अनर्थान करण्याविषयीं कुशल असून सिद्धपुरुष नव्हे, गतीनें चपल असून वायु नव्हे, तीक्ष्णमुख असून बाण नव्हे,— असा कोण हें जो जाणतो तो पंडित होय!" या कोड्याचें उत्तर 'डेकूण' होय. पहिल्या विशेषणाचा श्लेषार्थ वर दिलाच आहे; बाकीचीं उघडच आहेत. "

सदूषणापि निर्दोषा सस्वराऽपि सुकोमला ॥
नमस्तस्मै कृता येन रम्या नारायणी कथा २५४

"सदूषण (दूषणयुक्त; दूषणनामक राक्षसाचा जींत संदर्भ आहे) असून निर्दो-ष आणि सखर (कठोर; खरनामक राक्षसाचें जींत कथानक आहे) असून अत्यंत कोमल, अशी जी ईश्वरविषयक कथा ती ज्यानें केली त्यास वंदन असो!"

आच्छादयसि का मुग्धे वस्त्रेणाधरपल्लवम् ॥
वंदिता एव शोभंते वीराधरपयोधराः ॥२६५॥

"हे मुग्धे! आपल्या अधरपल्लवाचें वस्त्रानें का आच्छादन करतेस? अगे, वीर-धर आणि पयोधर हे क्षतांकित होत्साचेच विशेष शोभतात!"

मंदमंदगमना करिणी किं। वा विशालनयना हरिणी किं॥
पूर्णचंद्रवदना रजनी किं। पश्य गच्छति सखे तरुणी किं २६६

"हे सखा! ती पहा पहा राजमार्गानें कोण जाते आहे? ती मंदमंद गमन करणारी हस्तिनी आहे काय? अथवा विशालनेत्रा हरिणी आहे काय? किंवा पूर्णचंद्र हेंच जिचें वदन अशी पौर्णमासी रात्रि आहे काय?"

पंडिते चैव मूर्खे च बलवत्यपि दुर्बले ॥
ईश्वरे च दरिद्रे च मृत्योः सर्वत्र तुल्यता २६७

"पंडित, मूर्ख; बलवान्, दुर्बल; धनाढ्य, दरिद्र; या सर्वांस मृत्यूनें ग्रासलें आहे; कोणी सुटला आहे असें नाहीं!"

वंगाः कथमंगाः कथमित्यनुयुंक्ते तथा देशान् ॥
कीदृक्कर्णाटपुरमिति कोऽपि न जिज्ञासते मूढः २६८

"वंगदेश कसा आहे, अंग* कसा आहे, इत्यादि प्रकारें इहलोकींच्या अनाप्त वस्तूंच्या देशांविषयीं मूढ ते सांपत्तिकजन त्यांची चौकशी बारीक असतात; पण कर्णाटपुर म्हणजे यमनगरी कशी आहे हिच्याविषयीं कोणाचीही जिज्ञासा मग-ली जात नाहीं!"

रागाः पुष्पेषु रताः पुत्राः पितृधनपरिग्रहव्यग्राः ॥

---

* जोवत्त वांद वंगाचा आहे व अंगाचा बहार असतात. आजची पुराणांतला प्रसिद्ध सेनापति जो [illegible] अंगदेशाचें अधिपत्य दिलें होतें हें वाचकांस माहीत असेलच.

जननी रोदनवारणा परलोकगतस्य को बंधुः२६९

" स्त्रिया पुत्रांकडे पाहून शोक आवरतात. पुन पितृधनाच्या विभागाविषयीं न-यर होऊन त्या व्यवस्थेला लागतात. आई दुरच करीन बसते; पण जो बिचारा प्राणी प-रलोकाची वाट धरीत असतो त्याचा सांगाती कोण होतो ! "

हृदि तज्ज्ञोदरे वन्हिः स्वभावादग्निरूच्छ्रितः ॥
तेन मे दग्धतज्ज्ञस्य पुनरागमनं वृथा ॥ २७० ॥

" हे गोपा ! माझ्या हृदयाचे ठायीं तज्ज्ञा आहे व उदराचे ठायीं वन्हि आहे; तेव्हां मदीच्या कुक्षिज्वलनरूप धर्मापुढे माझा तज्ज्ञा जळून मी तुजकडे पाचवा करण्यास-ठाकों आहें. तात्पर्य हें कीं, मध्यान्हींच्या समयापुढें तज्जेच्यानें टिकाव धरवत नाहीं.

पातव्यं तृणकर्षणाय यमुना कच्छे न गच्छाम्यहं ।
कस्माद्वत्स पिनष्टि पांवरकुचद्वंद्वेन गोपीजनः ॥
भ्रूसंज्ञाविनिवारितोपि बहुशो जल्पन यशोदामतो ।
गोपीपाणिसरोजमुद्रितमुखो गोपीपतिः पातु वः २७१

" माझे गाईंच्या वत्साचें रक्षण करण्यास मी यमुनातीरीं जाणार नाहीं. यशोदा विचारते, ' कां पुत्रा ! ' कृष्ण उत्तर करतो, ' अगे या गोपी गवतलनरूपेंकरून मला चेंगरून टाकतात, '— याप्रमाणें तो बोलत असतां गोपी भ्रुसंज्ञांच्या योगानें त्यास-वारीत होत्या, तरीही तो तेव्हां गेल्यानंतर त्याचें मुख गोपींच्या पाणिसरोजांनीं मुद्रित झालें आहे असा तो गोपीपति तुमचें रक्षण करो ! "

किमकारि न कार्पण्यं कस्यालंपि न रेदनं ।
अस्य पापोदरस्यार्थे किमनार्हि न नाटकं २७२

" या दुष्ट उदराच्या भरणार्थ काय काय दैन्य आलें नाहीं ! कोणा कोणाचा उंबरठा उलंडला नाहीं ! व कोण कोणतें नाटक केलें नाहीं ! "

संपोष्यं सदपत्यवत् परकराक्रष्टव्यं च सुक्षेत्रवत् ।
संगोप्यं वणिगंगवत् प्रतिदिनं हेयं च सस्यिवत् ॥
वध्यं बंधवदप्रियं न हि न विस्मर्यं हरेर्नामव- ।

एवं सीदति पुस्तकं किल कदाप्येनद्गुरूणां वचः २७३

"पुस्तकावें उत्तम अपत्यामप्रमाणें संपोषण करावें, उत्तम क्षेत्रामप्रमाणें दुसऱ्याच्या नें कधीं हातीं लागूं देऊं नये, जखमी मनुष्याच्या शरीरामप्रमाणें वरचेवर त्याचें शोधन करावें, निर्बलग बिंबामप्रमाणें दररोज त्याचें अवलोकन करावें, बंधनांत ठेवल्याप्रमाणें त्यास बळकट बांधावें, हरीच्या नामाप्रमाणें त्याचें कधीं विस्मरण होऊं देऊं नये;— अशा नव्वेनें पुस्तक ठेवलें असतां नें वाईट होत नाहीं असें गुरूचें सांगणें आहे!"

मौने मौनी गुणिनि गुणवान् पण्डिते पण्डितोऽसौ ।
दीने दीनः सुखिनि सुखवान् भोगिनि भोगभोगः ॥
मूर्खे मूर्खो युवतिषु युवा वाग्मिषु मोदवाग्मी ।
धन्यः कोऽपि त्रिभुवनजयी योऽवधूतेऽवधूतः ॥ २७४ ॥

"मुनिस मुद्राधारन मौन धारण करणारा, गुणिजनांशीं समागम झाला असतां गुण मगट करणारा, पंडित मंडळींत पंडित, दीनाचे ठायीं दीन, सुखी असणाऱ्यांशीं सुखी, विलासीजनांशीं विलासी, मूर्खांशीं मूर्ख, तरुण स्त्रियांशीं तरुण, वावदूकांशीं वक्ता व वैराग्यांशीं वैरागी,— या प्रमाणें जो सर्वांशीं रंग पाहून वर्तणारा तो त्रिभुवनजयी चतुर पुरुष धन्य होय!"

उच्छिष्टं शिवनिर्माल्यं वमनं शंवकर्पटः ॥
काकविष्ठासमुत्पन्नाः पंचैतेऽतिपवित्रकः २७५

"उच्छिष्ट, शिवाचें निर्माल्य, वमन, मेनचीवर आणि काकविष्ठेपासून उत्पन्न झालेला;— हीं पांच अतिपवित्र होत!" हीं पांच अनुक्रमें करून दूध, गंगा, मध, रेशीम व पिंड होत.

शौचं धाम सुरांवुनं भगवतो वक्त्रासवमाज्ञानं ।
ह्याज्या चाधरपल्लवोऽप मृदुलांगुष्टस्तदुच्छीर्षकम् ॥
अंगुल्यस्तव सेवने विरलसा नूनः किमन्यत्करवं ।
हा हा वैरिणि हे नथापि मुरलि त्वां नैति निद्राऽपि किं २७६

गोपी साधत्वभावानें मुरलीस प्रार्थनात:— "हे मुरलि! अमृताचें केवळ गृह-[illegible] भगवंताचें मुखांवुज त्यांतील आसवाचें (मद्याचें) तुला भाजन पडलें, त्या-

वा मधरपल्लव होय तुझी कोमल शय्या होय, मृदुल तो अंगुष्ठ तो तुझें उपधान(उशी) होय, इतर अंगुली या तुझ्या सेवनाविषयीं (चरणसंवाहनाविषयीं) निरंतर तत्पर आहेत; आणखी यापेक्षां सुख तें कोणतें असावें ?—पण इतके असून हे वैरिणि! तुला निद्रा नी कशी येत नाहीं! "चोरणारणींचा भाव अर्थात् हा होय कीं आपल्या वैरिणीस झोंप लागून नी शब्द करीनाशी झाली कीं तिचें सर्व साध्य आपल्या हां-स्याम येईल।

अहं नेत्रा दूना किमपि कथयामीनि विजने ।
सखीषि चार्द्रेना सरलहृदयत्वाद्वगना ॥
ततः कर्णोपांते किमपि वदनाऽऽधाय वदनं ।
गृहीता धम्मिल्ले मम सखि निर्यातोऽधरसः २७७

"मला कांहीं सांगायाचें आहे असें खोटेंच त्यानें मला एकांतीं बोलाविले, तेव्हां मीही भोळ्या भावानें त्याच्याजवळ गेलें; तों त्या धूर्तानें कानाशीं लागण्याचें मिष करून माझ्या मुखाचें आघ्राण केलें आणि कुचकामें धरून अधरसाचें पान केलें!"

संग्रामे स्फुरदंद्रियाण करीना कपिमंडले ॥
दीप्तिर्वो दीप्तिरात्तिर्वो पुरुषार्थोदेव जायते २७८

"संग्रामाचे ठायीं मोठ्या मोठ्या योद्ध्यांचे व कपिमंडलांत करींचे नेत्र पडणें किंवा नेत्रोद्दीपन होणें हीं दोन्ही एका पराक्रमेंच होऊन जातात!"

शंभुः श्वेतार्कपुष्पेण चंद्रमा वल्मनंतुना ॥
अच्युतः स्मृतिमात्रेण साधवः क्षमसंपदः २७९

"शिव हा पांढऱ्या रुईच्या फुलानें, चंद्र वल्मीकाच्या दर्शनें, विष्णु केवळ स्मरणानें व साधु क्षमासंपत्तीनें क्षणांत केवळ नमस्कारानें प्रसन्न होतात!"

कुचौ तु परिवर्त्तितुं परिचितं चिरं चंदनं ।
कृताः परमुरोजयोः परिसरेऽरविंदस्रजः ॥
स्मृतिर्मनिरपि स्मृतिर्विरतनोः कर्णेवादरा- ।
दिदं तु मिलितं पुनर्विरचितं मया केशरे २८०

कोणी विषयी विरक्तता पावून कृतकर्मावद्दल अनुताप पावतो :— "मी चंदनाचा जो उपयोग केला तो निरंतर स्वतःलेपनार्थच केला; कमलांच्या माला ज्या घातल्या त्या स्वतःच्या आसपासंतच घातल्या; स्तवन व वंदन हीही आदरेंकरून स्वदारस्त्रियांचीच केलीं;— पण हें सर्व परमेश्वराचे ठिकाणीं माझ्याकडून कधींही झालें नाहीं."

धर्माख्याने श्रमज्ञाने च रोगिणां या मतिर्भवेत् ॥
सा सर्वदैव निष्ठेच्चेत् कोन मुच्येत बंधनात् ॥ २७९ ॥

"धर्मविषयक आख्यानांचें श्रवण आलें असतां, श्रमज्ञानांत व रुग्णावस्थेंत जी मनाची स्थिति होते तीच जर सदोदित राहात नाहीं तर कोण संसारतापापासून मुक्त होणार नाहीं?"

सुभाषितज्ञेन जनेन साकं। संभाषणं सुप्रभुसेवनं च ।
आलिंगनं तुंगपयोधराणां। प्रत्यक्षमेतत्त्रयमेव लोके २८२

"सुभाषितज्ञानाच्या ज्ञानानें ज्यास चातुर्य माप्त झालें आहे अशा मनुष्याशीं संभाषण, चांगल्या प्रभूची सेवा व पूर्णयौवना ज्या स्त्रिया त्यांचें आलिंगन, हीं तीन या लोकचीं गोष्टीं करतें होत."

अहो बत विचित्राणि चरितानि महात्मनां ॥
लक्ष्मीं तृणाय मन्यंते तद्भारेण नमंति च ॥२८३॥

"महात्मे जे पुरुष त्यांचें चरितवैचित्र्य काय सांगावें! पहा कीं, ते लक्ष्मीला तृणासमान मानतात आणि नित्यच भारानें नम्रही होतात!" तात्पर्य हें कीं, लक्ष्मीच्या मातीनें सज्जन उद्दाम न होतां उलटे लीनच होतात.

मित्रिते मौनमास्थिष्ठ वाणि मानसमे जने ॥
अंतर्गतरसाल्हारं न जानासि कदाचन २८४

"वैखरि! मानसिक जनाची गांठ पडली असतां तूं आपली मौन धारण करून असत जा; कां नर, हरएगत जो आल्हार त्याचा तुला मुळींच अनुभव पडला नाहीं!"

अतीव्रंते स्म वेदनास्वभावविरहिते निर्घृणे मोक्षिणाम्।

पत्र श्यामाकबीजान्यपि चटकवधूचंचुकोटिच्युतानि ॥
देवे दातुं कदन्नान्यपि शिशुकरजाकृष्टमुक्तावलीक-।
क्षण्णा-स्मर्त्वेव दृष्टा पुलकनिचितसं पूर्णिता मौक्तिकौघाः २८५

"जिथल्या चकोरपक्षी बाजणाऱ्या ज्या दरिद्र ब्राह्मणांच्या घरांत विपणीच्या चोचांतून पडलेले दाणेही वेचले जात असत, तेथेंच देवाच्या दयेनें संपत्ति आली असतां काय चमत्कार होईल याचा पहा आतां कीं, चोरांनीं दांडगाईनें गरीबांनले मोत्यांचें पेंडे ओढून त्यांतील दाणे चोंचींकडे परतून चालले असतां बापका त्यांकडे डोळे मोंचेनें पाहत राहूं लागल्या !"

हस्तांभोजाविलासा नवविधुहरिणश्यामनच्छायवीवी।
तेजोऽग्नेर्धूमधारा लवणिमसरसी मुग्धशैवालवल्ली ॥
वेणिश्रीवेणिदंडो विजयकरिणो गंडदानप्रणाली ।
वेल्लन्त्र्यो धरश्रीरकलधरणीपालपाणेः कृपाणः २८६

कोणी कवि भक्तकन्येच्या तरवारीचे वर्णन करतो :- "रम्भाकमलाचाहून विशालतर असलेला भयरसाचाच काय, कीं नवचंद्रावरील हरिणाच्या श्यामलतमतेचा लाजवाब काय, कीं पतिव्रतेचा धूमधागाच काय, कीं लावण्यसरोवरातील करडी शैवालवल्लीच काय, कीं दयूंच्या लक्ष्मीच्या वेणीचा पेरच काय, कीं दयारूप हत्तीच्या मदस्रावाची नलिकाच काय;- असा हा भक्तकन्या राजाच्या हातातील भेपवीर कृपाण शोभा पावत आहे !"

मारयामि यमुना महारयां त्वां वरोरु नरपत्यमंतरा ॥
द्राग्घटाकुरु दुकूलमायतारोधिरस्तु मम नावि चंद्रमाः २८७

कोणी चतुर नाविक कोण्या स्त्रियेस म्हणतो :— "हे रंभोरू! या उच्छृंखल यमुनामहाप्रवाहाचून तुला आवरायांचून मी नेऊन पोंचविनों; चेवढें माझ्या करीं नौकारूढ तुरळ्या पत्नीकरें काढ आणि माझ्या नावेंत चंद्रम्यास प्रगट होऊंदे !"

पत्या कुंठितदंतिदंतमुसलान्याचूर्णितान्याहवे ।
धाग यत्र पिनाकपाणिपरशोराकुंठिता वल्गसि ॥
तन्मे नावदुरो नृसिंहकरजैर्व्यादीर्यते सांप्रतं ।
दैवे दुर्नयतां गते तृणमपि मायेण वज्रायते ॥२८८॥

हिरण्यकशिपूची उक्ति:—"ज्या माझ्या उरस्थळावर हत्तींचीं आकुंठित दंत घुसले तीं चूर्ण झालीं व शिवाच्या परशूची धारही ज्यावर बोथट झाली, तें आज नृसिंहाच्या नखांनीं विदीर्ण होत आहे; नेहमीं दैव दुष्ट झालें असतां तृणही वज्रमाप होतें असें अशानें पाहिजे!"

अन्योन्यस्य निरीक्षणादुपगता नेत्रान्मुखे ह्रीःस्थिता।
संलापाद्धृदयं विहाय कुचयोः सीमामुपेत्यस्थिता ॥
गाढालिंगनलग्नतः कुचतटीं संत्यज्य नीविं गता ।
मर्त्योल्लंघनकारणं किमभवत्सा नच्च जानीमहे २८९

नवऱ्याच्या मनोव्यापाराचें कोणी मार्मिक कवि वर्णन करतो:—"परस्परांचा दृष्टादृष्ट झाली असतां लज्जा ही नेत्रापासून निघून मुखाचे ठायीं जाऊन बसली, पुढें संभाषणाच्या वेळीं मुखापासून निघून कुचसीमेवरीं जाऊन चढूकली, नंतर गाढालिंगनप्रसंगीं कुचतटापासून नाविमंदेशीं पोंचली: पण पुढें मर्त्याच्या करेंकरून न लंघिलेलें असें काय असेल हें आम्हांस कळत नाहीं!"

अकृत्वा पौरुषं या श्रीर्विकासिन्यपि किं तया ॥
जरद्गवोऽपि चाश्नाति देवादुपगतं तृणं ॥२९०॥

"पौरुष केल्यावांचून जी लाभलीच प्राप्त झालेली संपत्ति तींत काय तात्पर्य आहे? म्हातारा झालेला बैलही परच्छेनें उगवलेलें गवत खातो!"

सोत्साहविष्टो नरो विनंक्षीलते नच चापदम् ॥
दुग्धं पश्यति मार्जारो यथा नलगुडाहतिम् २९१

"सोत्साह विष्ट पुरुषाची दृष्टि दुःखावर असते पण नें प्राप्त होतांना जी विपत्ति येणार ती त्याला दिसत नाहीं; जसें मांजराची नजर दुधावर असते पण वरुण्याकडे त्याचें लक्ष असत नाहीं!"

चातकस्य मुखचंचुसंपुटे। नो पतंति यदि वारिबिंदवः॥
सागरीकृतमहीतलस्य किं। दोष एव जलदस्य दीयते २९२

"चातकाच्या चंचुपुटांत जर पाण्याचे बिंदु पडते नाहींत, तर सारी पृथ्वी जल-

वेव करून टाकणारा जो वेष त्यास वेष धारण करणे काय ? "

अंसावाकृष्टदुकूलया सरभसं गृह्णीं भुजाभ्यां स्तनौ ।
आकृष्टे जघनांशुके कृतमधः संयत्कमूरुद्वयम् ॥
नाभीमूलनिबद्धचक्षुषि तया व्रीडानतांग्या प्रिये ।
दीपःकुत्रचिदानवेपिनशिखः कर्णोत्पलेनाहनः २९३

" खांद्यावरून दुकूलाचे अपवरण केले असता प्रियेचे भुजयष्टिक करून स्तनांचे विमर्दन केले. जघनांशुकाचे आकर्षण केले असता आपले ऊरुद्वय तिने अत्यंत त्रिवर केले. नाभिमूलावर चक्षु बद्ध करून व लज्जानम्र होऊन दीपज्योतीवर कानाचा उपयोग केला. पण त्यामुळे कर्ण कमलाघाताने घायाळ होऊन दीपज्योति कंपायमान झाली ! "

संन्यासमकृत कार्षीज्जरो कलत्रे दुकूलमत्यजत्पाः ॥
तत्याज रागमधरे पुस्फिपुरश्चक्रिरे चिकुराः ॥२९४॥

संन्यासाचा स्वीकार त्याच्या वार्धक्यामुळे कोणी कवि असता पातला :—

" कार्षीने संन्यासग्रहण केला. अपरत्र्याने कलत्रत्याग केला. अधरानें रक्तता टाकून दिली आणि केशरी पुरुषांची स्थिति वर्णिली ! " असेच वेगळा केला असता तात्पर्य हे की. वेगळा पडून पडला. त्र्याचा विरह झाला. त्यामुळे सारखे केस करून घ्यावे लागले.

द्रुमाः पांडुमाया पृतनिविहगर्भाः स्त्रिय इव ।
सकुल्माले कुंदा नृपतिरुनमाना इव जना. ॥
पिको मंदं मंदं हृदि मदनमामनि जपति ।
प्रसोरग्रे पुर्वापरिचितसमाकः कविरिव २९५

" वृक्ष हे गर्भिणी स्त्रियाप्रमाणें पिवळेपान झाले आहेत, कुंद हे राजसत्कार पावलेल्या पंडितजनांप्रमाणें सकुड्मल झाले आहेत आणि कोकिल हा मदनाच्या मंत्राचा जप मंदमाणीनें आपल्याशींच करीत होत्साता राजसभेंतील अपरिचित असणाऱ्या कवीप्रमाणे भासत आहे. "

पुष्पाः पतंति मृगो वाताः कलयंति केवलां पुष्पिम् ॥

चुंबत्यंबरमवनिं विपरीते किंन विपरीतम ॥२९६॥

" मुक्त जे स्वर्गस्थ असतात ते भूमीवर पडले आहेत, बाल मरणजे अजनन ते अत्यंत मुक्तपणाने पावले आहेत म्हणि आकाश पृथ्वीला येऊन भेटले आहे; तेव्हां एक विपरीत झाले असतां काय काय विपरीत होणार नाही ? " 'मुक्ताः' 'बालाः' व 'अंबरम्' यांचे दुसरे अर्थ ध्वनित्व आहेत; व एकंदर श्लोकाचें तात्पर्यही त्यांच्या अनुसार पेणारच आहे.

सुप्रातं दिनमद्यनः परिणतं साफल्यमद्यायुषः ।
कर्माण्यद्य शिवंकराणि सुमहोन्नत्योन्मुखो नेत्रयोः ॥
कार्पण्येन विगत्य संप्रति कृतं प्रास्थानिकं मंगलं ।
यज्जागर्ति भवन्मुखेंदुरधुना दिष्ट्या दृगोरग्रतः २९७

" आज सुदिन उगवला, आयुष्याचें साफल्य पूर्ण झालें, सुभ कर्माचे सार्थक्य झालें, नेत्रांचें पारणें फिटलें म्हणि दैन्यानें आपलें चित्त उचलले, की आज आपला मुखचंद्र डोळ्यांसमोर प्राप्त होण्याचा योग आला ! "

पद्मीपत्रमवलोक्य गतः प्रेयान् वियुज्यते ॥
आलोकये कथं सख्यस्तस्य चंद्रमसो मुखं २९८

" हे सखीनो ! ज्याचें पद्म (चंद्रपद्म) पाहून प्रिय मार्गस्थ होतो, त्या विरहताप देणाऱ्या दुष्टाचें मुख मी कशी पाहूं ! "

उपाध्यायश्च वैद्यश्च ऋतुकाले वरांगना ॥
सूतिका दूतिका चैव कार्यांते तृणवत्समाः २९९

" उपाध्याय, वैद्य, ऋतुकाली स्त्री, सुईण म्हणि दूती -- इतकीं सर्वजण कार्य उरकलें असतां तृणवत् होतात ! "

संप्राप्तोऽपि महोदधिं न विदुषो जातो जलैर्वाडवो ।
प्रेषं प्राप्य च वातकोऽपि चरणौ भानुं न लेभेऽरुणः ॥
चंद्रः शंकरशेखरेऽपि सततं सोऽपि सपत्नी रतः ।
प्रायः सत्पुरुषाश्रितोऽपिलभते दैवानुरूपं फलं ॥३००॥

"वाटवार्गावें महामयूराचा आश्रय केला तरी त्याच्या जवांनीं त्याची वृक्षा हरणी वाटीं. वानरांस मेघाचा आश्रय झाला तरी त्याची तहान नाहींच, मरुणानें सूर्याची से-वा पतकरली तरी त्याच्या योगे त्याचे गारवा. तसाच चंद्रही शिवाच्या मस्तकीं असून रे-खेस पूर्ववत् सर्वांस दिसतो. त्याप्रमाणें सत्पुरुषांचा आश्रय घेतला तरी कोणाचे ही देवानुग्रहच फळसिद्धीस."

महादिव्यौषधयःपानं महाक्षीमुखचुंबनम् ॥
महागंधवनक्रीडा महावृक्षावनः कुतः॥३०१॥

"महादिव्यौषध्या पानकरणें महाक्षीमदनयनांचें मुखचुंबन आणि महावृक्षां-च्या उपवनांत क्रीडा हे सौख्य महादरिद्यानें कोठून प्राप्त होणार?"

नाभि नाभि कमलानि नव्यानें। नाभि महापद्मकुलानि नेत्रयोः॥
सर्वमेकमपि नृपिच्छुनें। पंचबाणमविगद्मुत्सवः॥३०२॥

"नाभि नाभि कमलें, नेत्र हे नाभि महापद्मकुलें नेत्रयोरि पहा, हा सर्व एकाकार्यांच नि-पुन गेला. असो काय विद्यानें हा मदनोत्सव होत असे!" हा सर्वांनच सर्वोत्कृष्ट होय. यापेक्षां त्याच्या कृपेचा किंवा द्वेषाचा काय पडेल.

दीपो मद्यपने ध्यानें कज्जलंच मधूपने ॥
यद्यन्यत्सर्वमित्येवं जायते नास्तिको मनाक ३०३

"दीप हा मद्यपानें पक्षात करणें आणि कज्जलाचा मधुपानें. ठीकच आहे, असें जिथें अल्प त्यांचे त्याला सर्वच अल्प होतें!"

मद्यारंभे मधुरांनिलकमलाः कज्जलरुचिं ।
दृशोः कर्णेदंडे विमलमणिनाटंकयुगलम् ॥
गले मुक्तामाला शुचिवसनमंगे च सततं ।
वशीकर्तुं विश्वं दधति खलु बाल्योपकरणं ३०४

"मद्यारंभी मधुरांनिलकमल, डोळ्यांत अंजन, दोन्ही कानांत मणिनाटं-क (रत्नांचे नाविरे), गळ्यांत मुक्तामाला, शुचिवस्त्र निरंतर परिधान केलेलें,— या सर्व बाह्यावरून मला असें वाटतें कीं, स्त्रिया या सर्व विश्वाच्या वशीकरणार्थ

वरील साहित्य वाङ्मयात असतात!" वर्णाकरणांत तिलक, अंजन, मणि वगैरे सामग्री अवश्य असून निरंतर सोवळ्यांत राहिले पाहिजे हें लोकप्रसिद्ध आहे.

स्नेहोपपन्न इति पूर्णदृशा विशेष-
ज्ञाली स्वमात्मनि वस्तुमकरं निधाय॥
तत्योदये तमश्च गृण्हति पद्मबंधौ ।
दीपा भवंति कलुषा बलवान् हि लोभः ३०५.

"पूर्णानें असंगमनाच्या समयीं दीपाचेठायीं आपला वस्तु-(तेज; द्रव्य)-समूह जो ठेवला, कीं हे स्नेहयुक्त (पक्षीं, तैलयुक्त) आहेत व पूर्णदृशेनें (संपन्नतेनें— वातीच्या अर्थानें) विराजमान आहेत असें समजून,— तेच दीप त्यानें आपल्या उदयकाळीं आपला वस्तुसमूह मागारी घेतला असतां त्यापक्षीं मलिनमुख होतात त्यापक्षीं लोभ हा परम दुर्धर आहे असें समजलें पाहिजे!"

मौनं कालविलंबश्च प्रयाणं भूमिदर्शनम् ॥
भृकुट्यन्यमुखी वार्ता नकारः षड्विधः स्मृतः ३०६.

" आपलें कोणापाशीं कांहीं काम असलें आणि त्यानें बळकट मौन धरलें, किंवा कामास उशीर लावला. अगर न भेटतां चालता झाला, किंवा गांठ पडली असतां मुद्दाकडे पाहूं लागला, अथवा त्याच्या कपाळावर आठी दिसली, किंवा मुद्दाम दुसऱ्याकडे पाहून बोलूं लागला, अगर्जे नन्याचा पाढा समजावा. नकाराचे वरील सहा प्रकार आहेत."

मज्जे त्वं मज्ज सिंधौ गिरिवरशिखरे त्वंच निष्ठ मनिष्ठे।
शांते मांते दिशांते कुरु वसतिमहो गर्व सर्वं भवासु॥
तेजः पातालमूलं भज भुवि भगवन् मा न मा नाम तेऽस्तु।
मैत्र्याः कामा अपंतीं सतनमहिमिमां तूर्णमाशां अयिष्ये ३०७

" हे मज्जे! तूं क्षुद्रांत बुडी मार; हे मनिष्ठे! तूं एकाद्या मोठ्या पर्वताच्या शिखरावर जाऊन बैस: हे शांते! दिशांच्या मांतभागीं तूं वस्ती कर; हे गर्वा! तूं ठेंगणा होऊन रहा; हे तेजा! तूं पातालाच्या तळवटीं जाऊन बैस; हे भगवंता माया! तुझें नांवच घेणें नाहीं देऊं नको;— कां तर मला मैत्रीनें धरून राहणारी जी दृश्यतृष्णा ति-

चाच मी इतःपर अंगीकार करणार!" तात्पर्य, पतनोन्मुख झटला स्वपतने वरील सा-
ख्या मंडळीस पूर्ण ओळाच मिळाली असून समजावें.

यः पठति लिखति पश्यति परिपृच्छति पंडितानुपासयति।
तस्य दिवाकरकिरणैर्नलिनीदलमिव विकास्यते बुद्धिः३०८

" जो अध्ययन करतो, लिहितो, तयाच्या व्यवहारावें किंवा पुस्तकांवें वरचेवर अव-
लोकन करतो, नेहमीं संशयनिरसन करून घेतो, पंडितांच्या समागमें असतो, त्याची
बुद्धि सूर्यकिरणांनीं जशी कमलिनी तशी विकास पावत जाते!" *

पक्वाम्रग्रथिताम्बुबिंदुनिकरैर्मुक्ताफलस्पर्धिभिः।
कुर्वत्या हरहासहारिहृदये हारावलीभूषणम् ॥
बाले बालमृणालनालवलयालंकार कांते करे ।
विन्यस्याननमायताक्षि सुकृतिकोऽधंत्वया स्पर्पते ३०९

" हे बाले! पक्वाम्रफलांची ग्रंथी करणारे जे पक्वाम्रापासून गळणारे अम्बुबिंदु
त्यांनीं शिवहास्यतुल्य शुभ्र वस्त्रःस्थलावर मोत्यांचा जणूं काय हार घालण करणा-
री जी तूं, ती कोवळ्या कमलनालतुल्य वलयांनीं सुशोभित केलेल्या हस्तावर आपलें
मुख देऊन कोणत्या धन्य पुरुषावें एकाग्रतेनें ध्यान करीत आहेस?"

सादरिकरूपवत्या मयनि भवत्या विभूषणं भारः॥
सर्वांगसौरभिण्या दमनकवल्याः किमाप्ति कुसुमेन ३१०

" सादरिक सौंदर्यानें मंडित जी तूं त्या तुला अलंकार हे केवळ भाररूप होत!
पहा कीं, सर्वांगांहीं सुगंध परिपूर्ण जी दमनवल्ली (दवणा) तिला हे सखि! पुष्पांचें
काय प्रयोजन होय?"

कर्णलंघिगुणोत्कर्षत्यागिनोधन्विनस्तथा ॥
निष्फलान्न विमुंचंति मार्गणान् संमुखे स्थितान् ३११

---

* वेकनचें वाक्य याचप्रमाणें आहे:—" वाचनानें मनुष्य परिपूर्ण होतो; लिहिण्यानें
तयारीचा येतो आणि संभाषणाचा योगानें सभ्य-सुसंगत बनतो."

(" Reading makes a man full, writing exact, and conversation ready ")

" (दानुषसीं) दाने ने आहेत ने मार्गणांस (याचकांस) त्यांचा गुणोत्कर्ष त्यांच्या कानावरून गेला असतां व ने संमुख आले असतां त्यांस निष्फल दवडीत नाहींत; म्हणजे अर्थातू त्यांची योग्य संभावना करून त्यांस बोळविताच !

" (धनिषसीं) धनुर्धर जे आहेत ने संमुख म्हणजे हातास आलेल्या मार्गणांस (बाणांस), कीं ज्यांचा गुण (दोरी) आकर्षून कर्णप्रदेशापर्यंत आणला आहे, त्यांस निष्फल सोडीत नाहींत; म्हणजे नीट लक्ष्यावर योजून त्यांचें संधान करतात ! "

चिरश्रांतो दूरादहमुपगतो हंत मलया —।
नरेकं त्वद्देहे नखपदमपि श्रेष्यामि दिवसम् ॥
समीरेणोत्कंपं नवकुसुमिता चूतलतिका ।
धुनाना मूर्धानं नहि नहि नहीत्येव वदति ३१२

वसंतानीत बाणांनें होणाऱ्या मानसमनोगत उत्प्रेक्षा:— " हे ममदे ! हा मी येथवर दूरच्या मलयाचलापासून चालत आल्यामुळें अगदीं दमून गेलों आहें, तर एक दिवसभर तुझ्या पदीं मला राहूं दे,— या ममाणें वसंत बापूनें प्रार्थना केली असतां नवपुष्पिन (श्लेषार्थ स्पष्टच आहे !) ही आम्रलता ही शिरःकंपानें छे! छे! छे! म्हणून जणों काय त्याचा निषेध करते ! "

यद्यपि धनेन धनिनः क्षितितलविहितेन भोगरहितेन ॥
तस्माद्रूपमपि धनिनश्लिष्यति नः कांचनो मेरुः ३१३ ॥

" पृथ्वीच्या पोटांत पुरून ठेवलेलें जें अनुपभुक्त धन त्याच्या योगानें जर धनी आपणास धनवान् म्हणवीत असतील, तर मग आम्हीही श्रीमंतच आहों,— अवघा सुवर्णमेरु आमचाच आहे ! "

कापि मृगाक्षी प्रियविरहयोगे। गंतुं निशापारमपारयंती ॥
उद्वातुमादाय करेण वीणा-। मेणांकमालोक्य शनैरहासीत् ३१४

" कोणी विरहिणी रात्र जाईना म्हणून सतार जवळ घेऊन आतां निजवर गाणार तों मृगांकाकडे पाहून संदर्भित करती झाली ! " अभिप्राय उघडच आहे. कीं, रात्र जाण्याचा जो उपाय आपण करणार तोच तो सांगण्यास मात्र कारण होईल असें जाऊन रात्र्यंत नेहांच जाते. सांगण्याचें कारण ' मृगांक ' शब्दांत

मृत्विन होतें. मृग हे कस्तुरीस अत्यंत सुख असल्यामुळें तो योगाचा असतां चंद्राची गति सहजच मुरडली!

उद्योगादविलम्बस्य सहायस्य धीमतः ॥
छायेवानुगता लक्ष्म्या नित्यं श्रीः सहचारिणी २१५

"विद्या मेहनतीनें उद्योग करणारा, बुद्धिमान आणि ज्याला विनाविलंब अत्यंत अनुकूलता आहे अशा पुरुषाच्या मागोमाग संपत्ति ही छायेप्रमाणें सदोदित चालत असते!"

विरला जानंति गुणान् विरलाः कुर्वंति निर्धनस्नेहान्॥
विरला परकार्यरताः परदुःखेनापि दुःखिता विरलाः २१६

"गुणज्ञ लोक विरळे सांपडतात, निर्धन पुरुषांचा स्नेह करणारे विरळा, दुसऱ्याच्या कार्यांत अहोरात्र झटणारे व दुसऱ्याचें दुःख पाहून कळवळणारे तर विरळच!"

का विद्या कविता विनार्थिजनतां त्राणं विना शास्त्रका।
कः सूनुर्विनयं विना कुलवधूः का स्वामिभक्तिं विना ॥
को धर्मः स दया विना नरपतिः को नाम नीतिं विना ।
भोगाः के रमणीं विना लिखितवत् किं जन्म कीर्तिं विना २१७

"कविता याचकांचें दारिद्र्य कायसा? शास्त्रज्ञान दानशक्तीवांचून कायउपयोगाचें? विनयहीन पुत्र कायकामाचा? नवऱ्याची निष्ठा नाहीं अशा कुलवधूस काय करावें? दया नाहीं तर धार्मिकता तरी कसली? नीति न्याय सद्वर्तन नाहीं त्याला राजा काय म्हणावें? रमणीय स्त्रीच्या व्यतिरिक्त भोगांत काय मजा? कीर्तियुक्त नाहीं तर जन्म तरी कसचें?"

निष्पंकं शिशिरेण पीवरगणैर्निर्मत्स्यं निःकूर्मकं ।
व्याधैर्निर्विहगं निरंबु रविणा निर्नीलकं दंतिभिः ॥
निःशालूकमकारि शूकरगणैर्नामैकमात्रं सरो ।
हे नीमून परोपकारक पयोदानेन मां पूरय ॥ २१८ ॥

"हें सरोवर शिशिर ऋतूनें निष्पंक करून टाकलें आहे, पीवरांनें त्यांतील मत्स्य चट फार केले आहेत, व्याधांनी त्यातला पक्षी विहार करणाऱ्या पक्ष्यांना संहार केला

आहे, रवीनें जल शोषून टाकलें आहे, हत्तीनीं त्यांतील कमलिनी उपटून विध्वंस केला आहे, डुकरांनीं चिखलांतील गवत खाऊन पार केलें आहे,— तेव्हां या सर्वस्व नाशापुढें हें केवळ नामशेष होऊन बसलें आहे; तर हे परोपकारक मेघा! मजवर दया करून मला मरून टाक!"

बधिरयति कर्णकुहरं वदनं मूकयति नयनमंधयति ॥
कुटिलयति गात्रयष्टिं संपद्दोषोऽयमद्भुतो लोके॥३१९॥

"संपत्तीचा विकार साऱ्या रोगांहूनही भयंकर आहे. पहा कीं, याच्या योगानें कान बधिरे होतात, वाचा बसते, डोळ्यांनीं दिसेनासें होतें आणि शरीर वांकडें होतें!" हें लाक्षणिक वर्णन सर्वांस समजण्यासारखेंच आहे.

यावच्चलति वायुरेकोऽपि नुमर्हति ॥
तावदेव तुरंगोऽयमाजगाम जगाम च ३२०

कोणी घोड्याच्या वेगाचें वर्णन करतो:— "वायु दुभंग झाला असतां तो पुनः मिळून एक तो होतो न होतो, तोंच हा घोडा गेला आणि आला सुद्धां!"

चिंताविषे कर्मणि चक्रपाणे-र्नापेक्ष्यते तत्र सहायसंपत्॥
पांचालजायाः पटसंविधाने। मध्येसभं यत्र तुरी न चेमा ३२१

"भगवंताच्या मनांत कोणतीही गोष्ट कर्तव्य असली म्हणजे तेथें सहाय्याची अपेक्षा असते असें नाहीं. पहा कीं, जेव्हां द्रौपदीच्या लज्जारक्षणार्थ तो धांवला तेव्हां सभेच्या मध्यें घोड्या किंवा चात्या चालवाव्या लागल्या नाहींत!"

अंब त्वाम्यसि निष्ठ गोरसमहं मथ्नामि मंथानकं ।
मालंब्य स्थितमीश्वरं रसभसं दीनानसो वासुकिः॥
सासूयं कमलासया सुरगणः सानंदमुद्यद्भयं ।
राहुः प्रेक्षत पंस वोऽस्तु शिवदो गोपालबालो हरिः ३२२

"आई! तूं दधिमंथन करतांना रमली आहेस तर थांब, मी भंगड मंथन करीं— असें म्हणून मंथनकाठें त्यानें ग्रहण केलें असतां ज्या-ज्याकडे वासुकि दीनमुख होऊन पाहूं लागला, उलटी सवतमत्सरानें पाहूं लागली, देवगण आनंदित हो-

स्वामी वधू मागणे आणि गरु मत्सर होत्साता पाहू लागला, तो गोपालपुत्र हरि तुम्हास कल्याणपर होवो!" वगैरे वर्णनीची कारणें उपरुच आहेत कीं. वाल्मीकास पूर्वीच्या कवींच्या आदरणे होऊन पुनः तो प्रसंग येतो कीं काय असें वाटतें; लक्ष्मीस वाटते कीं. या मथनाच्या योगानें मला भवन निर्माण होने कीं काय कोण जाणे; देव व्हावा अमृताविषयीं मत्सर आनें; आणि गरुस आपणावर पुन. काय प्रसंग गुदरला कोण जाणे दोघांकरितां

कुलगानिषिषर्मानिम्ब मदृषविम्बविनि ॥
नर्त्तोदृषविदोले हन दोलायने स्वरः ३०३

"कुलाचार आणि वस्त्राभरणवर्ग यांस या दोन स्त्रीवाचक शब्दांच्या स्त्रीदृषमुख दिसोल्यावर मदन हा स्वदृषन पावन आहे" असणे करीकरे कुलगानींचा संग होईल असा धाक वाटतो आणि त्याकरे हरपवल्लभाकरे पन सोडनें. आणि त्यामुळे मदनार्चा स्वारी होऊन त्याकरे स्वस्त गरिबी आहे

मिथो विलुठे नपयःपयोनिधौ। मुधेंदुमिथो न मुधा सुधाकरे॥
न वालिनं सिंहविकल्पधारया नरेंद्रमत्तस्त्वे गिलवि ३०४

"देव यांनी क्षीर समुद्र मंथन करीतांना त्यांतून मधुसोबत चंद्र आणि सुधा यांचा मथनाचा स्वारी मत्सर करणाऱ्या राक्षसांनी गिळून टाकण्याचे स्वारी आणि करणीपत्र तो चंद्र त्याच्याप्रमाणें सोडनें स्वारी

मिश्रे कापिशने गंगेऽरवने वह्नानने नाम्बनि ।
केदारक्षमपुरीव्ये दृषिताम्भिष्ठे पुरः सारसे ॥
चक्रांदेण विलोलिना विलसता नाम्बारिना मोक्षिना।
कंठे केवलमर्गलेव निहिता नीरस्य निर्गच्छतः ३०५

"सूर्य दिगंतरी वावरता असता कमलवन हे निर्माल्यित पुरुष होत्साते दीनवाणें दिसूं लागलें असतां. तसेंच हंसास मल्लिपार्वी आलिंगित पाहून अपर दुःखावें आकोश करूं लागले असतां, चक्रवाक पक्षी स्त्रीविपुक होत्साता कमलतंतु तोडीं धरीना व टाकून ही देईना, पर त्यानें कंठाने तापीं तुसनें धारण मात्र केले,

कीं माझ जाऊं लागल्यास त्यांस त्यांनीं अटकाव करावा !"

मिषापा: मन्मथे गलितकबरीबंधनविधा-।
वृदंचद्रोर्बिंबादरदलितचेलांचलमुरः ॥
घनाकृते पश्यन्त्यथ मयि समंदाक्षिवलितं ।
नमंन्या यद्दृष्टं न हि लिखितुमीशो मनसिजः ३२६

"मिषा मम्मानसमर्थी गलितकचभागचे बंधन करूं लागली असतां तिच्या उन्नमित भुजांनीं किंचित अस्ताव्यस्त झालेल्या अंचलाकडे व वक्षःप्रदेशाकडे मी सस्पृह पाहूं लागलों असतां तिने खालीं नवून लज्जामंद कटाक्षांनीं जें मजकडे अवलोकन केलें नें रेखण्यास मन्मथ सदनही समर्थ होणार नाहीं।"

सहस्रकरपूरणाभिखिलजंतुवक्त्रांबुज-।
मकाण्डाकरणादथ मदमदेरिनेत्रोत्सवात ॥
दरिद्रनिमिगंहृतेरखिलभूपचूडामणि—।
र्जगन्मणिरहर्मणिर्जगदिदं च धन्यं तम ॥ ३२७ ॥

कोणी कवि राजाचा स्तव करतो :— "सर्व भूपांत श्रेष्ठ व पृथ्वीचें रत्न असा हा राजा आणि सूर्य हे दोघे सिंहून जगाचें पालण करीत आहेत; कसें? तर सूर्य सहस्रकिरण मागट करतो व हा राजा हजारों याचकांचे हस्त दानपूरित करतो; सूर्य सर्व प्राण्यांच्या मुखकमलांस मकाशित करतो व राजाही सर्वांचीं तोंडें मफुल्लित करतो; सूर्य हजार पद्मे जे त्याचे मानिस्पर्शी त्याचा नेत्रोत्सव करतो आणि राजा आपल्या डोळ्यांस स्वमनाप्रमें दिपवून टाकतो; आणि सूर्य जसा अंधकाराचा ध्वंस करतो त्याप्रमाणें राजा हा राष्ट्रांतन दारिद्र्य घालवून राष्ट्रें देत नाहीं!"

सेयं सीधुमयी वा सुधामयी वा हलाहलमयी वा ॥
दृष्ट्वां निपीतमात्रा मदयति मोदयति मूर्च्छयति च २२८

"ती मद्यमय आहे! अमृतमय आहे! किंवा विषमय आहे हें मला कळत नाहीं; पण ती डोळ्यांनीं दिसें मात्रान करतांच उन्माद येतो. हर्ष होतो. व मूर्च्छाही मात होते!"

दोषमपि गुणवति जने हला गुणरागिणो न खिद्यंते ॥
शीतेंव रोहिणि पतितं पश्यति लोकः कलंकमपि ॥ २२९ ॥

" पुण्यवंताच्या ठायींचा दोष पाहूनहीं पुण्याचे वाटणे खेद भावना नाहींत: पहा
कीं, चंद्रामध्ये कलंकहीं लोक प्रसिद्धच आहे. "

अवगणी पुण्यवानपि दूषणवचनार्थने स्पृहया दारः ॥
पश्य शशाङ्कमपि लोके पूर्णेनापि परमार्थने सकलः ॥ ३३० ॥

" हरएक पुण्यवान मनुष्यांचे ठायीं अवगुणी लोक स्पृहेकरून दूषणांचे वचन
बोलणे. अशाप्रमाणे दुसऱ्याचे पहाणे हाच मनुष्याचे ठायीं मोठा अवगुण आहे
हरएक पुण्यवंतांचे " वर्तणूक दोन्ही प्रकारे पहाण्यास येणेकरून आपले ठायीं
दोषाचे व दुसऱ्या पुण्यवंताचे ठायीं पुण्याचे ' पुण्यवान यावरून मोठेपणाचा श्लोक
स्पष्ट करावयास हरकत

मनु नाम पुरुषेषु देवता । यान्यरूपाभिरपि दूरदर्शिनः ॥
भानि गर्भाद्रिदुरक्षणश्चलाः यत्कृपा विरलमास्म मे गतिः ॥३३१॥

" पुरुषांचे ठायीं अवतार या नावे मनुष्य देवता आहेत. कीं ज्या नपेकरून दूर-
दर्शक देव आहेत. त्या पुण्यकरू असून ही. मानी मनुष्य त्या परमेश्वरावर आहेत कीं, ज्या-
चे कृपा पर्वताच्या बालकाच्या स्खलनाविषयीही समर्थ आहे! "

अपूर्वरसनाम्न्यार्या स्वस्थानविनेत्र्यपि ॥
कर्णमूले दृशान्यस्यै दत्त्यन्यस्य जीवनं ॥३३२॥

" स्वतःचे मुख देव कोणी विरळ मान गहाणी जो निष्कारण विलक्षण सर्पिणी,
जो एकाच्या कानाला दुसरे आणि विषयाचाच जीव जातो! " अर्थ उपरच आहे कीं,
चहाडखोर एकाच्या कानाला लागतात आणि त्याचा परिणाम विशेषाचा मनुष्यावर
पडतो.

वरवीणां सौधे नृपतिरमणीनां नवमुचो ।
गवाक्षान्तर्लीना: कतिचन गृहीत्वा नलमुच: ॥
क्षणे गोपायंत्यो क्षणमविमर्षेण क्षणमहो ।
विदूष्यन्ति स्वर्णं कमपि किमु किंचन जना: ३३३

" राजस्त्रिया आपल्या महालातून फिरत असतां गवाक्षमार्गाने बाहेर पहाणेस्त्रा
स्त्या त्यांच्या शरीर प्रभा त्यांपैकीं मेघांनीं कांहीं चोरून घेऊन त्याच आतां विचारून-

ज्या मिषानें ते क्षणभर प्रगट व क्षणभर अप्रगट करीत आहेत; कीं ज्या प्रमाणें निर्धन पुरुष कोणाचा अपहार करून मिळविलेलें सोनें केव्हां लपविलें केव्हां बाहेर काढतात!"

चंद्रलांछनशोभावस्या वक्षोरुहौ तन्व्याः ॥
नो चेन्नाविरुढा कथमनिमिषतां भजेन मे दृष्टिः ३३४

"या तन्वीचे वक्षोज हे कांचनशैल (सुमेरु) होत यांत संशय नाहीं; कां कीं, तसें नसतें तर त्यांवर आरूढ होतांच माझी दृष्टि अनिमिष झाली हें कसें?" *

बलिः पातालनिलयोऽपः कृतश्चित्रमत्र किं॥
अपःकृतो दिवस्थोऽपि चित्रं कल्पद्रुमस्त्वया ३३५

"हे राजा! पातालांत असणाऱ्या बलीस तूं दानशूरत्वानें स्वर्गी केलास यांत नवल तें काय? पहा, स्वर्गस्थ कल्पतरूस तूं स्वर्गी करून राकला आहेस!"

यदेनच्चंद्रानर्नलदलवलीला विनयते
नरादृष्टं लोकः शशक इति नो मां प्रति नथा ॥
अहं बिंबं मन्ये त्वदरि विरहाक्रांतमदणी—
कटाक्षोल्काघातव्रणकृणकलंकांकितमनुं ३३६

चंद्रगत कलंकाचा उल्लेख:— "हे राजा! चंद्राच्या ठायीं लक्षावधी दृगासारखें जें दिसतें त्याविषयीं लोक मशा कल्पना करतात कीं, तो ससा आहे, पण मला तसें भासत नाहीं; माझी कल्पना अशी होते कीं, तुझ्या शत्रूंच्या स्त्रिया या पतिविरह असह्य होऊन चंद्राकडे ते निर्भत्सनपर तीव्र कटाक्ष फेंकतात त्यांच्या योगानें त्यास व्रण पडले आहेत!"

रे रे रामप्र वध्यभारवहनात्कुग्रामसभ्यासि किं ।
राजाप्यावसथं प्रवाहि-चणकाभ्यूषान् स्फुरं भक्षय ॥
सर्वत्र कुच्छ्रवनो हयानिति वदंत्यत्राधिकारे स्थिताः ।
राजा नैरुपदिष्टमेव मनुते सत्यं नटस्थाः परे ॥ ३३७ ॥

---

* अनिमिष म्हणजे जिचीं पापणी लवत नाहीत अशी. सर्वेश्वर शास्त्रकारांनी देव त्यांच्या लक्षणांपैकीं एक लक्षण दें आहे कीं, मनुष्यादिकांनीं त्यांच्या डोळ्यांच्या पापण्या लवत नाहीत. वर यावरून कवि कल्पना करतो कीं त्या अर्थी आरोहण यावेंकरून दें देवांचें लक्षण दर्शित झालें,— म्हणजे तो येथे विष्णु झाला;— त्या अर्थी बलीला हे सहजच अप्रयत्नसिद्ध होत!

[illegible] राजाच्या घरी राहून पाचशेजणांचे मारे राहण्याचे कष्ट करून उ-
गाच कुत्र्याप्रमाणे खाल्लेले नसे तर तुला सांगतो असे कर. राजाच्या वाड्यांत घरेदा क
र, म्हणजे तुला दरबारदार हरभट्यांची चेरी पिऊन नाईल. कसें म्हणशील तर अ-
श्वशालेवरील अधिकाऱ्याची परीक्षा उत्तम आहे की, दोषपूर असली की, त्या जनाव
रास घोडा म्हणून न ओळखतां. राजाचा पूर्ण भरवसा त्याच्यावर आणि तूतर केवढा उ-
दरभर. त्यास कसलेच किंमत नाही."

यस्यूर्वं पवनाग्निवाम्बसलिलैर्भागं नयो दृश्यं ।
नम्येनत्फलमाहृता परिणतं चन्नानरूपं वपुः ॥
पुण्यागंगकपोलचुंबनरुचा यस्याश्च रम्योनमें ।
प्रायः कुंडल वालमे किमपरं यस्यूर दोलायमे ॥८

"हे कुंडल! वायु, अग्नि, आकाश, जल, पृथ्वी या पांचांचे मेवन करून ने पृथ्वी
र नय आचरलेस त्याचे फल हे तुला प्राप्त झाले आहे की. पृथ्वी पवर्णरूप काया पव-
त्री, नम्रणाऱ्या मेघमंडपाप्रमाणे व फलाने चुंबन घेऊन पुन्हा परले आणि उत्कृष्ट रत्नांची
तुझा पहावास आला आहे. या तुझ्या कानाचे पृथ्वी वडिलांनी हे मनुष्य ने मोठे गा-
न आहेस त्या तुझ्या पवन वस्था प्राप्तांचे हे दर कमर्यादा पाहून "गोरे हे पृथ्व-
च्या खरिज स्त्रियांचे पवन त्यांचे अर्थ घेऊन प्रमाणाम मनुष्यादि संस्का-
र त्याम करावे लागतात हे मनुष्य आहे. त्याप्रमाणेच पवनाग्निसाधन वर्गांत पवन्या-
चाचे मान आहेत हेही मनुष्य आहे. पृथ्वीचे आदेशत हे सर्वावयित्व मनुष्यांचा-
वर ही वर्गाचे कल्याण करते आहे. पृथ्वीच्याविषि कसा कारण हे वाचकांस सांगणा-
स नको च.

सोपाता च महीपतिः कृतयुगालंकार भूतो गतः ।
सेतुर्येन महोदधौ विरचितः स्वामी दशास्यांतकः ॥
अन्ये चापि युधिष्ठिरप्रभृतयो याता दिवं भूपते ।
नैकेनापि समं गता वसुमती नूनं त्वया यास्यति ३१९

भोजप्रबंध.

भुंजराजाने भोजाच्या वधार्थ जे पुरुष पाठविले होते ते पुढील श्लोक पढून त्याच्याक-
डे परत आले. आपला वध निश्चित होणार असें जाणून पुढील निर्भर्त्सन गर्भित श्लोक भो-

नानें रचून आपल्या चुलत्याच्या हवालीं करण्यास सांगितलें :——

" हे राजा ! कृतयुगास अलंकारभूत जो मांधाता राजा तो गेला: ज्यानें महोदधीवर सेतु रचना केला तो दशाननांतक राम तरी कोठें आहे ? दुसरे जे युधिष्ठिरादि राजे मोठे मोठे होऊन गेले तेही सर्व स्वर्गाचा मार्ग धरते झाले ; —— पण इतक्यांपैकीं एकाबरोबरही ही पृथ्वी गेली नाहीं. ही बहुधा तुजबरोबर मात्र येईल असें वाटतें!"

मुरली महदीयवंशजा। परपुंसा परिचुंबिता सती ॥
विजने विपिने भयातुरा। परमेशं स्मरती रहस्यसा ३४०

" महावंशापासून (पक्षी, वेळूपासून) उत्पन्न झालेली मुरली ही परपुरुषानें (पक्षी, कृष्णानें) चुंबिली गेली असतां, आपण एकीकडे रानीं आहों असें जाणून भयभीत होत्साती परमेशाचें स्मरण करूनच जणों काय आक्रोश करती झाली ! "

विद्वद्राजशिरोमणे तुलयितुं धाना त्वदीयं यशः।
कैलासं च निरीक्ष्य तत्र लघुतां निक्षिप्तवान् पूर्वजे ॥
उत्तप्तं नदुपर्युमासहचरं तन्मूर्ध्नि गंगाजलं ।
तस्याग्रे फणिपुंगवं तदुपरि स्फारं सुधादीधितिं ३४१

" हे सकलशिरोमणि राजा ! तुझ्या यशाचें परिमाण करण्याचें मनांत आणून ब्रह्मदेवानें पहिल्यानें सगळा कैलासचा कैलास पारखण्यांत घातला ; पण तेवढ्यानें होत नाहींसें पाहून नंतर त्यावर नंदी उभा केला ; त्यापुढें शिव व पार्वती हीं नंदीवर बसविलीं ; पुढें शिवाच्या जटेवर गंगेस ठेविलें. नंतर सर्प व सरते शेवटीं देदीप्यमान चंद्र यांचें आरोपण केलें ! "

दारिद्र्यानलसंतापः शांतः संतोषवारिणा ॥
याचकाशाविघातांतर्दाहः केनोपशाम्यतु ३४२

" दारिद्र्यरूप अग्नीचा संताप संतोषरूप उदकानें शमन पावला ; पण दारीं आलेल्या याचकाच्या आशाभंगानें जो अंतर्दाह होतो तो कशानें शांत व्हावा ? " तात्पर्य हें कीं, स्वतःचें दैन्य सज्जन हे धैर्यैकरून सोसतील ; पण दुसऱ्याच्या दैन्याचें निवारण करण्याचें नें असामर्थ्य दारिद्र्याच्या पोटीं येतें त्याचे दुःखावेग कसे सहन करावे ?

धन्या ला गृहदेहली स्तुवानि पा तत्सारपद्मप्रभां ।

जाना सा सरसी रसाद्विज्ञानि सा यस्यां विहारेच्छया॥
वंद्यः कोऽपि स एव यः खलु तया नेत्रेण संभाव्यते ।
धिग्धिग्वेधसमेषु मां यदनयन्नेकं कथंचित्कथं॥३४३॥

कोणी उत्कंठित झणतो:—"तिच्या चरणाची प्रभा ज्याच्यावर पडते तो वंदरठा धन्य होय; ज्या पुष्करिणींत ती विहार करण्यास हौसेनें उतरते ती स्पृहणीय होय; व जो कोणी तिच्या नेक्षणानें धन्यत्व पावतो तो वंद्य होय; पण ब्रह्मदेवास धिक्कार असो की, त्यानें या तिहींपैकीं एके ठिकाणीही माझा योग जोडिला नाहीं!"

स्फुरसि बाहुलते किमनर्थकं ।
त्वमपि लोचन वाम भवस्थिरम् ॥
तमहमागतमप्यपराधिनं ।
न परिरब्धुमलं नच वीक्षितुं॥३४४॥

"हे भुजलते! तूं उगाच कशाला स्फुरण पावतेस? हे वामनेत्रा! तूंही स्थिर हो कसा! कां कीं तो अपराधी मजकडे आला तरीही मी त्यास आलिंगन करणार नाहीं किंवा त्याच्याकडे तुसतीं पाहणार देखील नाहीं!" ही अर्थांनच खंडित झालेल्या मानिनीची उक्ति होय.

याःपश्यंति प्रियं स्वप्ने धन्यास्ताः सदि योषितः॥
अस्माकं तु गते कांते गता निद्राऽपि वैरिणी ३४५

"ज्या स्त्रियांस आपल्या वल्लभाचा समागम स्वप्नांत घडतो त्या धन्य होत; पण आमची तर विरहसमयीं अशी स्थिति होते कीं, वैराण निद्राही आम्हांस पारखी!"

राजन् दौवारिकादेव मामवानस्मि वारणं ॥
मद्वारिणमिच्छामि त्वत्तोऽहं जगतीपते ३४६

"हे राजा! तुझ्या द्वारपालापासूनच मी वारण (गमनमतिबंध—पक्षीं, हत्ती) पावलों; तेव्हां आतां तुजपासून मद्वारणाची (माझ्या गमतिबंधाची;—पक्षीं, मदोन्मत्त हत्तीची) मी अपेक्षा करतों!"

अर्था न संति न च मुंचति मां दुराशा ।

त्यागे रतिं वहति दुर्ललिते मनो मे ॥
यांचा च लाघवकरी स्वबधे च पापं ।
माणाः स्वयं व्रजत किं परिदेवितेन ३४७

प्राणी दरिद्र आपली स्थिति वर्णितो:—" मजपाशीं पैसा नाहीं; इकडे पहावें तर दुर्ललनृष्णा मला सोडीत नाहीं. माझें लाडकें मन दुसऱ्याची धनाशा पूर्ण करण्याविषयीं उत्कंठक होतें; पण इकडे यांचा नर लघुत्व आणणारी आहे. बरें, या दोहेरी त्रासापासून आपणास मुक्त करून टाकीन म्हटलें तर आत्महत्येचें महापातक धरलें आहे. तेव्हां हे प्राणांनो! तुम्ही आपोआपच मला सोडून जा कसे! व्यर्थ शोक करून फ-ड काय? "

कूपे पानमधोमुखं भवति मे नद्यो वराक्यः स्त्रियः।
सारंगैर्बकटिट्टिभैः सह सरस्येवं समालोकयन्॥
नादत्ते तृषितोऽपि हीनसलिलं क्रूरैर्वृतं जंतुभि-।
र्मीनादुन्नतकंधरः सुरपतिं नन्वातको याचते ३४८

चातकाच्या दिव्यजलपानावर उत्प्रेक्षा:—" विहिरींचें पाणी पिण्यास अधोमुख व्हावें लागतें, नद्या तर बिचाऱ्या स्त्रियाच आहेत, सरोवर हे हंस बक आणि टिट्टिभ पांनीं परिपूर्ण असतें; तेव्हां क्रूर माण्यांनीं व्याप्त अशा कुजल संचयापासून जें उदक प्यावयाचें तें तृषासमयीं ही घेण्याचें न पतकरून मानी जो चातक तो गर्वानें ऊर्ध्वकंठ होत्साता देवाधिदेव जो इंद्र त्यापाशीं काय ती याचना करतो. "

भवारण्यं भीमं ननुगृहमिदं छिद्रबहुलं ।
बली कालश्चोरो नियतमसिता मोहरजनी ॥
गृहीत्वा ज्ञानासिं विरतिफलकं शीलकवचं ।
समाधानं कृत्वा स्थिरतरदृशो जागृत जनाः ३४९

" हे जनहो! हें संसारारण्य भयंकर आहे, शरीररूप गृह रक्षित असेल म्हणावें तर हें मुळींच बहुच्छिद्र आहे, मृत्युरूप चोर हा बलिष्ट आहे, मूढत्वरूप रात्रि ही केवल अंधकार व्याप्त आहे; तर ज्ञान हाच खड्ग, शांति हीच दाढ, शील हेंच कवच असो तीन घेऊन मोठ्या खबरदारीनें जागत बसा! "

दैवे समर्प्य चिरसंचितकर्म जालं ।

सुस्थाः स्करं वसन किं परयाचनाभिः ॥
मेरुं प्रदक्षिणयतोऽपि दिवाकरस्य ।
ते तस्य सप्त तुरगा न कदाचिदश्वो ॥२५०॥

" चिरसंचित जें कर्मजात त्याचा दैवावर हवाला देवून स्वस्थपणें कांहीं गहा: परयाचना करून काय प्राप्त होणार आहे? पहा कीं, येवढा सूर्य सुवर्णमेरुला दक्षिणा घालीत असतां त्याचे जे सात घोडे आहेत ते आहेत; सातांचे आठ कधीं झाले आहेत काय? "

परस्परं संवदना जडानां। मौनं विधेयं मननं सुधीभिः ॥
कोलाहले काकजनस्य जाते। विराजते कोकिलकूजितं किं ३५१

" मूर्खांचे परस्पर भांडण लागलें असतां बुद्धिमान् पुरुषांनीं तेथें मौन धारण करावें हें बरें; कावळ्यांचा कलकलाट चालला असतां कोकिलाचें कूजित शोभतें काय?"

उपभुक्त खदिरवीटीजनितोधररागभंगमपान् ॥
पितरि मृतेऽपि हि वेश्या रोदिति हा नाथ नाथेति ३५२

" विडा खाऊन कातानें तोंड रंगलें असतां अधरोष्ठांची लाली मोडेल या भयानें वेश्या हा आपल्या बापाच्या मरणाची बातमी ऐकून निरोप शोक करते, " हा नाथ! हा नाथ! " (" हा पितः " ह्मणेल तर ओठाला ओठ लागून अधररागाचा भंग होईल!)"

किमंगारवद् गां खुरैः स्पर्शयंतः। कुरंगा इवांगानि संकोचयंतः ॥
भटंतो नटंतो भटं तोषयंत-स्तुरंगाः पुरं गाहयंति ३५३

" पृथ्वीवर जणों काय निखारेच पसरले आहेत अशा भावनेनें निजा खुरांनीं स्पर्श करणारे न करणारे, हरणांप्रमाणें अंगसंकोच करणारे, फिरणारे, नाचणारे आणि राउताच्या मनांत भरणारे, असे चांगल्या चांगल्या रंगाचे घोडे नगरींत मजेरा करिताहेत!"

यदि प्रभुरुदारधीः स्करसकाव्यकौतूहल-।
स्तथैव च सभासदः सदसि तद्गुणग्राहिणः ॥
स्करवर्णसदलंकृतिर्भवति नव्य नृत्योद्यता ।
मदीयरसनानटी रसघटीयमानंदभूः ॥२५४॥

"जर प्रभु उदार असेल आणि सरसकाव्याच्या श्रवणाविषयीं त्यास हौस असेल, त्याप्रमाणेंच सभासद हे काव्यगुणग्राहक असतील, तर रसाची केवळ पात्राच आणि आनंददायक अशी जी माझी जिव्हारूप नदी ती सुवर्ण-(सोनें: उत्तम वर्ण)-घटित अलंकारांनीं (श्लेष स्पष्टच आहे) युक्त होत्साती सभेंत नृत्य करण्यास तयार आहे!"

यन्नाम्नः प्रथमाक्षरं विजयते भानौ द्वितीयाक्षरं ।
नृत्यं नृत्यति सत्कवींद्रवदने भृत्वांत्यवर्णद्वयम् ॥
रामो रावणमानघान समरे शंभोः शिरः शालिनी ।
सा सर्वाक्षरमालिनी भवतु मे भाग्याय भागीरथी ३५५

"जिच्या नांवाचें पहिलें अक्षर (भा-' नेत्र') सूर्याचे ठायीं विराजमान होतें, दुसरें (गी-' वाणी') सत्कवींच्या वदनाचे ठायीं नृत्य करते आणि शेवटलीं दोन अक्षरें (रथी) होऊन रामानें रावणास रणांगणीं मारिलें तो शंभु शिरीं शोभणारी सर्वाक्षरयुक्त भागीरथी माझा भाग्योदय करो!"

स्वयं स्थाणुरपर्णा स्त्री विज्ञाग्वस्तनयः स्मृतः ॥
तथापि कुरुते छायां भवतापापहारिणीं ॥३५६॥

"शिव हा स्वतः स्थाणु (शंकर: आडाचा बुंधा) आहे, स्त्री अपर्णा (पार्वती: पर्णरहिता), आणि पुत्र विशाख (कार्त्तिकेय; शाखारहित) होय, तरी शिवाची छाया संसारतापास दूर करते!"

विधेर्जाः पुरा सृष्टवानब्जयोनिं। धरामंडले सारभूतं किमस्ति ॥
चतुर्भिर्मुखैरुत्तरं तेन दत्तं। नमाखु स्तमाखु स्तमाखु स्तमाखुः ३५७

"पूर्वी एकेसमयीं ब्रह्मे झालें कीं, इंद्रानें ब्रह्मदेवास प्रश्न केला, कीं पृथ्वीतला वर सर्वोत्कृष्ट वस्तु आपण कोणती निर्माण केली आहे? ब्रह्मदेवानें चारी मुखांनीं एकदम उत्तर केलें, " नमाखु, नमाखु, नमाखु, नमाखु!"

कीटोऽयं भ्रमरी भवेदविरतध्यानान्नथा चेद्गृहं ।
रामः स्यां त्रिजटे तथात्मनुचितं दांपत्यसौख्यच्युतः ॥
एवं चेत्कृतकृत्यतैव भविता रामस्तव ध्यानतः ।
सीतां त्वं च निहत्य राक्षसपतिं सीतांतिके यास्यति ३५८

सीता अशोकवनिकेंत असतां तिनें व त्रिजटेनें एका भ्रमरानें एक किस्सा परले-सा पाहिला. त्यावरून सीता त्या राक्षसीस म्हणते:—

"हे त्रिजटे! या किड्यास भ्रमराचें ध्यान लागलें असल्यामुळें हा भ्रमर होईल; तद्वतच मीही जर राम बनलें तर मीतें अनुचित होऊनही दंपत्य सौख्यापासून भ्रष्ट होईन." त्रिजटा म्हणते, "अगें जर घडेल तर कृतकृत्यता होईल; कां तर राम तुम्ही आहे ते करून सीता होईल आणि तूं राम होऊनी रावणास मारून सीतेच्या भेटीस जाशील!"

जन्मप्रभृति वक्रस्य हलस्य च खलस्य च ॥
सोढुं त्वयोर्मुखाक्षेपं भवत्येकैव सा क्षमा ३५९

"जन्मापासून वक्र जो हल (नांगर) आणि खल यांच्या तोंडाचा तडाखा सोसण्यास एक क्षमाच (पृथ्वी) समर्थ!"

धनुरभूर्न नरेंदुनिवासयोग्ये ।
स्थाने पिशाचपतिना विनिवेशितोऽपि॥
किं कैरवाणि विकसंति नमः प्रयाति ।
चंद्रोपलो द्रवति वार्धिरुपैति वृद्धिं॥३६०॥

"हे शाहण्या भोळ्या! नें स्थान बालचंद्राच्या वसतीस योग्य नेथें शंकरानें तुला ठेविला असतांही तुझ्या योगानें कैरवें विकास पावतात काय? अंधकाराचा नाश होतो काय? चंद्रकांत द्रवतो काय? आणि समुद्र वाढतो काय?"

नव्यं पथ्यं सहेतु प्रिय मित मृदुलं सारवद्दैन्यहीनं ।
साभिप्रायं दुरापं सविनयमशठं चित्रमल्पाक्षरं च ॥
बहुर्थं कोपशून्यं स्मितयुतघनदाक्षिण्यसंदेहहीनं ।
वाक्यं ब्रूयाद्रसज्ञः परिषदि समये समसेयाममत्तं ३६१

"रसज्ञानें सभेंत समय पाहून जें वाक्य बोलायाचें तें अशा प्रकारचें असावें:— खरें, हितकर, सप्रमाण, प्रिय, मित, मृदु, अर्थयुक्त, दीनपणाचें, साभिप्राय, दुर्लभ, विनययुक्त, शांतल, मनोहर, स्वल्प, मोठ, गांभीर्य, स्मित, दाक्षिण्ययुक्त, निःसंदेह, मर्मसहित आणि मत्सररहित."

पदवाक्यप्रमाणज्ञो रसभावविभागवित् ॥

कविरिव विनिहितनिद्रस्तरुणि नवार्थे स्थितस्तरुणः३६२

दूती नायिकेस सांगते:— " हे तरुणि, जसा कवि पदांच्या व शब्दांच्या रचनेंत गढून गेला असतो व रूपकालंकार साधण्याविषयीं चतुर असतो त्याप्रमाणें नायक हा निद्रेचें मिष करून तुझ्याकरतां संकेतस्थानीं येऊन बसला आहे; कसा नर तुझ्या पावलाचा शब्द ऐकण्याविषयीं परमोत्सुक आणि तुझें रूप व अलंकार यांची मनोमय भावना करण्यांत चूर होऊन गेलेला असा! "

उद्भिन्नं किमिदं मनोभवनृपक्रीडारविंदद्वयं ।
सूते तत्कथमेकनः किल लसद्रोमावलीनालतः ॥
चक्रद्वंद्वमिदं क्षमं तदपि न स्यातुं मुखेंदोः पुरो ।
लावण्यांबुनि मग्नयौवनगजस्यावैमि कुंभद्वयं ३६३

कोणी कवि स्तनद्वयावर उत्प्रेक्षा करतो:— " मदन नृपाचें हें क्रीडाकमलद्वय उत्पन्न झालें काय! पण असें म्हणावें तर उदरस्थलावर शोभणारी जी रोमावलीरूप वेली ती एक असतां या पुष्पद्वयास कशी पुरवेल? तेव्हां ही कल्पना जमत नाहीं. बरें, हें चक्रवाक पक्ष्यांचे जोडपें आहे म्हणावें तर मुखचंद्राच्या समोर हें वियुक्त झाल्या खेरीज कसें राहील? तेव्हां माझा असा तर्क होतो कीं लावण्यरूप जलाशयांत बुडी मारून राहिलेला जो यौवनरूप गज त्याचें हें गंडस्थल होय! "

दंता विश्लथदंताः केशाः काशप्रसूनसंकाशाः ॥
नयनं तमसामयनं तथापि चित्तं धनांगनायत्तं ॥ ३६४ ॥

"दांत हालूं लागले, केश हे काशपुष्पांप्रमाणें पांढरे झाले, डोळे हे अंधकाराचें स्थान झालें, तथापि चित्ताची आसक्ति धन आणि स्त्री यांवरील कमी होत नाहीं!"

तप्ता मही विरहिणामिव चित्तवृत्ति-स्तृष्णाऽध्वगेषु कृपणेष्विव वृद्धिमेति ॥
सूर्यः करैर्दहति दुर्वचनैः खलो नु। छाया सतीव न विमुंचति पादमूलं ३६५

" उष्णकालांतील मध्यान्हाचें वर्णन:— " विरही पुरुषांच्या चित्तवृत्तीप्रमाणें पृथ्वी अत्यंत तप्त झाली आहे, कृपणाचे ठायीं जशी (धन-) तृष्णा वाढत असते त्याप्रमाणें पांथांची पावलेंस वाढत आहे, जसा दुर्जन हा दुर्वचनांनीं दुसऱ्यास जा-

ठीन असतो त्यामप्रमाणें सूर्य हा आपल्या किरणांनीं संताप करीत आहे आणि छाया ही साध्वीप्रमाणें चरणांची मिठी सोडीत नाहीं !"

जीवंतु मे शत्रुगणाः सदैव । तेषां प्रसादात्सुविचक्षणोऽहं ॥
ये ये यथा मां प्रति बाधयंति । तेते तथा मां प्रति बोधयंति २६६

" माझे शत्रुगण चिरकाल जीवंत असोत; त्यांच्या प्रसादानें मला बुद्धि फार आली आहे. जे जे मला बाधा करतात तेते मला त्याच मानानें बोधही करतात."

रोलंबो मधुपः पिकस्तु परभृद्रंधानुसारी मरुद्- ।
हंसाः केवलपक्षपातनिरता श्चंद्रोऽपि दोषाकरः ॥
चेनो नेति शुकस्त्विहैकपठिनाख्यायी पयोदो जडः ।
कं वाहं प्रहिणोमि हंत कठिनस्वांताय कांताय मे २६७

कोण्या विरहिणीची उक्ति :— " कठिणहृदय जो वल्लभ त्याच्याकडे दूत तरी कोण पाठवावा ! भ्रमर तर मधुप (मद्यप), कोकिल दुसऱ्याचे परी वाढलेला, वायु हा रंध्रान्वेषी, हंस हे केवळ पक्षपात करणारे (नेहमीं पंख हलविणारे), चंद्र हा दोषाकर (दोषांचा खाण: निशाकर). मनाच्यानें तर जाववतच नाहीं. शुक पटविलेलें नेमकें बोलणारा आणि मेघ हा जड (मंदबुद्धि) होय ! "

बहुनिष्कपटद्रोही बहुधान्योपघातकः ॥
रंध्रान्वेषी च सर्वत्र दुष्को मूषको यथा २६८

खल आणि मूषक यांचें साम्य :— " (खलपक्षीं)- जे अत्यंत निष्कपट त्यांचा द्रोह करणारा, सामः दुसऱ्याच्या नाशाविषयीं उद्युक्त आणि सर्वत्र छिद्रान्वेषणाविषयीं तत्पर, असा खल असतो."

" (मूषकपक्षीं)- अत्यंत मूल्यवान वस्तूंचा नाश करणारा, धान्याचा विध्वंस करणारा आणि जिकडे तिकडे गोंधळ पाडणारा. "

आजन्मानुगतेऽप्यस्मिन्काले विमुखमंबुजं ॥
मायेण गुणपूर्णेषु रीतिरेषेवनामियं ॥ २६९ ॥

" जन्मापासून अनुगत म्हणजे मागें असणारें जें नाल त्यावरीं हें कमल हें

विकसित होऊं लागलें असतां विमुख होतें; तेव्हां लक्ष्मी ज्यांस प्राप्त होते, त्यांची गुणवंताविषयीं ('गुण' शब्द श्लिष्ट होय) अनास्था कां वयाची च!"

तवैव मावीर्य्यं जलद जगदानंदकरणं ।
यदंभः पाली गहरसि खलसत्त्वाज्जलनिधेः ॥
निसर्गात्सारास्ना नयसि च कथंचिन्मधुरना-।
मथा सारैस्तासां युगपदुपकर्त्तासि जगतः ३७०

"हे मेघा! तुझेंच कौशल्य या जगास आनंद करणारें आहे. तें असें कीं, दुष्टसत्त्व (दुष्टस्वभाव पक्षीं दुष्ट आहेत जलचर ज्यांत) जो समुद्र त्यापासून उदकसमूहाचें तूं हरण करतोस आणि तो उदकें स्वभावतः क्षारयुक्त असतां त्यांचे ठायीं तूं चमत्कारिक रीतीनें माधुर्य उत्पन्न करून त्यांच्या वृष्टीनें जगाचें हित करतोस!"

अक्षराणि परीक्ष्यंतामंबराडंबरेण किम ॥
शंभुरंबरहीनोऽपि सर्वज्ञः किं न जायते ३७१

"कोणाच्या विद्वत्तेची परीक्षा करणें असतां त्याची विद्या पहावी; पोषाखाचा थाटमाट काय करावयाचा आहे? पहा कीं, शंभु हा वस्त्रहीन असल्यानें त्याची सर्वज्ञता नाहींशी होते काय?"

इह रूपमात्रसारे चित्रगते कनककल्हारे ॥
न रसो नापि च गंधो मधुकरबंधो वृथा परिभ्रमसि ३७२

"हे मूढ मधुकरा! हें चित्रांतील सुवर्णकमल केवळ रूपानें मात्र खऱ्या कमलासारखें आहे! यांत मकरंद नाहीं व सुगंधही नाहीं; मग उगीच कशाला भोंवतालीं हिंडत आहेस?"

कवयंति पंडितराजे कवयंत्यन्येऽपि विद्वांसः ॥
नृत्यंति पिनाकपाणौ नृत्यंत्यन्येऽपि भूतवेतालाः ३७३

पंडितराय आपली व स्वकालीन कवींची तुलना करतात:——

"पंडितराज कविता करीत असतां दुसरे विद्वान्ही कवित्व करीत आहेत; ज्याप्रमाणें शिव तांडव करूं लागला असतां भूतवेतालादि मंडळी ही नाचूं वागडूं लागते!"

क्षुत्ता देनाः सिताः केशा वाङ्निरोधः पदे पदे ॥
पानमज्ज मिमं देहं तृष्णा साध्वी न मुंचति ३७४

'' दांत पडले, केस पांढरे झाले आणि मस्तक हालूं लागलें; पण यावन्मात्रेंहि हा देह पतनोन्मुख झाला असतां आशा ही साध्वी स्त्रीप्रमाणें सोडीत नाहीं!''

अलमतिचपलत्वात्स्वप्नमायोपमत्वात्।
परिणतिविरसत्वात्संगमेनांगनायाः ॥
इति यदि शतकृत्वस्तत्त्वमालोकयाम-।
स्त्वदपि न हरिणाक्षीं विस्मरत्यंतरात्मा ३७५

'' क्षणभर टिकणारा, स्वप्नदर्शनाप्रमाणें आभासरूप आणि परिणामीं विरस, असा जो स्त्रीसंगम तो पुरे झाला, असें शंभर वेळां नीट आपणास तत्त्व कळलें, तथापि जीव हा हरिणाक्षीपुढें पुनः लुटपुटतोच !''

औत्सुक्यान्निमिलनं त्रपया संकोचमंचनं च मुहुः॥
नवसंगमयोर्यूनोर्नयनानामुत्सवो जयति॥३७६॥

'' उत्सुकतेनें एकेक्षणीं मिटणारे आणि लज्जेनें पुनः संकोच पावणारे असे ते तरुण विवाहित स्त्रीपुरुषांचे नेत्र त्यांचा विलास हा अत्यंत शोभा पावतो!''

वयोवृद्धा नृपोवृद्धा ये च वृद्धा बहुश्रुताः॥
ते सर्वे धनवृद्धस्य द्वारि तिष्ठंति किंकराः ३७७

'' वयोवृद्ध, नृपोवृद्ध आणि विद्यावृद्ध हे सर्व धनवृद्धाच्या द्वारीं दास होऊन राहतात.''

तस्मै नमोऽस्तु विबुधाय मनसि जडात्मने ममे मुनिष्पेव ॥
गेहे श्रीरिव गुरुजनपुरतो मूर्त्तेव सा व्रीडा ॥ ३७८ ॥

'' ज्याच्या स्थानीं नीच मला मनुष्यप्रमाणें होय, कामशास्त्रांत गुरुप्रमाणें, गृहकृत्यांत सेवकाप्रमाणें, घरांत लक्ष्मीप्रमाणें आणि वडिल माणसांपुढें जणों मूर्तिमती लज्जाच!''

यस्य नास्ति विवेकस्तु केवलं यो बहुश्रुतः॥
स न जानाति शास्त्रार्थान् दर्वी पाकरसानिव ३७९

" ज्याला स्वतः विवेचनाचें सामर्थ्य नाहीं त्यानें जरी बहुत अध्ययन केलें तरी त्यास शास्त्रांतील गम्य असत नाहीं. ज्यामप्रमाणें सेपाकांतल्या पढीला जातीनें निखट मीठ गोड वगैरे कांहीं कळत नाहीं, तिचें काम नुसतें टवळण्याचें!"

अर्थो नराणां पतिरंगनानां । वर्षा नदीनामृतुराट् नरूणाम् ॥
स्वधर्मचारी नृपतिःमन्नानां । गतं गतं यौवनमानयंति॥३८०॥

" अर्थसंचय हा पुरुषांचें, पति स्त्रियांचें, वर्षर्तु नदींचें, ऋतूंचा राजा जो वसंत तो वृक्षांचें, स्वधर्मास अनुसरून वागणारा राजा मनांचें यौवन पुनःपुनः त्यांस आणितो."

गौरवं प्राप्यते दानान्नतु वित्तस्य संचयात् ॥
स्थितिरुच्चैःपयोदानां पयोधीनामधः स्थितिः ३८१

" गौरव जें प्राप्त होनें तें द्रव्याच्या दानानें होते संचयानें होत नाहीं. पहा कीं, मेघांची स्थिति आकाशांत आणि समुद्रांची भूमीवर!"

वरं पच्छतु वा नवा नरेशो।मम कर्णेऽपि च शारतां करोतु ॥
रतिमिच्छतु वा नवा नवोढा। यदि केलीगृहदेहलीमुपैतु॥३८२॥

" राजा हा मला द्रव्य देवो किंवा न देवो, माझ्याशीं त्यानें कानगोष्ट मात्र करावी म्हणजे झालें; नूतन स्त्री ही रतेच्छा मनांत धरो अथवा न धरो, क्रीडामंदिराच्या उंबरठ्यावर तिनें पाऊल ठेवावें म्हणजे झालें!"

रे कूप जीवनागार यदि दातृत्वमिच्छसि ॥
तदा त्वं गुणवत् पात्रमेकं वा संनिधौ कुरु ३८३

" जीवनाचें (उदकाचें — जीविकेस साधन जें द्रव्य त्याचें) आगर असणाऱ्या हे कूपा! तुला जर दातृत्वाची कीर्ति संपादन करण्याची असेल तर तूं आपल्या जवळ एक गुणवत् पात्र(दोरी लावलेलें भांडें — गुणवान् पुरुष) ठेव!"

गलच्चक्र मिलज्जानु मस्खलच्च पदे पदे ॥
मसिकालससंपुक्तं भट्टनट्टं विराजते॥३८४॥

कोणी भटजींच्या नट्टाचें वर्णन करतो:— " ज्याचे डोळे अर्धमुर्धे मिटलेले

आहेत, गुडघे एकमेकाला लागलेले आहेत, जें पावलोपावलीं अडखळतें आणि लोकांच्या मार्गांनीं पीडलेलें, असें भटकूं विराजमान होतें !"

कृत्वा विग्रहमश्रुपातकलुषं शय्यासनादुत्थिता ।
क्रोधार्तोऽपि विगृह्य गर्भभवनाद्वारं रुषा प्रस्थिता ॥
दृष्ट्वा चंद्रमसं प्रभाविरहितं मत्पूषवानाहना ।
हा रात्रिस्त्वरिता गतेति पतिना कांता प्रिया स्मोरसि ३८५

"नयन्यांनीं सांडून वगळून कढून फणकाऱ्यानें पलंगावरून उठली आणि नवऱ्याच्या रागानें महालाच्या दारकडे जाऊं लागली; पण इतक्यांत प्रभाविरहित झालेला चंद्र तिच्या दृष्टीस पडला व पहांटचा गार वारा अंगाला लागला, तेव्हां खेद पावून पुनः माघारी आली आणि 'रात्र ही किती लवकर गेली' असें म्हणून कांतास आलिंगिती झाली !"

युगपत् स्वगंडचुंबनलोलौ पितरौ निरीक्ष्य हेरंबः ॥
तन्मुखमेलनकुतुकी स्वाननमर्पयाय परिहसन् पायात् ३८६

"शिव व पार्वती या दोघांस आपल्या चुंबनाविषयीं एकदम उत्कंठ पाहून गणपतीनें काय केलें कीं आपलें तोंड एकदम मागें घेतलें; तेव्हां त्यांचींच मुखें परस्पर मिळालेलीं पाहून हसणारा जो हेरंब तो तुमचें रक्षण करो !"

भक्ष्येण जीर्णेन यातु यत्त्वयोपकृतं कृपे ॥
नरः प्रत्युपकारार्थं विपत्तिमभिवांछति ३८७

तात्पर्य मारुतीप्रत उक्ति:—"हे कृपे! तुझे जे मजवर उपकार आहेत ते खाल्लेलें अन्न जिरून जावोत, ते फेडण्याची मी इच्छा करीत नाहीं; कां कीं प्रत्युपकार करायाचा झटला झणजे दुसऱ्याच्या विपत्तीची आशा करावी लागते!"

उद्गजमुखी मृगराजकटि-र्गजराजविराजितमंदगतिः ॥
यदि सा वनिता हृदये निहिता कृजपः कृतपः कृ समाधिगतिः ३८८

"चंद्रासारखें जिचें वदन, सिंहाच्या सारखी कंबर आणि गजराजासमाणें विराजमान अशी मंदगति, अशी वनिता जर हृदयस्थानीं प्राप्त झाली, तर जप कोणाक-

डे, तप कोणाकडे आणि समाधि कोणीकडे !"

सच्छिद्रो मध्यकुटिलः कर्णः स्वर्णस्य भाजनं ॥
धिग्दैवं विमले नेत्रे पात्रं कज्जलभस्मनः ३८९

"काय दैवाची कृति आहे पहा! कीं जो कर्ण सच्छिद्र आणि मध्यें वांकडा त्याला सुवर्णभूषण मिळतें आणि विमल जीं नेत्रें तीं बिचारीं काजलाला पात्र झालीं आहेत!" 'सच्छिद्र,' कुटिल' आणि 'विमल' यांचीं अर्थांतरें ससिद्धच आहेत.

विश्वेश्वरस्तु सुधिया गलितेऽपि भेदे। भावेन भक्तिसहितेन समर्चनीयः॥
माणेश्वरश्चतुरया मिलितेऽपि चित्ते। चैलांचलव्यवहितेन निरीक्षणीयः ३९०

"जो सुधी आहे त्यास आत्मज्ञान होऊन जीवेश्वरांच्या मधील भेद त्याचा जरी गलित झाला, तरी त्यानें विश्वेश्वराची पूजा भावानें व भक्तीनें अवश्य करावी; कीं ज्याप्रमाणें चतुर स्त्री ही परस्परांचें मन मिळालें असलेंही वस्त्राच्छादित होत्साती च आपल्या वल्लभाच्या दृष्टीस पडते!"

तव विरहमसहमाना सा तु माणान् विमुञ्चती ॥
किंतु तथाविधमंगं न सकलमिति ते न मुंचति॥ ३९१॥

"तुझा विरह सहन करण्यास असमर्थ होत्साती तीं तर माणांस टाकण्यास तयार झाली; पण असलें सुंदर शरीर आपणास मिळावयाचें नाहीं या लोभानें ते माण च तिला सोडीनात!"

दोषागमनमाशंक्य रविरेष निरोहितः ॥
कथमिंदुः समायाति कुतः शंका कलंकिनः ३९२

"दोषागमन (रात्रीचें येणें— दोषप्राप्ति) पुढें होणार तों असंदरच सूर्य आपला किरणजाल दडून राहिला. पण त्याच समयास इंदूनें वर डोकें काढलें; ठीकच आहे, जो मुळींच कलंकयुक्त (दोन्ही अर्थ स्पष्टच आहेत) त्यास शंका कोठून असणार!"

तमसं कैर्न तपोभिः फलितं तद्रोपनारीणाम् ॥
लोचनयुगले यासामंजनमासीन्निरंजनं ब्रह्म ३९३

" आजपर्यंत तपश्चर्या कोणी केल्या नाहींत? पण एका गोपींचीं तरी पायधूळ आपलीं अमें लाटलें पाहिजे; कां कीं त्यांच्या नेत्रयुगीं निरंजन जें परब्रह्म तें अंजन होऊन बसलें! "

आश्लेषशेषा रतिरंगनाना-मामोदशेषा कुचकुंकुमश्रीः॥
तूणीरशेषः कुसुमायुधोऽपि। प्रभातशेषा रजनी बभूव ३९४

" स्त्रियांच्या रतींतील केवळ आलिंगन मात्र शेष राहिलें, कुचांवर केलेल्या केशरलेपांपैकीं केवळ गंध मात्र शेष राहिला, मदनापाशीं शेष काय तो बाण मात्र आणि गर्भांपैकीं पहांट मात्र उरली! "

मलिना गलिना रदावली। लवलीवल्लवली भवंति केशाः॥
न तथापि कथा रथांगपाणेः। श्रवणप्रीतिकरीति मंदरीतिः ३९५

" मंदर जो दंतपंक्ति ती गळून गेली व केश हे लवलीप्रमाणें पांढरे होत आहेत; तथापि चक्रपाणि जो कृष्ण त्याची कथा कानास आवडत नाहीं;—मंदी न मूर्खांची रीति होय! "

वागुच्चारोत्सवमात्रं नक्रियां कर्तुमक्षमाः॥
कलौ वेदांतिनो भांति फाल्गुने बालकाइव ३९६

" सामान्य कलियुगांत वेदांत बोलणारे पंडित कसे भासतात? कीं जशीं शिमग्यांतलीं पोरें नोंडानें यथेच्छ बडबड मात्र करतात, पण त्यांतील गम्य समजून त्यास बिलकुल भीत नसतें! "

तुंगासनास्तुंगनराः समर्था। मनोरथान्पूरयितुं न नीचाः॥
धाराधरा एव धराधराणां। निदाघदाहं शमितुं न नद्यः ३९७

" उंच पदवीचे न स्वभावानें थोर असे लोक हेच लोकांचे मनोरथ पुरविण्यास समर्थ होतात; जे पुरींच नाच त्यांच्या हातून ते कार्य घडत नाहीं. पहा कीं, दुसऱ्यांचा संताप दूर करण्याचें सामर्थ्य मेघांनेच धारण केलें नद्यांचे ठायीं असत नाहीं. "

हरेः पदाहतिः श्लाघ्या न श्लाघ्यं स्वर रोहणं॥
सर्वोऽपि विदुषां युक्त्या न युक्त्या मूर्खमिश्रता ३९८

"सिंहाचा पादप्रहार हा श्लाघ्य होय, गर्दभावर आरोहण केलेलेंही श्लाघ्य न-हे; सामर्थ्यानें विद्वान् पुरुषावरोबर स्पर्धाही श्रेयस्कर होय; परंतु मूर्खाबरोबर मैत्री कामाची नाहीं."

निर्गुण इति मृत इति च द्वावेकार्थाभिधायिनौ विद्वि।।
पश्य धनुर्गुणशून्यं निर्जीवं यदिह शंसन्ति।। ३९९ ।।

"निर्गुण मनुष्य हें मेल्यासारखेंच समजावयाचें: पहा, गुणरहित (शून्यार्थ हा उघ इच आहे) असें जें धनुष्य तें असून नसून सारखेंच."

कर्कशतर्कविचारव्यग्रः किं वेत्ति काव्यहृदयानि।।
ग्राम्य इव कृषिविलग्नश्चंचलनयनावचोरहस्यानि ४००

"मनाला कठोरत्व देणारे जे तर्कविचार त्यांतच सदां जो गढलेला त्याला का-व्याचें हृदय तें काय कळणार? जसें,नांगर धरणाऱ्या कुणब्यास चतुर कामिनीच्या भा-षणांतील मर्म काय समजणार!"

अंतःमनसमरुसेतकदत्यमान- ।
मूलस्य चंपकतरोः क्व विकासचिंता।।
मायो भवत्यनुचितस्थितिदेशभाजां।
श्रेयः स्वजीवपरिपालनमात्रमेव ४०१

"अनिष्टाग्नि तापलेलें जें मारवाडांतील वाळवंट त्याची धग ज्याच्या मूळाशीं नि-र्मार आहे अशा चंपकवृक्षाचा पुष्पविकास होईल ही आशा कवणला पाहिजे? अयो-ग्यस्थानीं जे जाऊन पडले त्यांनीं आपला प्राण रक्षण करून ठेवला म्हणजे त्यांचें भा-ग्य समजावें!"

तथा भूदस्माकं मयममविशंका तनुरियं ।
ततोऽनु त्वं मेयानहमपि हताशा प्रियतमा ।।
इदानीं नाथस्त्वं वयमपि कलत्रं किमपरं ।
मयाप्तं प्राणानां कुठिशकठिनानां फलमिदं ४०२

"मूर्खी आपली अशी स्थिति होता कीं, दोघांची शरीरें जणूंकाय एक होतीं;

पुढें तूं माझा वल्लभ आणि मी दुर्भाग्या मियतमा इतका दोघांत भिन्नभाव झाला; आणि आतां तर तूं पति आणि मी स्त्री इतकाच संबंध राहिला आहे. तेव्हां ब्रह्मयाणें कठिण असे जे माझे माण त्यांचें हें फळ मला प्राप्त झालें आहे."

निर्मित्सुः सुदतीमजो विरचिते वक्त्रे वाशिष्ठ्यांनितः।
कोशीभूत निजांबुजासनमधिष्ठातुं न शक्तो विधिः ॥
मध्यं विस्मृतवान् कुचौ च कठिनौ पीनौ नितंबौ कचान्।
वक्त्रान् निर्मितवान् मतिः स्फुरति हि स्वस्थे नृणां चेतसि ४०३

"ब्रह्मदेव या स्त्रीस जेव्हां निर्माण करूं लागला तेव्हां त्यानें मध्यमतः हिचें पुरत केलें; त्याच्या योगानें काय झालें कीं चंद्राची शंका वाटून त्याच्या आसनाचें कमल मिटूं लागलें;—तेव्हां आपलसंकोचा पुढें पाडिन होत्साता विधीनें राहिलेली सर्व रचना अराभर घाईनें आटपून टाकली. तीं अशी कीं, स्तन आणि नितंब हे होते तसेच जाडी ठेवले, केस वांकडेच राहिले आणि कंबर करायास तर तो पुढां च विसरला! एकंदरीत चित्त अस्वस्थ असलें ह्मणजे कोणतेंही काम नीट होत नाहीं!"

देव त्वत्कर-नीरदे दिशि दिशि प्रारब्धपुण्योन्नतौ ।
चंचत्कांचनरत्नराजि तडिति स्वर्णामृतं वर्षति ॥
स्फीता कीर्तिनदंगिणी समभवत्तृप्ता गुणिग्रामभूः ।
पूर्णं चार्थिसरः शशाम विदुषां दारिद्र्यदावानलः ४०४

"हे राजा! तुझा हस्तरूप मेघ दशा दिशांचे ठायीं उत्कृष्ट उन्नति पावला असतां आणि स्फुरण पावणारीं जीं रत्नजडित सुवर्ण कंकणें त्यांची विद्युल्लते सारखी प्रभा पडून सुवर्णरूप उदकाचा वर्षाव झाला असतां, कीर्तिरूप नदीस पूर येऊन ती चोहोंकडे पसरली आहे, गुणिजनरूप भूमि तृप्तीनें तृप्त झाली आहे, याचकसमूहरूप सरोवरें तुडुंबलीं आहेत आणि विद्वज्जनांचा दारिद्र्यरूप दावानल विझून गेला आहे!

षड्दर्शनमटवीमटंति विकटं क्रामंति देशांतरं ।
गाहंते गहनं समुद्रमटनक्लेशं क्षपां कुर्वते ॥
सेवंते कृपणं पतिं गजघटासंघट्टदुःसंचरं ।
सर्पंति मधनं धनांधिनधियस्तल्लोभविस्फूर्जितं ४०५

"दुर्गम अरण्यांतून जाणे, भयंकर परदेशांतून फिरणें, गहन जो समुद्र त्याचा पर्यटन करणें, शत्रूची दगदग करणें, कृपण धन्याची सेवा करणें, हत्तींच्या गर्दीमुळें संचार करण्यास भीतिदायक अशा रणांगणीं मरण पावणें, इतके सर्व प्रकार धनलुब्ध लोक जे करतात हा लोभाचा प्रभाव होय!"

व्यासादीन् कविपुंगवाननुचितैर्वाक्यैः सलीलं हसन्।
उच्चैर्जल्प निमील्य लोचनयुगं श्लोकान् सगर्वं पठन्॥
काव्यं धिक्कुरु यत्परैर्विरचितं स्पर्धस्व सार्धं बुधैः।
यद्यभ्यर्थयसे क्षणेन रहितः पांडित्यमासुंबलान् ४०७

"नर तुला अंगीं विद्वत्ता नसतांही फुकाची पंडितगिरी मिळवायाची असेल तर पुढील गोष्टी कर:— व्यासादिक महान् महान् कवींविषयीं हवातसा चारगटपणा करून त्यांची थट्टा कर. मोठ्यानें बोल आणि डोळे मिटून मोठ्या डोलानें श्लोक म्हण, दुसऱ्यानें केलेल्या काव्याची निंदा कर आणि पंडितजनाशीं नेहेमीं स्पर्धा करीत जा!"

मूर्खत्वं सकलं भजस्व सुमने मूर्खस्य चाष्टौ गुणाः।
निश्चिंतो बहुभोजकोऽतिमुखरो रात्रिंदिवं स्वप्नभाक्॥
कार्याकार्यविचारणांधबधिरो मानापमाने समः।
प्रायेणामयवर्जितो दृढवपुर्मूर्खः सुखं जीवति॥४०८॥

"रे बेड्या! मूर्खत्व संपादन करण्यास कांहीं आयास पडत नाहींत, त्याचापासून पुढील आठ लाभही आहेत तर हेंच आपल्या ठायीं दृढ ठेव. आठ गुण येणेंप्रमाणें:— निश्चिंतपणा, यथेष्ट भोजन, अति मुखरत्व, रात्रंदिवस झोंप, कार्याकार्यविचाराविषयीं अंधत्व व बधिरत्व, मान व अपमान हे दोन्ही सारखे, प्रायः शरीरास आरोग्य असून गलेलठ्ठ होऊन पडणें;— इत्यादि प्रकारें मूर्ख हा सुखेंकरून राहतो!"

अनाकारो चंद्रः सरसिजदलद्वंद्वसहितो।
गृहीतः पद्मार्द्धं कुटिलकुटिलैः सोऽपि सिकतैः॥
सुधां मुंचत्युच्चैरनिशमपि संमोहजननीं।
किमुत्पत्तानालीयं वदन नगनः कर्तुकृतिना॥४०९

"ह्यदयानें ही उत्पत्ति परंपरा निर्माण केली आहे काय? कोणती, तर आकाशा-

शिवाय चंद्र, त्यावर कमळपत्रांची जोडी, मागें कुटिल अंधकारसमूहानें तो चरून केलेला आणि असा चंद्र नेहमीं अमृताचा वर्षाव करणारा, कीं ज्या अमृतलहरीनें उज्जीवन जें व्हावयाचें तें न होतां उलटें संमोहन होतें (पक्षीं,- मूर्च्छा येते)! ५

पुष्पेषोरभिषेकहेमकलशौ हारप्रभावाहिनी-।
चक्राह्वौ मदनोन्मदद्विपपतेः कुंभौ रतेः कंदुकौ ॥
कंदौ बाहुमृणालिकाचुगुलयोर्लीलालतासत्फले ।
नव्यौ रत्नसमुद्गकौ वहति सा लावण्यपूर्णौ स्तनौ ४१०

स्तनयुगुलावर उत्प्रेक्षा:— " मदनास मार्वभौम अभिषेक करण्याचे हे सुवर्णकलश आहेत काय? अथवा मुखाह्लादनप्रवाहरूप नदींतील हे चक्रवाक आहेत काय? किंवा मदनरूप मदोन्मत्त हत्तीचें गंडस्थल, रतीचें क्रीडाकंदुक, बाहुरूप कमलनालांचे कांदे, लीलारूपलतेचें दोन उत्कृष्ट फलें, किंवा लावण्यानें भरलेले हे नवे रत्नकरंडक आहेत काय?"

तन्वंग्या गुरुसन्निधौ नयनजं यद्वारि संस्तंभितं।
तेनांतर्गलितेन मन्मथशिखी सिक्तो वियोगोद्भवः॥
मन्ये तस्य निरुध्यमानकिरणस्येषामुखे नोद्गता ।
श्वासायासससागतालिसरणिव्याजेन धूमावली ४११

" स्त्रियेनें गुरुजनांच्या समोर डोळ्यांतील अश्रु जे तसेच संस्तब्ध करून ठेवले ते मानल्या आंत जिरल्यामुळें वियोगजन्य जो मदनाग्नि त्यावर ते पडले त्यायोगानें तो किंचित् विझून त्याची जी धूमावली निर्माण झाली ती निश्वासगंधास लुब्ध झालेल्या भ्रमरमालेच्या रूपानें जणों काय बाहेर पडली ! "

तरुमूलादिषु निहितं जलमाविर्भवति पल्लवाग्रेषु ॥
निभृतं यदुपक्रियते तदपि महांतो वहंत्युच्चैः ४१२

" वृक्षांच्या मूळांशीं जें उदक घालावें तें त्याच्या पल्लवाग्रांवर प्रगट होतें; ठीकच आहे कीं जे थोर आहेत ते गुप्तपणें केलेल्या उपकारासही प्रसिद्धपणें मिरवतात!"

हृदयं कौस्तुभोद्भासि हरेः पुष्णातु वः श्रियम्॥
राधाप्रेक्षारोधाय दत्तमुद्गमिव श्रिया ४१३

"कौस्तुभानें शोभा पावणारें असें विष्णूचें हृदय तुमचें कल्याण करो; कीं ज्याचे ठायीं वरील रत्नाच्या मिषानें लक्ष्मीनें जणों काय मोहोरच करून ठेवली आहे, कीं राधेनें आंत सवत घेऊं नये म्हणून!"

पिनाकफणिबालेंदुभस्ममंदाकिनीयुता ॥
तथापि भवते मूर्तिरपवर्गानुसारिणी॥ ४१४॥

"हे शंभो! तुझी मूर्ति पिनाक (धनुष्य), फणी (सर्प), बालेंदु (बालचंद्र) भस्म आणि मंदाकिनी (स्वर्गगा) यांनीं युक्त असतांही अपवर्गातें म्हणजे मोक्षातें देणारी आहे." पिनाक, फणी, बालेंदु, भस्म आणि मंदाकिनी या शब्दांचीं आद्याक्षरें अनुक्रमानें पवर्गांतील आहेत हें उघडच आहे.

दृतं यस्यालोकाद्विरहिजनशोकापनयनं ।
यदंके सानंदं नयनमरविंदं विहरति ॥
नयस्यापैति श्रीः कचनिचयराहोरपि पुनः ।
समे खेदं सोमावदनहिमधामा शमयतु ४१५.

स्त्रीमुख चंद्र यांचें व्यतिरेकवर्णन — "ज्याच्या आलोकानें (अवलोकनानें; प्रकाशानें) विरहिजनांच्या शोकाचें हरण तेव्हांच होतें; ज्याच्यापायीं नयनरूप कमल आनंदानें विहार करतें आणि कचकलापरूप जो राहु त्याच्यायोगानेंही ज्याचें तेज कमी होत नाहीं, तो स्त्रीमुखरूप चंद्रमा माझ्या संतापास दूर करो!" विरहिजनांचा ताप स्वच्या चंद्राच्या योगानें वाढतो, कमलें संकुचित होतात व राहुग्रासाची त्यास भीति असते, या तीन गोष्टी प्रसिद्ध आहेत.

मौलौ किंनु महेश मानिनि जलं किं वक्त्रमंभोरुहं ।
किं नीलालकवेणिका मधुकरी किं भ्रूलता वीचिका ॥
किं नेत्रे शफरी किमु स्तनयुगं मेरुद्वयांगद्वयं ।
लावण्यामृतमिति वंचयन् गिरिसुतां गंगाधरः पातु नः ४१६

शिवानें गंगेस मस्तकीं धारण केली असतां त्याचा व पार्वतीचा संवाद —
"हे महेशा! हें मस्तकावर काय?—हे मानिनि! [illegible] आहे; तोंड दिसतें आहे तें?—तें कमळ आहे; नील केशपाश दिसतो आहे हा?—तो मधुकरांचा

समूह आहे: भुलना दिसते आहे?—तो नरंग आहे: डोळे?—ते दोन मासे आहेत; स्तनयुग?—तें जलविहार करणारें चक्रवाकांचें जोडपें आहे;—यामप्रमाणें साशंक झालेली जी पार्वती तिचें वंचन करणारा गंगाधर आमचें रक्षण करो!"

धन्यास्ते कवयो यदीयरसना रुक्षाध्वसंचारिणी।
धावंतीव सरस्वती द्रुतपदन्यासेन निःक्रामति ॥
अस्माकं रसपिच्छिले पथिगिरां देवी नवीनोदयन्-।
पीनोत्तुंगपयोधरेव युवतिर्मोथर्यमालंबते॥४१६॥

"ते कवि धन्य होत ज्यांच्या जिव्हारूप कोरड्या रणरणीत रस्त्यावरून सरस्वती ही अशाश्वत पावलें टाकीत धावत्च निघून जात असते; पण आमची स्थिति अशी आहे की, जिचे पीनोत्तुंग पयोधर नवे उद्भेद पावले आहेत अशी युवति मिसरड्या जागेवरून जात असता जशी जपून हळू हळू चालते त्याप्रमाणें आमची वाग्देवी रस्त्यानें घसरून अशा मार्गावरून मंद मंद पदांनी गमन करते!" 'रस' आणि 'पद' या शब्दांचे दोन दोन अर्थ येथेच आहेत.

समये पयोधराणामपतितया नैव शक्यते स्थातुं॥
उत्कंठिनासि बाले नहि नहि सखि पिच्छिलः पंथाः४१७

"या पयोधरकाली (वर्षासमयी) अपतिता मोठी दुःसह होय, म्हणजे पतिसमागमाशिवाय दिवस कंठणें मोठें कठीण आहे. ही कोणा एका तरुणीची उक्ति ऐकून तिची सखी नीट विचारते, 'अगे उत्कंठित काली आहेस काय?' याला उत्तर उत्तर करते. "छे छे! चोहोंकडे चिखल झालेला म्हणून अपतिता अवस्था म्हणजे पडल्याशिवाय राहणें कठीण आहे असें मी म्हणतें!" हें श्लेषोपन्हुतीचें उदाहरण होय.

भीतिर्नैव भुजंगपुंगवविषान्मीतिर्न चंद्रामृतान्।
नाशौचं नृकपालकंठललनाच्छौचं न गंगाजलात् ॥
नोद्वेगश्चितिभस्मनो नवसुतं गौरीस्तनालिंगनात्।
आत्मारामतया हिताहितसमः स्वस्थो हरः पातु वः४१८

"ज्याला गळ्यांतील महासर्पांच्या विषापासून भीति नाहीं व शिरस्थ चंद्राच्या अमृतापासून आनंद नाहीं; गळ्यांत नरकपालांची माला रुळत असल्यानें

ज्याला अपवित्रता नाहीं व जटाजूटस्थ गंगेच्या जलापासून पावित्र्य नाहीं; ज्याला चिताभस्म अंगास फांसल्यापासून उद्वेग नाहीं व गौरीच्या स्तनालिंगनापासून सुख नाहीं;– असा इष्टानिष्टाविषयीं उदासीन व आत्मस्थितीस पावल्यामुळें सदोदित स्वास्थ्य अनुभवणारा शिव तुमचें कल्याण करो!"

नायं मयाति विकृतिं विरसो नयः स्यात्।
न क्षीयते बहुजनैर्निनरां निपीतः ॥
जाड्यं निहंति रुचिमेति करोति तृप्तिं ।
नूनं सुभाषितरसोऽन्यरसातिशायी ४१९

"सुभाषितरसाची दुसऱ्या कोणत्याही रसास सर येणार नाहीं; पहा कीं, इतरांप्रमाणें हा कधींही विकार पावत नाहीं, विरस होत नाहीं, बहुतांनीं सेवन केला असतांही कमी होत नाहीं, जाड्याचें (मूर्खत्वाचें) हरण करतो, रुचीची वृद्धिकरतो आणि आनंददायक होतो!"

दुर्जनहुताशदग्धं काव्यशवर्णे विशुद्धिमुपयाति॥
दर्शयितव्यं तस्मान्मत्सरिमनसः प्रयत्नेन ४२०

"काव्यरूप शवर्णे दुर्जनरूप अग्नींत दग्ध झालें असतां अत्यंत शुद्ध होतें; यास्तव मत्सरी मनाच्या मनुष्यांस तें आदरून दाखवावें!"

नएव पदविन्यासास्तएवार्थविभूतयः ॥
तथापि नव्यं भवति काव्यं ग्रथनकौशलात् ४२१

"तीच शब्दांची योजना व अर्थांचें गौरव, तथापि पदरचनेच्या चातुर्यानें काव्य नवेंसें भासूं लागतें!"

इह तुरगशतैः सयानु भूर्ता । धनरहिता विबुधाः सयांतु यत्र ॥
गिरिशिखरगतोऽपि काकपंक्तिः। पुलिनगतैर्न समत्वमेति हंसैः ४२२

"भूर्ख हे शंभर घोड्यांवर बसून फिरोत व पंडित निर्धन होत्साते पायांनीं चालोत; तरी पंडित जे श्रेष्ठ ते श्रेष्ठच; पहा कीं, पर्वतशिखरावर बसलेली काकांची ही नदीच्या काठंवंठावर फिरणाऱ्या हंसांची बरोबरी करूं शकत नाहीं!"

कतिचिदुदूनविभ्रमत्सराः। कतिचिदात्मवचस्तुनिष्ठालिनः॥
अहह केऽपि निरक्षरकुक्षय-स्तदिह संमति कं मति मे श्रमः ४२३

" कोणी पाहावे, तर त्यांच्या ठायीं मत्सर परिपूर्ण नांदत असून वरचेवर उचंबळून असतो; कोणी पाहावे, त्यांस आपल्या स्वतःच्या कवितेचेच रोज इतर कोणाचीही पसंत नसून तिची कायती नेहमीं प्रशंसा; याकरीं पुष्कळ तर विचारे अक्षरशत्रुच; तेव्हां काय हे करायाचें तें कोणासाठीं म्हणून करावें? "

स्थिरा शोभते गुणवतां खलवृत्त्या न बाध्यते ॥
रत्नदीपस्य हि शिखा वात्ययाऽपि न नाश्यते ४२४

" हे स्वभावतःच सज्जन त्यांचे शील खलांच्या उपद्रवानें विघडत नाहीं; कसें? तर ज्याप्रमाणें रत्नदीपाची ज्योत वावटळीच्यादेखील वाऱ्यानें विझत नाहीं! "

केनांजितानि नयनानि मृगांगनानां ।
को वा करोति रुचिरांगरुहान् मयूरान् ॥
कश्चोत्पलेषु दलसन्निचयं करोति ।
को वा करोति विनयं कुलजेषु पुंसु ४२५

" हरणींच्या डोळ्यांत कोणीं अंजन घातलें आहे? मोरांचे पिसारे विचित्र कोणीं केले आहेत? नीलकमलांस पत्रशोभा कोणीं दिली? कुलज जे पुरुष त्यांच्या ठायीं विनय कोणीं आणला? "

माभूत्सज्जनयोगो यदि योगो मा पुनः स्नेहः ॥
स्नेहो यदि विरहो मा यदि विरहो जीवितावधिः का ४२६

" प्रथमतः सज्जनांची गांठच पडूं नये, पडली तर स्नेह जडूं नये, स्नेहीं जडलाच तर मग विरह नको होऊं नये; कां कीं विरह झाल्यावर मग जीवितावधि कशाला हवी? "

अनुकुरुतः खलसुजनावग्निमपाश्चत्ययोः सूच्याः ॥
विदधाति बंधमेको मुद्रणमस्यापरोऽपि विदधाति ४२७

" खल आणि सज्जन हे सुईच्या पुढल्या व मागल्या भागांसमान होत; एक

पाडणें हें पहिल्याचें काम व त्याचें आच्छादन करणें हें दुसऱ्याचें!"

यदर्था दत्तांनि दधाना रसना तत्स्वादुसौख्यमनुभवति॥
प्रकृतिरियं विमलानां क्लिश्यंति यदन्यकार्येषु॥ ४२८॥

"हे दांत जें चावनात त्याचें मधुर सौख्य जिव्हा अनुभवते; निर्मल अंतःकरणाचे जे सज्जन त्यांच्या स्वभावच हा, कीं दुसऱ्याच्या कल्याणाकरितां कष्ट सोसावे!"

लक्ष्मीर्यादोनिधेर्यादो नादो वादोचितं वचः॥
विभेति या धीवरेभ्यो जडेष्वेव निमज्जति ४२९

"लक्ष्मी ही समुद्रांतील जलचर आहे हें वचन वादास्पद नव्हे; कां कीं, धीवरांस (पक्षी, बुद्धिमान् पुरुषांस) भिते व जडांचे ठायीं निमज्जन पावते!" ह्मणजे बुद्धिमंतांस मात्र होत नाहीं व जड ह्मणजे मूर्ख यांजपाशीं वास करते. 'ड' आणि 'ल' यांच्या साम्यास्तव 'जलांत बुडून राहते' हा श्लेषार्थ उघडच आहे.

एकेन तिष्ठताऽधस्तादन्येनोपरि तिष्ठता ॥
दातृयाचकयोर्भेदः कराभ्यामेव सूचितः ४३०

"दाता आणि याचक यांजमधील भेद पालथा आणि उलथा हात यावरूनच सूचित होतो!"

लक्ष्मीपयोधरोत्संगकुंकुमारुणितो हरेः॥
धन्यो बलिः स येनास्य भिक्षापात्रीकृतः करः ४३१

"बलीची धन्यता काय वर्णावी? कीं ज्यानें लक्ष्मी कुचाभोगकुंकुमानें रंगलेला जो हरीचा हस्त त्यास दानग्रहणार्थ भिक्षापात्र करविला!"

दुर्जनसहवासादपि शीलोत्कर्षं न सज्जनस्त्यजति ॥
मनिपर्व तपनवासो निःसृतमानः शशी शीतः ४३२

"दुर्जनांचा सहवास घडला असतांही साधु आपलें शील टाकीत नाहीं; पहा कीं, प्रति अमावास्येला चंद्राला सूर्याचा सहवास घडतो, पण त्याजपासून निघाला जो रे, कीं लागलीच आपले शीतलत्व मगट करतो."

विगृहीतः पराक्रांतो भूयोभूयश्च संहतः॥

माधुर्यमेवावहति सुश्लोकइव सज्जनः ४३३

"उत्कृष्ट श्लोकाचा जसा विग्रह केला, पदें पाडलीं, किंवा पुनःपुनः निरनिराळा अन्वय लावला तरी त्याचें सौंदर्य कमी होत नाहीं, त्यामाणेंच सज्जनाशीं विग्रह (कलह) केला, त्यास पदाक्रांत केला (म्ह० त्याची अवज्ञा केली), किंवा त्याची वारंवार खंडना केली, तरी त्याचें नैसर्गिक शील ढळत नाहीं।"

अपूर्वः कोऽपि कोपाग्निः सज्जनस्येतरस्य च ॥
एकस्य शाम्यति स्नेहाद्वर्धते ऽन्यस्य वारिनः ४३४

"सज्जन व दुर्जन यांचा कोपाग्नि किती विलक्षण तऱ्हेचा आहे पहा! कीं एक स्नेहाच्या योगानें शमला जातो व दुसरा वारला असता वृद्धि पावतो!" 'स्नेह' शब्दाचा दुसरा अर्थ 'तेल' हा होय; व 'वारि' याचा अर्थ 'पाण्यापासून' असा होतो. तेलानें विस्तव विझणें व पाण्यानें वाढणें हें विलक्षण आहे हें उघडच आहे.

जलनिधौ जननं धवलं वपु-र्मुरारिपोरपि पाणितले स्थितिः ॥
इति समस्तगुणान्वित शंख मोः। कुटिलता हृदये न निवारिता ४३५

"हे शंखा! तुझें जन्म समुद्रांत झालें. तुझें शरीर पांढरें शुभ्र आहे, मुरारीच्या हस्ततलीं तुला सदोदित वास घडतो, यामाणें समस्त गुणांनीं तूं युक्त असतां तुझ्या हृदयाच्या ठायींची कुटिलता कांहीं निवारली नाहीं!" शंखाचें अभ्यंतर कुटिल असतें हें प्रसिद्धच आहे.

यत्रात्मीयो जनो नास्ति भेदस्तत्र न विद्यते ॥
कुठारैर्दृढनिर्मुक्तैर्भिद्यंते तरवः कथं ॥ ४३६ ॥

"जेथें परका मनुष्य मिळाला नाहीं तेथें फूट पडत नाहीं; तर कुऱ्हाडीचे दांडे काढून घेतले तर झाडें कशीं तुटलीं जातील?"—'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' हीं वचन प्रसिद्धच आहे.

धृतेन धनमिच्छंति मानमिच्छंति सेवया ॥
भिक्षया भोगमिच्छंति नेदैवेन विडंबितः ४३७

" द्यूत खेळून जे धनप्राप्तीची इच्छा करतात, सेवा करून मानाची अपेक्षा करतात आणि सिंहासनाचें अवलंबन करून भोगाची आशा करतात, ते हतभाग्य होत!"

भयश्रवणकर्षणं फणिफणामणेः कर्षणं ।
करेण करिनोलनं जलनिधेः पदा लंघनम् ॥
मरुन्महरिबोधनं निशितस्वड्गसंरोपणं ।
कदाचिदपि संभवेन्न कृपणस्य वित्तार्जनं ४३८

" लोखंडाचे हरभरे दांतांनीं फोडणें, सर्पाच्या फणेवरील मणी हिसकावून घेणें, हातांत हनी नोलून धरणें, समुद्र पायांनीं उतरून जाणें, निजलेल्या सिंहास उंडवचून जागे करणें, तीक्ष्ण तरवारीवर बसणें;— हीं सर्व संभवतील: पण कृपणाच्या वित्ताचें हरण करणें हें कधीं घडणार नाहीं!

तैलाद्रक्षेज्जलाद्रक्षेद्रक्षेच्छिथिलबंधनात् ॥
मूर्खहस्ते न दातव्यमेवं वदति पुस्तकम् ४३९

" पुस्तक म्हणतें, माझें तेलापासून, पाण्यापासून व शिथिलबंधनापासून रक्षण कर; आणि मला मूर्खाच्या हातीं देऊं नको."

व्याधेस्तत्त्वपरिज्ञानं वेदनायाश्च निग्रहः ॥
एतद्वैद्यस्य वैद्यत्वं न वैद्यः प्रभुरायुषः ४४०

" वैद्याची वैद्यगिरी म्हणजे इतकीच, कीं व्याधीचें निदान त्यानें ठरवावें व वेदना बंद कराव्या; वैद्य कांहीं आयुष्याचा धनी नाहीं."

पल्लवे नास्ति माधुर्यं सुधायां नास्ति शीतिमा ॥
विद्रुमे नास्ति मृदुता नन् त्रयं दयिताधरे ४४१

" पल्लवाच्या ठिकाणीं माधुर्य नसतें, अमृताचे ठायीं लालपणा नसतो आणि पोवळ्याच्या अंगीं मार्दवता नाहीं: पण हे तिन्ही गुण मिळून प्रियेच्या अधरोष्ठाचे ठायीं वास करतात!"

लोभमूलानि पापानि व्याधयो रसमूलकाः ॥
स्नेहमूलानि दुःखानि त्रयं त्यक्त्वा सुखी भवेत् ४४२

" सर्व पापाचें मूळ लोभ हा होय, व्याधीचें मूळ पशुत्व होय, दुःखाचें मूळ ऐहिक वस्तूंवर धरलेली ममत्व बुद्धि होय, यास्तव ही निंद्य सोडून देणें हा सुखाचा मार्ग होय!"

मानीरो लभते न पंजरशुकालापेन कोतूहलं।
कस्तूरीहरिणस्य सौरभनया व्याघ्रो न संतुष्यति॥
मीनिर्मोक्षि मयूरनांडवधिधौ व्याधस्य दुष्टात्मभि-
र्व्यामायां भुवि संति केऽपिविरला संतो गुणग्राहकाः ४४३

" मानजगम पिंजऱ्यांतील गमूच्या बोलण्याचें कौतुक वाटत नाहीं, गायास कस्तूरीमृगाच्या सुगधाचें समोष होत नाहीं, पारध्यास मोराचा नाच पाहून आनंद होत नाही त्याप्रमाणे, दुष्टांची मरजेली जी पृथ्वी तिचे ठायीं कोणी विरळ गुणग्राहक आहेत ते आहेत!"

परस्परस्यागमरक्तलोचनश्चुवः।पयोधरोत्पीननितंबयोस्तव ॥
नयोरभूच्चयमुन्नतिं गत-मतेरिह मध्यस्यनिमाननंतनि ४४४

" परस्पर समागमाच्या सुखाने स्त्रीचे नेत्र जसे तुझे झाले, पण त्यांची उन्नति न पाहून मध्य कटिप्रदेश, हा मत्सरानें झिजून कृश झाला असें मला वाटतें!"

पात्रे त्यागी गुणे गागी विगर्गी विषयेष्वपि ॥
आचारे बोद्धृ. गणे योद्धा पुरुषः पंचलक्षणः ४४५.

" पात्राचे ठायीं दान करणारा, गुणिजनांचे ठिकाणीं आदरबुद्धि धरणारा, विषयाविषयीं पराङ्मुख असणारा, शास्त्रांत निष्णात आणि रणांत शौर्य प्रकट करणारा,—हीं पांच महापुरुषांचीं लक्षणें होत."

एकेन राजहंसेन या शोभा सरसो भवेत ॥
न सा बकसहस्रेण परितस्तीरवासिना ४४६

" एका राजहंसानें जी सरोवरास शोभा येईल ती साऱ्या तीरावरील लक्षोंवधी जमलेल्या हजार बगळ्यांनीं येणार नाहीं."

यथा खरश्चंदनभारवाही।भारस्य वेत्ता नतु चंदनस्य ॥
तथा हि विमः श्रुतिशास्त्रपूर्णो। ज्ञानेन हीनः पशुभिः समानः ४४७

"जसा गर्दभ चंदनाचें ओझें वाहणारा असला तरी त्याला ओझ्याचें मात्र ज्ञान, चंदनाचें नाहीं; त्याममाणेंच वेद व शास्त्र यांत पारंगत असूनही जो ब्राह्मण ज्ञानशून्य तो पशुतुल्य समजावा."

तरुणि संहर संहर लोचने। तृणलवेषु कुठारपरिग्रहः ॥
मयि मनोभवमार्गणपीडिते। नहि सतामुचितं मृतमारणं ४४८

"हे तरुणि! आपला कटाक्ष आटोप आटोप; अगे! तृणलवावर कोणी कुठाराचा प्रयोग करतो काय? मदनाच्या बाणानें पीडित जो मी त्या मजवर हा दुसरा प्रहार कशास पाहिजे? सज्जन जे आहेत ते मेलेल्यावर घाव घालीत नसतात!"

चतुरः सखि मे भर्ता यल्लिखति स तत्परो न वाचयति॥
तस्मादप्यधिको मे स्वयमपि लिखितं स्वयं न वाचयति ४४९

"माझ्या पतीचें चातुर्य काय सांगूं? तो जें लिहितो तें दुसऱ्यास वाचतां येत नाहीं." हें पहिलीचें वर्णन ऐकून दुसरी उत्तर करते, "आमचे यजमान तर याहूनही शहाणें आहेत. स्वतः लिहिलेलेंच त्यांस वाचतां येत नाहीं!"

मन्त्रुर्विवेकी ममदा सुशीला। तुरंगमः शास्त्रनिपातधीरः॥
विद्वान् विरागी धनिकः मदाता। भूमंडलास्याभरणानि पंच ४५०

"विवेकी राजा, सुशील कांता, शास्त्राचा घाव सोसण्यास खंबीर असा घोडा, वैराग्यशील विद्वान् आणि दानशूर धनिक,—हीं पांच भूमंडलाचीं भूषणें होत!"

पत्राणि जीर्णानि फलं विनष्टं। छाया गता पक्षिकुलैः प्रयातं॥
वसंत जानीहि नवाशयासौ। समुन्नतिं नैव जहाति वृक्षः ४५१

"पानें गळून गेलीं, फळें गळालीं, छाया नाहींशी झाली, पक्ष्यांचे समुदाय आश्रय करीनासे झाले,— पण इतक्याही उपर ज्यापेक्षां हा वृक्ष आपली उन्नति (उंची—पसा, थोर स्वभाव) टाकीत नाहीं त्या अर्थी हे वसंता! हा तुझ्या आशेवर गुंतून राहिला आहे असें समज!"

करिवर संचर धीरं मा मर्दय मर्माणि पत्राणि ॥
अस्मिन् गह्वरकुहरे [illegible]नसटः केसरी वसति॥ ४५२॥

" हे हस्तिश्रेष्ठा ! हळू हळू चाल, झाडांचा पाला तुडवीत वाजवू नको; कां कीं या वनाच्या आंत आपल्या झाडून गर्जना करणारा सिंह वसत आहे ! "

पुष्पादनंतरं स्यात्फलं तताथां सिद्धमिति लोके ॥
चित्रं कनकलतेयं पुष्पोद्गमनः फलद्वयं पूर्वं ॥ ४५२ ॥

" वृक्षसृष्टींत पहिलें असतां पद्म फुलें येऊन नंतर फलें धरतात असा क्रम आहे तो; पण या सुवर्णवेलीच्या ठायीं हा काय चमत्कार दृष्टीस पडतो पहा. कीं पुष्पोद्गमाच्या पूर्वीच फलद्वयाचा संभव ! "

अहमिहैव वसन्नपि तावक-स्त्वमपि तत्र वसन्नपि मामकः ॥
हृदयसंगम एव सुसंगमो । न तनुसंगम एव सुसंगमः ४५३

" मी येथें असूनहीं तुझा आहे व तूं तेथें असूनहीं माझा आहेस; तस्मात् हृदयसंगम हाच खरा संगम, येरवीं शरीर समागम हा कांहीं वास्तविक संगम नव्हे ! "

गुरुजननयने पिधेहि निद्रे । त्वरितमिहास्तमुपैहि पद्मबंधो ॥
इति वदति मनोभवाभिनम्रा । चिरसमयागमवल्लभा मृगाक्षी ४५४

" हे निद्रे ! गुरुजनांचे नेत्रनिमीलन कर; हे पद्मबंधो सूर्या ! तूं लवकर अस्ताला जा, यामप्रमाणें मदनानें विद्ध झालेली स्त्री, कीं जिचा वल्लभ फारा दिवसांनीं घरीं आला — ना बदनी झाली ! "

परिमितविशिखो न चेन्मनोजो । यदि च हरो न हरेन्नदीयमंगं ॥
यदि मृदुकुसुमेषुरेष न स्या-दवनितले न किमाचरेन्नदानीं ४५५

" हा मदन जर परिमितशर (पंचशर) नसता, शिवानें त्याचा अनंग केला नसता, आणि कोमळ पुष्पें हीं त्याचे बाण नसते, तर त्यानें पृथ्वीतलावर काय काय अनर्थ करून दिले असते ! "

चंद्र स्तैरं विहर गगने मेयसी नम्रवक्त्रा ।
नीलांभोज त्वमपि विकसोन्मालिनाक्षी मृगाक्षी ॥
इत्थं मुक्तां कुरु पिक निजां मानिनी मोक्षिणीयं ।
पुष्पद्वाग्भैः फलितमधुना यद्गृहीतोऽभिमानः ४५७

"हे चंद्रा! प्रियेनें रागानें तोंड खालीं केलें आहे, तेव्हां आतां तूं खुशाल गगनांत विहार कर. हे नीलकमला! तिनें आपले डोळे मिटले आहेत. वास्तव हा तुझा विकास पावण्याचा काल आहे. हे कोकिला! मानिनीनें मौन अंगीकारिलें आहे, वास्तव तूं आपली वाणी प्रकट कर. तुमची भाग्यें हल्लीं फळास आलीं आहेत, कां कीं प्रियेनें मान धारण केला आहे!"

किं केकीव शिखंडमंडितनुः किं कीरवत्पाठकः ।
किंवा हंसवधूवांगनागतिगुरुः शारीव किं सुस्वरः ॥
किंवा हंतशकुंतराजपिकवत् कर्णामृतं सिंचते ।
काकः केन गुणेन कांचनमये व्यापारितः पंजरे ४५८

"या कावळ्यास सोन्याच्या पिंजऱ्यांत जो ठेविला आहे तो काय समजून? —यास काय मोरासमाणें शोभिवंत पिसारा आहे? कां राघूसारखी मनुष्यवाणी आहे? कां हंससमाणें स्त्रियांसारखी यास गति आहे? कां साळुंकी सारखा सुस्वर आहे? कां पक्ष्यांचा नायक जो कोकिल त्याच्यासारखी कर्णमधुर वाणी आहे? याच्या अंगीं येवढा गुण तरी पाहणारानें काय पाहिला?"

मुंचद्वारं चिकुरनिकरं विम्बनीपाणिगर्भे।
मात्राश्लिष्टस्त्रिभिनवसनस्पष्टसर्वांगशोभा ॥
स्नानोत्तीर्णा कमलनयना तिर्यगावर्त्तितास्या।
नो वा कस्या समवारसमाक्रांतमंतः करोति ४५९

"मोकळे सुटलेले केश हातांच्या पोकळींत जिनें धरले आहेत, जिचें वस्त्र अंगावरोबर लगटून गेल्यामुळें जिच्या सर्व अवयवांची शोभा स्पष्ट दिसत आहे व जिनें आपलें तोंड तिरकस फिरविलें आहे, अशी स्नान करून बाहेर आलेली तरुणी पाहून कोणाचें अंतःकरण मदनाक्रांत होत नाहीं!"

अभिलषसि यदींदो वस्त्वलक्ष्मीं मृगाक्ष्याः।
पुनरपि सकृदब्धौ मज्ज संस्तालयांकम् ॥
सकिमलमथ किंवा पारिजातप्रसूनैः ।
सुरभय यदि नो चेत्तं कुतः स्या सुगंधुः ४६०

" हे चंद्रा ! तुला जर कमलनयनेच्या मुखाचें साम्य करावयाचें असेल तर पुनः एक वेळ समुद्रांत बुडी मार आणि कलंक पुसून टाकून आपलें बिंब लखलखीत कर: आणि त्यानंतर पारिजातकाच्या पुष्पांनीं नें सुवासित कर. असें न करशील तर मुखाची शोभा तुला कोठून लाभेल ? "

यद्यपि बहुभिः सौख्यैर्यद्यपि गिरिमथनमुषितसर्वस्वः॥
तदपि परगीतभूधररक्षायां दीक्षितो जलधिः ४६१

" जरी समुद्राचें बंधन (संबंध समयीं) पर्वतांनींच केलें. जरी पर्वताच्या (मंदराचलाच्या) योगानेंच मंथन होऊन समुद्रांतील सर्व रत्नें हरलीं गेलीं. तरी त्यांच्या याचनेवरून (इंद्रापासून) भय उत्पन्न झालें असतां. त्यांस रक्षण करण्याचें व्रत समुद्रानेंच! " मैनाक पर्वत समुद्रांत दडालेला आहे त्यास अनुलक्षून वरील आर्या आहे.

घृणा शंका भयं लज्जा जुगुप्सा चैव पंचमी॥
कुलं शीलं तथा जातिरष्टौ पाशाः सकीर्तिताः ४६२

" दया, साशंकता, भय, लज्जा, तिटकारा, कुल, शील आणि जाति हे आठ पाश होत: यापैकीं एकादें साहस करणेंच असतां, हीं आठ मनिबंधक होतात. "

कस्त्वाणि पाणिपतितानि विना विचार-
यंतानि मोक्तुमुचितानि न मौक्तिकानि॥
गुंजेति संजनयते यदिह भ्रमं ते ।
हल्लारविंदनयनोत्पलयोः समैव ४६३

" हे सुंदरि ! तुझ्या हातांत जीं हीं मोतीं आहेत तीं अविचारानें फेकून देऊं नको. तुला तीं गुंजासारखीं वाटत असतील खरीं; पण तसें वाटण्याचें कारण तुझ्या हस्तांची नाममात्र व डोळ्यांची काळीमात्र या होत ! "

महतो सुवृत्तयोः सखि हृदयग्रहयोरयोः समुच्छ्रितयोः॥
सज्जनयोः स्तनयोरपि चिरंतनं संगतं भवति॥ ४६४॥

भर्तृहरीच्या 'नीतिशतकांत' असा एक श्लोक आहे:—
मणौ वज्रसमानसूत्रघटना संजातेयं तव ॥ मद्यर्थे यदि होतें करघटनेस देऊनि सगळा ॥ मद्यर्थे यत्नाच्या कठिण परणा हेंच असता॥
मिळालें संपादी मजकुनि अवश्य निःशंक जिवीं। नसे तो मैनाक स्तनिन वदतोयाची खरी॥

"जे थोर बुद्धीचे, सत्स्वभावाचे, लोकांच्या हृदयांत भरणारे, उन्नतिसंपन्न, अ शा सज्जनांची निरंतर संगति राहते. कशी? तर जसें पृथुल, वर्तुल मनोरम आणि उन्नत अशा स्तनद्वयाचें अव्यवधान सान्निध्य असतें त्याप्रमाणें !"

स्वर्गापगाया स्तरलैस्तरंगैः। पौरांगनानां कुटिलैः कटाक्षैः॥
धर्मश्च कामश्च समेत्य तीरे। व्यन्योन्यमायोधनमारभेते ४६५

"गंगेच्या तीरीं धर्म आणि काम हे दोघे येऊन एकमेकांशीं युद्ध करूं लागले त: एकाचें आयुध गंगेचे चंचल तरंग आणि दुसऱ्याचें पौरवधूंचे कुटिल कटाक्ष!"

मीमांसा पठिता न यैरुपनिषच्चैव श्रुता तत्त्वतः।
श्रीमच्छंकरभाष्यतो भगवती गीताप्यधीता न यैः॥
सिद्धांतापगतं शिरोमणिमतं ज्ञात्वापि किंचित्तनो।
भट्टाचार्यपदं गताः कथमहो लज्जां लभंते न ते ४६६

"ज्यांनीं मीमांसेचें अध्ययन केलें नाहीं, ज्यांनीं तत्त्वतः उपनिषच्छ्रवणही कधीं केलें नाहीं, ज्यांनीं श्रीमच्छंकराचार्यांच्या भाष्यावरून भगवद्गीतेचें परिशीलनही केलें नाहीं, ते लोक शिरोमणीच्या अपसिद्धांतरूप मताचें किंचित् ज्ञान होतांच देखील भट्टाचार्य हें उपपद आपल्या नांवाला लावून घेतात, तर त्यांस लज्जा कशी वाटत नाहीं?"

यन्नार्जवेन लघिमा गरिमाणं वक्रता ननुते॥
छंदःशास्त्र इवास्मिन् लोके सरलः सखे किमसि ४६७

"छंदःशास्त्रांत जसें आहे कीं, सरळ रेषेनें लघु मात्रा मोजतात व वांकडीनें गुरु मोजतात, तशी जगांतली स्थिति आहे; म्हणजे सरळ आचरणानें लघुत्व प्राप्त होतें व वक्रता दाखविल्यानें गौरव प्राप्त होतें, मग असें असतां, हे मित्रा! तूं सरलतेनें कां वागतोस?"

असंबद्धमंथनकदर्थनमुत्सहंते ।

[illegible] 'साकी रामायणांत सुरेख चमत्कारिक उपमा आहे :—
मधु मागतसे रघुपति तया दिव कधि ने खट्ट न गणी ॥
तांत्र वक्रता व्यर्थी गर्ज्यें मंतिहि जैसें 'म'गणीं ॥ ॥

मर्यादया नियमिनाः किमु साधवोऽपि ॥
लक्ष्मीसुधाकरसुधाद्युपनीय दोषे ।
रत्नाकरोऽपि गरलं किमु नोज्जगार ४६८

"सज्जन हे मर्यादेनें नियमित झालेले जरी असले तरी त्यांचा अतीच उपमर्द झाला असतां तो त्यांस सहन होत नाहीं. पहा कीं, समुद्र हा रत्नाकर खरा; पण लक्ष्मी, चंद्र, अमृत इत्यादि अर्पण केल्या नंतरही जेव्हां त्यास देवदैत्य सोडीनात; तेव्हां शेवटीं त्यानें विष बाहेर टाकलें!"

सम्यगनिष्पन्नः सन् योऽर्थस्त्वरया स्फुटीक्रियते ॥
स व्यंग्य एव भवति प्रथमो विनतानभूज इव ४६९

"विनतेला पहिला झालेला मुलगा जो अरुण तो जसा गर्भाद्यवयव न होत्साता जन्मास आला व व्यंग (थोटा) निपजला. त्याप्रमाणें जो अर्थ पूर्णत्वानें व्यक्त केलेला नसतां श्रोत्यांस किंवा वाचकांस त्वरित भासमान होतो, तो व्यंग्य समजावा."

व्यथयति नगमुपेतः स्वच्छप्रकृतीनवद्यलेशोऽपि ॥
उद्विजते ननु चक्षुः सक्तेन रजःकणेनापि ॥ ४७० ॥

"जे प्रकृत्या स्वच्छ असतात, त्यांस दोषाच्या लेशानें ही हीनत्व येतें; जसें रजःकण डोळ्यांत गेला असतां, तेवढ्यानेंही डोळा दुखूं लागतो!"

अज्ञातमलोभमजिह्मं त्यागिनमनुरागिणं विदोषज्ञं ॥
यदि नाश्रयति नरं श्रीः श्रीरेव हि वंचिता तेन ४७१

"सदय, निर्लोभ, सरळ, दाता, प्रीतियुक्त व मनुष्यांची ज्ञात असलेला जर हा पुरुषाचा जर लक्ष्मीनें आश्रय केला नाहीं, तर तीच बिचारी फसवी असें म्हटलें पाहिजे!"

या स्वसदनि पद्मेऽपि संभावयति स्म [illegible]
इंदिरा मंदिरा मन्ये* [illegible]

* चरण पहिला कांहीं पाठभेद असला पाहिजे.

" जी लक्ष्मी स्वतःचें गृह जें कमल त्यामध्येंही संध्याकाळपर्यंतच कायती राहते, ती दुसऱ्याच्या घरांत कशी दीर्घकाळ राहील ? "

दिग्वाससं गतव्रीडं जटिलं धूलिधूसरम् ॥
पुण्याधिका हि पश्यंति गंगाधरमिवात्मजं ४७३

" ज्यास पुण्य-विशेष घडला आहे असेच धन्य पुरुष शिवास व स्वपुत्रास दिगंबर, यथेच्छ वर्त्तन करणारा, जटाधारी आणि धुळीनें मळलेला असा पहातात." वरील विशेषणें दोहोंकडे सहजच लागणारीं आहेत

मलिनैरलकैरेनैः शुक्लत्वं प्रकटीकृतम् ॥
तद्दोषादेव निर्याता वदनाद्रदनावलिः ४७४

" केश हे मूळचे मलिन (काळे) असतां त्यांनीं आपलें शुक्लत्व धारण केलें, या दोषानेंच जणूं काय दंतपंक्ति निघून गेली ! "

श्रुतिः शिथिलतां गता स्मृतिरपि प्रनष्टाऽधुना।
गतिर्विपथमागता विगलिता द्विजानां तनिः ॥
गवामपि च संहतिः समुचितक्रियातश्च्युता ।
कृता नु जरया तया कलियुगस्य साधर्म्यता ४७५

जरेचें व कलियुगाचें साम्य :—" (जरापक्षीं) कर्ण मंद झाले आहेत, स्मृति नष्ट होत चालली आहे, नीट चालतां येत नाहीं, दांत पडले आहेत व इंद्रियांचे समुचित व्यापार त्यांजकडून होत नाहींत."

" (कलियुगपक्षीं) वेदाचें माहात्म्य कमी झालें आहे, स्मृति लुप्तप्राय झाली आहे, सद्धर्माचा मार्ग सुटला, (विद्वान्) ब्राह्मणांचे समुदाय दृष्टीस पडत नाहींत, गाईंचा [illegible] करीत नाहींत."

[illegible]तत्संतः। कृत्वा म्रियंते जनकश्चिरायुः ॥
[illegible]। पश्यंतु लोकाः कलिकौतुकानि ४७६

" कलियुगाच्या [illegible] आहेत पहा ! सज्जन दुःख पावतात, दुर्जन मजा मारतात; [illegible] पावतात, वाघास दीर्घायुष्य होतें; परस्त्रीशीं स्वे-

हसाव आणि स्वजनाशीं वैर!"

सद्वंशजातं गुणकोटियुक्तं। धनुःकथं पार्थिव वामहस्ते ॥
शरः परप्राणविहारदक्षः। सपक्षपातोऽप्यधमो गरीयान् ४७७

"हे राजा! तें धनुष्य सद्वंशापासून (पक्षीं, उत्तम वेळूपासून) आणलेलें गुणकोटीनें (पक्षीं, दोरी व टोकें यांनीं) युक्त तें तूं डाव्या हातांत वागवतोस आणि जो बाण दुसऱ्याच्या प्राणाच्या नाशाविषयीं कुशल व पक्षपातयुक्त (पक्षीं, पंख लावलेला) त्याला उजव्या हातांत घेऊन गोरविनोस हा केवढा अन्याय!"

नन्वाश्रयस्थितिरियं नव कालकूट।
केनोन्नरोन्नर विशिष्टपदोपदिष्टा ॥
प्रागर्वणस्य हृदये हृषलक्ष्मणोऽथ ।
कंठेऽधुना वससि वाचि पुनः खलानां ४७८

"हे कालकूटा! तुला उत्तरोत्तर वरच्या वरच्या स्थानाचा आश्रय करण्यास कोणीं शिकविलें? पूर्वी तूं मागगच्या हृदयाचे ठायीं वास करीत होतेंस, पुढें शिवाच्या कंठाचा आश्रय केलास आणि हीवटीं खलांच्या वाणीचेठायीं राहिलेंस!"

आपूर्येत पुनः स्फुरच्छफरिकासारोर्मिभिर्वारिभि-।
र्भूयोऽपि प्रविजृंभमाणनलिनं पश्येम नो पाशयं ॥
इत्याशागतनंतुबद्धहृदयो नक्तंदिनं दीनधीः ।
शुष्यत्यानपशोधिनस्य सरसस्तीरे नरत्सारसः ४७९

"जलाशय माशांच्या कीडेनें ज्यांत तरंग उत्पन्न होणार नाहीत असा झरकांनीं पुनः भरून जाईल व यांत कमलें विकसतेलीं मी पुनः पाहीन, असा आशातंतूनीं ज्याचें हृदय गच्चंदिवस बद्ध झालें आहे, असा हंसांस पा सरोवराच्या तीरीं दीन होत्साना उन्हाचा ताप सोशीत बसला आहे!'

वैद्या वदंति कफपित्तमरुद्विकारा
ज्योतिर्विदो ग्रहगतिं परिवर्तयंति
भूताभिषंग इति भूतविदो वदंति
भावीतकर्म बलवत्सुकृतो वदंति

" शरीरव्याधींची उपपत्ति वैद्यजाण चार प्रकारांनीं करतात:— वैद्य कफवातपित्तांचे विकार सांगतात, ज्योतिषी सांगतात कीं ही ग्रहगतींचीं फलें होत, मांत्रिक भूतचेष्टा सांगून सांगतात आणि ऋषि प्राक्तन कर्मापासून सांगजे पूर्वजन्मींच्या आचरणापासून त्यांची उपपत्ति करतात ! "

काकः पद्मवने रतिं न कुरुते हंसो न कूपोदके ।
मूर्खः पंडितसंगमे न रमते दासो न सिंहासने ॥
कुस्त्री सज्जनसंगमे न रमते नीचं जनं सेवते ।
या यस्य प्रकृतिः स्वभावजनिता केनापि न त्यज्यते ४८१

" कावळ्यास कमलवनाची शोभा पाहून आनंद होत नाही. हंस हा कूपोदकाचेठायीं रमत नाहीं, मूर्खाला पंडितांच्या समागमानें संतोष होत नाहीं, दासास राजसभा काय होय? व्यभिचारिणी स्त्री सज्जनांच्या संगतीनें सुख पावत नाहीं, नर नीच जनांचा समागम तिला आवडतो; एकंदरींत जी ज्यांची स्वभावसिद्धप्रकृति ती कोणाच्यानें सोडवते ? "

हस्ती वन्यः स्फटिकघटिते भित्तिभागे स्वबिंबं।
दृष्ट्वा दृष्ट्वा प्रतिगज इति त्वद्विषां मंदिरेषु ॥
दंताघातादुलितदशनस्तं पुनर्वीक्ष्य सद्यो ।
मंदं मंदं स्पृशति करिणीशंकया विक्रमार्क ४८२

" हे विक्रमादित्या ! तुझ्या शत्रूंच्या मंदिरीं वनांतला हत्ती जाऊन तेथील स्फटिकभिंतीचे ठायीं आपलें प्रतिबिंब पाहून हा दुसरा हत्ती आहे या बुद्धीनें त्यास टक्कर देतो; पण पुढें काय होतें कीं, वरील आघाताच्या योगानें त्याचे दांत मोडून गेले असतां पुनः त्याच भिंतीकडे तो मंद मंद जाऊन हस्तिनीच्या बुद्धीनें त्याच आपल्या प्रतिबिंबास गोंजारूं लागतो ! "

यद्यसौ दलित सिक्थस्य का हानिः करिणो भवेत् ॥
[illegible]लिका तु तेनैव सकुटुंबोपजीवति ॥४८३॥

" हत्तीनें कांस्कर चघळला असतां त्यांतील थोडीशी मीत जर गळून पडलें तर त्यांत त्याची हानि ती काय? पण या मीतांवरच मुंगीच्या कुटुंबाचा निर्वाह होतो ! "

दरिद्रता धीरतया विराजते कुरूपता शीलतया विराजते ॥
कुभोजने चोष्णतया विराजते कुवस्त्रता शुभ्रतया विराजते ४८४

" दरिद्र पुरुष जर स्वभावाचें गंभीर असेल, तर त्या गुणानें त्याचें दारिद्र्य शोभतें जातें; कुरूप मनुष्य जर स्वभावाचा चांगला आहे तर तो शोभत जातो. कदन्न उष्ण असल्यानें तें भक्षण जातें; आणि जीर्ण वस्त्र स्वच्छतेनें शोभतें."

पद्मपुष्पफलच्छाया मृदुत्वत्कलदामभिः ॥
धन्या महीरुहा येषां जिगमिषा यांति नार्थिनः ४८५

" पानें, फुलें, फळें, छाया, मृदु साली व लाकडें यांनी पूर्ण कोणत्या कोणत्या वृक्षाकडे हे अर्थिजन जाण्याची इच्छा धरीत नाहीत ते वृक्ष धन्य होत."

कीटगृढे कुटिलोऽतः कठिन क्षारोबुसंभवः शून्यः ॥
अन्यः श्रीपतिनिकटे केन गुणेन स्थितिं लभे ॥ ४८६ ॥

" हा शंख कीडांनी भरलेला आहे, आंत कुटिल, जाड्या कठिण, खारट उदकांत जन्म पावलेला आणि शून्य. दुसरा असला विष्णूजवळी वास आम्हांस जो मिळाला तो कोणत्या गुणाकरून असेल ते असो !"

कथाकरकरस्पर्शादुद्विद्वेषसि सर्वतः ॥
चंद्रकांतमणे तेन मृदुत्वं लोकविश्रुतं ॥ ४८७ ॥

" हे चंद्रकांत मण्या ! ज्ञानशून्याविषयीं येवढें मत्सर तूं चंद्राचें किरण त्यांचा स्पर्श होतां तुला करोर लागून तूं द्रव पावतोस. तस्मात् तुझा मृदुत्वाचा कीर्ति यथार्थ आहे."

चित्रं न नद्यदपमंबुधिरंबुदौघ ।
सिंधुप्रवादपरिपूर्णतया महीयान् ॥
त्वं त्वर्थिनामुपकरोषि परत्यकूप ।
निर्याच्ञ कुक्षियुगुलं हि महत्त्वमेतत् ४८८

" मेघांपासून होणाऱ्या वृष्टीनें व नद्यांच्या जलप्रवाहांकरून सागर हा सदोदित परिपूर्ण असतो यांत कांहीं नवल नाहीं; पण हे मत्सकूपा! तूं आपल्या कुक्षी-

वें निष्पीडन करून तृषितांची पीडा दूर करतोस हें तुझें महत्त्व बरोबर वर्णन करण्यासारखें स-
रें!"

कंपंते गिरयः पुरंदरभिया मैनाकमुख्याः पुनः।
क्रंदंत्यंबुधरा स्फुरंति वडवावक्त्रोद्गता वन्हयः॥
भोः कुंभोद्भव मुच्यतां जलनिधिः स्वस्त्यस्तु ते सांप्रतं।
निद्रालुश्लथबाहुवल्लिकमलाश्लेषो हरिः सीदति ४८९

"हे अगस्त्या! तूं समुद्रास अंजलिगत करून माशूं पाहात आहेस, पण ही पहा काय तारांबळ उडून गेली आहे ती!—इंद्राच्या वज्रापासून भय पावलेले मैनाकादि पर्वत जे आजपर्यंत समुद्रांत सरसरूप दडून राहिले होते ते आतां इंद्राच्या धाकानें कांपूं लागले आहेत, मेघ रडूं लागले आहेत, वडवाग्नि निराश्रय होणार यास्तव तो मुखाबाटे ज्वाला टाकूं लागला आहे आणि निद्रावशीकरून जिची मिठी सईल पडली आहे अशा लक्ष्मीनें आलिंगित जो हरि तोही दुःख पावत आहे;—तर तुला कांहीं दया येऊंदे व समुद्रास सोड कसा!"

भ्रूभंगे रचितेऽपि दृष्टिरधिकं सोत्कंठमुद्वीक्षते।
रुद्धायामपि वाचि सस्मितमिदं दग्धाननं जायते॥
कार्कश्यं गमितेऽपि चेतसि तनू रोमांचमालंबते।
दृष्टे निर्वहणं भविष्यति कथं मानस्य तस्मिन् जने ४९०

कोणी मानिनी आपल्या सखीस म्हणते:—"अगे! तो प्रियजन दृष्टीसमोर असला म्हणजे मी आपल्याकडून कितीही मानधारण केला तरी तो पार कसा पडावा? पहा कीं, मीं आपल्याकडून जरी बळेंच कपाळाला आठ्या घातल्या, तरी माझी दृष्टि त्याच्या मुखाकडे लागून माझें हृदयगत औत्कंठ्य मगट करते; मी मुखास जरी बसलें तरी अंतर्गत हर्ष या मेल्या तोंडावर स्मिताच्या रूपानें आविर्भूत होतो: आणि मन कितीही कठीण केलें तरी अंगावर येणारा कांटा कशानें लपणार? तेव्हां खरोखर बाह्यचिन्हांनीं मानावें हेंमित्व व्यक्त होतें!"

जन्मस्थानं न खलु वनिता वर्णनीयो न वर्णो ।
दूरे पुंसां वपुषि रचना पंकशंकां करोति ॥
पद्मप्येवं सकल करभिर्दुर्व्यगर्वापहारी ।
को जानीते परिमलगुणः कोऽपि कस्तूरिकायाः ४९१

" कस्तुरीचें जन्मस्थान पाहिलें तर तें मोठें निर्मळ आहे असें नाहीं; वर्ण ही वर्णनीय आहे असें नाहीं; निचा लेप अंगावर केला असतां विखल दिसला आहे कीं काय असा भास होतो: पण इतकें असून ती साऱ्या सुगंधीद्रव्यांच्या तोंडांत मारते; नेत्रां हा निचा काय लोकोत्तर गुण आहे पहा! "

मौलौ सन्मणयो गृहं गिरिगुहा त्यागः किलात्मत्वचो।
निर्यत्नोपननैश्च दृत्तिरनलैरेकत्र चर्येदृशी ॥
अन्यत्रानृजुवर्त्मना द्विरसना वक्त्रे विषं वीक्षणं ।
सर्वांगलसृवकं कथय भो भोगिन् सुखं किं त्विदं ४९२

" हे सर्पा! तुझ्या मस्तकावर पहावें तों उत्तम रत्नें चमकताहेत, तुझें निवासस्थान पर्वतांच्या गुहा होत, त्याग (पक्षी, दान) तर स्वतः आपल्या शरीराचाही तूं करतोस, नेत्रेंद्रियांची तुझी वृत्ति पाहिली तर अत्यंत सुलभ जो वायु त्यावर तुझा निर्वाह चालतो;—एकीकडे पहावें तों तुझी एकंदर चर्या अशी; पण दुसरीकडे पहा काय आहे तें!— कुटिलगति (कपटाचरण), दोन जिभा (चहाडी), तोंडांत विष (कटु भाषण), आणि अत्यंत अमंगलदायक दर्शन, नेत्रां तुझा खरा प्रकार तरी कोणता सांगावा? "

का कस्य कति वा दंता मेषस्यांडं कियत्पलं ॥
गर्दभे कति रोमाणि व्यर्थैषा तु विचारणा ४९३

" कावळ्यास दांत किती असतात, मेंढ्याच्या अंडांत किती मांस असतें, गाढवाच्या अंगावर किती रोम असतात,--इत्यादि गोष्टींची विचक्षण करीत बसणें म्हणजे मूर्खपणा आहे! "

नैषां संध्याविधिरविकलो नाच्युतार्चोऽपि सांगा।
न स्वे काले हवनविधयो नापि वेदार्थचिंता ॥
न स्कंदेलानियतमयनं नापि निद्रावकाशो ।
न द्यौ लोकावपि नवभृथौ राजसेवापराणां ४९४

" जे राजसेवेंत निपुण झालेले त्यांची संध्या पुरी करावयाची नाहीं, देवपूजा पण उरकायाची नाहीं, पंचाक्षरी होम हवन पडायाचें नाहीं, वेदार्थाचें मनन क-

रण्यास त्यांस अवकाश नाहीं, वेळेवर जेवण नाहीं व झोंपही नाहीं:—सारांश, त्या हतभाग्यांस इहलोकींचें सुख लाभत नाहीं व परलोकींचेंही नाहीं !''

निर्ईत्ता ध्वरकृत्य ऋत्विजमहोन्नीर्णापगो नाविकं।
युद्धांते क्षमटं च सिद्धविजयो बोढारमासस्थलः॥
वृद्धं वारवधूजनं च कितवो निर्घृष्टतद्यौवनो ।
ध्वस्तांतंकचयश्चिकित्सकमपि द्वेष्टि प्रदेयार्थिनं ४९५.

'' यज्ञकर्म उरकून गेलें असतां यजमानास ऋत्विज नकोसा होतो, नदी ओलांडून गेलेल्या उतारूस नाविक तृणवत वाटूं लागतो, युद्ध समाप्त झालें कीं योद्धा म्हणजे कःपदार्थ होऊन जातो, एकदां स्थळ मिळालें म्हणजे मग वरास कोणी विचारीत नाहीं, बिसनी लोक हे वारवधूंचा बहार भोगून मोकळे झाले म्हणजे मग त्यांस पुंसतनासे होतात आणि रोगास दूर करून आपला झालेला पैसा वैद्य मागूं लागला कीं तो माजी रोग्यास दुस्मान वाटूं लागतो !''

स्वाधीना दयिता स्तनावधि सुतोऽसौ षोडशाब्दावधि।
म्यात्कन्या करपीडनावधि सतस्त्रीस्तद्दृशत्वावधि ॥
जामाता बहुलार्थितावधि सखा साधुसलापावधि ।
शिष्यो गुह्यनिरूपणावधि परे चेते धनित्वावधि ४९६.

'' जों पर्यंत मुलगा झाला नाहीं तों पर्यंत बायको आपल्या स्वाधीन, मुलगा सोळा वर्षांपर्यंत, मुलगी वय होई तों पर्यंत, सून तीस यौवनदशा माप होई तोंपर्यंत, जांवई पुष्कळ जों पावतों पोंचतें आहे तों पर्यंत, मित्र लोक आपणास घेरें त्यागताहेत तों पर्यंत, शिष्य गुरुकिल्ली सांगून दिली नाहीं तोंवर आणि सामान्यतः इतर लोक जवळ पैसा आहे तोंपर्यंत !''

तापं लुंपसि सर्वतो विनरसे मुक्ताफलं मुक्तिषु ।
क्षेत्रं सिंचसि किंच पल्लवयसि श्रीखंड मुख्यान द्रुमान्॥
क्षारं क्षारमिदं जलं जलनिधेरादाय जीमूत हे ।
विश्वं जीवयसि ब्रवीतु जगति प्रौढोऽपि कस्ते गुणान ४९७

'' हे मेघा! तूं साऱ्या जगाचा ताप घालवितोस, समुद्रांतील खिंपांत मोतीं

उत्पन्न करतोस, डोनें शिंपतोस. चंदनादि द्रव्यांस पल्लवित करतोस, समुद्रावें अमि-श्रय खारट जें पाणी तें शोधून घेऊन विश्वाचें पुनरुज्जीवन करतोस: तेव्हां कोणी केवढाही प्रौढ वक्ता आला तरी तुझ्या गुणांचें यथास्थित वर्णन करणें केवढें दुराप-स्त आहे!"

स्निग्धेंद्रोपल सुंदरः कचभरो वक्त्रं सगोत्रं विधो-।
र्वैश्यानो मणिकुंभडंबरमुषौ मध्योऽस्ति वा नास्ति वा॥
श्रोणीमंडलमूरुदुर्वहमहो शोणाब्जतुल्ये पदे ।
मन्ये मंजुगिरो मरालमहिलाध्येयो गतिर्विभ्रमः ४९८

" तुझतुझीं इंद्रनीलासमाणें सुंदर केशपाश, चंद्रासारखें रमणीय मुख, रत्न कलशांच्या डौलाचें स्तन मध्यभाग (कटिप्रदेश) हा असतो की नाहीं. सांग्यास न झेपणारा असा जघनभार, रक्तकमलतुल्य पावलें, मंजुल स्वर आणि हं-सस्त्रियांनीं ज्यास पाहून शिकावें असा गतिविलास!"

देवो हरिर्वहतु वक्षसि कौस्तुभं तत् ।
मन्ये च काचन पुनर्फणिनः मणिष्ठा ॥
यत्पादसंगनिसमर्पितमौलिभाणि ।
धत्ते सदैव शिरसा सरसीरुहाणि ४९९

" विष्णु हा कौस्तुभास स्वहृदयीं धारण करो; पण त्याच्यापेक्षा फणिमणींचा मनी-ला मला फार अधिक वाटतें. कां तर, त्याच्या पादस्पर्शानें विकास पावतोंकरून ज्यांचा सुगंध प्रगट झाला आहे अशीं कमलें विष्णु आपल्या शिरीं धारण करतो!"

राज्यं येन पदांतलग्नतृणवत्त्यक्तं गुरोराज्ञया ।
पाथेयं परिगृह्य कार्मुकवरं घोरं वनं प्रस्थितः ॥
स्वाधीनः शशिमौलिचापविषये प्राप्तो नवै विक्रियां ।
पायाद्वः स विभीषणाश्रुजनिता रामाभिधानो हरिः ५००

" ज्यानें वस्त्राच्या दशोला आरकलेल्या तृणासमाणें आपल्या पित्याच्या आ-ज्ञेवरून राज्य सोडून दिलें, जो धनुष्य हेंच काम तें पाथेय (शिदोरी) बरोबर घेऊ-न घोर अरण्यांत गेला, ज्याला शंकरचापाच्या दर्शनेंकरून भीति न वाटतां तें ज्या-नें सहज सोडून टाकलें आणि विभीषणाच्या घोरल्या भावाचा ज्यानें वध केला

तो रामनामधारी विष्णु तुमचें रक्षण करो."

कुलाचला यस्य महीं द्विजेभ्यः। प्रयच्छतः सीमदृषत्त्वमापुः॥
बभूवुरुत्सर्गजलं समुद्राः। स रेणुकेयः श्रियमाननोतु॥५०१॥

"ज्याच्या पृथ्वीदानसमयीं अष्टकुलाचल हे ब्राह्मणांच्या दानविषयक भूमी वे धोंडे झाले आणि समुद्र हे दानोदक झाले, तो रेणुकापुत्र तुम्हांस श्रेयस्कर होवो!"

पदव्यक्तिव्यक्तीकृतसहृदयानंदसरणौ।
कवीनां काव्येन स्फुरति बुधमात्रस्य धिषणा॥
नवक्रीडावेशाव्यसनपिशुनो यः कुलवधू-।
कटाक्षाणां पंथाः स खलु गणिकानामविषयः ५०२

"शब्द श्रवणमात्रेंकरून सहृदयाच्या ठायीं उत्पन्न होणारा जो आल्हाद तो कवीच्या काव्याचे ठायीं ज्ञात्यास मात्र बुद्धिगोचर होतो कसा? तर ज्यामध्यें नूतन समागमाच्या योगानें प्राप्त झालेल्या रसिकत्वाचें दर्शक जे कुलवधूंचे कटाक्ष ते गणिकजनांस अगम्य असतात!"

ते भूपीपतयो जयंति नतयो येषां द्विषद्भूभृतां ।
ते वंद्या यतयो विशंति मतयो येषां परेब्रह्मणि ॥
ते श्लाघ्याः कवयो वयोमदभरव्याजृंभमाणांगना-
दृक्पाता इव तोषयंति हृदयं येषां गिरां संचयाः ५०३

"ते राजे धन्य, कीं ज्यांच्या पायांवर त्यांच्या शत्रूंस डोकें घासावें लागतें; ते यती धन्य, कीं ज्यांच्या बुद्धीस परब्रह्म हें गोचर झालें आहे; आणि ते कवि धन्य. कीं ज्यांचे वाग्विलास तरुणीच्या मदपूर्ण कटाक्षाप्रमाणें रसिकांच्या हृदयास हृष्ट करतात!"

त एवामी बाणास्तदपि हरलब्धं धनुरिदं।
स एवाहं पार्थः समधिगतसकारासनिनिचयः॥
इमास्ता गोप्यो हरिचरणचिंतैकशरणाः।
हियंते गोपालैर्विधिरपि वलीयान्न तु नरः ५०४

कृष्णावतार समाप्त झाल्यावर अर्जुनाची जी दुर्दशा उडाली तिचें तो खेदपूर्वक वर्णन करतो :-- "अरेरे! नेच ना हे माझे बाण, नेंच हें शिवापासून प्राप्त झालेलें धनुष्य, तोच हा मी अर्जुन, कीं ज्यानें दानवांचा कर्दनकाळ संहार केला; आणि ही सर्व जुनाच सामग्री असतां कृष्णाच्या पायांशीं ज्यांचा एकभाव अशा या गोपी यावनचरांनीं हरून न्याव्या काय? नस्मान् दैव हें प्रबल होय, नराचा आपल्या पौरुषाविषयींचा अभिमान सारा खोटा!"

उत्सिक्तः कुसुमासवैः कुमुदिनीं राजमिषां पुष्पिणी-
मालिंगन्निजिं निर्भयं परिचयं कुर्वन् पुनः पल्वलैः॥
यावत्पंकजसौरभस्वमखिलं गृह्णन् लघु मस्थित-
स्तावत्कस्य उपस्थितेन मरुता विघ्नमयाद्भावनि ५०५

"पुष्पमधूनें (पक्षीं, मद्यानें) झिंगून गेलेला असा वायु राजमिषा (राणी; पक्षीं, चंद्रवल्लभा) जी कुमुदिनी ती पुष्पिणी (फुललेली; पक्षीं, अस्पर्शी) असतां तिला आलिंगन देऊन तिच्या पल्वलांशीं (पक्षीं, पदरांशीं) निर्भयपणें परिचय करीत होत्साता सर्व पंकजसौरभ्याचें हरण करून जों इकडून जात होता तोंच मध्यान्हकाल समीप आलासा पाहून पांथ्यांपांथ्यांचा कोंडींकडे धांवतो!"

अलंकरोति हि जरा राजामात्यभिषग्यतीन्॥
विडंबयति पण्यस्त्रीमल्लगायकसेवकान् ५०६

"राजाचे मंत्री, वैद्य व संन्यासी यांस जरा ही भूषण आणते; नीच वारांगना, मल्ल, गायक व सेवक यांस विडंबनेस पात्र करते!"

गर्जन् हरिः सांभसि शैलकुंजे। मतिध्वनीनात्मछटानिशम्य॥
पदं ददंध क्रमितुं सरोषः। मतंगजन्यस्मृगेंद्रनादम्॥ ५०७॥

"पर्वतावरील एका कुंजांतील जलाशयाच्या कांठीं असतां सिंहानें मोठ्यानें गर्जना केली व जिनसरसे चोहोंकडे प्रतिध्वनि उठले; ते ऐकून सिंह तेथून चढून अन्य सिंहाच्या हांकेनें त्यावर झेप घालण्यास तयार झाला!"

उपानीतं दूरात्सरिमलमुपाघ्राय मरुता ।
समापासीदस्मिन्मधुरमधुलोभान्मधुकरः॥

परो दूरे लाभः कुपितफणिनश्चंदननरोः।
पुनर्जीवन् यायाद्यदि नदिह लाभोऽयमतुलः ५०८

"हा मधुकर वाऱ्यावर वाहत आलेल्या परिमलास हुंगून मधुरमधूच्या लोभानें या चंदनाकडे आला आहे. आतां यास वरील लाभ होणें नर दुरापास्तच आहे, पण वरील वृक्षावर जो क्रुद्ध सर्प आहे त्याच्या तडाक्यांतून बचून हा जीवंत माघारीं जावो म्हणजे यानें मोठी मिळविली!"

दष्टे जगद्वपुषि कालभुजंगमेन ।
तन्नांधकारमिषमाविरभूद्विषं यत् ॥
संजात लक्ष्मणि तदिंदुमणौ निपाट्य।
ज्योत्स्नामये पयसि तत् क्षिपति स्म धाता ५०९

"कालरूप भुजंगमानें (पक्षी, कृष्णसर्पानें) जगद्रूप शरीरास दंश केला असतां अंधकाराच्या रूपानें जो विषार चोहोंकडे पसरला तो चंद्ररूप मण्याकडून शोषून घेऊन चंद्रिकारूप दुग्धरावांत त्यास ब्रह्मदेव जणों काय टाकता झाला!"

सुधाधाम्नः कांतिस्तव वदनपंकेरुहगुणै-।
र्जितेव म्लानत्वं व्रजति सहता माणदयिते ॥
वदत्येवं कांते दिवसविरहातंकचकिता ।
तदंगे सल्लग्ना तव दिशतु राधा प्रियशतं ५१०

"हे माणप्रिये! तुझ्या मुखकमलाच्या कांतीनें जणूं काय लज्जित झालेली अशी ही चंद्राची शोभा म्लानत्व पावत आहे असें वाटतें, यामाणें कृष्णाचें भाषण ऐकून संध्यासमय झालासा पाहून घाबरलेली व आपल्या वल्लभाच्या अंगावर निजें अंग टाकून दिलें आहे अशी राधा तुझें बहुत कल्याण करो!"

श्लेषे केचन शाल्वगुंफविषये केचिद्रसे चापरे— ।
ऽलंकारे कतिचित्सदर्थविषये चान्ये कथावर्णके ॥
आसर्वत्र गभीरधीरकविताविंध्याटवीचातुरी-।
संचारे कविकुंभिकुंभभिदुरो बाणस्तु पंचानन: ५११

" कोणी कवि श्लेषांनच निपुण असतात. कोणी शब्दार्थांत, कोणी रसांत, कोणी अलंकारांत. कोणी मोठ अर्थाचें निबंधन करण्यांत, किंवा कोणी कथानक बांधण्यांत: पण कवितारूप गहन विंध्याटवींत संचार करण्याविषयीं अत्यंत कुशल असा सहसा आपणे कविराजांचा गर्व परिहार करणारा एक बाणरूप सिंहच होय!"

ये संसन्क विवादिनः परयशःशल्ये न मूर्छाकुलाः ।
कुर्वंति स्वगुणस्तवेन गुणिनां पत्यादुगाच्छादनं ॥
तेषां गोषकषायितोदरदृशां कोपोष्णनिःश्वासिनां ।
दीर्घा श्लक्ष्णशिरोरुहेव कृष्णफणिनां विद्या जनोद्वेगिनी ५१२

" जे सभेंत नेहमीं वादविवाद करणारे, दुसऱ्याच्या कीर्तिश्रवणानें ज्यांच्या पोटांत शूल उठतो व जे आपल्या गुणांची प्रशंसा करून दुसऱ्यांच्या गुणाचें आच्छादन करण्याविषयीं नेहमीं जपलेले असतात. ज्यांची विद्या रागानें ज्यांचा दृष्टि लाल झाली आहे व जे उष्ण निःश्वास टाकतांहेत. अशा कृष्णसर्पाच्या शिरोरुहाप्रमाणें लोकांस अत्यंत भयावह होय!"

ज्योतिःशास्त्रमहोदधौ बहुतरात्सर्गापवादान्मधिः ।
कल्लोलैर्निखिले कणान् कतिपयाल्लब्ध्वा कृतार्थो इव ॥
दीर्घापुःस्फुटसंपदादिकथनैर्दैवज्ञपाशा इमे ।
मोहं मोहमनुभवंत्यधिकं मोहं मुहुः कुर्वते ॥ ५१३ ॥

" बहुत नियम व अपवाद या तरंगांनीं व्याप्त असा जो ज्योतिःशास्त्ररूप महासागर त्यांतले थोडेसे कण प्राप्त झाल्यानें केवळ कृतार्थ होऊन बसलेले असे जे ज्योतिषी ते दीर्घायुष्य, संपत्ति, संपन्न इत्यादिकांविषयीं धनिकांस आशीर्वाद देत दारोदार हिंडतात!"

उपचारः कर्तव्यो यावदनुत्पन्नसौहृदाः पुरुषाः ॥
उत्पन्नसौहृदानामुपचारः केवलं भवति ॥ ५१४ ॥

" जों पर्यंत कोणाशीं मैत्री जडली नाहीं तोंपर्यंत त्यास आदरसत्कारादि उपचार करावे: पण एकदां मैत्री जुळल्यावर मग वरील उपचार करणें हें सोंग दिसतें!"

मांसं मृगाणां रहसि योगिनानां। मृगद्विषां चर्म फलं द्रुमाणाम् ॥

स्त्रीणां स्वरूपं च नृणां हिरण्यमेते गुणा वैरकरा भवंति ५१५

"मृगांचें मांस, हत्तींचे दांत, सिंह व वाघ यांचे कातडें, वृक्षांचें फळ, स्त्रियांचें सौंदर्य आणि धना ढ्याचें द्रव्य,—हे सर्व गुण मत्येकाच्या नाशास कारणभूत होत."

दारेषु किंचित्स्वजनेषु किंचित्। गोप्यं वयस्येषु सुतेषु किंचित्॥
युक्तं न वा युक्तमिदं विचिंत्य। वदेद्विपश्चिन्महतोऽनुरोधात् ५१६

"कांहीं गोष्टी बायकोपासून गुप्त ठेवाव्या लागतात, कांहीं चाकरमाणसांपासून, कांहीं मित्रांपासून व कांहीं पुत्रांपासून: एकंदरीत कोणतीही गोष्ट युक्त आहे कीं अयुक्त आहे याचा विचार करून शहाण्या मनुष्यानें मोठें धोरण ठेवून बोलत असावे."

राष्ट्रस्य चिन्नं कृपणस्य वित्तं। मनोरथं दुर्जनमानुषाणाम्॥
स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं। देवो न जानाति कुतो मनुष्य: ५१७

"राष्ट्राची चिन्तहानि, कृपणाचें धन, दुर्जनांचें मनोगत, स्त्रियांचें कामचरित आणि पुरुषाचा भाग्योदय,—या पांचांचा देवासही थांग लागत नाहीं, मग माणसांचा काय पाड!"

संतश्चेदमृतेन किं यदि खलास्तत्कालकूटेन किं।
दातारो यदि कल्पशाखिभिरलं याद्यर्थिनः किं तृणैः॥
किं कर्पूरवलाकया यदि दृशः पंथानमेति प्रिया।
संसारेऽपि सतींद्रजालमपरं यद्यस्ति तेनापि किं ५१८

"जर सज्जनांचा समागम आहे तर अमृत कशाला पाहिजे? दुर्जनाशीं संबंध आहे तर कालकूटाचें काय प्रयोजन? दाते आहेत तर कल्पवृक्षांची काय गरज आहे? याचकापुढें तृणाची काय मातब्बरी आहे? प्रिया दृष्टीस पडली असतां कापराच्या कांडीनें डोळे किती गार होणार? संसाराच्या विचित्र पसाऱ्यापुढें गारुड्याचा खेळ झकमारतो!"

कलहांतानि हर्म्याणि कुवाक्यांतं च सौहृदं॥
कुराजानि राष्ट्राणि कुकर्मांतं यशो नृणां ५१९

"कलह लागला कीं घर बुडालें, दुर्वचनाचा प्रयोग झाला कीं मैत्री आटपली, वाईट राजा आला कीं राष्ट्राची इतिश्री समजावी, दुष्कर्म पडलें कीं अब्रू खालीं झाली!"

विनं परिमितमधिकव्यथतीतं पुरुषमाकुलीकुरुते॥
ऊनांशुकमिव पीनस्तनजघनाया: कुलीनाया: ५२०

"जो हाताचा सतत त्याला थोडा आदा असला क्षणाने फार पीडा होते; कीं ज्या मनाणें स्तन व जघन यांचा विस्तार कुलिन स्त्रियेस आखूड वस्त्रामुळें संकोचदायक होतो!"

मेनाचलेन सरसीरुहलोचनाया-
श्चान:मभूतपवनादुदये प्रदीप:॥
तेनैव सोऽस्तसमयेऽस्तमयं विनीत:।
कुद्धे विधौ भजति मित्रमपित्रभावं ५२१

"कमलाक्षीच्या त्या पदराच्या योगानें वाऱ्यापासून दीपाचें मयमत: संरक्षण झालें, तोच पदर पुढें त्याच मनाच्या योगविशेषास कारणीभूत झाला. नेहमीं दैव प्रतिकूळ झालें असतां मित्रही शत्रु बनतो!"

सहजमलिनवक्रभावभाजां। भवति भव: मभवात्मनाशहेतु:॥
जलधरपदवीमवाप्य धूमो। ज्वलनविनाशमनुप्रयाति नाशं ५२२

"जे स्वभावतःच मलिन व वक्र त्यांस उन्नति प्राप्त झाली असतां ते आपल्या जनित्याच्या नाशास कारणीभूत होतात: पहा कीं, धुम हा मेघ बनला कीं, अग्नीच्या उपशामास कारण होऊन नंतर स्वत: लय पावतो!"

कल्पवृक्षोऽपि कालेन भवेद्यदि फलप्रद:॥
को विदोषस्तदा तस्य वन्यैरन्यमहीरुहै: ५२३

"कल्पवृक्षही जर अवकाशानें फलप्रद होऊं लागला, तर मग त्याच्यांत व इतर रानवट झाडांत काय अंतर राहिलें?"

वरं दारिद्र्यमन्यायप्रभवाद्विभवादपि॥
शरीरे क्षतजा रम्या स्थूलता न तु रोगिणा ५२४

"अन्यायानें मिळवलेल्या वैभवापेक्षां दारिद्र्य बरें; जसें स्थूलत्वापेक्षां किंवा रक्तजलेल्या अंगापेक्षां सडपातळपणा बरा!"

अंतर्विशति मार्जारी श्वनी वा राजवेश्मनि॥
वहिस्थस्य गजेंद्रस्य किमर्धः परिहीयते ५२५

" मांजरी व कुत्री ह्या दोघी खुशाल राजवाड्यांत प्रवेश करतात; आणि हत्ती पाहिला तर त्यास जागा बाहेर! पण असें असल्यानें हत्तीचें काय कमी होत आहे?"

पीयूषेण सुरा श्रिया मुररिपुर्मर्यादया मेदिनी।
शक्रः कल्पतरुः शशांककलया श्रीशंकरस्तोषितः॥
मैनाकादिनगा निजोदरगृहे यत्नेन संरक्षिताः।
मज्जूलीकरणे घटोद्भवमुनिः केनापि नो वारितः ५२६

" समुद्रानें देवास अमृत दिलें, विष्णूस लक्ष्मीचें दान केलें, पृथ्वीस मर्यादा दिली, इंद्रास कल्पवृक्ष दिला, शंकरास चंद्राची कला देऊन संतुष्ट केलें आणि मैनाकादि पर्वतांस आपल्या उदराचे ठायीं ठाव दिला; पण ज्याचेकडेस अगस्त्यानें त्याला माराणार्थ अंजलींत घेतलें त्याचेकडेस वरच्यापैकीं एकानेंही त्याचें रक्षण केलें नाहीं!"

रत्नाकरे परिहृता वसतिः किमन्यत्।
अंगीकृतः कठिनवेधनदुःखभारः॥
वक्षोजकुंभपरिरंभणलोलुपेन ।
किं किं न तेन विहितं नवमौक्तिकेन ५२७

" मौक्तिकानें समुद्रांतली आपली वसती सोडून दिली; फार तर काय? पण वेधनसंस्काराचें महादुःखही सहन केलें! हें सर्व कशाकरतां? तर कुचकुंभपरिरंभणाविषयींची जी त्याची उत्कट इच्छा ती तृप्त करण्याकरतां!"

यथा देशस्तथा भाषा यथा राजा तथा प्रजा॥
यथा भूमिस्तथा नीरं यथा बीजं तथांकुरः ५२८

" जसा देश तशा भाषा; जसा राजा तशी प्रजा, जशी भूमि असेल तसें उदक असणार; आणि जसें बीं असेल त्या मानाचें झाड निपजणार!"

सद्यः फलति गांधर्वं मासमेकं पुराणकम् ॥
वेराः फलंति कालेषु ज्योतिर्वैद्यं निरंतरं ५२९

" गायनविद्या तत्काल फलद्रूप होते; पुराणाची माप्ति महिन्यानें होते; वेरांचें फल कालांतरानें दृष्टीस पडतें; माणि ज्योतिष व वैद्य हीं निरंतर लाभपर होतात!"

न देवाय न धर्माय न बंधुभ्यो न चार्थिने॥
दुर्जनेनार्जितं द्रव्यं भुज्यते राजतस्करैः ५३०

" दुर्जनानें मिळविलेलें द्रव्य देवकार्य, धर्मकृत्य, बंधुजन, किंवा याचक यांच्याकडे खर्च व्हावयाचें नाहीं; तर त्याचा उपभोग राजा किंवा तस्कर याजकडून व्हावयाचा!"

नैनः स्वयमुपभोक्ष्यसि मोक्ष्यसि वज्रजलद पत्रकुचापि॥
तत्किं नव न मुंचसि मुक्ता मुक्ता भवंति यत्रापः ५३१

" हे मेघा! जर हा जलसंचय तूं स्वतः उपभोगणार नाहींस असें नाहीं व कोठें तरी यदृच्छेनें टाकून देणार, तर त्या ठिकाणीं जलबिंदु सोडतें भवतीं ते मौक्तिकरूप होतात तेथें वर्षाऋतु संचयाचा तूं कां विनियोग करीत नाहींस?"

पाथोनिधिमधि पाथो विनरसि पाथोद किं तेन ॥
दिनकरकरभिनमे चातकपोतं न तोषयसि ॥ ५३२ ॥

" हे मेघा! तूं समुद्रावर वृष्टि करतोस, पण त्यापासून काय काम आहे? सूर्यकिरणापासून संताप पावलेल्या बालचातकास तूं कां संतुष्ट करीत नाहींस?"

सरलयोः किल सख्यमुदाहृतं। कुटिलयोर्घटनैव कदाचन ॥
यदि भवेत्सरलेन खलेन वा। न चिरमस्ति धनुःशरयोरिव ५३३

" खरें सख्य जें व्हावयाचें तें दोघां सरल स्वभावाच्या पुरुषांत होऊं शकतें; कधीं कधीं तें कुटिल स्वभावाच्या मनुष्यांतही सांपडतें. पण एक सरळ आणि एक सरळ अशांची संगति घडली असतां ती फार वेळ टिकत नाहीं; पाहा उदाहरण. कुटिल जें धनुष्य व सरळ जो बाण यांचें होय!"

राज्ये नहि सुखं दुःखं संधिविग्रहचिंतया ॥
पुत्रादपि भयं यत्र तत्र सौख्यं हि कीदृशं ५३४

" राज्यांत खरेखुरा सुखी नाहीं; निरंतर संधि (तह) व विग्रह (लढाई) यां-

ची चिंता असते. शिवाय जेथें मत्यक्ष पुत्रापासूनही भय वेथें करव तें काय?

छायामन्यस्य कुर्वंति स्वयं तिष्ठंति चातपे ॥
फलंति वै परार्थे च नात्मनोर्थे महाद्रुमाः ५३५

"मोठाले वृक्ष हे दुसऱ्या करता छाया करतात आणि स्वतः उन्हांत राहतात; तसेच केवळ दुसऱ्याकरतांच ते फलद्रूप होतात!"

कः कौ के कं कौ कान् हसति च हसतो हसंति तन्वंग्याः॥
दृष्ट्वा पल्लवमधरः पादौ पद्मे च कोरकान् दंताः॥ ५३६॥

"सुंदर स्त्रीचे कोणकोणते अवयव कोणकोणाला हंसतात? तर अधर पल्लवाला हंसतो, पाय कमलांस व दांत कळ्यांस!"

अंतस्तिमिरनाशाय शाब्दबोधो निरर्थकः॥
न नश्यति तमो नाम कृतया दीपवार्तया ५३७

"केवळ शाब्दिक बोधानें आंतलें अज्ञान नष्ट होत नाहीं; जसें 'दिवा दिवा' असा उच्चार केल्यानें अंधाराचा उजेड होत नाहीं!"

लोके कलंकमपहातुमयं मृगांको।
जानो मुखं तव पुनस्तिलकच्छलेन॥
तन्नापि कल्पयसि तन्वि कलंकरेखां।
नार्यः समाश्रितजनं हि कलंकयंति ५३८

"चंद्र हा आपणास जडलेला कलंक दूर व्हावा म्हणून मुखाच्या रूपानें मगट झाला; पण हे स्त्रिये! त्यासही पुनः गोंदण्याच्या मिषानें तूं कलंकित करतेस; तस्मात् ज्यानें तुझा आश्रय केला तो कलंकयुक्त व्हावयाचाच!"

वासः प्रधानं खलु योग्यता याः। वासो विहीनं विजहाति लक्ष्मीः॥
पीतांबरं वीक्ष्य हरौ ननूजां। दिगंबरं वीक्ष्य विषं समुद्रः॥५३९॥

"लोकांत मानमान्यता होण्यास वस्त्र हें प्रधान आहे; जो वस्त्रकळाहीन आहे त्याला लक्ष्मीचा लाभ दुरापास्त होय. पहा कीं, पीतांबर जो विष्णु त्याला

समुद्राने आपली कन्या अर्पण केली: आणि शिव हा केवळ दिगंबर, यास्तव त्यास विष दिलें।"

आनंद तांडवपुरे द्रविडस्य गेहे ।
चित्रं वसिष्ठघनिनाममभाज्यपात्रं ॥
विद्युल्लतेव परिनृत्यति नत्र दर्वी ।
धारां विलोकयति योगबलेन सिद्धः ५४०

" आनंदाचें वसतिस्थान असें जें द्रविडाचें घर त्याच्या घरीं तुपाचा तवंगी देणारी द्रोणी म्हणजे हात अरुंधतीच्या सारखी!* तींत पळी फिरवी खरवडत होती तर विद्युल्लतेसमाणें ! आणि तुपाची धार जी पानावर पडत होती ती सिद्धानेंच योगबलेंकरून पाहावी, इतरास अगोचर होय!"

स्वगृहे पूज्यते मूर्खः स्वग्रामे पूज्यते प्रभुः ॥
स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ५४१

" मूर्खास मान स्वतःच्या घरांतल्या घरांत, अधिकाऱ्यास त्याच्या गांवांत, राजास त्याच्या देशांत; परंतु विद्वानास तो जिकडे जाईल तिकडे!"

अर्थाहरण-कौशल्यं किंस्तुमः शास्त्रवादिनां ॥
अव्ययेभ्योऽपि ये चार्थान् निष्कास्यंति स्वनेकशः ५४२

" जे शास्त्रवेत्ते आहेत त्यांची अर्थनिष्पादनाविषयीं जी निपुणता असते ती काय सांगावी! प्रत्यक्ष अव्ययांपासूनही ते अर्थ काढूं शकतात!" या श्लोकांत 'अर्थ' व 'व्यय' हे स्वर्थी शब्द होत हें उघडच आहे.

वक्त्रं पूर्णशशी सुधाधरलता दंता मणिश्रेणयः।
कांतिः श्रीर्गमनं गजः परिमलस्ते पारिजातद्रुमः ॥
वाणी कामदुघा कटाक्षलहरी नत्कालकूटं विषं ।
मन्ये सुंदरि हा श्रमाय मथितो मूढैः सुरैः सागरः ५४३

---

* समर्थांचे उत्तरकडे जे उडुप नांव आहे त्यांतील महादा वसिष्ठ, त्याच्या ज्योतारी अरुंधती वगैरे कुरकुडत असले. ही दिसेनाशी झाली म्हणजे साठा महिन्यांनी मनुष्य परतें हा एक लौकिक कल्पना आहे हें आमच्या वाचकांस माहीत असेलच!

" मुख हें पूर्णचंद्र होय, अधरपल्लव हा सुधामय, दांतांची पंक्ति ही जणूं रत्नेंच होत, शरीरसौंदर्य हें लक्ष्मी होय, गजगति गमनाचे ठायीं आहे, निःश्वासाचे ठायीं पारिजाताचा सुवास अधिष्ठित आहे, वाणी केवळ कामधेनूच आणि कटाक्ष हे कालकूटतुल्य होत;— मग इतकें सर्व आयतें सिद्ध असतां जेव्हां देवांनीं समुद्रमंथनाचा येवढा खटाटोप केला तेव्हां ते मूर्ख नव्हेत?"

इंदुं निंदति चक्रवाकयुगुलं भासांनिधिं कौशिकः।
स्वादु क्षीरमरोचकी सुकृतिनं पापी जडः पंडितम्॥
त्यक्तं सर्वजनैः खलः कटुवचा ग्राम्यः पुमान्नागरं ।
कः पैतामहगोलकेऽत्र निखिलैः संमानितो वर्तते ५४४

" चक्रवाकांचा जोडा चंद्रास निंदतो, दिवाभीत सूर्याचा धिक्कार करतें, ज्याच्या तोंडाला रुचि नाहीं तो मधुर जें दुग्ध त्यास नांव ठेवतो. पापी पुण्यवंताची व मूर्ख पंडिताची निंदा करतो, कटुभाषण करणारा जो खल तो सर्वसंगपरित्याग केलेत्यास दोष देतो आणि गांवढळ मनुष्य शहरवासी पुरुषास वाईट म्हणतो;— तेव्हां या ब्रह्मांडगोलांत सर्वांनीं संमानित असा कोण आहे बरें?"

श्रिया गेहे मयाऽरण्ये रामस्त्यक्तस्त्वया पथि॥
वनमुद्रे पुरंध्रीणां प्रत्ययं कः करिष्यति ५४५

सीता हनुमंतानें खाली टाकलेल्या मुद्रिकेकडे पाहून खेदानें म्हणते:—

" हे मुद्रे! राज्यलक्ष्मीनें रामाला गृहींच सोडिलें, मीं त्यास वनांत टाकून दिलें, आणि तूं त्यास मार्गांत सोडून आलीस; तेव्हां आतां स्त्रियांवर कोण विश्वास ठेवील?

तुंगपीनकुचकुंभशोभिता-दूरसंस्खलितचैलपल्लवाः ॥
वेणुनादहृतचित्तवृत्तयः। चित्रवच्चलदृशोऽवतस्थिरे॥५४६॥

" मुरलीच्या नादानें ज्यांच्या चित्तवृत्ति हरण झाल्या आहेत आणि उत्तुंग व पुष्ट अशा कुचकुंभांवरून स्खलित झालेल्या पल्लवाचें ज्यास भान राहिलें नाहीं, अशा गोपी चित्रासारख्या तटस्थ उभ्या राहिल्या!"

किं तुलसि मया सि मतीच्छ मुग्धे च्युतं त्वलंकारम् ॥
मृगयाम्यच्युतमेव त्वद्दैरेतैर्न मे हानिः॥ ५४७ ॥

"हे मुग्धे! येवढ्या घाईनें काय चालली स? हा तुझा दागिना गडून परता. तरी त्याची तुला शुद्ध नाहीं काय?" ती उत्तर करते "मी मुळीं अच्युताच्याच" शापांत आहे: हे दागिने किती ही सांडले तरी मला त्यांची पर्वा नाहीं!"

अहंकारो धियं ब्रूते मा सुप्तं प्रतिबोधय ॥
उदिते परमानंदे नत्वं नाहं नवै जगत् ५४८

"अहंकार बुद्धीस सांगतो कीं, आत्मज्ञान जन्य जो परमानंद त्यास जागा करूं नको: तो जागा झाला कीं, मी तूं व जगत् हीं तिन्ही नष्ट होऊन जातील!"

केचिन्निद्रागता: केचित्कथयंति बहिर्गता:॥
केचिदंतर्गता: केचिन्नो जानेऽकृता इति ५४९

कोणा एकाद्या थोर मनुष्याच्या भेटीला कोणी गरीब मनुष्य गेला असतां त्याची हेटाळणी येणेप्रमाणें चालते:— "कोणी म्हणतात, यजमान निजले आहेत; कोणी सांगतात. बाहेर गेले आहेत म्हणून; कोणी म्हणतात, आंत कामांत आहेत: आणि कोणी मुळींच कानावर हात ठेवतात!"

सीताचिंताकुले रामे निद्रा निरगमद्दुषा ॥
कथमेकाकिनं जह्यामित्येवं न जहौ निशा ५५०

"रामास सीतेविषयीं चिंतातुर पाहून निद्रा ही सवतीमत्सरानें निघून गेली; आणि रात्रीस वाटलें कीं, हा अगोदरच विरहातुर झाला आहे, तर याला एकट्याला सोडून कसें जावें? म्हणून तीही जाईना." सारांश, रामास सीताविरहापुढें झोंप येईना व कांहीं केल्या रात्रही जाईना!

देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ॥
तत्त्वबुद्ध्या त्वमेवाहमिति मे निश्चिता मतिः ५५१

कोणी अद्वैतवादी परमेश्वरास म्हणतो:— "देहबुद्धीनें पाहतां मी तुझा दास आहे, जीवबुद्धीनें पाहतां तुझा अंश आहे. आणि तत्त्वबुद्धीनें पाहतां मी आणि तूं स्वरूपतः एकच आहोंत, असा मी सिद्धांत करून ठेवला आहे."

'अच्युत' म्हणजे 'न सांडणारा', यावरून 'कृष्ण'!

हे हेमकार परदुःखविचारमूढ ।
किं मां मुहुः क्षिपसि वारशतानि वह्नौ ।।
दग्धे पुनर्मयि भवंति गुणा निरेका ।
लाभः परं खलु मुखे तव भस्मपातः ५५२

"हे सुवर्णकारा! तूं परदुःखाविषयीं केवळ निश्चिंत आहेस. तूं मला शंभर दां अग्नींत कां टाकतोस? त्याच्या योगानें काय होतें आहे, कीं माझ्या ठायीं अधिकाधिक गुण उत्पन्न होत आहेत, पण तुला स्वतःला लाभ झटला म्हणजे तोंडांतरख जात आहे येवढाच काय तो!"

ईशो पदमणयभाजि मुहूर्त्तमात्रं ।
माणप्रियेऽपि कुरु मानिनि या मसादं ।।
जानातु मत्प्रभुरसौ पदयोर्नताना-।
मस्माद्दशामिव मनोरथभंगदुःखं ५५३

कोणी कवि लक्ष्मीस म्हणतो:—"प्रभूनें तुझ्या पायांवर मस्तक ठेवलें असतां घटकाभर मन घट्ट करून तूं तसाच कोप धारण कर; असें केलें असतां माझ्यासारख्या भक्तजनांचा मनोरथभंग केला असतां कसें दुःख होतें हें तरी अंमळ राजश्रीस कळूं दे!"

गुणिनि गुणज्ञो रमते नागुणशीलस्य गुणिनि परितोषः।।
अलिरेति वनात्कमलं न दर्दुरस्त्वेकवासोऽपि।। ५५४।।

"जो गुणज्ञ असतो त्यास गुणिजनाच्या सहवासापासून आनंद होतो; व ज्याला गुणाची परीक्षा नाहीं त्याला त्याची पर्वाही नसते. कसे? तर भ्रमर हा वनांतून कमलाकडे झेंप घेऊन आदरून येतो; आणि नित्य ज्याचा त्याशींसहवास असा जो मंडूक त्याच्या कधीं ध्यानींमनींही तो गोष्ट येत नाहीं!"

सरसो विपरीतश्चेत्सरसत्वं न मुंचति ॥
सारसा विपरीतश्चेद्रासस्था एवकेवलं ५५५

तो सरस (रसिक) आहे तो विपरीत झाला तरी त्याचें सरसत्व जात नाहीं; पण जे दुसते सारस ('ज्ञानलव दुर्विदग्ध') आहेत ते विपरीत झाले असता

तां केवळ राक्षस बनवान!" पक्षी, 'सरस' या शब्दाचा विपर्यय 'रसस'-हाच होय; व 'साक्षरा:' याचा विपर्यय 'राक्षसा:' असा होतो.

उत्कृष्टमध्यमनिकृष्टजनेषु मैत्री।
पद्मच्छिलासु सिकतासु जलेषु रेखा॥
वैरं क्रमाद्धममध्यमसज्जनानां।
पद्मच्छिलासु सिकतासु जलेषु रेखा ५५६

"उत्तम, मध्यम आणि निकृष्ट लोकांशी सख्य हें शिलेवर, वालूवर आणि पाण्यावर काढलेल्या रेषेप्रमाणें आहे; आणि त्याशीं वैर हें वरच्याच्या विपरीत क्रमाक्रमाणें दृष्टीस पडतें!"

यन्मनीषिपदांभोजरजःकणपवित्रितम्॥
तदेव भवनं नो चेद्वकारस्तत्र लुप्यते ५५७

"जें गृह विद्वज्जनांच्या चरणरजांनीं पवित्रित झालेलें नेत्र भवन, नाहीं तर 'भवन' शब्दांतला भकार काढून टाकावा!"

क्व सरसि वनखंडं पंकजानां क्व सूर्यः।
क्व च कुमुदवनानां कौमुदीबंधुरिंदुः॥
चिरपरिचयबंधा प्रायशः सज्जनानां।
नहि विचलति मैत्री दूरतोऽपि स्थितानां ५५८

"सरोवरांत असणारा कमलांचा समुदाय कोठें आणि सूर्य कोठें? कुमुदां-चें वन कोणीकडे आणि चंद्र कोणीकडे! तेव्हां चिरपरिचयाच्या योगेंकरून ह्द झालेला जी सज्जनांची मैत्री ती दूर असल्यानेंही विकार पावत नाहीं!"

अपराधादधिकं मां व्यथयति नवकपटरचनेयम्॥
शास्त्राघातो न तथा सूचीक्षतवेदना यादृक् ५५९

"तूं माझा अपराध केलास यापेक्षां मला इतकें वाईट वाटत नाहीं, पण तुझ्या कपटप्रयोगाचा फार संताप येतो; शास्त्राचा घाव तितकी वेदना देत नाहीं, कीं जि-तकी वेदना सुईच्या टोंचण्यानें होते!"

पश्यात्र नलिनीपत्रे बलाका परिदृश्यते ॥
हरिन्मणिमये पात्रे मुक्तिकेव प्रतिष्ठिता ५६०

"कमलपत्रामध्यें ही बगळी पहा कशी शोभते आहे, कीं जशी पाचेच्या भांड्यावर बिंबठेवावी तशी!"

किटिस्तु धरणीधरः कति न संति भूदारकाः ।
गिरिस्तु कनकाचलः कति न संति भूभारकाः ॥
मरुत्तु मलयानिलः कति न संति झंझानिलाः ।
प्रभुस्तु विबुधाश्रयः कतिन संति कुक्षिंभराः ५६१

"वराह हाच एक धरणीधर होय, नाहीं तर भूमीस विदारणारे डुकर काय थोडे आहेत? पर्वतांत पर्वत मेरु हाच होय, नाहीं तर भूभारभूत असे पुष्कळ आहेत! मलयानिल हाच वायु होय, नाहीं तर झंझावात काय थोडे आहेत? तसेंच, जो पंडितांस आश्रय देतो तोच प्रभु म्हणावा; नाहीं तर उदरंभरि राजे पुष्कळ आहेत!"

रवेरस्तं तेजः समुदयति खद्योतपटली ।
मरालाली मूका कलकलमुलूका विदधते ॥
इदं कष्टं द्रष्टुं सुचिरसहमानांबुजवती ।
मिलद्भृंगव्याजात्कवलयति हालाहलमहो ५६२

"सूर्याचें तेज अस्तंगत झालें आणि काजव्यांची मंडळी चमकूं लागली, हंसांचें कूजित बंद झालें आणि दिवाभीत शब्द करायाला लागले, ही परम शोचनीय स्थिति न साहून शुद्ध जी कमलिनी ती भ्रमरांच्या मिषानें जणों काय विषप्राशन करीत आहेशी भासते!"

गतः सकालो यभासन् देवाः सेवानुवर्त्तिनः॥
दशानन दशां पश्य तरंति तृणरोऽभसि ५६३

"हे रावणा! ज्याकाळीं सत्यस्थ देव हे तुझे सेवक झाले होते तो काळ गेला; आतांच्या काळाचा महिमा पहा, कीं पाण्यावर दगड तरूं लागले आहेत!"

काकैः सह विरुद्धस्य कोकिलस्य कलागिरः॥

खलसंगेऽपि नैष्ठुर्यं कल्याणः मलतेः कुतः ५६४

" काकांचा आणि कोकिळाचा जरी विरोध आहे तरी कोकिळानें मधुरवाणी टाकली आहे कीं काय? नाहीं. खलांचा संसर्ग घडला असतांही कल्याणमनुष्य निष्ठुरत्व धारण करीत नाहीं! "

सखे साहजिकं प्रेम दूरादपि विजायते ॥
चकोरीनयनद्वंद्वमानंदयति चंद्रमाः॥५६५॥

" हे मित्रा! साहजिक जें प्रेम तें दूर अंतरावरूनहीं जडतें; पहा. चकोरीच्या नेत्रयुग्मास आकाशस्थ चंद्र आल्हाद देतो! "

किं तया सुमहत्यापि श्रिया देशांतरस्थया ॥
रिपवो यां न पश्यंति सुहृद्भिर्यां न भुज्यते॥५६६॥

" दूरच्या देशांत असलेल्या संपत्तीचा काय उपयोग? कीं जी पाहून शत्रु झुरत नाहींत आणि मित्र जिचा उपभोग घेत नाहींत! "

सौहार्दस्वर्णरेखाणामुच्चावचभिदाजुषां ॥
परीक्षमिनि कोऽप्यस्ति परीक्षानिकषोपलः ५६७

" मैत्रीरूप भिन्नभिन्न स्नेहवर्णरेखांची परीक्षा करण्याचा एक मोठा उत्कृष्ट निकष आहे; तो कोणता? नर परोक्ष! " म्हणजे कोणाचें आपणावर किती प्रेम आहे हें परोक्ष आपणावरून नेहमींच कळतें!

द्यूते पणः मणयकेलिषु कंठपाशाः ।
क्रीडापरिश्रमहरव्यजनं रतांते ॥
शय्या निशीथसमये जनकात्मजायाः
मांसं मया विधिवदादिदमुत्तरीयं ५६८

" जें सीतेचें उत्तरीय (शेला) द्यूताचे वेळेस पण लावापास उपयोगी पडत असे, मणयक्रीडेचे वेळीं जें कंठपाश होत होतें, रतिसंभोगानंतर जें श्रमपरिहार करणारें व्यजन होत होतें आणि मध्यरात्रीं प्रसंगवशात् शय्याही होत असे, तें आज मला सुरेकें-

करून मात्र झालें !"

दातुरापत्ति संभ्रान्तौ याचके समुपस्थिते॥
नास्तीति वाग्जीवितयोर्बहिर्निःसरणे रणः ५६९

" याचक याचना कराया ला आला आणि दात्याला तर आपत्ति मात्र झाली, तेव्हां 'नाहीं' म्हणतांना दात्याच्या जीविताचा आणि वाणीचा झगडा होतो; म्हणजे वरील शब्द उच्चारणें त्यास मरणप्राय होऊन जातें !"

मौखर्यं लाघवकरं मौनमुन्नतिकारकम्॥
मुखरं नूपुरं पादे कंठे हारो विराजते ५७०

" वाचाळपणा हा लघुत्व आणणारा आहे आणि मौन हें उन्नति देणारें आहे; पहा कीं, निरंतर शब्द करणारीं जीं नूपुरें त्यांचें अधिष्ठान पायांवर आणि मुका जो मौक्तिकहार तो कंठाचे ठायीं धारण केला जातो !"

त्वयि वर्षति पर्जन्ये सर्वे पल्लविता द्रुमाः॥
अस्माकमर्कवृक्षाणां जीर्णे पत्रेऽपि संशयः ५७१

" हे पर्जन्या ! तूं वृष्टि केली असतां सारे वृक्ष पल्लवित झाले: पण आह्मी जे अर्कवृक्ष (रुई) त्या आह्मांस जीर्णपत्राविषयीं शंका वाटत आहे !"

जिह्वे प्रमाणं जानीहि भोजने भाषणेऽपि च॥
अतिभुक्तिरतीवोक्तिः सद्यः प्राणापहारिणी ५७२

" हे जिव्हे ! भोजन व भाषण या दोहोंतही परिमित असत जा; का कीं, अतिभोजन व अतिभाषण हीं दोन्हीं तात्काल प्राणहरण करणारीं होत !" म्हणजे मर्यादा सोडून दोन्हींही केलीं असतां घात होतो !

संचारिणी कांचनवल्लरीव । विद्युल्लता वा पतिता नभस्तः॥
घृतस्य धारा पतिता न जाने । दिव्यंगना वाथ भुवंगना वा ५७३

कोणी विनोदी कवि तुपाच्या धारेचें वर्णन करतो:— " ही धार इतकी चंचल आहे कीं, जणों काय हलणारी सुवर्णवल्लीच, किंवा आकाशांतून पडलेली विफल्ल-

नाच; शिवाय तिचें रूप इतकें सूक्ष्म आहे कीं, ती पहली केव्हां वोही समजली नाही; मला तर अमावास्या क्षय झाला कीं, ती आकाशांत गुप्त झाली किंवा भूमींत गडप झाली. कोण जाणे!"

नेपथ्यादपि राजते हि नितरां व्यालुप्त भूषाननं।
संभोगश्रममीलितं विजयते चक्षुः कटाक्षादपि॥
गाढालिंगनकौतुकादपि नवं दोर्वल्लिविस्रंजनं।
मत्यालापरसादपि प्रियतरं मौनं कुरंगीदृशः ५७४

"रतिप्रसंगेंकरून ज्याचरची पत्रादिरचना विलुप्त झालेली आहे असें मुख पहिल्यापरीस अधिक खुलतें, संभोगश्रमास्तव निमीलित झालेलीं नेत्रें कटाक्षाहून अधिक शोभा देतात, गाढालिंगनाच्या सुखापेक्षां बाहूंचें शिथिलत्व हें विशेष रमणीय वाटतें आणि मत्प्रलापापेक्षांही श्रांतताजन्य जें मौन तें प्रियकर होतें!"

सरसिरुहोदरसुकुमारावधरिनबिंबाधरे मृगाक्षि तव।
वदवदने मणिरदने तांबूलं केन लक्षयाम वयं॥ ५७५॥

"हे मृगनयने! कमलाच्या गाभ्याप्रमाणें सुकुमार आणि तांबड्याचा गर्व हरण करणारा ज्याचा अधरोष्ठ आहे, तसेंच ज्यांतील दंतपंक्ति रत्नांप्रमाणें झळकते, अशा तुझ्या मुखाचे ठायीं तांबूल आहे कीं नाहीं हें आम्हीं कशावरून ओळखावें?" ह्मणजे तांबूलाच्या योगानें प्राप्त होणारे जे धर्म,—सुवास, अधररक्तिमा, आणि दंतमुक्तता,— ते तुझ्या ठायीं स्वभावसिद्धच आहेत; तेव्हां अर्थीनच तांबूलचर्वण हें पुनरुक्त होय!

गुरुषु मिलितेषु शिरसा प्रणमसि लघुभूतना समेषु समा॥
उचितज्ञासि तुले किं तुलयसि गुंजाफलैः कनकम॥ ५७६॥

"हे तुले! गुरूंशीं तूं नम्रभाव प्रगट करतेस, लघूंशीं उन्मतेनें वागतेस आणि सामान्यांशीं बरोबरीनें राहतेस, ही तुझी उचितज्ञता प्रशंसा करण्यासारखी आहे खरी; पण गुंजेची आणि सोन्याची तुलना करतेस हें किती असमंजस आहे!"

ग्रंथिलतया किमिक्षोः किमपभ्रंशेन भवति गीतस्य॥
किमनार्जवेन भाविनः किं दारिद्र्येण दयितस्य॥ ५७७

"ऊंस गांठ्याळ असला ह्मणून काय झालें? गाण्यांत वर्णापभ्रंश झाला ह्मणून माधुर्याचा काय हानि आहे? चंद्राची कोर वांकडी असली ह्मणून काय बिघडलें? वल्लभाच्या दारिद्र्यास्तव अनुरक्त स्त्रीचा प्रेमा उडेल काय?"

अप्युन्मादात्प्रलपनो बलाच्च परिजल्पनः॥
सर्वतः सारमादद्यादश्मभ्य इव कांचनं ५७८

"उन्मत्त भाषण करणारापासून किंवा मोठ्या कष्टानें जो बोलनो त्यापासून सार काढून घेत असावें; कसें? तर दगडांतून सोनें काढनाराप्रमाणें!"

किंपुष्पं किं फलं चास्य करीरस्य महात्मनः॥
येन वृद्धिं समासाद्य न कृतः पत्रसंग्रहः ५७९

"या महात्म्या करीराची काय थोरवी सांगावी? कीं ज्यानें वृद्धीसमयीं मुसना पत्रांचाही संग्रह केला नाहीं; मग पुष्पाची किंवा फलाची गोष्ट तर दूरच!"

पुराणांते श्मशानांते मैथुनांते च या मतिः॥
सा मतिः सर्वदा चेत्स्यात्को न मुच्येत बंधनात् ५८०

"पुराणश्रवणानंतर, श्मशानयानाच्या नंतर आणि मैथुनावसानीं जी मनाची स्थिति होते ती जर सदोदित राहील, तर संसारबंधनापासून कोण मुक्त होणार नाहीं?"

दूरस्थाः पर्वता रम्या वेश्या च मुखमंडने॥
युद्धस्य वार्ता रम्या च त्रीणि रम्याणि दूरतः ५८१

"डोंगर दुरून साजरे, वेश्येचें रमणीयत्व नेवदें चेहेरेपट्टीवर पाहून घ्यावें, आणि युद्धाची वार्ता मात्र रम्य; या तिहींचा साक्षात् प्रसंग करण्याच्या भरीस कोणी पडूं नये!"

नास्त्यलसस्याध्यवसायवीरः करोति विज्ञाननिधिर्गुणं हि॥

अंधस्य किं हस्ततलस्थितोऽपि। मकाशयत्यर्थमिह प्रदीपः ५८५

"ज्याला छाति करून दाखविण्याचा दम नाही त्याच्यापाशीं केवळ ज्ञानाचें मोठें कोठारही जरी असलें तरी त्यापासून कांहीं निष्पन्न होणार नाहीं. पहा कीं. अंधळ्यानें आपल्या हातावर जरी दिवा घेतला असला तरी त्यापासून त्यास पदार्थ-दर्शन होणार आहे काय?"

अजनमरुतः श्वासश्रेणीमिमामुपचिन्वते।
मलयजरसो धाराबाष्पं प्रपंचयितुं प्रभुः ॥
कुसुमशयनं कामास्त्राणां करोति सहायतां।
द्विगुणगरिमा कामोन्माथः कथं नु विरंस्यति ५८६

"विंझण्याचा वारा हा निश्वासवातास वाढवितो. चंदनाचा रस हा अश्रुधारां चीं वृद्धि करतो आणि पुष्पशय्या ही कामायुधांस साह्य मात्र होते; मग अशा योगानें कामाची बाधा ही दुणावली असतां ती दूर कशी व्हावी?"

आदाय वारि परितः सरितां मुखेभ्यः।
किं नावदर्जितमनेन दुरर्णवेन ॥
क्षारीकृतं च वडवादहने हुतं च।
पातालकुक्षिकुहरे विनिवेशितं च ५८७

"चोहोंकडून नद्यांच्या मुखांपासून जलौघ घेऊन दुष्ट समुद्रानें काय मिळविलें बरें? येवढें मात्र केलें कीं, मूळचें गोडें पाणी होतें तें खारट करून टाकलें, कांहीं वडवाग्नीच्या मुखीं घातलें आणि कांहीं पातालाच्या खबदाडींत नेऊन दिलें!"

शक्तादरक्षि यदि पक्षियुगं तथापि।
मैनाक संनिधव नेह गतागतानि ॥
निःसत्त्वता च निरपत्रपता च किंतु।
पाथोनिधौ निवसता भवतार्जितानि ५८८

"हे मैनाका! तुला समुद्रानें आपल्या पोटांत घेतल्यामुळें तुझ्या पंखांचा बचाव झाला हें खरें; पण पूर्वीप्रमाणें आतां तुला आकाशांत संचार कोठें करतां येतो आहे?

स्वामभाणेंच सागराश्रय केल्यानें तुझें दुर्बलत्व व निर्लज्जत्व जगत्प्रसिद्ध झालें हें तूं कसें जाणत नाहींस ?

तृषां धरा याः समयत्यशेषां। यः सोऽबुदो गर्जति गर्जतूच्चैः॥
यस्त्वेष कस्यापि न हंति तृष्णां। स किं वृथा गर्जति निस्त्रपोऽब्धिः ५८९

"जो मेघ पृथ्वीची सारी तृषा शमविनो तो गर्जनो हें ठीकच आहे, तो खुशाल मोठ्यानें गर्जना करो: पण जो अदत्त कोणाचीही तहान भागवीन नाहीं तो समुद्र निर्लज्जासमाणें व्यर्थ गाजनो हें काय?"

क्रौंचः क्रीडतु कुर्दना च कुररःकंकः परिष्वज्यतां।
मद्गुर्मोद्यतु सारसश्च रसतु मोड्डीयतां टिट्टिभः॥
भेकाः संतु बका वसंतु चरतु स्वच्छंदमाटिस्तटे ।
हंहो पद्मसरः कुतः कतिपयैर्हंसैर्विना भ्राजसे ५९०

"हे पद्मसरोवरा! तुझेठायीं क्रौंच हा क्रीडा करो, कुरर खिदळो, कंक तुला आलिंगन देवो, मद्गु तुझ्या उदकाचें सेवन करून मत्त होवो, सारस शब्द करो, टिट्टिभ उडो, बेडूक व बगळे हे तुझ्या आश्रयानें असोत व आटि हा तुझ्या तीरीं स्वच्छंदेंकरून विहार करो; पण हें सर्व असूनही कांहीं हंस जर तुझ्याजवळ नाहींत तर तुला कोठली शोभा?"

यावद्यावद्वर्धति कलया पूर्णकामः शशांक-।
स्तावत्तावद् द्युतिमयवपुः क्षीयते सा मृगाक्षी॥
मन्ये धाता घटयति विधुं सारमादाय तस्या-।
स्तस्माद्यावन्न भवति सखे पूर्णिमा तावदेहि ५९१

"चंद्राची एकेक कळा जों जों वाढत जाते तों तों मृगनयनेच्या कांतिमय शरीराचा ह्रास होतांना दृष्टीस पडतो, यावरून असें वाटतें कीं ब्रह्मदेव हा तिच्या शरीरलावण्यापासून चंद्रास निर्माण करतो; तर हे मित्रा! जोंवर पूर्णिमा दूर आहे तोंवर तूं तिला जाऊन भेट!"

संचारो रतिमंदिरावधि सखीकर्णावधि व्याहृतं ।
श्वेतः कांतसमागमावधि महामानोऽपि मौनावधि॥

हास्यं चाधरपल्लवावधि पदन्यासावधि प्रेक्षितं ।
सर्वं मावधि नावधिः कुलस्त्रियां प्रेम्णः परं केवलं ५९२

"कुलस्त्रियांचा संचार स्वतःला म्हणजे गृहमंदिरापर्यंत, भाषण सखीच्या कानीं पडे तोंपर्यंत, मनाचा व्यापार पतिवांछित जाणण्यापर्यंत, अनिशापित मान स्वतःला म्हणजे मौनधारण, हसणें अधरपल्लवावेरी आणि पाहणें पाऊल टाकण्यापर्यंत: एका गोष्टीस मात्र त्यांच्या ठायीं मर्यादा नाहीं. ती गोष्ट कोणती? तर पतिविषयक प्रेम!"

सत्यमेव गदितं त्वया विभो। जीव एक इति यत्पुरावयोः॥
अन्यदारनिहिता नखव्रणा-स्त्वावके वपुषि पीडयंति मां ५९३

"हे प्राणनाथा! आपण जें मला सांगितलें कीं तुझा व माझा देह हे एकच आहेत हें सर्वथा खरें आहे. यास मत्यंतर पडा कीं, अन्यस्त्रीनें आपल्या ठायीं केलेलीं नखक्षतें तिच्या विकारीं मला येऊन टोचलीं!"

विप्रियमप्याकर्ण्य ब्रूते प्रियमेव सर्वदा सज्जनः ॥
क्षारं पिबति पयोधेर्वर्षत्यंभोधरो मधुरमंभः ५९४

"सज्जन पुरुष अप्रिय भाषण श्रवण करूनही नेहमीं प्रियच बोलत असतात: ज्याप्रमाणें मेघ हा समुद्राचें क्षारोदक पीऊन मधुर जलाचाच वर्षाव करतो!"

मेरुर्दूरगतो महान् हिमगिरिः प्रालेयमाचोऽभवत्।
चंद्रः श्रीसहितोऽपि याचकभयात्क्षीणत्वमालंबते॥
कौपीनं धृतवान् हरोऽपि सहसा विष्णुर्जले संस्थितो।
वारां राशिरपेयतामुपगतः को नाम दातुं क्षमः ५९५

"मेरु याचकांस भिऊन दूर सरला, हिमालय हिमाच्छादित होऊन बसला, चंद्र हा लक्ष्मीयुक्त खरा, पण तोही वरील भयानें क्षीण झाला, शिवानें कौपीन धारण केलें. विष्णु पाण्यांत जाऊन दडला आणि समुद्र हा अपेय झाला, तेव्हां यांनां दाता उरला तरी कोण?"

कृष्णा ते कचसंहतिरंजुजनयने नखाधरः शोणः ॥

त्वं सुरतरंगिणी कथमभिनस्तापी न ते वियोगः स्यात् ५९६

" हे कमलनयने ! तुझी वेणी ही कृष्णा (नदीविशेष; पक्षी, काढी) आहे; तुझा अधरोष्ठ हा शोण (नदविशेष; पक्षी. आरक्त) आहे आणि तूं स्वतः सुरतरंगिणी- (देवनदी; पक्षी, कामिनी) आहेस; मग तुझा वियोग हा तापी (नदविशेष; पक्षी. ताप देणारा) कसा नसेल ? "

स्निग्धमालप सुरुक्षमेव वा । त्वत्कथैव सखि मे रसायनम् ॥
शीतलं सलिलमुष्णमेव वा । पावकं हि शमयेदसंशयम् ५९७

" हे सखि ! तूं गोड बोल किंवा कठोर भाषण कर; तुझें भाषण हेंच मला आल्हाद देते. पहा कीं, उदक हें थंड असो अगर ऊन असो, नें अग्नीचा उपशम करणारच ! "

रुक्मध्ये वाग्भंगैर्वचनविधिमंगी कुरु नवा ।
स्मितज्योत्स्नाकांतं कुरु वदनमेतन्मयि नवा ॥
त्रिलोकीमूर्द्धन्या यदि विविध पुण्याधिकतया ।
मया दृष्टासि त्वं तदिह सफलं मेऽजनि जनुः ५९८

" हे सिंहमध्ये ! तूं कुटिलोक्तीचें भाषण कर अथवा न कर; किंवा मजकडे पाहून स्मितचंद्रिकेनें विराजमान असें मुख कर किंवा करूं नको; माझें जन्म घेतल्यानेंच सफल झालें, कीं त्रैलोक्यांत सौंदर्यानें श्रेष्ठ अशी जी तूं ती माझ्या विविध पुण्यांच्या कमाईनें आज माझ्या दृष्टीस पडलीस ! "

भानुबिंबमिदमस्तगामि च । सोदयं कुमुदबंधुमंडलम् ॥
दृश्यते रतिपतेः प्रवासिनां । क्रोधरक्तमिव लोचनद्वयम् ५९९

" एकीकडे अस्तास जाणाऱ्या सूर्याचें बिंब व दुसरीकडे उदय पावणारें चंद्रबिंब दिसत आहे; हीं प्रवासिजनांस रतिपतीचीं दोन आरक्त झालेलीं नयनेंच काय अशीं भासवात ! "

सहते वारवधूपतानाजानेषः कथां नैव ॥
सहते विपत्सहस्रं मानी नैवापमानलेशमपि ६००

"जातिवंत घोडा हा रणांगणावर शेंकडों बाणांचे घाव सहन करतो, पण चाबकाचा फटकारा त्यास बिलकुल सहन होत नसतो; नसेंच जो मानी आहे तो हजारों विपत्तींस दाद देत नाहीं, पण कोणाचें फट शब्दलेलें त्यास खपत नाहीं!"

हृदतरगलकनिबंधः कूपनिपातोऽपि कलश ते धन्यः॥
यज्जीवनदानैस्त्वं नर्षामर्षं नृणां हरसि ॥ ६०१ ॥

"हे कलशा! तुझ्या मानेला फांस लावून लोक तुला विहिरींत टकलून देतात असें जरी आहे तरी तूं धन्य आहेस; कां कीं तृषेनें पीडलेल्यांस तूं जीवनाचें दान करतोस!"

प्राप्य प्रमाणपदवीं को नामास्ते तुलेऽक्षेपस्ते ॥
नयसि गरिष्ठमधस्तान्तदितरमुच्चैस्तरां कुरुषे॥ ६०२॥

"हे तुले! तुला सर्व लोक प्रमाण समजूं लागले येवढ्यानें तुझ्या अंगीं हा केवढा ताठा आला पहा! कीं वजनदाराचें पारडें खालीं बसवून हलक्यास तूं उंच पदवीला पोंचविते स!"

को हि तुलामधिरोहति शुचिना दुग्धेन सहज मधुरेण॥
तप्तं विक्लवं मथितं तथापि यत्स्नेहमुद्विरति॥ ६०३॥

"स्वभावेंकरून मधुर जें दुग्ध त्याची सर कोणास येणार आहे? पहा कीं, तापविलें, न्यांत विरजण घातलें, त्याचें मथन केलें, तरी लोणी कायं? स्नेहाचा (लोण्याचा) च आविर्भाव करते!"

जगति विदितमेतत्काष्ठमेवासि नूनं ।
तदपिच किल सत्यं कानने वर्धितोऽसि ॥
नवकुवलयनेत्रीपाणिसंगोत्सवेऽस्मिन् ।
मुसल किसलयं ते तत्क्षणाद्यत्न जातं ६०४

"हे मुसळा! साऱ्या जगास माहितच आहे कीं तूं काष्ठ आहेस, शिवाय तूं मुळींच अरण्यांत वाढलेलें आहेस; तेव्हां या नवकुवलयनेत्रीच्या करस्पर्शाचा महालाभ तुला झाला असतां तुला जे तत्क्षणीं अंकुर फुटले नाहींत तें ठीकच आहे!"

मेकेन क्वणता सरोषपरुषं चल्लष्णसर्पात्मने।

दातुं कर्णचपेटमुल्लसितभिया हस्तःसमुल्लासितः।।
यच्चाधोमुखभस्मिणी विदधता नागेन तूष्णीं स्थितं।
तत्सर्वं विषमंत्रिणो भगवतः कस्यापि लीलायितं ६०५

"कृष्णसर्पावर रागानें जळफळून वर त्यास टाकून बोलून त्याच्या मुसकाडींत देण्याकरतां बेडकानें जो बेलाशक आपला पंजा वर उचलला आणि अशा समयीं नागानें खालीं मान घालून डोळे मिटून वरील प्रकार जो सहन केला,—हें सर्व हे महामांत्रिका! तुझ्या अद्भुत सामर्थ्याचें फल होय!"

तृषार्तैः सारंगैः प्रति जलधरं क्षुरि विरुतं।
घनैर्मुक्ता धारा सपदि पयसस्तान् प्रति मुहुः॥
खगानां के मेघाः क इह विहगा वा जलमुचा-
मयाच्ञो नार्त्तानामनुपकरणीयो न महतां ६०६

"तृषार्त्त झालेल्या पक्ष्यांनीं मेघाकडे पाहून फार आक्रोश केला आणि मेघांनींही त्यांजवर दया करून जलधारांनीं त्यांचा संताप शमविला; आतां वस्तुतः पाहतां मेघ हे पक्ष्यांचे कोण व मेघाचे पक्षी हे कोण? पण जे दुःखित होतात त्यांस सर्वोपाधीं याचना करणें आहे व थोर आहेत त्यांस उपकार करतांना आम किंवा अनाम हा कांहीं एक विचार नसतो!"

शिला बाला जाता चरणरजसा यत्कुलशिशोः।
स एवायं सूर्यः सपदि निजपादैर्गिरि शिलाम् ॥
स्मशानं भूयो भूयो न खलु कुरुते कामपि वधूं ।
कुले कश्चिदुन्यः प्रभवति नरः श्लाघ्यमहिमा ६०७

"ज्या सूर्याच्या कुलांत उत्पन्न झालेल्या एका कुमारानें आपल्या पादस्पर्शीकरून शिलेची स्त्री केली, तो नित्य मणिपर्वतावर पादन्यास करून भ्रमण करीत असतो, पण अद्यापि त्याच्या प्रभावानें एकही स्त्री बनली नाहीं;— तेव्हां हेंच खरें कीं एकाची सर दुसऱ्याला येत नाहीं; नांव करून जाणारा असा पुरुष एकेक कुलांत एकेकदांच होऊन जातो!"

दीप्यंतां ये दीप्ते घटिता मणयश्च वीरपुरुषाश्च॥
देवः स्वविनाशायतु भवति तृणानामिव लघूनां ६०७

" जसे रत्नदीप प्रकाशार्थ निर्माण केलेले असतात त्याप्रमाणें जे शौर्यसंपन्न पुरुष आत्मप्रभाव गाजवण्याकरतां या भूलोकावर सृष्टिकर्त्याने पाठविलेले असतात ते आपलें शौर्य प्रगट करोत; पण त्यांचें पाहून हलक्यानें आपली मर्दुमकी रात्रंदिवस पाहणें हें येरझेऱ्या गणनाप्रमाणें आहे,- केवळ आत्मविनाश हेंच त्यांचें फळ!"

ग्रामण्यनि गजानत्यान् गंधद्विपःकलभोऽपिसन्।
भवनि स्फुरतां वेगोद्रेकं भुजंगशिशोर्विषम्॥
भुवमधिपतिर्बालावस्थोऽप्यलं परिरक्षितुं ।
न खलु वयसा ज्ञात्यैवायं स्वकार्यसहो भरः ६०९

" गंधगज हा नरूण असतांही इतर हत्तींचा पराभव करतो, त्याप्रमाणेंच नागाच्या पोराचें विष वेगेंकरून तीव्रतर असते; तेव्हां यावरून स्पष्ट आहे कीं राजा हा बाल्यावस्थेंत असला तरी त्याच्या अंगीं पृथ्वीला साहा पालण्याचें सामर्थ्य असतें तें वयेंकरून प्राप्त होत नसतें, तर हा जातिगुणच समजायाचा!"

जिह्वैकैव सतामुपैति फणवतां सप्तुश्चतस्रश्च ना-।
सास्यस्यैव विभावसोर्नियमिताः षट्कार्त्तिकेयस्य च॥
पौलस्त्यस्य दृशाननस्य फणिपतेर्जिह्वासहस्रद्वयं।
जिह्वालक्षशतैककोटिनियमो नो दुर्जनानां मुखे ६१०

" सज्जनांस जिव्हा एकच असते, सर्पांस दोन असतात, अग्निदेवास चार आहेत, अग्नीस सात व कार्त्तिकस्वामीस साहा आहेत, रावणास दहा होत्या असें शेषास दोनहजार आहेत; पण दुर्जनांच्या तोंडात किती लक्ष, किंवा कोटी आहेत याचा कोणींच नेम सांगवत नाहीं!"

यः पृष्ठं युधि दर्शयत्यरिभटश्रेणीषु पो वक्रना-।
मस्मिन्नेव विभर्त्ति यश्च किरति क्रूरध्वनिं निष्ठुरः॥
दोषं तस्य तथाविधस्य भजतश्चापस्य गृह्णन् गुणं ।
विख्यातः परमेक एव नृपतिः सीमा गुणग्राहिणां ६११

" हे राजा! तुझ्या गुणग्राहकत्वाचें काय वर्णन करावें? पहा, हे तुझें धनुष्य युद्धाचेठायीं शत्रूवीरसमुदायास आपली पाठ दाखवितें, तुझेच ठायीं आपलें वक्र

त्व प्रगट करनें आणि निष्ठुर होत्सातें क्रूरध्वनि करतें; पण तें असें दोषयुक्त (पक्षीं, भुजाचा आश्रय करणारें) असतांही त्याचा तूं गुण (पक्षीं, दोरी) ग्रहण करतोस!"

नालिंगंति कुचद्वयं भवदिभमोत्तुंगकुंभद्वय-।
त्रासाद्वेणिलतासु नैव दधति प्रीतिं नवासिभ्रमात्॥
भ्रूभंगान् भवदीयदुर्धरधनुर्भीत्या भजंते न ते।
वैरिस्त्रोणिभुजो निजांबुजदृशां भूमंडलाखंडल ६७२

" हे पृथ्वींद्रा! तुझे वैरी तुझ्या हत्तींच्या उंच गंडस्थलाच्या भ्रमानें आपल्या स्त्रियांस आलिंगन करीनातसे झाले, तुझ्या खड्गाच्या भ्रमानें त्यांस स्त्रियांच्या कबरीभाराकडे पाहण्याची प्रीति वाटूं लागली आणि तुझ्या भयंकर धनुष्याच्या भ्रांतीनें त्यांस स्त्रियांच्या भ्रुकुटि भयप्रद होऊं लागल्या आहेत!"

मधुरमिव वदंति स्वागतं भृंगनादै-।
र्नतिमिव फलनम्रैः कुर्वतोऽमी शिरोभिः॥
ननु ददत इवार्घं पुष्पवृष्टिं किरंतः ।
कथमतिथिसपर्यां शिक्षिता शाखिनोऽपि ६७३

"हे आश्रमवृक्ष ही अतिथींची पूजा करावयास शिकले आहेत काय! पहा हे भृंगाच्या गुंजारवानें जणूं काय मधुर भाषणयुक्त स्वागत करतात, फलांनीं नम्र झालेल्या माथ्यांनीं हे जसे काय नमन करतात आणि पुष्पवृष्टीच्या मिषानें अर्घ्यप्रदानच करिताहेतसे दिसतात।"

मकरीविरचनमिश्रा राधाकुचकलशपीडनव्यसनी॥
ऋजुमपि रेखां कुंपन् बल्लववेषो हरिर्जयति॥ ६७४॥

" पत्रावलीची विरचना करण्याच्या मिषानें राधेच्या कुचपीडनाविषयीं लालस आणि सरळरेषा आली असतांही ती मोडून टाकणारा, असा बल्लववेषी हरी जय पावतो!"

कुंभोत्तिस्फूर्जदंभोधर विपुलतडिद्भगंभीरनादै-।
रंभः संभारसंभावनकुतुकिकुलं घातकानां मनुत्पन्॥
ऊर्ध्वं विन्यस्तचंचूपुटमुपरि परिभ्राम्यदुत्तानवातै-।

" मेघांचा गडगडाट व विजांचा चमचमाट पाहून चातकसमुदायास मोठी आशा उत्पन्न झाली कीं आतां जलवृष्टीची रगाडीच रगाडी होऊन जाईल; यास्तव ते उडूं बागडूं लागले व वर आपल्या चोंचा करून झंझावातावरोबर मिसळून भ्रमण करूं लागले; पण सरते शेवटीं मेघांपासून बिचाऱ्यांस एकही जलकण नमा त होऊन लज्जायमान होत्साते सर्व जागच्याजागीं चीप बसले !"

पवनु नभसो गच्छत्वस्तं निमज्जतु वारिधौ।
व्रजतु वरुणागारद्वारं प्रभाभिरनाहतः॥
तदपि नरणिर्दत्वा पादं शिरःस्क महाभृतां ।
दलिननिमिरध्वान्तः प्रातः पुनः सकृदेष्यति ६१६

" सूर्य हा आकाशापासून पवन पावो, अस्तास जावो, समुद्रांत बुडो किंवा नेपाभ होत्साता वरुणगृहाच्या द्वारीं जावो· तरी येवढें निश्चित आहे कीं, तो अंधकारसमूहाचा नाश करून व पर्वतांच्या शिखरांवर पाय देवून पुनः उदयास येणार !"

पक्षद्वंद्वविराजितोऽहममलं मीनान् प्रसेवे सदा ।
पुष्टांगः सकलादिभिः परिवृतश्चंद्रः समः किं मम ॥
सर्वस्थाणुशिरोगतोऽहममलं चंद्रं बको हासते ।
मात्सर्येण दुरात्मकोऽपि सुजनं दृष्ट्वा सदा हासते ६१७

" मी चंद्रप्रमाणें पक्षद्वयानें (दोन्ही अर्थ उघडच आहेत) विराजमान आहे, मी नेहमीं मीनशाली (मत्स्यसमृद्ध; पक्षी, राशिविशेष) भोगीन असतों, शिवाय मी पुष्टांग आहे आणि चंद्राला तर कळा लागतात (मजमधें न्यूनाधिक होत असतो), मग चंद्र माझी बरोबरी कशी करावेल? तसेंच मी सर्व स्थाणूंच्या (वृक्षांचीं खोडें; पक्षी, शिव) शिखरीं वास करतों;—यामप्रमाणें स्वच्छ जो चंद्र त्यास बगळा हा हसतो! सारांश, दुर्जन हा मत्सरभावानें भलत्याजणांच बरोबरी करून त्याचा उपहास करीत असतो!"

समाप्त.

किताबखान्यात

खालीं लिहिलेलीं पुस्तकें मिळतील.

	रु.	आ.	पै.
परशुरामपंत भाऊ पटवर्धन यांचें चरित्र	१		
संस्कृत कविपंचक के० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं केलें तें—			
दंडी, कालिदास, बंधु, बाणभट्ट प्रत्येकास		६	
भवभूति		८	
थोर पुरुषांचे आणि स्त्रियांचे पवाडे		१	८
अनंतफंदीकृत लावण्या			८
धाशिराम कोतवाल	१		
रूपगमार्थदर्शी व्याख्या कालिदास कृत रघुवंश सर्ग दुसरा; शिकण्यास रू-			
लभ होण्यास्तव के० परशुरामपंत तात्या यांनीं तपासून छापविला		७	०
विनोदमहदाख्यायिका		७	२
शिष्यजनविलाप आणि विष्णुनिधन काव्य		६	४
विष्णुगुणादर्श		६	२
विष्णुविरहज्ञानक		६	२
मुंबई इलाख्याचा नकाशा		६	६
हिंदुस्थानचें भूगोलपत्रक		६	९
मुंबई इलाख्याचें भूगोलपत्रक		६	९
मराठी नकाशाचें पुस्तक (नकाशे १३ रंगविलेले)	१	—	८
निबंधमालेंतील सुभाषित		७	४
सुरक्षामाळा		६	४
चातुर्य आणि मनोरंजन		६	५
मनुष्याचें कर्तव्यकर्म		६	६

सुभाषितांचें

शुद्धिपत्र.

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१	१२	चंडद्युतिः	चंडद्युतिर्
१	१८	कोणीं	कोणी
२	१	आहें	आहे
२	२१	धडपणी	धडपणीं
३	५	कोणींच	कोणीच
३	११	तें	तें
३	१३	वाक्पारुष्यांचो-	वाक्पारुष्याचो-
		पकारोऽपि	पकारोऽपि
३	१५	करणारे	करणारें
४	२१	पांचेचे	पाचेचे
४	२४	घानस्तान	धानस्तान
४	२५	महीभृत्	महाभृत्
५	१०	कवी	कवि
५	१५	कवीं	कवि
६	२	सिंहाचे	सिंहाचें
७	६	कवी	कवि
७	१३	कवी	कवि
८	१४	कोणीं	कोणी
९	६	अमसिद्धचं	अमसिद्धच
९	२१	कोणी	कोणीं
१०	७	फेंकलीं	फेंकली
११	२	धार्मिक	धार्मिक
१२	११	सरोवरांशीं	सरोवराशीं
१२	२०	जाणें	जाणे
१४	२१	सुरामन्न कलहः	सुरामन्नकलहः

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१६	१२	शिक्षिनां	शिक्षिना
१७	शेवटीं	नेतव्य मनयोः	नेतव्यमनयोः
		केन न जाते	केन न जाने
१९	१५	नेहेमी	नेहेमीं
१९	२२	मीन·	मीनः
१९	२३	पर्णाशनः	पर्णाशनो
१९	२४	खरों	खरो
२०	४	कांय?	काय?
२०	४	शिवाय	शिवाय
२०	८	काहीं	कांहीं
२०	१८	अन्यंदृविलस-	अन्यंदृविलस-
		त्यरिनापान्	त्यरनापान्
२०	२०	लोणी	लोणीं
२०	शेवटीं	भलं-	भलंकार होय
२१	१६	भर्थान्	भर्थान्
२३	१	कोणी	कोणीं
२३	१४	कठीण	कठिण
२३	२१	पडले	पडलें
२४	१३	हरि	हरिः
२५	१०	पायांशी	पायांशीं
२५	११	कांही	कांहीं
२५	११	कानांशी	कानांशीं
२५	१२	कानांशीं	कानांशीं
२५	१२	लाडीगोडीची	लाडीगोडीचीं

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध	पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
२५	१३	शेवटी	शेवटीं	४२	१६।१७	नेहेमी	नेहेमीं
२६	२२	जहास.	जहाम	४३	१७	नेहेमी	नेहेमीं
२७	२१	कर्णो	कर्णो	४३	१८	नेहेमी	नेहेमीं
२८	६	उघडी	उघडीं	४५	१३	वाग्वादश्चार्थ	वाग्वादश्चार्थ
२८	२०	कृष्ण	कृष्णः			संबंधः	संबंधः
२८	२१	पिककाकयोः	पिककाकयोः	४६	१०	कपोतिकाऽकु	कपोतिकाऽकु
२९	३	अंगुल्याः	अंगुल्या			नलया	लनया
२९	१६	ठायी	ठायीं	४६	११	दृष्ट	दष्ट
३०	२	ठिकाणी	ठिकाणीं	४६	१२	नेनाहनः	नेनाहनस्
३०	११	नावेचे	नावेचें	४६	१५	नाही	नाहीं
३०	१४	नेहेमी	नेहेमीं	४६	२२	सज्जनांचाच	सज्जनांचींच
३१	२	नलिनी	नलिनीं	४६	शेवटीं	पापनांपंच	पापंनापंच
३१	३	कमळे	कमळें	४७	१	पानकाचे	पानकाचें
३१	१०	आहे	आहें	४७	९	नहेमीं	नेहेमीं
३१	१५	।।।	।	४७	२१	दुदशा	दुर्दशा
३२	१५	वैदेहेनि	वैदेहीनि	४८	३	चौरैः	चौराः
३२	१८	कोणीं	कोणी	४९	१४	बुधो	बुधो
३२	१९	मी	मीं	५०	१	फेकलेला	फेंकलेला
३२	२०	फुलांनीं	फुलांनीं	५०	१०	तुझे	तुझें
३७	१६	सुवर्णाचें	सुवर्णाचे	५१	४।५	पहूनःनत्यानर्	यहूनस्तत्यानर्
३८	१८	सांद्रसिंदूरजि-	सांद्रसिंदूरजि-	५१	१६	राहावे	राहावें
		रूपा	रूपा	५१	शेवटीं	दुर्दशा.	दुर्दशा करिनो
३९	११	केस	केंस				त्याप्रमाणें.
४०	१०	केस	केंस	५१	६	मुरारी	मुरारि
४०	२२	तुझे	तुझें	५२	७	मारवी	मारवि
४०	शेवट	पंडितांनी	पंडितांनीं	५३	२	मसगीं	मसंगीं
४१	२	ओलांगलयेऽपि	ओलांगलयेऽपि	५४	४	रविपादैरनिधि	रविपादैरनधि
						हतः	हतः

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
५४	४	आज्ञाये	आज्ञायाये
५४	१८	द्विजिह्वो	द्विजिह्वः
५५	३	सारस्वे	सारस्वें
५६	२	ह्यारे	ह्यारि
५६	९	बहिस्थीयतां	बहिःस्थीयतां
५७	१	तमोऽभिदिनं	तमोभिरुदिनं
५७	४	श्रेष्ठानीं	श्रेष्ठांनीं
५७	१७	मी	मीं
५८	१४	मीमासानिपुणं	मीमांसानिपुणं
५९	२०	पोंवळाची	पोंवळांचीं
५९	२१	मोनी	मोनीं
५९	२३	अर्थोन्	अर्थोन्
६०	१	व्यापाऱ्यी	व्यापाऱ्यां
६०	१६	तपनाय	पतनाय
६३	२१	केस	केश
६६	६	धम्मीलच्युत	धम्मिल्लच्युत
६७	२०।२१	उपायानीं	उपायांनीं
६७	२२	ते	तें
६९	२३	प्रणामांतः	प्रणामांतं
७०	६	कठीण	कठिण
७०	९	ठायी	ठायीं
७०	१३	च्छंदसा	छंदसा
७०	शेवटीं	करने	करनें
७२	१५	पांपरी	पांपरी
७५	३	पुसां	पुंसां
७५	१३	जाणें	जाणे
७६	१०	पडां	पटं

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
७७	२२	देकूण	देकूण
७८	शेवटीं(१)	अधिपत्य	आधिपत्य
७९	२	आवरनान	सांवरनान
७९	१४	वत्सावें	वत्सांवें
७९	२१	मात्रा	मात्रां
८०	१७	पंचेनेऽनिषधि-	पंचेनेऽनिषधि-
		चक:	चकाः
८१	११	वोलाविले	वोलाविलें
८१	१७	पोळ्यांवें	पोळ्यांचें
८१	१८	दोन्ही	दोन्हीं
८२	३।४	स्त्रिपांचीच	स्त्रियांचांच
८३	६	निष्ठचेन	निष्ठेचेन
८३	१	वंचु	वंचु
८३	५	वोंवानून	वोंवांनून
८४	७	कुचनरी	कुचनरीं
८५	१६	ओळावी	ओंठावी
८५	२२	स्त्रियामप्रमाणें	स्त्रियांप्रमाणें
८५	२४।२५	कवीप्रमाणें	कविप्रमाणें
८६	८	सुमहानपोत्सवो	सुमहानुत्सवो
८८	७	ठायी	ठायीं
८८	१६	आठी	आंठी
८८	२१	मा न	मान
८८	२२	सतनमहिमां	सतनमहिमां
८८	२३	[illegible]	[illegible]
८९	१५	देकून	देकून
९०	शेवटीं	आडे	आडें
९१	८	विरळ	विरळाः

शुद्धिपत्र

पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध	पृष्ठ	ओळ	अशुद्ध	शुद्ध
९२	१	हनीनीं	हनींनीं	११९	१६	हसणारा	हंसणारा
९२	१९	मथ्यानि	मथ्यामि	१११	१	कोणी	कोणीं
९२	२०	रसभसंदीना- नमो	सरभसंदीना- नमो	१११	२४	स्वर रोहणं	स्वरारोहणं
९२	२५	मंथनकाचें	मंथानकाचें	११२	१३	सैनक	सेकन
९३	४	जाणें	जाणे	११२	ओवरी	द्रोपांची	द्रोपांचीं
९३	६	जाणें	जाणे	११३	१३	केस	केंस
९३	१९	सरोमद्रवने	सरोमद्रवनें	११३	२३	संरोवरें	सरोवरें
९४	६	कचभारावें	कचभारावें	११४	१	जाणे	जाणें
९५	१२	नपेकरून	नपेंकरून	११५	१५	मुखेनोद्दना	मुखेनोद्दना
९६	२२	प्रवाहि	प्रयाहि	११६	१०	दुनं	द्रुनं
९६	२७।२८	तेथे	तेथें	११६	१४	समे	स मे
९७	४	द्रोपूट असली	द्रोंपूट असलें	११७	१७	कठीण	कठिण
९७	१८	हेही	हेंही	११७	१८।१९	उत्तर उत्तर	उत्तर
१००	२६	अशी	अशीं	११७	२०	कठीण	कठिण
१०१	८	संवदना	संवदनां	११८	२१	यज्ञां	यज्ञां
१०१	१६	ओठाला ओठ	ओंठाला ओंठ	११८	२४।२५	काकपंक्ती	काकपंक्ति
१०१	१७	खुरें	खुरैः	११९	२३	पाश्चत्यचो:	पाश्चात्यचोः
१०१	२१	रंगाचे	रंगांचे	१२०	२२	घडला	घडला
१०२	१०।११	अक्षरें	अक्षरें	१२१	ओवट	विडंबितः	विडंबिताः
१०२	२१	मुखांनी	मुखांनीं	१२२	१०	जागेकरणें	जागेंकरणें
१०२	२२	नमाखु	नमाखु	१२२	१८	ठरवावे	ठरवावें
१०४	१४	पत्र्यांचे	पत्र्यांचें	१२२	२२	नसनें	नसनें
१०७	२	पानसन्ज मिमं	पानसन्जमिमं	१२२	ओवटी	त्यक्ता	त्यक्त्वा
१०७	३	केस	केंस	१२३	२	निन्हा	निन्हीं
१०७	१९	राहना-	राहनात.	१२३	७	केऽनि विरला	केऽपि विरलाः
१०८	१०	ेते	होनें	१२३	१४	आले	आलें
				१२३	२३	सजोंवनी	सजीवनीं